म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. क्र.

# डाळिंबीची उसळ







REFBK-0024521

ना. कृ. सोहोनी

३०५९
24529

ठाणे मराठी ग्रंथसंग्रहालयास—
सप्रेम-भेट
१०।२।६५

**मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.**

**सूचना** :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

20 MAR 1985

20 MAR 1985

(क्रु. मा. पहा)
५०००–३–८४

© ना. कृ. सोहोनी
१० फेब्रुवारी १९८५

मुद्रक :
**सौ. रेखा लिमये,**
श्री अभंग स्टेशनर्स,
तीन पेट्रोलपंप,
ठाणे–४००६०२.

प्रकाशक :
**ना. कृ. सोहोनी,**
उथळसर, ठाणे–४००६०१.

**मूल्य : १५ रुपये**

संदर्भ निबंध
क्र. ३०७९
२५५२१
३।३।८५

# प्रस्तावना

आमच्या ठाणे शहरातील नामवंत विधिज्ञ श्री. ना. कृ. उपाख्य नानासाहेब सोहोनी यांचा माझा ऋणानुबंध चाळीस वर्षांचा तरी आहे. माझ्या वाचण्यात आलेला त्यांचा पहिला लेख महाराष्ट्र सारस्वतकार कै. वि. ल. भावे यांच्यावरील होता. तो मला अतिशय आवडलेला होता. त्यानंतर 'विवेक' साप्ताहिकामधूनही त्यांचे काही लेख मी वाचले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी संबंध असल्याने त्यांचा लोकसंग्रह मोठा पण. संघ मंडळीतले कडवेपण त्यांच्यात अजिबात नसल्याने त्यांच्या वयाची वडिलकी आड न येताही आमचा स्नेह जमत गेला आणि त्यामुळेच बहुधा त्यांच्या मुलींनी त्यांच्या या पहिल्या पुस्तकाला प्रस्तावना लिहिण्याचा मान मला दिला असावा.

वकिलीचा व्यवसाय अन इतर सामाजिक बांधिलक्या सांभाळीत नानासाहेबांनी लेखन केलेले असले तरी त्यांचा मूळ पिंड वाङमयसेवकाचा आहे ही गोष्ट या ग्रंथात त्यांनी लिहिलेल्या व्यक्ती चित्रांवरून माझ्या लक्षात आली. लेखना शिवाय प्रवास अन् पक्षीनिरीक्षणाचा विलक्षण छंदही त्याना आहे. जगन्नाथपुरी, काशी विश्वनाथ, ज्ञानपीठ नालंदा आणि म्हैसूर इत्यादी स्थळांचे वर्णन त्यानी या ग्रंथात अतिशय खुमासदारपणे अन् तपशीलवारपणे केलेले आहे. त्याचप्रमाणे सातभाई, देवपक्षी चक्रवाक, कोकीळ, गरुड व करढोक इत्यादी पक्ष्यांचे त्यांनी केलेले वर्णन अन् सांगितलेली माहिती इतकी नमुनेदार आहे डॉ. सलीम यांच्यासारख्या पक्षीतज्ञालाही ती वेड लाविल इतकी बहारदार आहे. 'अरे, हे तर मुखवटे' या आपल्या ललित निबंधात मुखवटे घालून मिरवणाऱ्या सगळ्या मंडळींचा दंभस्फोट कटुता न आणता अगदी खुसखुशीत शद्बात व कोपरखळ्या मारीत आपल्या खास ढंगात लेखकाने केलेला आहे. प्रसन्न आणि बालबोध शैली हे नानासाहेबांच्या लेखनाचे खास वैशिष्ठ्य. त्यांच्या 'डाळींबीच्या उसळी' चा आस्वाद घेताना वाचकांना कटुतेचा ठसका अजिबात लागणार नाही इतक्या खमंग शैलीत त्यानी आपल्या लेखनाचा डौल सजवलाय.

नानासाहेबांचा खरा पिंड वाङमयोपासकाचा आहे याच्या साक्षी त्यांच्या या ग्रंथामधल्या वाङमयसेवकांच्या व्यक्तिचित्रांमध्ये पहायला मिळतात ऑलिव्हर गोल्डस्मिथ, रियासतकार गो. स. सरदेसाई, वि. कों. ओक व 'केसरी' चे भूतपूर्व संपादक ज. स. उपाख्य तात्यासाहेब करंदीकर या व्यक्तिचित्रांची लेखकाने करून दिलेली ओळख म्हणजे

या ग्रंथाचा गाभा आहे. लेखकाची व्यासंगी वृत्ती या व्यक्तिचित्रांमध्ये ठळकपणे पहायला मिळते ऑलिव्हर गोल्डस्मिथवरील शिलालेख डॉ. जॉन्सनच्या शब्दात सांगण्यात लेखकाने किती औचित्य साधले आहे त्याची जाण इंग्रजी वाङमय वाचणाऱ्यांनाच येईल बारा रियासतींच्या द्वारे भारताचा जवळ जवळ हजार वर्षांचा सुसंगत इतिहास लिहिणाऱ्या रियासतकार सरदेसाई यांची ओळख करून देताना सरजदुनाथ सरकार, वि. का. राजवाडे, चिंतामणराव वैद्य व वासुदेवशास्त्री खरे या विख्यात इतिहास संशोधकांची ओझरती ओळख करून देण्यास ग्रंथकार विसरत नाहीत यावरून इतिहासात तन्मय होण्याच्या त्याच्या वृत्तीची चांगली पछान व्यासंगी वाचकाला खचित होईल. 'बालबोध' मासिकाद्वारे चारशे चरित्रे चारशे कविता व चारशे निबंध लिहिणाऱ्या वि. कों. ओक (१८४०-१९१४) या प्रचंड वाङमय लिहिणाऱ्या वाङमयसेवकाची ओळख ही देखील या ग्रंथाचे भूषण ठरावी. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे एक असामान्य कार्यकर्ते असलेल्या आबा थाणेकरांचे व्यक्तिचित्र ठाणेकरांना चटका लावणारे ठरावे. या ग्रंथातील व्यक्तिचित्रांवरून नानासाहेबांच्या व्यासंगाची जाणीव वाङमय प्रेमिकांना खचित होईल.

वाचन हे एक बौद्धिक खाद्य आहे. सामान्य वाचकांना अत् व्यासंगी वाचकांनाही नानासाहेबांची ही वाङमयरुपी "डाळींबी उसळ" मोठी चविष्ट वाटेल याची मला खात्री वाटते. त्यांच्या या पहिल्या वाङमय अपत्याचे, मराठी वाचक भरघोस कौतुक करतील याविषयी माझ्या मनात तिळमात्रही शंका नाही.

**अरविंद ताटके**

# डाळिंबीची उसळ

ना. कृ. सोहोनी


१. उगाच चार शब्द

२. आम्हा मुलींचे मनोगत

३. ललित लेख १ ते ४१

४. प्रवास वर्णन ४४ ते ९३

५. पक्षी वर्णन ९५ ते १२७

६. व्यक्ति दर्शन १२९ ते १५२


मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
३०७८
२४५२९

# उगीच चार शब्द

सुमारे तीस वर्षांपूर्वी मी विशेषतः " विवेक " मध्ये व क्वचित इतरत्र लेख लिहीण्यास सुरवात केली. मोजलेले नाहीत पण दोनशेच्या आसपास मी लेख लिहिले असावेत. माझ्या लेखात अनेक प्रकार असत. व्यक्तिचित्रे, लघुनिबंध पुस्तक परीक्षणात्मक लेख असत. मला पहिल्यापासून प्रवासाचा भारी सोस. म्हणून प्रवास वर्णन हाही माझ्या लेखांचा विषय झाला होता. पक्षिनिरीक्षण हा माझा छंद. ह्या छंदाच्या झपाट्यात मी तीस चाळीस पक्ष्यांवर लेख लिहिले. मी पक्ष्यांवर लेख लिहितो ही बातमी वाऱ्यावरून आकाशवाणीपर्यंत पोचली. आकाशवाणीवर " कोकिळ " पक्ष्यावर दहा मिनिटे बोलण्याचे निमंत्रण मला मिळाले. एक चिटुकला चेकही मिळाला.

लेख मी लिहीले खरे, पण एकदा लेख लिहून हातावेगळा केला मग मात्र मागे फिरून त्या लेखांकडे पहात नसे. आपल्या लेखांचे कौतुक झालेले ऐकणे हे स्वाभाविकपणे मलांही आवडत असे. पण त्यासाठी खास खटपट करण्याची कला मला अवगत नव्हती त्यामुळे लेख विवेक कचेरीचे पोटमाळ्यावर सुखाने पहुडले होते. त्यांची झोप मोड करून " उत्तिष्ठत, जाग्रत " असे कोणी म्हणण्याचीही शक्यता नव्हती. पण आमच्या कन्या आणि आप्पा दांडेकर यांच्या काय आणि कसे मनात आले नकळे. त्यांनी लेखमुक्तीसाठी मा. राजाभाऊ नेने यांच्याकडे खटपट सुरू केली. लेख मिळवले. त्या लेखांपैकी काही लेखांच्या झेरॉक्स मुद्रा काढल्या. लेख पुन्हा मुद्रणालयाकडे पाठविण्यासाठी लिहिले. मुद्रणालयाकडे लेख पाठवून त्यांची प्रूफे दुरुस्त करण्याचे काम केले. नाना खटपटी आणि उद्योग केले. त्यांनी घेतलेले कष्ट पाहून मी उगीच हे लचांड यांच्यामागे लावले असे वाटून विषाद वाटला. शेवटी त्यांच्या उत्साहात मी सहभागी झालो.

ह्या लेखसंग्रहाला ठेव किंवा अक्षर ठेव अशी चांगली नावे सुचविण्यात आली होती. पण या लेखांचे पंचमेळ स्वरूप असल्यामुळे एका लेखाचे नाव " डाळिंबीची उसळ " हेच पुस्तकाचे नांव पसंत केले.

या लेखांचे पुनर्मुद्रण करण्याकरिता " विवेक " च्या संपादकांनी संमति दिली त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो.

**ना. कृ. सोहोनी**

ॐ

# आम्हां मुलींचे मनोगत

लहानपणी आम्हा मुलींना आमच्या नानांचा आम्हाला खूप धाक वाटायचा. पण नाना जेव्हा मित्रमंडळीत बसलेले असायचे आणि हास्याची कारंजी उडत असायची तेव्हा लक्षात यायचे की ही हास्याची कारंजी नानांच्या बोलण्यातून निर्माण झालेली आहेत. तेव्हा लक्षात आले की आमचे नाना नुसतेच रागीट नाहीत. नानांना प्रवासाची आवड खूप. नाना प्रवासाहून आल्यानंतर आम्ही मुली त्यांना विचारीत असू "नाना प्रवास कसा झाला" तर त्यांचे उत्तर फक्त. चांगला झाला" एवढेच. पण केव्हातरी विवेक साप्ताहिक चाळताना नानांचा लेख पाहण्यात आला आणि तो वाचला म्हणजे त्यातून त्यांच्या प्रवासाचे रसभरीत वर्णन कळायचे.

नानांचे स्नेही श्री. बाळासाहेब जोग घरी आले की विचारणार, काय नाना ट्रीपला केव्हा निघायचे, तुमच्या हातची आमटी बरेच दिवसात खायला मिळाली नाही" तेव्हा लक्षात आले नानांच्या हातात सुग्रणीची करामत पण आहे.

सकाळी अभ्यास करताना रेडिओवर ऐकायला यायचे "आता ठाण्याचे ना. कृ. सोहोनी पक्ष्यांवर आपले विचार मांडतील" तेव्हा समजले पक्षीगण रेडिओकेंद्रात जाऊन पोहोचला आहे.

दोन तीन महिन्यापूर्वी घरातले कांही जुने कागद चाळत बसलो होतो. चाळता चाळता असे लक्षात आले की नानांचे लिखाण पुष्कळ आहे तेव्हा विचार असा आला की हे सर्व विखुरलेले लिखाण एकत्र करावे आणि त्यातून ही पुस्तकाची कल्पना साकार झाली.

ही कल्पना साकार करतांना विवेकचे भूतपूर्व संपादक श्री. राजाभाऊ नेने यांचे खूप मोठे सहाय्य झाले. त्यांनी विवेक कार्यालयांतून नानांचे सर्व जुने लेख मिळवून दिले. तसेच ठाण्याचे प्रसिद्ध लेखक श्री अरविंद ताटके यानी त्या लेखाचे निरीक्षण करून कोणत्या क्रमाने छपाई करावी ह्याचे मार्गदर्शन केले.

नानांचे प्रवासी मित्र श्री. परचुरे हे उत्कृष्ट चित्रकार आहेत. त्यांनी ह्या पुस्तकाच्या सजावटीला खूप मोठा हात भार लावला आहे इतकी सगळी तयारी झाली तरी छपाईचा प्रश्न होता. श्री अभंग स्टेशनर्स ह्या संस्थेच्या चालकांनी थोड्या विलंबाने का होईना पण चांगल्यापैकी छपाई, बांधणी करून हा प्रश्न सोडवला. ह्या बद्दल आम्ही वरील सर्वांचे ऋणी आहोत.

शेवटी एक प्रश्न राहीला. ह्या लेखांच्या संचाला नाव काय द्यायचे? ह्या लेख-संग्रहांत 'डाळिंबीची उसळ" असा एक लेख आहे. शिवाय नानांच्या आवडीचा तो पदार्थ. तेव्हा सर्वानुमते तेच नांव निश्चित झाले. तेव्हा अशी ही "डाळिंबीची उसळ" पुस्तक रूपाने आपल्या समोर ठेवली आहे. कशी वाटली ते सांगा हं!

वरील ऋण निर्देशांत आणखी एका गोष्टीचा उल्लेख करणे अगत्याचे आहे आणि तो म्हणजे हे सर्व लेख पुनर्मुद्रीत करण्यास विवेक साप्ताहीकाच्या संपादक महोदयांनी आपली पूर्ण सहमती दर्शवली आहे.

**वत्सला प्रभाकर दांडेकर**

ठाणे,

**वैशाली विनायक रिसबूड**

दि. २४-१-१९८५

**दिपाली बाळकृष्ण कुलकर्णी**

.... अ नु क्र म णि का ....

ललित लेख--


* डाळिंबीची उसळ
* अजि म्यां पॅसिफिक पाहिला
* ऑलिव्हर गोल्डस्मिथ
* असावे कपडे अपुले छान
* नको, मला प्रसिद्धी नको
* आबांचे फोटो
* काळा चष्मा
* जपणुकीचा मंत्र
* अरे, हे तर मुखवटे


* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

# :: डाळिंबीची उसळ ::

दिवसेंदिवस वयोमान वाढत आहे. परवा श्रावण वद्यात वयात आणखी एका वर्षाची भर पडली. वास्तविक वासना आता कमी व्हायला पाहिजेत नाही का ? पण पदार्थाची रुचि त्यांच्या सेवनाची अनिवार इच्छा कमी होण्याची लक्षणे दिसत नाहीत. एक लहानसे उदादरण. मला आवडणाऱ्या पदार्थांची यादी फार मोठी होईल. पण डाळिंबीची उसळ आहे ना! ती मला अजून भयंकर आवडते. आणि मधून मधून मिळत गेली की बरे वाटते. माझ्या आवडीच्या या पदार्थाचे नांव ऐकताच शिष्ट माणसे अगदी उपहासपूर्वक काय म्हणतील त्याची मला कल्पना आहे "बिचाऱ्या! आवडीच्या पदार्थाचे नांव घ्यायचे ते तरी विचार करून घ्यायचे होतेस. मला बासुंदी आवडते, मोतीचुराचे लाडू आवडतात, माव्याची बर्फी, दुधासाखरेची सहस्रपुटे देऊन सिद्ध केलेली खडी, घीवर मांडे आवडतात, असे म्हणायचे होतेस. पण डाळिंबींची उसळ आवडते असे म्हणून तुझ्या आवडीच्या क्षुद्रपणाचे प्रदर्शन मात्र केलेस. असे कांहीतरी बोलू नये माणसाने लोक हसतात, टीका करतात. टवाळी होते आपली."

आता चवीपटी करून शिष्ट लोकांशी हुज्जत कोण घालीत बसणार ? पण डाळिंबीच्या उसळीची लज्जत ही संशयातीत आहे. मुंबईच्या मामा ताब्यांच्या फराळाच्या दुकानात या पदार्थाची अवीट गोडी ज्यांनी चाखली असेल त्यांना या पदार्थांची वेगळी शिफारस करण्याची आवश्यकता नाही. मामांनी या अस्सल मराठमोळ्या पदार्थांची गुजराथी लोकांना चटक लावली. मुंबईच्या निरनिराळ्या भागात राहणारे गुजराती मामांच्या दुकानी येऊन डाळिंबीची उसळ खात बालगंधर्वांनी मराठी नाटकांची आणि संगीताची गोडी गुर्जर बंधूंना लावली त्यातलाच हा प्रकार होता मग दक्षिणी मामा तांब्यांसारख्या गरीब निरभिमानी माणसाला त्यांच्या या इतर दिग्वीजयाबद्दल पारितोषिक मिळाले असो वा नसो ! इतिहास पारितोषिकाची पर्वा करीत नाही.

ॐ ॐ ॐ

याउप्पर देखील मला माझ्या या आवडीबद्दल कोणी हसणार असतील तर हसोत बापडे ! म्हणतात ना मारणाराचा हात धरता येईल पण हंसणाराचे तोंड दाबून हसे बंद करता येणार नाही. तसा मीही बराच निर्ढावलो आहे आता. हसण्याचे काय मोठेसे घेऊन बसलात ? या डाळिंबींच्या उसळीवरून आईच्या हातचा खरपूस प्रसादही मी एक वेळ खाल्ला आहे. मांजरे माराची आठवण झालीच लागलीच विसरतात असे (माणसे) सांगतात. पण मी नाही विसरणार तो प्रसंग. माझी मुंज झाली त्या वर्षाची गोष्ट. चैत्रात मुंज झालेला मी अगदी ताजा टवटवीत बटू होतो. पुढे श्रावणमास येताच मला भलतीच मागणी येऊ लागली. संपत शनिवारी आंघोळीची बोलावणी. श्रावण सोमवारी आणि

[stamp]

शुक्रवारी जेवायची आमंत्रणे. आणि वरती दक्षिणा. त्या जानव्याने आणि हात दोन हात लांबीच्या लंगोटीने माझ्यात काय कायापालट घडून आला होता भगवान जाणे. माझ्या अंगप्रयत्नातून पुण्य जणू ओसंडत असावे. एरवी वामन द्वादशीच्या दिवशी एका संस्कृत प्राध्यापकाच्या पत्नीने मला घरी बोलावून माझ्या उजव्या पायाचा अंगठा संध्येच्या पळीच्या पाण्यात बुडवून ते पाणी तीर्थ म्हणून प्राशन कशाला केले असते. उरलेले डोळ्याला अंगाला लावले त्यावेळी संस्कृत प्राध्यापकाच्या पत्नीने कदाचित पुढील श्लोकही मनात म्हटला असेल

यत्वगस्थिगतं पापं देहे तिष्ठती मामके ।
पानेनांगुष्ठ तीर्थस्य दत्याग्निरधंधजम् ॥

आमच्या अगदी शेजारची जानकीबाई ही तर मोठी भावीक होती. मला ब्राह्मण म्हणून बोलावण्याची पुण्यपर्वणी ती थोडीच वाया जावू देणार होती! एक दिवस सकाळीच जानकीबाई आमच्या घरी आली आणि आईला म्हणाली.

"यमुताई तुमच्या बाबूला आमच्याकडे उद्या ब्राह्मण धाडा"

आईने होकार दिला. विषय संपला. मला मध्ये तोंड घालण्याची काहीच गरज नव्हती. दुसऱ्या दिवशी जानकीबाईकडे मुकाट्याने जायचे आणि जेवून परत यायचे. पण मी बोलायला नको तरी बोललोच शेवटी—

"जानकीबाई! ब्राह्मण येईन, पण डाळिंबीची उसळ केली पाहिजे हो!"

हे बोलायचा अवकाश. आमच्या आईचा सगळा रोखीचा व्यवहार होता. उधारी बंद तिने माझ्या पाठीत दोन तीन धपाटे घातले आणि धपाटे देता देता म्हणत होती.

"बाळ्या गधड्या! डाळिंबीची उसळ कधी खाल्ली होतीस की नव्हतीस उभ्या जन्मात."

जानकीबाई कळवळली आईच्या तावडीतून मला सोडवून तिने आपल्या पोटाशी धरले आणि आईला म्हणाली.

"कशाला मारलेस बाबूला? लेकरू आहे ते. त्याला काय कळतंय?"

"कळत नाही म्हणूनच मारले. आता पुढच्या वेळेला अगदी चांगले कळेल आपोआप. मुलाना वेळच्यावेळी नीट वळण लावले नाही तर ती बिघडतात."

आईने मला वळण लावण्याचे कामी काही कसूर केली, आपले कर्तव्य बजावले नाही असे मी म्हटले तर मला पाप लागेल. मी गोठा मनस्वी आणि पिळदार मुलगा

असतो तर डाळिंबीच्या उसळीवरून आईने शिक्षा करताच भीष्मप्रतिज्ञा करून मोकळा झालो असतो की "आजपासून उभ्या ह्यातीत डाळिंबीच्या उसळीला मी आणि डाळिंबीची उसळ मला कायमची मुकली. चुकूनही डाळींबी मुखावाटे पोटात गेली तर हा देह पडो!"

पण कसले वळण आणि कसली रीत घेऊन बसला? आई गेली आणि शिस्तही गेली तिच्याबरोबर. मी पुन्हा जसाच्या तसा कोरडा राहिलो. मुंजा मुलगा असतांना जिभेला जी चटक लागली होती तीच मागील अंकावरून पुढे चालू होती लग्न झाले म्हणून चवीत थोडाच फरक पडणार? आज या घडीला देखील तोच मामला आहे. अधून मधून उबळ येते उसळ खायची. अशा वेळी तानमान पाहून हलकेच घरात जाऊन प्रस्तावना करावी लागते—

"ए, परवा रविवार आहे. न विसरता डाळिंब्या कर."

हा सौदा चटकन पटला तर बरे असते नाहीतर कधी कधी निष्कारण सवाल जबाब होतात.

"डाळिंब्या कर? अहो चार दिवसापूर्वी नव्हत्या का केल्या? आताशा झालाय तरी काय तुम्हाला?"

"ए, अती शहाण्ये! नीट आठवण कर चार दिवसापूर्वी शिजवली होतीस ती वालांची डाळ. इतकी वर्षे स्वयंपाक करतेस, तुला वालाची डाळ आणि डाळिंब्या यातला साधा फरक कळू नये?"

"कसला फरक आलाय डाळ तरी वालाची आणि डाळिंब्या तरी वालाच्याच."

"हे पहा मला पोराबाळांच्या देखत मला पुन्हा पुन्हा सांगायची वेळ आणू नकोस. लागेल तेवढे वाल आणून ठेव आणि न सांगताच मधून मधून डाळिंब्या करीत जा. रोजच्या रोज तीच चर्चा बरी दिसत नाही."

एवढ्या नमनानंतर डाळिंब्या होतात. इतकी आपली हिंमत आहे. आमच्या शब्दाला अगदीच हे नाही असे समजण्याचे कारण नाही. एखादे वेळी मात्र डाळिंब्यांचे प्रायश्चित अगोदर घ्यावे लागते. मी कामात असतो, कांही लिहीत अथवा वर्तमानपत्र वाचीत आणि डाळिंब्याची उसळ हवी ना, मग अगोदर डाळिंब्या सोला. कष्ट करा. आधी कष्ट मग फळ. डाळिंब्या सोलायला माझी हरकत नसते हे खाजगी सांगायला काहीच हरकत नसते. लहानपणी ताट भरभरून डाळिंब्या मी बोलता बोलता सोसलेल्या आहेत. अजूनही तयारी आहे. पण डाळिंब्या सोलतांना कोणी पाहिले की मोठी पंचाईत होते.

डाळिंबीची उसळ हे मोठे पक्वान्न नसेल पण ते कसबाचे काम आहे. कोणीही उठावे आणि डाळिंबीची उसळ करावी इतकी सोपी ती नाही. कोणी एक नवखी सूनबाई मला मोदक येतात म्हणून मोदक करायला बसली आणि फसगत झाली तिची माहिती आहे ना ? तिचे मोदक उभे राहिनात. शेवटी तिने सासुबाईना बोलावून सांगितले 'सासुबाई सासुबाई द्रोण आणा.' सासुबाईने कपाळाला हात लावला सारं उकड पूरण वाया गेले. भलत्याने डाळिंब्याची उसळ केली तर ही भानगड होण्याचा संभव असतो डाळिंब्या प्रथम स्वच्छ धुवाव्या लागतात. त्या शिजत लावल्या तरी कमी शिजून चालत नाहीत. उग्र लागतात. जास्त शिजल्या तर गिच्च गोळा होतो. फोडणी वाचून चालत नाही. जास्त तेल खपत नाही. दुसरे एक तंत्र विसरून चालत नाही डाळिंब्या करतांना जिरे आणि भाजलेले खोबरे वाटून वाटण करावे लागते. हे वाटण तर डाळिंब्याचे मणी मंगळसूत्र त्या वाचून उसळ लंकेची पार्वती तशी ओकी दिसते शिवाय तुम्हाला शंभर नंबरी चीज तयार व्हायला हवी असेल तर वेळात वेळ काढून हातचे काम बाजूला ठेऊन स्वयंपाक घरात टेहळणी करून सर्व काही आलबेलं आहे की नाही ते पहावे लागते. मामा तांबे अशी शंभर नंबरी उसळ तयार करीत म्हणून लोक त्यांच्यावर खूष होते.

कहाण्यांच्या पुस्तकात कोणते व्रत केव्हा करावे म्हणजे ते व्रत सुफळ संपूर्ण होते हे प्रामुख्याने सांगितलेले असते. सगळे महत्त्व त्यात आहे. डाळिंबीची उसळ कधी करावी, ह्याचे विषयी फारसे कोणी लीहीलेले आठवत नाही पण डळिंबीची उसळ कधी करावी हे ठरवायला पंचांग पहावे लागते. अशातला भाग नाही. साधा धोपट नियम म्हणजे मनांत डाळिंब्यांची उसळ खाण्याची कुंडलीनी जागृत झाली की तो दिवस योग्य मानावा.

तदेव लग्नं सुदिनं तदेव । तारावलं चंद्रबलं तदेव ॥
विद्याबलं देवबलं तदेव । लक्ष्मीपतेत वगैरे वगैरे समजले की नाही ?

पण डाळिंबीची उसळ कधी करू नये हे सांगणे आवश्यक आहे. रविवारची सुट्टी सरली की सोमवारी कामाचा वाघ तुमच्या मागे हात धुऊन लागतो. बाहेर जाताना अंगरख्याच्या वगैरे गुंड्या लावायची देखील आठवण सामोरे येणाऱ्या माणसाने करून द्यावी लागते. अशा दिवशी डाळिंबीची उसळ करून आपले नुकसान आणि जगाचे हसे कोणीही करून घेऊ नये. 'डाळिंबी उसळ बंद' शाळा कॉलेजच्या विशेषतः वार्षिक परिक्षा जवळ आल्या की हा पदार्थ करणे वर्ज्य समजावे. हल्लीचे युग निवडणुकीचे आहे. म्हणून त्या विषयी सावधगिरीचा इशारा देवून ठेवणे जरूर आहे. मोठ्या निवडणूकीच्या अगोदर दोन मास आणि लहान लहान चिल्लर निवडणुकीचे अगोदर एक मास डाळिंब्याची उसळ सेवन करू नये. केल्यास निवडणूकीत हार खावी लागते. सामान्यपणे असे हे वेळापत्रक आहे. पण प्रत्येकाने परिस्थितीनुसार आपापले वेळापत्रक तयार करावे.

माफ करा. या प्रकरणातले अगदी कलशप्रकरण सांगत असताना मी एक आपलपोटा, माणूसघाणा प्राणी आहे असे वाटण्याचा संभव आहे. पण कृपा करून माझ्याविषयी बरेवाईट मत ठरवण्याची घाई करू नका. डाळिंब्याची उसळ आणि सोबत चांगले सुग्रास पदार्थ केलेले आहेत आणि तुम्ही आता जेवायला बसून अगदी सुरवात करणार आहात. वदनी कवळ घेता नाम घ्या श्रीहरींचे.

सहज हवन होते नाम घेता फुकाचे
जिव करी जिवित्वा अन्न हे पूर्ण ब्रह्म
उदरभरण नोहे जाणि जे यज्ञकर्म ॥

या गोड प्रसंगी मन प्रसन्न राहिले पाहिजे. सावकाशी पाहिजे. मध्ये व्यत्यय येता उपयोगी नाही. बरोबर आहे? मग पुढचे दार पक्के लावून घ्या. गैरसमज करून घेऊ नका. तुमच्या पंक्तीला दहा इष्टमित्र बोलवायचे असले तरी बोलवा. जेवणाच्या अगोदर क्षणभर अगोदर आला त्यालाही पंक्तीचा लाभ द्या.

पण काही माणसांना रविवारी अथवा सणासुदीच्या दिवशी लोक जरा आराम के साथ जेवत असतात. हेच नेमके समजत नाही. तुम्ही चार घास घेत असता इतक्यात कसलेतरी काम घेऊन कोणीतरी तुमच्या दारात टपकतात आणि तुम्हाला जेवताना पाहून म्हणतात देखील—

“हा, चालू द्या, सावकाश, मी बसतो. चालू द्या काय डोंबल? साऱ्या जेवणाचा विचका करणारी ही गोष्ट असते मी तस्सा पान टाकून उठलेला आहे अशावेळी.

डाळिंबीच्या उसळीच्या सुग्रास जेवणाचा हा शत्रू आहे. आपल्या दाराची फळी फोडून हा शत्रू येईलही. काळजी घ्या. डाळिंबीच्या उसळीच्या सेवनचे हे पथ्य आहे.

• • •

त्याने तात्काळ बजावले की "आडवाटेने गलबतांत घुसणाऱ्या भामट्याला मी गलबतावर बिलकूल थारा देणार नाही पहिले बेट लागताच गचांडी मारून उतरवीन मग त्या बेटात कोणी चिटपांखरू असो वा नसो." न्यूनीझला खरोखरच मार्टीनने गलबता बाहेर लोटले असते तर कुठे तरी कुत्र्या-मांजरा सारखे त्याला मरण आले असते. पण ईश्वरी सूत्र निराळे होते.

या घटनेनंतर लवकरच मार्टीनच्या गलबतावरील खलाशांना दुरून स्पेनकडे परत जाणारी तारवे दिसली ती गलबते जवळ आल्यावर पाहतात तो आदल्या वर्षी मोठ्या उमेदीने सुवर्णनगरीची वसाहत करण्यासाठी गेलेल्या अलोझो व डायगो ह्यांची ती तारवे आहेत असे समजले. हीन दीन अवस्थेतील ह्या मंडळीने आपली शोककथा मार्टीनच्या गलबतावरील लोकांस सांगितली डायगो कोठे नापत्ता झाला होता 'आमची पूर्ण वाताहात होऊन आम्ही ७० माणसे कशीबशी जीव घेऊन स्पेनला जात आहोत, असे ते म्हणाले.

हा वृत्तांत ऐकताच 'मनोरथा चल त्या नगरीला' अशा थाटांत निघालेले गलबतावरील गुलहौशी लोक घाबरले सुवर्णनगरीची झाली एवढी सफर बस झाली आता अधीक शहाणपणा नाकरता माघारी जावे असे ठरले. ही घाबरगुंडीची परिस्थिती म्हणजे आपले घोडे पुढे दामटण्याची सुवर्ण संधी आहे. हे न्यूनीझने जाणले त्याने गलबतावरील लोकांना धीर दिला. तो पूर्वीही अमेरिकेच्या सफरीला गेला होता. तो म्हणाला 'रॉडरीग बरोबर केलेल्या सफरीत डेरीअनच्या डोंगराळ मुलुखांत वसाहतीस योग्य जागा असून तेथील नद्यांच्या वाळूत विपूल सोने सापडते हे आपण प्रत्यक्ष अनुभवले आहे. माघारी फिरण्याचे वा घाबरण्याचे कारण नाही.'

ज्यांच्या तोंडचे पाणी पळाले होते त्यांना न्यूनीझच्या ह्या आश्वासनाने पुन्हा धीर आला. डेयरीनच्या रोखाने गलबताचे सुकाणू धरून प्रवास सुरु झाला. न्यूनीझची सद्दी सुरु झाली. ज्याला गचांडी धरून गलबतावरून ढकलून द्यायचा होता तो न्यूनीझ त्याच गलबतावर गणपतराव होऊन बसला.

डेरियनला उतरलाच मार्टीनने हुकूस फर्मावून आपले वजन बसवण्याचा यत्न केला. त्याच्या लोकांना ते हुकूम असह्य होऊ लागले. यावेळी न्यूनीझला आपला म्होरक्या बनवून त्यांनी बंड उभारले बंड सुरु होताच मार्टीन जीव घेऊन पळाला. आता सर्व सत्ता न्यूनीझकडे आली. सत्ता हाती येताच न्यूनीझने मदतनीस विझॉरो यांच्या मदतीने डेरियन भागात धुमाकूळ घातला. तेथील आदीवासींना लुटले त्यांचा छळ केला, त्यांच्या रक्ताचे पाट वाहवले न्यूनीझची एवढी दडस त्या लोकांनी घेतली की ते त्याला सपशेल शरण गेले आदिवासींचा कारेल नामक म्होरक्या होता. त्याला जिंकल्यावर न्यूनीझने त्याला सुळी देण्याचा हुकूम केला. त्याने न्यूनीझची विनवणी करून ईमानदारीने

राहण्याचे वचन दिले. आणखी वरती आपली कन्याही त्याला दिली. कोमागर नांवाचा तेथील आदिवासींचा दुसरा नेताही न्यूनीझचा दोस्त बनला. न्यूनीझचे थाटामाटात स्वागत करून त्याने त्यास ४००० औस सुवर्ण भेट म्हणून दिले. सुवर्णाकरीता न्यूनीझचे लोक आपसांत भांडत, हात घाईवर येत. हे कोमागरने पाहीले. त्याला या लोकांचे आश्चर्य वाटे. त्याना उद्देशून या समारंभाच्या वेळी तो म्हणाला "तुम्हा सारख्या शिकल्यासवरल्यांनी सोन्याकरीता इतके घायकुतीला येणे उचीत नाही. त्या पलीकडच्या डोंगराच्या पलीकडे एक महासागर आहे त्या महासागराला मिळणाऱ्या नद्यांच्या पाण्यात महापूर सोने आहे तेथे जाण्याची वाट जरा अवघड आहे. तरी थोड्या दिवसांच्या प्रयत्नाने तेथे पोहचता येईल.

कोमागाराचे वचन ऐकून न्यूनीझ व त्याचे स्पॅनीश लोक यांस परमावधीचे समाधान वाटले. सुखस्वप्ने पडून तो महासागर आम्ही या चर्मचक्षुनी आता पाहाणार परमेश्वराने युरोपच्या सुधारलेल्या माणसापासून अठ्ठावीस युगे चोरून ठेवलेले हे सुखनिधान आपणास लाभणार आपली कीर्ती दिगंत पोचणार याबद्दल त्याना निश्चिती वाटू लागली आणि हा महासागर शोधून काढल्यावर फर्डीनंड राजाची तरी न्यूनीझला बंडखोर ठरवून सुळी देण्याची काय प्राज्ञा आहे ?

न्यूनीझची राजाला खूष करण्याचीही खटपट चालू होती. कोमागारने दिलेल्या सुवर्णाच्या पंचमांश त्याने राजाकडे पोचता करण्या करीत वेगळा काढला स्पेनमध्ये पालामोटी हा कोषाध्यक्ष होता. त्याचा खिसा भरून राजाकडून आपणास कॅप्टन. जनरल हा हुद्दा मिळविण्याची खटपट केली. दोन विश्वासू माणसे स्पेनला पाठवून आपण राजांची इमाने इतबारे चाकरी इकडे चालवली आहे असा राजाकडे निरोप पोचवण्याची व्यवस्था केली.

इतकी व्यवस्था केल्या नंतर अज्ञात महासागराच्या दिग्विजयाच्या सिद्धतेस न्यूनीझ लागला. न्यूनीझने सर्व वसाहतीची एक सभा भरवली. त्यासभेत पनामा सामुद्रधुनी ओलांडून महासागर शोधून काढण्याचा निश्चय जाहीर केला लोकांस न्यूनीझचा हा धाडशी प्रयोग आवडून त्या सभेतील एकशेनव्वद जवान या मोहिमेत सामील होण्यास सिद्ध झाले.

दि. १ सप्टेंबर १५१३ या दिवशी एकशेनव्वद सैनिकांची तलवारी, भाले, कुऱ्हाडी धनुष्ये इतक्या शस्त्रास्त्रांनी सुसज्ज सेना पनामा ओलांडण्यासाठी निघाली. त्यांनी तेथील आदीवासी ओझेकरी व वाटाड्ये आपल्या बरोबर घेतले होते.

प्रवासाचा पहिला टप्पा विषुववृत्ताच्या प्रदेशांतून असल्यामुळे ऊन मनस्वी होते. रस्ता दलदलीचा व सभोवती दाट जंगल त्यामुळे कुऱ्हाडींनी झाडेझुडपे काटेकुटे

# :: अजि म्यां पॅसिफिक पाहिला ::

आजच्या नावाड्याला पॅसिफिक दर्शनाची अपूर्वायी वा नाविन्य उरलेले नाही. त्याच्या नावांनी ह्या महासिधुचा कानाकोपरा जवळ जवळ नांगरून काढला आहे. वारा पिऊन पुष्ट झालेल्या शिडाच्या तारवांना आणि आगनौकांनी या महासिंधूच्या विशाल कटीखांद्यावर मनसोक्त क्रिडा केली आहे. आज हा पॅसिफिक सर्व सागरापैकीच एक सागरच उरला आहे.

पण सन १५१३ च्या २५ सप्टेंबर या दिवशी वास्को न्यूनीझने डेरियनच्या डोंगर माथ्यावरून पॅसिफिक महासागराचे ततरजत वर्ण रूप पहिल्या प्रथम पहिले त्यावेळी परमात्म्याचा साक्षात्कार होताच अमृतरायाच्या मुखातून " अजि म्यां ब्रह्म पाहिले " अशी पद्मवाणी प्रगटली तसाच काहीसा प्रकार होऊन वास्को न्यूनीझ पण " अजि म्यां पॅसिफिक पाहीला " असा गजर करीत हर्षभराने नाचला असेल

इसवी सन १५०३ च्या अखेरीस कोलंबस पश्चिम द्विपांच्या धाडशी सफरीवरून परतला त्यावेळी सारे सेविल शहर त्याला पाहायला लोटले होते. पश्चिम द्विपाच्या सफरीवरून परत येताना त्याने नाना प्रकारची फळे, नाना जातीचे पशू पक्षी व ताम्रवर्णी माणसेही बरोबर आणली होती. तंबाखु व बटाट्याच्या लागवडीचे रहस्यही त्याने युरोपियन लोकांसाठी आणले होते. सामान्य लोकांच्या झुंडीच्या झुंडी आशाळभूतपणे या नवल परीकडे पहात होत्या.

राजा फरडिनंड, राणीसरकार आणि उमराव मंडळाचे लक्ष कोलंबसाने बरोबर आणलेल्या पेटारे आणि हारे यांजवर खिळून राहिले होते. कारण ते पेटारे सुवर्णानी भरलेले आहेतही बित्तंबातमी त्यांना समजली होती. त्या पेटाऱ्यांच्या आणि डबोल्यांच्या मानाने आत सुवर्ण फार कमी होते ! पण कोलंबस मोठा चाणाक्ष होता. त्याने अशी बतावणी केली की आपण हे सुवर्ण केवळ नमुन्यादाखल आणले आहे. पश्चिम द्विपांत मात्र अपरंपार सुवर्ण आहे. नुसता कुदळीचा घाव घालताच सोन्याच्या लगडी अलगद वर येतात इकडे कथलाला जेवढे मोल आहे तेवढेच मोल तिकडे सुवर्णाला आहे. तेथील राजेरजवाडे सुवर्णाच्या पात्रावाचून इतर वरकड धातूंच्या पात्रांतून पाणीसुद्धा पीत नाहीत.

फरडिनंड राजा हा नेहमीच ओढग्रस्त असे. कोलंबसाचे तोंडून सुवर्णभूमीचा वृत्तांत वाचल्या पासून हे नवे घबाड लवकरच आपल्याला लाभेल अशी सुखस्वप्ने त्याला पडू लागली. सन १५०९ साली आलोंझो व डायगो हे साहसी नावाडे अमेरिकेकडे जाण्यास सिद्ध आहेत असे समजताच फरडीनंडने त्यास पनामाच्या सामुद्रधुनीपाशी वसाहत स्थापण्यास संमती दिली.

आलेझा आणि डायगो यांचे पाठोपाठ सन १५१० मध्ये मार्टीन फर्नान्डेझ नावाच्या एका धनाढ्य माणसाने ही वसाहत स्थापण्यासाठी आपण अमेरिकेत जाऊ इच्छित असल्याचे जाहीर केले. या सफरीसाठी खलाशी आणि वसाहतीसांठी धाडशी व शूर माणसे मार्टीनला हवी होती. मार्टीनच्या हाकेसरशी अमेरिकेत जाऊ पाहणाऱ्या उमेदवारांची कॅडीझ बंदरात एकच दाटी झाली. कॅडीझमध्ये जमलेल्या या सुवर्णमेळाव्यात बहुरंगी लोक होते. अमीर उमरावांना आपले उखळ सुवर्णानें पिवळे करण्याची इच्छा होती म्हणून ते आले होते. जे लोक कर्जाने कुजले होचे त्यांना दारांत कायमचे धरणे धरून बसलेल्या सावकाराच्या पाशांतून मोकळे व्हायची इच्छा होती पोलीसांचा ससेमिरा ज्यांचे मागे होता असे खिसेकापू व बदमाश अमेरिकेत आपले नशीब काढण्याच्या हेतूने तेथे जमले होते. काहीजणांना कजाग बायकांशी संसार करण्याचा कंटाळा आला होता. म्हणून ते म्हणत होचे की अमेरिकेत जाऊन नवा संसार मांडावा. कुदळ मारताच सोन्याच्या लगडी अलगद वर येतात. या कोलंबसाच्या सुवर्णखचीत वाणीने लोक पागल बनले होते. तेथे जमलेल्यांपैकी काही दीडशहाण्यांनी तर खाणीतून कुदळीने खणून काढलेले सुवर्ण वाहण्यां सवरण्यास कष्ट पडू नयेत म्हणून बरोबर खेचरेही आणली होती.

भलेभलतेच लोक मार्टीनच्या गलबतांतून अमेरिकेत जाण्याच्या खटपटीत असल्याचा गवगवा राजाच्या कानापर्यन्त गेला. मार्टीनचे गलबत बंदरा बाहेर नांगरून ठेवण्यात आले होते गव्हर्नराचे शिपाई गलबताकडे कोण कोण जाते येते यावर नीट पाळत ठेवून राहिले होते. या बंदोबस्ताचा जे अलबते गलबते भामटे लोक गलबतात घुसू पहात होते त्यांना मनस्वी संताप आला. अधिकाऱ्यांना शिव्या शाप देत चडफडत ते किनाऱ्यावरच उभे राहीले.

शेवटी मार्टीनचे गलबत कॅडीझमधून निघाले पाठचा वारा असल्याने ते हां हां म्हणता भर समुद्रात शिरले. स्पेनचा किनारा दृष्टी आड झाला. इतक्यात गलबतावर एका एकी एक भलामोठा शिकारी कुत्रा दिसला. ही ब्याद गलबतावर कशी व केव्हा आली हे गूढ कोणालाच उकलेना. एका हडप्या भोवती हा दांडगेश्वर भुंकत भुकत घिरट्या घालीत होता. ह्या आश्चर्य कारक घटनेचे कुतुहल संपण्यापूर्वी त्याहून आश्चर्यकारक घटना गलबतावर घडली बंद असलेला हडपा आपोआप उघडला आणि आतून अंगात चिलखत डोकीत शिरस्त्राण, कमरेला तलवार, व हातात ढाल धारण केलेला तीशीचा एक तरणाबांड गडी बाहेर आला बंदरावर इतर लोक नुसतेच दांत ओठ खात उभे होते. आरडा ओरडा करीत होते. त्या भाऊगर्दीत हडप्यांत बसून या माणसाने आपणास गलबतांत चढवून घेतले होते. गलबत बंदराबाहेर निघेपर्यंत कांही हालचाल न करता तो निमूटपणे हडप्यातच राहिला.

लवकरच गलबतांतील मंडळीनी या व्यक्तीस ओळखले. ह्या धाडसी तरुणांचे नांव वास्को न्यूनीझ हे होते. मार्टीन फर्नांडीस हा कडक शिस्तीचा माणूस होता. न्यूनीझला

# :: अजि म्यां पॅसिफिक पाहिला ::

आजच्या नावाड्याला पॅसिफिक दर्शनाची अपूर्वायी वा नाविन्य उरलेले नाही. त्याच्या नावांनी ह्या महासिधुचा कानाकोपरा जवळ जवळ नांगरून काढला आहे. वारा पिऊन पुष्ट झालेल्या शिडाच्या तारवांना आणि आगनौकांनी या महासिंधूच्या विशाल कटीखांद्यावर मनसोक्त क्रिडा केली आहे. आज हा पॅसिफिक सर्व सागरापैकीच एक सागरच उरला आहे.

पण सन १५१३ च्या २५ सप्टेंबर या दिवशी वास्को न्यूनीझने डेरियनच्या डोंगर माथ्यावरून पॅसिफिक महासागराचे ततरजत वर्ण रूप पहिल्या प्रथम पहिले त्यावेळी परमात्म्याचा साक्षात्कार होताच अमृतरायाच्या मुखातून " अजि म्यां ब्रह्म पाहिले " अशी पद्मवाणी प्रगटली तसाच काहीसा प्रकार होऊन वास्को न्यूनीझ पण " अजि म्यां पॅसिफिक पाहीला " असा गजर करीत हर्षभराने नाचला असेल

इसवी सन १५०३ च्या अखेरीस कोलंबस पश्चिम द्विपांच्या धाडशी सफरीवरून परतला त्यावेळी सारे सेविल शहर त्याला पाहायला लोटले होते. पश्चिम द्विपाच्या सफरीवरून परत येताना त्याने नाना प्रकारची फळे, नाना जातीचे पशू पक्षी व ताम्रवर्णी माणसेही बरोबर आणली होती. तंबाखु व बटाट्याच्या लागवडीचे रहस्यही त्याने युरोपियन लोकांसाठी आणले होते. सामान्य लोकांच्या झुंडीच्या झुंडी आशाळभूतपणे या नवल परीकडे पहात होत्या.

राजा फरडिनंड, राणीसरकार आणि उमराव मंडळाचे लक्ष कोलंबसाने बरोबर आणलेल्या पेटारे आणि हारे यांजवर खिळून राहिले होते. कारण ते पेटारे सुवर्णानी भरलेले आहेतही बित्तंबातमी त्यांना समजली होती. त्या पेटाऱ्यांच्या आणि डबोल्यांच्या मानाने आत सुवर्ण फार कमी होते ! पण कोलंबस मोठा चाणाक्ष होता. त्याने अशी बतावणी केली की आपण हे सुवर्ण केवळ नमुन्यादाखल आणले आहे. पश्चिम द्विपांत मात्र अपरंपार सुवर्ण आहे. नुसता कुदळीचा घाव घालताच सोन्याच्या लगडी अलगद वर येतात इकडे कथलाला जेवढे मोल आहे तेवढेच मोल तिकडे सुवर्णाला आहे. तेथील राजेरजवाडे सुवर्णाच्या पात्रावाचून इतर वरकड धातूंच्या पात्रांतून पाणीसुद्धा पीत नाहीत.

फरडिनंड राजा हा नेहमीच ओढग्रस्त असे. कोलंबसाचे तोंडून सुवर्णभूमीचा वृत्तांत वाचल्या पासून हे नवे घबाड लवकरच आपल्याला लाभेल अशी सुखस्वप्ने त्याला पडू लागली. सन १५०९ साली आलोंझो व डायगो हे साहसी नावाडे अमेरिकेकडे जाण्यास सिद्ध आहेत असे समजताच फरडीनंडने त्यास पनामाच्या सामुद्रधुनीपाशी वसाहत स्थापण्यास संमती दिली.

आलेझा आणि डायगो यांचे पाठोपाठ सन १५१० मध्ये मार्टीन फर्नान्डेझ नावाच्या एका धनाढ्य माणसाने ही वसाहत स्थापण्यासाठी आपण अमेरिकेत जाऊ इच्छित असल्याचे जाहीर केले. या सफरीसाठी खलाशी आणि वसाहतीसांठी धाडशी व शूर माणसे मार्टीनला हवी होती. मार्टीनच्या हाकेसरशी अमेरिकेत जाऊ पाहणाऱ्या उमेदवारांची कॅडीझ बंदरात एकच दाटी झाली. कॅडीझमध्ये जमलेल्या या सुवर्णमेळाव्यात बहुरंगी लोक होते. अमीर उमरावांना आपले उखळ सुवर्णानें पिवळे करण्याची इच्छा होती म्हणून ते आले होते. जे लोक कर्जाने कुजले होचे त्यांना दारांत कायमचे धरणे धरून बसलेल्या सावकाराच्या पाशांतून मोकळे व्हायची इच्छा होती पोलीसांचा ससेमिरा ज्यांचे मागे होता असे खिसेकापू व बदमाश अमेरिकेत आपले नशीब काढण्याच्या हेतूने तेथे जमले होते. काहीजणांना कजाग बायकांशी संसार करण्याचा कंटाळा आला होता. म्हणून ते म्हणत होचे की अमेरिकेत जाऊन नवा संसार मांडावा. कुदळ मारताच सोन्याच्या लगडी अलगद वर येतात. या कोलंबसाच्या सुवर्णखचीत वाणीने लोक पागल बनले होते. तेथे जमलेल्यांपैकी काही दीडशहाण्यांनी तर खाणीतून कुदळीने खणून काढलेले सुवर्ण वाहण्यां सवरण्यास कष्ट पडू नयेत म्हणून बरोबर खेचरेही आणली होती.

भलेभलतेच लोक मार्टीनच्या गलबतांतून अमेरिकेत जाण्याच्या खटपटीत असल्याचा गवगवा राजाच्या कानापर्यन्त गेला. मार्टीनचे गलबत बंदरा बाहेर नांगरून ठेवण्यात आले होते गव्हर्नराचे शिपाई गलबताकडे कोण कोण जाते येते यावर नीट पाळत ठेवून राहिले होते. या बंदोबस्ताचा जे अलबते गलबते भामटे लोक गलबतात घुसू पहात होते त्यांना मनस्वी संताप आला. अधिकाऱ्यांना शिव्या शाप देत चडफडत ते किनाऱ्यावरच उभे राहीले.

शेवटी मार्टीनचे गलबत कॅडीझमधून निघाले पाठचा वारा असल्याने ते हां हां म्हणता भर समुद्रात शिरले. स्पेनचा किनारा दृष्टी आड झाला. इतक्यात गलबतावर एका एकी एक भलामोठा शिकारी कुत्रा दिसला. ही ब्याद गलबतावर कशी व केव्हा आली हे गूढ कोणालाच उकलेना. एका हडप्या भोवती हा दांडगेश्वर भुंकत भुकत घिरट्या घालीत होता. ह्या आश्चर्य कारक घटनेचे कुतुहल संपण्यापूर्वी त्याहून आश्चर्यकारक घटना गलबतावर घडली बंद असलेला हडपा आपोआप उघडला आणि आतून अंगात चिलखत डोकीत शिरस्त्राण, कमरेला तलवार, व हातात ढाल धारण केलेला तीशीचा एक तरणाबांड गडी बाहेर आला बंदरावर इतर लोक नुसतेच दांत ओठ खात उभे होते. आरडा ओरडा करीत होते. त्या भाऊगर्दीत हडप्यांत बसून या माणसाने आपणास गलबतांत चढवून घेतले होते. गलबत बंदराबाहेर निघेपर्यंत कांही हालचाल न करता तो निमूटपणे हडप्यातच राहिला.

लवकरच गलबतांतील मंडळीनी या व्यक्तीस ओळखले. ह्या धाडसी तरुणांचे नांव वास्को न्यूनीझ हे होते. मार्टीन फर्नांडीस हा कडक शिस्तीचा माणूस होता. न्यूनीझला

त्याने तात्काळ बजावले की "आडवाटेने गलबतांत घुसणाऱ्या भामट्याला मी गलबतावर बिलकूल थारा देणार नाही पहिले बेट लागताच गचांडी मारून उतरवीन मग त्या बेटात कोणी चिटपांखरू असो वा नसो." न्यूनीझला खरोखरच मार्टीनने गलबता बाहेर लोटले असते तर कुठे तरी कुत्र्या-मांजरा सारखे त्याला मरण आले असते. पण ईश्वरी सूत्र निराळे होते.

या घटनेनंतर लवकरच मार्टीनच्या गलबतावरील खलाशांना दुरून स्पेनकडे परत जाणारी तारवे दिसली ती गलबते जवळ आल्यावर पाहतात तो आदल्या वर्षी मोठ्या उमेदीने सुवर्णनगरीची वसाहत करण्यासाठी गेलेल्या अलोंझो व डायगो ह्यांची ती तारवे आहेत असे समजले. हीन दीन अवस्थेतील ह्या मंडळीने आपली शोककथा मार्टीनच्या गलबतावरील लोकांस सांगितली डायगो कोठे नापत्ता झाला होता 'आमची पूर्ण वाताहात होऊन आम्ही ७० माणसे कशीबशी जीव घेऊन स्पेनला जात आहोत, असे ते म्हणाले.

हा वृत्तांत ऐकताच 'मनोरथा चल त्या नगरीला' अशा थाटांत निघालेले गलबतावरील गुलहौशी लोक घाबरले सुवर्णनगरीची झाली एवढी सफर बस झाली आता अधीक शहाणपणा नाकरता माघारी जावे असे ठरले. ही घाबरगुंडीची परिस्थिती म्हणजे आपले घोडे पुढे दामटण्याची सुवर्ण संधी आहे. हे न्यूनीझने जाणले त्याने गलबतावरील लोकांना धीर दिला. तो पूर्वीही अमेरिकेच्या सफरीला गेला होता. तो म्हणाला 'रॉडरीग बरोबर केलेल्या सफरीत डेरीअनच्या डोंगराळ मुलुखांत वसाहतीस योग्य जागा असून तेथील नद्यांच्या वाळूत विपूल सोने सापडते हे आपण प्रत्यक्ष अनुभवले आहे. माघारी फिरण्याचे वा घाबरण्याचे कारण नाही.'

ज्यांच्या तोडचे पाणी पळाले होते त्यांना न्यूनीझच्या ह्या आश्वासनाने पुन्हा धीर आला. डेयरीनच्या रोखाने गलबताचे सुकाणू धरून प्रवास सुरु झाला. न्यूनीझची सद्दी सुरु झाली. ज्याला गचांडी धरून गलबतावरून ढकलून द्यायचा होता तो न्यूनीझ त्याच गलबतावर गणपतराव होऊन बसला.

डेरियनला उतरलाच मार्टीनने हुकूस फर्मावून आपले वजन बसवण्याचा यत्न केला. त्याच्या लोकांना ते हुकूम असह्य होऊ लागले. यावेळी न्यूनीझला आपला म्होरक्या बनवून त्यांनी बंड उभारले बंड सुरु होताच मार्टीन जीव घेऊन पळाला. आता सर्व सत्ता न्यूनीझकडे आली. सत्ता हाती येताच न्यूनीझने मदतनीस विझॉरो यांच्या मदतीने डेरियन भागात धुमाकूळ घातला. तेथील आदीवासींना लुटले त्यांचा छळ केला, त्यांच्या रक्ताचे पाट वाहवले न्यूनीझची एवढी दडस त्या लोकांनी घेतली की ते त्याला सपशेल शरण गेले आदिवासींचा कारेल नामक म्होरक्या होता. त्याला जिंकल्यावर न्यूनीझने त्याला सुळी देण्याचा हुकूम केला. त्याने न्यूनीझची विनवणी करून ईमानदारीने

राहण्याचे वचन दिले. आणखी वरती आपली कन्याही त्याला दिली. कोमागर नांवाचा तेथील आदिवासींचा दुसरा नेताही न्यूनीझचा दोस्त बनला. न्यूनीझचे थाटामाटात स्वागत करून त्याने त्यास ४००० औंस सुवर्ण भेट म्हणून दिले. सुवर्णाकरीता न्यूनीझचे लोक आपसांत भांडत, हात घाईवर येत. हे कोमागरने पाहीले. त्याला या लोकांचे आश्चर्य वाटे. त्याना उद्देशून या समारंभाच्या वेळी तो म्हणाला "तुम्हा सारख्या शिकल्यासवरल्यांनी सोन्याकरीता इतके घायकुतीला येणे उचीत नाही. त्या पलीकडच्या डोंगराच्या पलीकडे एक महासागर आहे त्या महासागराला मिळणाऱ्या नद्यांच्या पाण्यात महापूर सोने आहे तेथे जाण्याची वाट जरा अवघड आहे. तरी थोड्या दिवसांच्या प्रयत्नाने तेथे पोहचता येईल.

कोमागाराचे वचन ऐकून न्यूनीझ व त्याचे स्पॅनीश लोक यांस परमावधीचे समाधान वाटले. सुखस्वप्ने पडून तो महासागर आम्ही या चर्मचक्षुनी आता पाहाणार परमेश्वराने युरोपच्या सुधारलेल्या माणसापासून अठ्ठावीस युगे चोरून ठेवलेले हे सुखनिधान आपणास लाभणार आपली कीर्ती दिगंत पोचणार याबद्दल त्याना निश्चिती वाटू लागली आणि हा महासागर शोधून काढल्यावर फर्डीनंड राजाची तरी न्यूनीझला बंडखोर ठरवून सुळी देण्याची काय प्राज्ञा आहे ?

न्यूनीझची राजाला खूष करण्याचीही खटपट चालू होती. कोमागारने दिलेल्या सुवर्णाच्या पंचमांश त्याने राजाकडे पोचता करण्या करीत वेगळा काढला स्पेनमध्ये पालामोटी हा कोषाध्यक्ष होता. त्याचा खिसा भरून राजाकडून आपणास कॅप्टन. जनरल हा हुद्दा मिळविण्याची खटपट केली. दोन विश्वासू माणसे स्पेनला पाठवून आपण राजांची इमाने इतबारे चाकरी इकडे चालवली आहे असा राजाकडे निरोप पोचवण्याची व्यवस्था केली.

इतकी व्यवस्था केल्या नंतर अज्ञात महासागराच्या दिग्विजयाच्या सिद्धतेस न्यूनीझ लागला. न्यूनीझने सर्व वसाहतीची एक सभा भरवली. त्यासभेत पनामा सामुद्रधुनी ओलांडून महासागर शोधून काढण्याचा निश्चय जाहीर केला लोकांस न्यूनीझचा हा धाडशी प्रयोग आवडून त्या सभेतील एकशेनव्वद जवान या मोहिमेत सामील होण्यास सिद्ध झाले.

दि. १ सप्टेंबर १५१३ या दिवशी एकशेनव्वद सैनिकांची तलवारी, भाले, कुऱ्हाडी धनुष्ये इतक्या शस्त्रास्त्रांनी सुसज्ज सेना पनामा ओलांडण्यासाठी निघाली. त्यांनी तेथील आदीवासी ओझेकरी व वाटाड्ये आपल्या बरोबर घेतले होते.

प्रवासाचा पहिला टप्पा विषुववृत्ताच्या प्रदेशांतून असल्यामुळे ऊन मनस्वी होते. रस्ता दलदलीचा व सभोवती दाट जंगल त्यामुळे कुऱ्हाडींनी झाडेझुडपे काटेकुटे

झाडीत त्यांस रस्ता सुधारावा लागत होता. रात्री आदीवासीचे हल्ले होण्याची भीती त्यामुळे जागावे लागे. दिवसा एकीकडे अंगातून घाम निथळून जिवाची तलखली होई. एकीकडे तहानेने जीव व्याकूळ होत असे. मध्येच आगावू सुगावा न देता आकाशांतून मुसळधार पाऊस कोसळे व नद्यांस उतार मिळेनासा होई. अंगावरील कपडे घामाने कुसू लागले. पायांत काटे भरून पाय जड झाले होते. पहिल्या आठवड्यातच सर्वांची शक्ती क्षीण झाली. एकशे नव्वदांतले पुष्कळसे लोक उठवणीला आले त्यांना मागे ठेवून निवडक लोकांनीशी न्यूनीझ पुढे सरकला.

आता चढाव सुरु झाला. जंगल विरळ झाले. अठरा दिवसांची पायपीट व वनवास भोगल्यावर आपत्ती कमी होण्याची सुचिन्हे दिसू लागली. इतक्यात एक आदिवासी होडीवाला शंभर माणसांना घेऊन न्यूनीझच्या लोकांवर चाल करून आला. न्यूनीझवर अर्थात आदिवासींचा हा कांही पहिलाच हल्ला नव्हता. त्याने आदिवासी लोकांशी लढण्याचे एक तंत्र अनुभवाने पक्के केले होते. आदिवासींना आगीचे लेळ सोडणाऱ्या अस्त्रांची व आपटबारासारखे बार काढणाऱ्या शस्त्रांची माहीती नव्हती त्या अस्त्रांना ते फार भीत तोच प्रयोग न्यूनीझने करताच हे टोळीवाळे जीव घेऊन पळत सुटले. पळणाऱ्या शत्रुवर वास्तवीक दया केली पाहिजे. परंतु पुरा धाक बसवण्यासाठी त्याने आपल्या शिकारी कुत्र्यास त्यांचे अंगावर सोडले. पकडलेल्या लोकांस कुत्र्यापुढे फेकताच कुत्र्यांनी त्यांस फाडून काढले. न्यूनीझ म्हणतो आपण ज्या दिग्वीजयार्थ निघालो आहोत तो इतका अपूर्व आहे आणि लोकोत्तर आहे की त्याचे पुर्ततेसाठी खून रक्तपात ह्यासारख्या गोष्टी अगदी क्षम्य आहेत. शेवटी त्या टोळीवाल्यास जिंकून न्यूनीझची दिग्वीजयी टोळी अगदी शेवटच्या टप्प्यापर्यंत येऊन पोचली.

इतक्यात त्याच्या बरोबरच्या वाटाड्याने डोंगरावरील एका उंच टेकडावरून मार डेल सुर उर्फ पॅसिफिक महासागर दिसतो असे सांगितले. शिल्लक राहीलेल्या सदुसष्ट लोकांस घेऊन त्या टेकडाकडे न्यूनीझ वळला. अगदी वर जाण्यापूर्वी त्याने आपल्या अनुयायांना थोडा वेळ मागे राहाण्याचीच आज्ञा केली. मार डेल सूर पहिल्या प्रथम पाहणारा युरोपीयन, पहिला ख्रिश्चन असा आपल्या नांवाचा जयजयकार यावच्चंद्र दिवाकरौ राहावा अशी इच्छा होती. या सोहळ्यात सदुसष्ट भागीदार उत्पन्न करण्याची न्यूनीझची बिलकूल इच्छा नव्हती.

उजव्या हातात तलवार घेऊन डाव्या हाताने स्पेनचा ध्वज वाऱ्यावर फडकावीत एक एक पाऊल सावकाश उचलीत तो टेकडीच्या शिखराकडे चालला होता आता अगदी अखेरची दहा पाच पावले टाकताच आपण डोंगराच्या आणि वैभवाच्या शिखरावर एकदम येऊन पोचलो असे न्यूनीझला वाटले. उतरणी वरील हिरव्यागार वृक्षांच्या शेंडया पलिकडे दूरवर त्याने दृष्टी टाकली आणि—

सप्तरजत वर्णाने झळाळणाऱ्या पॅसिफिक महासागराचे रुप त्याच्या दृष्टीस पडले. त्या दिप्तीमान सागररुपाकडे अनिमिष नेत्रांनी तो सारखा पहात राहिला

थोड्या वेळाने त्याने आपल्या सवंगड्यास साद घातली. आनंदाच्या धुंदीत नाचत जयध्वनीचा गजर करीत ते पॅसिफिक वीर टेकडीच्या माथ्यावर आले. त्यांच्यापैकी एकाने एक वृक्ष तोडला व त्याचा क्रुस बनविला व तो त्या टेकडीवर उभारला. नंतर सर्वांनी आपणास पॅसिफिक महासागर शोधून काढण्याची शक्ती दिल्याबद्दल परमेश्वराचे पुन्हा पुन्हा आभार मानले. न्यूनीझने अँड्रेज या लेखका करवी एका कागदावर लॉर्ड न्यूनीझने हा महासागर प्रथम पाहून नंतर आपल्या संवगड्यास तो दाखवला असा वृत्तांत लिहून घेतला पॅसिफिक महासागराने दि. २५ सप्टेंबर १५१३ या दिवशी युरोपपासून चोरून ठेवलेले आपले रूप चोरून घरात शिरलेल्या न्यूनीझपुढे प्रकट केले.

[ स्टिवन झ्वाईगचे " फ्लाईट इन्टु इम्मॉर्टलरी " या निबंधावर आधारलेला ]

# :: ऑलिवर गोल्डस्मिथ ::

आपल्या प्रतिभेच्या तेजस्वी दीप शिखेने इंग्रजी सारस्वताच्या दाही दिशा उजळून टाकणाऱ्या आलिवर गोल्डस्मिथचा नामघोष इंग्लीश घराघरांतून घुमून राहीला असल्याचे आजही आपल्याला ऐकू येते. सव्वादोनशे वर्षाहून अधिक कालावधी लोटूनही त्याच्या प्रासादिक गद्य व पद्य कृतीवर रसिकांच्या चित्तवृत्ती जडून राहिल्या आहेत. भ्रमर सुमन कलिकेत जे गुंतून पडले आहेत ते तेथून हलायला तयार नाहीत

इंग्लंडातील घालमेलीच्या काळांत कांही इंग्लीश कुटुंबे आयर्लंडमध्ये जावून स्थाईक झाली. गोल्डस्मिथ कुटुंब त्यापैकी होते. चार्लस हा गोल्डस्मिथचा बाप एडीसनच्या शाळेत याज्ञिकी शिकायला त्याला पाठवण्यात आले होते. त्या रूक्ष विषयात त्यांचे मन रमेना. कारण ते गुरुकन्येवर बसले होते. लवकरच गुरुजींनी आपल्या चेल्याच्या हातावर कन्यादानाचे उदक सोडले. वर त्याला पालास गांवची लहानशी उपाध्ये वृत्तीही मिळाली. तथापी चाळीस पौंडाच्या वार्षीक उत्पन्नातून चार्लसचा संसार चालणे कठीण होते.

पालास गांवी १६२८ मध्ये आलीवरचा जन्म झाला. मुलाचा पायगुण म्हणा किंवा योगायोग म्हणा आलीवरच्या जन्मानंतर थोड्याच दिवसात चार्लस बाबाचा एक चुलत सासरा होता तो वारला. तोही उपाध्यायच होता. त्याच्या मृत्युनंतर त्याची वृत्ती अचानक जावईबापूंना मिळाली. लककरच आपले कोंपर चार्लस बाबाने सोडले. बिऱ्हाड घेऊन तो लियॉस ह्या हमरस्त्यावरील एका खेड्यात आला आणि एका प्रशस्त घरात राहू लागला. पूर्वीच्या चाळीस पौंडाच्या क्षुद्र वृत्तीचे मानाने नवे दोनशे पौंडाचे :वर्षासन चार्लस बाबाला मोठे घबाड वाटले असल्यास नवल नाही. चार्लस हा प्रेमळ पण जरा सनातनी वळणाचा माणूस होता. 'विकार ऑफ वेकफिल्ड' या कादंबरीत वेकफिल्डच्या बापाचे जे अप्रतिम पात्र रंगवले आहे त्यामुळे गोल्डस्मिथने आपल्या पित्याची स्मृती अमर करून ठेवली आहे.

आलिवरचे घरी एलिझाबेथ डेलाप नांवाची मोलकरीण होती. तिचा ऑलिववर जीव होता. तिने त्याची मुळाक्षरे घटवून घेतली. थॉमस बायर्न नांवाचा एक सैन्यातला पेन्शनर त्या गांवी रहात असे. त्याने बसल्या बसल्या उद्योग हवा म्हणून एक तात्या पंतोजी शाळा चालवली होती. त्या शाळेत सातव्या वर्षी ऑलिवर जाऊ लागला. थॉमस गुरुजी मुलांकडून जुजबी लिहिणे, वाचणे गणित वगैरे विषय करून घेई. त्याचे स्वताचे शिक्षण विशेष झालेले नसले तरी तो मोठा बहुश्रुत आणि गोष्टी वेल्हाळ होता मुलांना भुताखेताच्या पऱ्यांच्या शिलेदारांच्या पराक्रमाच्या हल्ले वेढे व युद्धाच्या रसभरीत गोष्टी सांगे. जुनी आयरीश गाणी व कवने त्याला मुखोद्गत असत. आणि तो धडा धडा

मुलांस ती म्हणून दाखवी. त्यामुळे शाळकरी मुलांना तो मोठा गान भास्कर भासायचा गोल्डस्मिथने आपल्या "डेझर्टेड व्हिलेज" ह्या काव्यांत ऑबर्नच्या ह्या गुरुजीचे अविस्मरणीय चित्र रंगवले आहे.

थॉमस गुरुजींच्या शाळेतले अध्ययन संपल्यावर ऑलिवर दुसऱ्या शाळेत गेला. या शाळेत त्याला बऱ्याच हालअपेष्टा सहन कराव्या लागल्या. आणि जर गोल्डस्मिथच्या वर्णनावरून तो एक गोंडस आणि सोनचाफ्याच्या फुलाप्रमाणे गोरापान मुलगा असेल अशी कल्पना आपल्याला चाटून जाते. पण प्रत्यक्ष परिस्थिती वेगळीच होती. तो एक बुट बांयंगण, बेढब, त्यातच थोडा वेंधळा आणि कुरुप मुलगा होता. ब्रह्मदेवाने रुपाचे बाबतीत त्याच्यावर एवढा सुड उगवल्यावर शितळादेवी बऱ्या गप्प बसतील ? त्यानीही ऑलिवरच्या सर्वांगावर देवीच्या वणाचे सारवण घालून ठेवले शाळेतली वात्रट कार्टी या कुरुप मुलाला हजार नांवे आणि टिकल्या ठेवीत. कोणी त्याला ठोंब्या म्हणत, कुणी काळा रोम तर कुणी इसाप नांवाने त्याला हांक मारीत.

सतराव्या वर्षी डब्लीनच्या ट्रिनीटी कॉलेजांत ऑलिवर गेला. यावेळी चार्लस बाबाकडून फारशी त्याला मदत होत नसावी. कारण कॉलेजात थोडे काम करण्याच्या अटीवर शुल्क माफी मिळवून तो तेथे गेला होता. कुठे झाडलोट कर तर कुठे वाढू सवरू लागे. असे काम त्याला करावे लागे. ह्या सवलतीचा लाभ घेऊन अनेक मंडळी पुढे चांगली सरसावली. कोणी मोठे न्यायाधीश झाले, कोणी धर्माधिकारी बनले. गोल्डस्मिथने फुकट जेवणखाण व शुल्क माफी मिळवण्यापलिकडे या सुवर्ण संधीचा लाभ घेतल्याचे दिसत नाही. अभ्यासाकडे त्याचे सदा दुर्लक्ष असायचे.

डब्लीनच्या पदवी परिक्षेत कसाबसा तो उत्तीर्ण झाला. पण तेवढ्यात त्याचे वडील चार्लस वारले. ऑलिवर आता चांगला एकवीस वर्षाचा होता, तथापि कॉलेजात झकास कपडे घालणे, पत्ते झोडणे, अलगुजावर गाणी म्हणणे, आणि लांब लांब गोष्टी सांगणे या पलीकडे त्याने कांहीच केले नाही. आता तर कांही तरी पोटापाण्याचा उद्योग पहाणे त्याला जरुरीचे होते. त्याने रोजगार मिळवण्याची पांचदहा ठिकाणी खटपट केली पण सर्वच ठिकाणाहून नकार मिळाला. शिवाय कांही ठिकाणी ऑलिवरच्या विक्षिप्तपणामुळे त्याला नोकरी मिळू शकली नाही. त्याला धर्मशिक्षकाचे जागेकरीता बोलावणे आले. पण त्यावेळी लालशेंदरी कपडे घालून कचेरीत तो हजर झाला. हे ध्यान पाहून त्याला तेथील अधिकाऱ्यांनी घरचा रस्ता सुधारण्यास सांगितले, एकदा अमेरिकेत त्याने जावे म्हणून आप्तमंडळींनी ३० पौन्ड जमा करून कार्कला पाठवावे. इकडे मंडळी हा अमेरिकेला गेला असे समजली. चार सहा दिवसांनी हे दिवटे रडत परत आले. आपण एका चहापार्टीत बसलो होतो. तेवढ्यात गलबतवाल्याने गलबात सोडले अशी सबब त्याने सांगितली.

पुन्हा एकदा थातुर मातुर करून ऑलिवरने वकिलीचा अभ्यास करावा म्हणून एका भल्या गृहस्थाने पन्नास पौण्ड त्याला दिले. ते सर्वच्या सर्व त्याने जुगारात घालवले. पुढे वैद्यकिचा अभ्यास करायचा निश्चय करून तो लीडच्या युनिव्हर्सीटीत गेला. पण तेथेही पदवी परीक्षेला न बसता एकाएकी तेथून चालता झाला. त्याला काय दुर्बुद्धी आठवली कोणास ठावूक पण नंतर कांही वर्षे अलगुजावर गाणी वाजवून दाखवून तो पोटाला मिळवू लागला. फ्रान्स फ्लॅण्डर्स वगैरे ठिकाणी तो हिंडला. शेतकरी लोकांना मुरलीच्या नादाने त्याने नादावून सोडले. त्यामुळे अन्नउदकाची पंचाईत जरी त्याला पडली नाही तरी अशा लाजिरवाण्या भिक्षांदेहिच्या मार्गाचा त्याने का अवलंब केला होता ते कळण्यास मार्ग नाही. शेवटी पुन्हा गाडे ठिकाणावर येऊन पॅडुआ या इटालियन विद्यापीठाची वैद्यकीय पदवी परीक्षा तो पास झाला. पण त्याच्या पदवीला कोणी पुसेना; आणि धंद्याचा जम काही बसेना. काही दिवस औषधे तयार करून त्याने विकली, पुस्तके विकण्याचा धंदा करून पाहिला. ईस्ट इंडिया कंपनीत नोकरी पत्करली. ती सुटल्यावर नाटक कंपनीत शिरूनही त्याने पाहिले. पण नट म्हणून नांव कमवण्याची सोय परमेश्वराने ठेवलीच नव्हती. अगदी हताश होऊन शेवटी लेखक होण्याचे त्याने निश्चित केले.

ᘏ ᘏ ᘏ

त्यावेळी लेखनकला अगदी विपन्नावस्थेत होती. लेखकांचे हाल कुत्रा खात नसे. आठ आठ तास राबूनही पोटाला मिळण्याची त्यांना भ्रांत असे. लेखक मंडळी बहुतेक कर्जबाजारी असत. त्यांना कर्जापायी बेलीफाचे धरणे केव्हा येईल त्याचा पत्ता नसे.

सहा वर्षे नेटाने लेख लिहिण्याचा सपाटा गोल्डस्मिथने ठेवला होता. ते सर्व लिखाण निनावी असे. स्मॉलिटचे ब्रिटिश मॅगझीन, न्यू बरीचे 'पब्लीक लेजर' या मासिकातून तो लिही. या उमेदवारीच्या काळात त्याने विपुल लिखाण केले. त्यापैकी 'पब्लीक लेजर' मध्ये क्रमशः प्रसिद्ध झालेले पुढे "सिटिझन ऑफ दि वर्ल्ड" या नांवाने प्रसिद्धी पावले. त्याने ह्यूम आदि करून लेखकाचे इतिहास वाचून इंग्लंडचा इतिहासही लिहिला. त्याचे लिखाणात दुसरे काही नसले तरी आकर्षक मांडणी आणि मनोवेधक भाषा असे. त्यामुळे तो लवकरच लोकप्रिय लेखक झाला.

लोकप्रिय लेखक होताच त्यावेळच्या अग्रगण्य लोकांत त्याची उठबस होऊ लागली. जेवणे पार्ट्या होऊ लागल्या. मुळच्या ओढगस्ती जीवनाला आणखी जोड मिळाली.

त्याच्या "विकार ऑफ वेकफिल्ड" या कथेची जन्मकथा मनोरंजक आहे. ओढगस्तीच्या एका कठीण प्रसंगाचेवेळी हे अद्वितीय पुस्तक जगासमोर आले. लंडनमधल्या त्याच्या जागेचे भाडे खूप थकले. मालकीणबाईने शेरिफाला बोलावून जप्तीची तयारी

केली. गोल्डस्मिथने त्याचा निर्वाणीचा सखा डॉ. जॉनसनला तांतडीने पैसे घेऊन बोलावले. जॉनसनने एक गिनी माणसांबरोबर पुढे पाठवून आपण मागावून येतो असे कळवले. जॉनसन येईपर्यंत हे रावसाहेब झिंगून तर्र झाले होते. कोणी सांगतात की ऑलिवरने मालकीणबाईलाही थोडे मद्य घेण्यास विनविले. जॉनसनने हे वर्तमान पाहताच गोल्डस्थिमला चांगले फैलावर घेतले. मद्याचे बाटलीचे बूच घट्ट बसवून त्याने ती आपल्या हातात घेतली. इतक्यात प्रसंगावधान राखून "मजपाशी एका कादंबरीचे हस्तलिखित आहे, ते पहा" असे ऑलिवरने जॉनसनला सांगितले. जॉनसनला ते पुस्तक बरे वाटले व ते विकून साठ पौण्ड त्याने तात्काळ आणवले ! जन्मताच लेखकाचे पांग फेडणारे हे पुस्तक पुढे त्रिखंडात गाजले.

विकार ऑफ वेक फिल्डनंतर 'गुड नेचर्ड मॅन' हे नाटक गोल्डस्मिथने लिहीले. वास्तवीक हे नाटक चांगले असूनही गॅरिकने त्यांचा प्रयोग करण्यास साफ नकार दिला पुढे दुसऱ्या ठिकाणी त्या नाटकाचे प्रयोग झाले. पण एकंदरीत हे पुस्तक लाभले असे कांही म्हणता येणार नाही 'शी स्टूपस टू कॉंकर' या नाटकाने मात्र लोकप्रियतेचे गौरीशंकर गाठले असे म्हटल्यास हरकत नाही. खरे पाहिले तर नाटकापेक्षा प्रहसन हा शब्दप्रयोग या पुस्तकाचे बाबतीत अधीक यथार्थ होता. या नाटकाचे प्रयोगाचे वेळी नाट्यगृहांतून चिक्कार गर्दी लोटत असे

थोडक्याच अवधीत हात लावील त्याचे सोने होईल अशी अद्‌भूत किमया गोल्डस्मिथला साधली. त्याने पुस्तके लिहिण्याचा तडाखा लावला. इंग्लंडचा इतिहास, रोमचा इतिहास, ग्रीसचा इतिहास, पशुपक्षी विज्ञान या सर्व विषयावर त्याने लिहीले. त्याचा सर्वोत्तम पुस्तकाला मिळाले नाहीत त्याच्या दसपट पौन्ड त्याच्या या नव्या पुस्तकांना मिळू लागले त्याच्या पुस्तकात चुका राहून जात व लोकांना टवाळी करायला एक साधन सापडे.

हा थोर चतुरस्त्र लेखक बोलण्यात अगदीच गचाळ होता. त्याच्या मित्रांना या गोष्टीचा मोठा अचंबा वाटे गैरिक म्हणे हा गोल्डस्मिथ बेटा लिहीतो गोड पण बोलण्याच्या कामात अगदी धोंडा आहे. त्याचा दुसरा एक मित्र शॅमिअर म्हणे 'याच्या गांवढळ बोलण्यावरून "ट्रॅव्हलर" ह्या काव्याचा हा जनक आहे असे क्षणभरही वाटत नाही.'

गोल्डस्मिथ हा सद्‌गुणांचा पुतळा नव्हता त्याचे दोष सर्वांच्या परिचयाचे होते. पण त्या दोषांबरोबर कांही ठळक गुणही होते. तो मोठ्या मनाचा आणि सढळ हाताचा माणूस होता, दुसऱ्याला मदत करताना आपले स्वतःचे उद्या काय होणार हे सुद्धा तो पहात नसे. गोल्डस्मिथ हा अलौकिक पुरुष असून जगाने त्याला ओळखले नाही. आणि त्या निराशेने त्याचा कष्टमय अंत झाला असा एक समज रुढ आहे त्यात मात्र कांहीच

तथ्य नाही असे मेकॉलेने आपले स्पष्ट मत नमूद केले आहे. त्याला पुस्तकापासून जी प्राप्ती होत होती तेवढी त्या काळी संपन्न माणसाचीही प्राप्ती नसे. त्याच्या ओढगस्त आणि अविचारी राहाणीमुळेच तो कर्ज बाजारी झाला. पुस्तके लिहीण्याच्या आश्वासनावर काढलेल्या कर्जाचा आकडा दोन हजार पौण्डावर गेला. हे कर्ज आता फिटत नाही. हे तो समजून चुकला. हा हृद्रोगच शेवटी त्याच्या अंतास कारण झाला त्याने स्वतःची उपेक्षा स्वतः जेवढी केली, इतकी जगाने खास केली नाही.

ह्या विख्यात लेखकाचा अकाली झालेला अंत ही अत्यंत शोचनीय घटना होती. पण तेथे सर्वांचा. निरुपाय होता. शेहेचाळीस वर्षे पुरी होण्यापूर्वीच मृत्यूने त्याला नेण्याची सिद्धता केली. त्याला दोषी ताप येऊ लागला. तापात वैद्याचें औषध तो घेत नसे. स्वतःच स्वतःवर उपचार करी. दुखणे अधिक होत होते. बाहेरचा वैद्य आणून उपचार सुरू होईपर्यंत दिवसगत फार झाली. गोल्डस्मिथला शेवटी त्याच्या वैद्याने सांगितले की "तुमची ही दशा ह्या तापाने झालेली नाही. तुमचे मन खंबीर आहे ना ?"

"नाही हो नाही" गोल्डस्मिथने काढलेले हे अखेरचे शब्दच खरे होते. मनाने पंगु झालेला गोल्डस्मिथ दिनांक ३ एप्रिल १७७४ या दिवशी परलोकवासी झाला.

वेस्ट मिन्स्टर ॲबेमध्ये त्याचे स्मरणार्थ स्मृतीशिला उभारण्यात आली. त्यावरील लेख डॉ. जॉनसनचा आहे.

"ही शिला कवि इतिहासकार ऑलिवर गोल्डस्मिथचे स्मरणार्थ उभारली आहे. त्याने कोणत्याच विषयावर लिहायचे शिल्लक ठेवले नाही आणि जे लिहिले ते आपल्या असामान्य शैलीने नटविले आहे."

# :: असावे कपडे आपुले छान ::

त्याला योग म्हणा किंवा कांहीही म्हणा, पण एखादी गोष्ट एकेकाला जमत नाही खरी. कपड्यांच्या बाबतीत आम्ही आतापर्यंत सारांश पाहिला एकंदरीत छानदार, झकास ऐटबाज पोषाख घालून मिरवण्याचे आमच्या कुंडलीत नाही. असे कांही झाले की लोक परिस्थितीवर टेपरे ठेवित असतात. पण खरे सांगायचे तर परिस्थिती बिरिस्थिती सब झूट आहे. 'असावे कपडे आपुले छान' अशी जोरदार जिद्द असावी लागते माणसा-जवळ तरच ही गोष्ट होते. एरवी नाही. याचे मूर्तीमंत उदाहरण म्हणजे आमचे पडोशी दादा दातार. बारामहिने बत्तीस काळ दादा दातारांच्या कपड्याचा नूर कायम एखाद्या मुलाचा बिगरीपासून शाळा सोडीपर्यंत सदा पहिला नंबर असावा तसा. आजकाल कोणीही उपटसुंभाने उठावे आणि गरम कपडे घालावे. त्याला धरबंध कसा तो राहीलेलाच नाही. पण 'ब्लेझरचे' नांव देखील लोकांना माहीती नव्हते तेव्हा दादा दाताराने ब्लेझरचे कोट सर्रास वापरले होते दादा दातारांची धोतरे मँचेस्टरची, शर्ट पांढरे शुभ्र, सोन्याची बटणे व कपलिंक्स आणि डोक्याला हंगेरियन टोपी. दादा दाताराचा असा सदा बाजीरावी बेत असे. दादा दाताराचा झकपक पोषाख हा शेजाऱ्या—पाजाऱ्यांच्या टिकेचा व कांहीचा मत्सराचा विषय असे. साधारणपणे कोणाचे चांगले बघवत नाही. अशी जी वृत्तीची माणसात असते ती कपड्याच्या बाबतीतही लागू आहे. झकास पोषाख करणाऱ्यांचा 'वस्त्रार्थे अक्षतां समर्पयामी' या कोटीतले लोक हेवा करीत असतात. दादा दातारांच्या दुर्दैवाने ते वारले तेव्हा त्यांना थोडेफार कर्ज असल्याची वार्ता बाहेर फुटली. तेव्हा तर दादा दातारांच्या पोषाखावर जळणाऱ्यांना पुत्र झाल्याचे सुख लाभले. दादा मेल्यावर कैक दिवस हे लोक त्यांच्या दिवाळखोरीचा ग्रंथ आल्यागेल्यापाशी बाया बापड्यांपाशी मोठ्या रसाळपणे वर्णन करून सांगत. आणि शेवटी समारोप करून म्हणत 'अशी निसटतात बरे मँचेस्टरची धोतरे'! लोक वानोत वा निंदोत दादा दाताराने असावे कपडे आपुले छान हे व्रत आमरण सोडले नाही.

मी शाळकरी मुलगा होतो तेव्हां झकपक, ऐटबाज पोशाख म्हणजे काय हे समजण्याचीच मला अक्कल नव्हती. शिवाय मी शाळकरी होतो तेव्हा पोरासोरांच्या कपड्यालत्याची फिकीर घरातील माणसे फारशी करत नसत. बायकांना जशी वर्षाकाठी दोन घडोती दिली की कार्यभाग संपला तसे पोरांच्या अंगावर धड कपडा अडकवलेला असला म्हणजे झाले. पोरांना शिवलेल्या कोटांची मुदत ते कोपरावर विरायला लागेपर्यंत आणि पाटलोणीची त्या ढोपरावर नाही तर मागे कुठेतरी फाटू लागेपर्यन्त. मुलांचे कपडे, त्यांची शिलाई धुलाई हे चर्चेचे विषय नसत. सारे आग्रह असायचे वर्गात पाचाच्या आत

निदान दहाच्या आत नंबर आला की नाही, सकाळी सूर्य नमस्कार घातले की नाही, रामरक्षा व परवचा म्हणून झाला की नाही याचा. माझी रामरक्षा तर कधीच तोंडपाठ झाली होती. भीमरुपी महारुद्रा स्त्रोत्र मुखोद्गत झाले होते. तरी देखील कपडयालत्त्याचे आग्रह आम्हाला कोणी केले नाही. त्यातही पुन्हा एक गंमत होती एखादे पोर जरा बावळे असले की आलीच त्याच्या वाट्याला 'वडीलधारी' वस्त्रे, बापुचा कोट, आप्पाची हापपँट हा उकाडा चालू राही. मुले नाकी डोळी जरा नीटस गोजीरवाणी असली तर कपडयाचे लाड थोडेफार पुरवले जातात. पण माझ्या बाबतीत तिकडे वळायलाच नको होते गणेशचतुर्थी जवळ आली म्हणजे ज्या मूर्ती म्हणजे सांगाडे तयार असतात त्यानाच सरासरी हात पाय जोड आणि हाताला सांपडेल तो रंग फासून गणपतीवाले बाजारात धाडतात त्यातलाच जवळजवळ प्रकार माझ्या भूलोकी अवतार प्रसंगी झाला होता. तेव्हा माझ्या कपडयांच्या षौकाची शोकांतिका झाल्यास नवल काय ! कपडयांचे माझे मनसुबे जागच्या जागीच जिरले.

महाविद्यालयात मी दाखल झालो तेव्हा वस्त्र स्वावलंबनाचे कांही अधिकार वडीलांनी माझ्या स्वाधीन केले. आपल्या पसंतीचे कापड आपण खरेदी करण्याचा आणि आपणांस वाटेल त्या शिंप्याकडे कपडे शिवून घेण्याचा हक्क मला प्राप्त झाला. हे प्राप्त झालेले हक्क जर हलके हलके वापरण्यास मी सुरवात केली असती तर महाविद्यालयातून बाहेर पडण्याच्या वेळेपर्यंत छानदार पोषाखाच्या सीमारेषेपर्यंत पोचायला; मला वास्तवीक काहीच हरकत नव्हती. त्यावेळी अगदी नव्या नमुन्याची अडचण उपस्थित झाली. मिसरूड अद्याप खोल होती, दाढी हनुवटीच्या कुशीत निद्रीस्त पडलेली होती. दलीतांची भरडलेल्या भारतीय जनतेच्या दारूण दुखांची आर्त हाक ऐकू येण्याइतकी कानांची वाढही झाली नव्हती आणि हेच तर मोठे नवल आहे की, अकस्मात हातांनी कातलेल्या सुताची, हातांनी विणलेली वस्त्रे वापरण्याची मी प्रतिज्ञा केली. देशभक्तिचे वारे माझ्या डोक्यात थैमान घालून राहीले होते. चांगला चहा घेत होतो तो सोडला. तरी साखर ही सोडणार होतो. पण एका चांगल्या माणसाने सांगितले की फुकट गावाला उपद्रव होईल. असे भलते सलते नेम धरू नको. वस्त्रांचे बाबतीत नुसतीच स्वदेशी वस्त्रे वापरण्याचा नेम मी धरतो तर त्यात फारसे काही बिघडले नसते. कारण गिरीणोचे कापड देखील दलीत पिडीत आणि भुकेकंगाल कामगारांनी आपल्या स्वेदगंगेचे मोल देऊन निर्माण केलेले स्वदेशी कापड होते. हात विणीच्या वस्त्रांचा हा ब्रह्मसंबंध माझ्या सात आठ वर्षेतरी मानगुटीला बसला होता अशी वस्त्रे वापरणाऱ्यांचा आणखी एक विशेष असा की वस्त्रे कशी वापरायची "खादीच्या धारकांना काहीही चालते" हा जणू नियमच असे. त्याचा थोडासा उपसर्ग मलाही पोचला होता. नुकता कॉलेजमध्ये जाऊ लागलेला कॉलेजीअर आणि मुद्दामच जाडी भरडी वस्त्रे वापरण्याचा माझा तो अट्टाहास पाहून माझे मित्र माझी चेष्टा करीत जो जो माझी टर उडवीत तो तो माझा हट्ट बळावत चालला. त्यांची चेष्टा सुरु झाली की क्रोध आणि उपहास युक्त मुद्रा धारण करून

मी सात्वीक संतापाने त्यांना म्हणे "ए टोणग्यांनो अक्कल तुमच्या वाट्याला अजिबात कशी रे नाही आली ! " लेकाच्यांनो तुम्हाला काहीतरी जाणीव आहे का ? अरे " मी घेतले उगीच ना व्रत अंधतेने ! " मी शिष्टपणाचा आव आणून तावातावाने त्यांचेशी वादविवाद करू लागलो. हुज्जत घालू लागलो. तेव्हा त्यांनी माझे नांवच टाकले. ते म्हणाले आम्ही तुझे मित्र म्हणून आम्हाला सरळ दिसले ते तुला सांगितले. खादी वापरू लागायला तुला अद्याप वेळ आहे. या उप्पर तुझा अट्टाहास असेल तर हात विणीची खादीच काय पण तू जन्मभर ज्यूटची वस्त्रे वापरलीत तरी आमच्या बापाचे कांही जात नाही. पुढे एकेका गोष्टीचा ती सतत करण्यामुळे कंटाळा येतो तसा मला हात विणीच्या वस्त्रांचा कंटाळा आला. कोणी न सांगताच हात विणीची वस्त्रे मीच उतरून ठेवली. वस्त्रांचे खादी पर्व संपले

मला आता भीती वाटत होती ती ही माणसे एका टोकाहून सुटली की अगदी विरुद्ध टोकाला जावून भिडतात, तसे माझे देखील होईल. खादी सोडल्यावर इंग्लीश वस्त्रे वापरणारांची उदाहरणे मला माहीती होती. वस्त्रांचे धोरण मी बदलले. चार चांगली माणसे जसा नेटका पोषाख करतात तसा पोषाख करायचा. उगीच कांही पण करायचे नाही असे ठरले. पोषाखांत देखील जाणत्याच्या चालीने चालावे ह्या शिरस्त्याप्रमाणे मी मामाला गुरु केले गुरु केले म्हणजे कांही मंत्र घेतला नाही मामाला वाट पुसत वस्त्रांचे तारू हाकारायचे असे मनाने ठरवले. ज्या मामाचे चेलेपद मी मनाने स्विकारले तो मामा ही खरोखरीच वस्तू होती. बांधेसूद आणि सूडौल शरिराची देणगी घेऊन तो जन्माला आला होता प्रभाकर पणशीकर प्रमाणे त्याने जे वस्त्र धारण करावे ते त्याला शोभून दिसायचे. लखनवी वेलबुट्ट्यांचा अंगरखा घातला की एखाद्या विलायतखांसारखा तो दिसे. नेहरू शर्टावर मुंडेदार जाकीट चढवले की छोट्या छोट्या सभांच्या सभामंचावर त्याला सहज जागा मिळे. इंग्लीश ड्रेस मामा फारसा करीत नसे. पण तो वापरण्याची वेळ कधीतरी येई तेव्हा मॅचिंगचे तंत्र सांभाळून तो उठावदार पोषाख करी. मला तर वाटे मामाने एखाद्यावेळी छाटी लावली तर लोक त्याला साधुपुरुष समजून त्यांच्या चरणावर लोळण घेते मामाला प्राप्त झालेली वस्त्रसिद्धी ही त्याच्या पावलावर पावूल टाकून जाणाराला लाभली पाहिजे. हा हिशोब करून मामांचा गंडा बांधण्याची उमेद मी धरली होती.

पण हिशोब कुठेतरी चुकत होता, तेच आकडे मांडले तरी उत्तर बरोबरच येत नव्हते. तेच कपडे वापरले तरी लोक माझ्याकडे काहीतरीच चेहरा करून पहात. मामाचे अनुकरण एकतर महागात पडत होते. पण छानदार कपडे वापरण्याबद्दल वाहवा झाली असती तर त्या हौसेखातर मी वस्त्रांचे मोलही आनंदाने दिले असते. पण वाहवा तर दूर राहीली उलट दोन वेळा चांगली फजगत झाली मामाच्या पेटंट दुकानातून कापड घेऊन त्याच्या स्टायलीस्ट दर्जीकडून विजारीचे स्टिचिंग मी करून घेतले म्हणजे विजार शिवली. विजार शिवून देतांना दर्जी दहा दहा वेळा सांगत होता की विजारीकडे पहात रहावे

निदान दहाच्या आत नंबर आला की नाही, सकाळी सूर्य नमस्कार घातले की नाही, रामरक्षा व परवचा म्हणून झाला की नाही याचा. माझी रामरक्षा तर कधीच तोंडपाठ झाली होती. भीमरुपी महारुद्रा स्त्रोत्र मुखोद्‌गत झाले होते. तरी देखील कपडयालत्त्याचे आग्रह आम्हाला कोणी केले नाही. त्यातही पुन्हा एक गंमत होती एखादे पोर जरा बावळे असले की आलीच त्याच्या वाट्याला 'वडीलधारी' वस्त्रे, बापुचा कोट, आप्पाची हापपँट हा उकाडा चालू राही. मुले नाकी डोळी जरा नीटस गोजीरवाणी असली तर कपडयाचे लाड थोडेफार पुरवले जातात. पण माझ्या बाबतीत तिकडे वळायलाच नको होते गणेशचतुर्थी जवळ आली म्हणजे ज्या मूर्ती म्हणजे सांगाडे तयार असतात त्यानाच सरासरी हात पाय जोड आणि हाताला सांपडेल तो रंग फासून गणपतीवाले बाजारात धाडतात त्यातलाच जवळजवळ प्रकार माझ्या भूलोकी अवतार प्रसंगी झाला होता. तेव्हा माझ्या कपडयांच्या षौकाची शोकांतिका झाल्यास नवल काय ! कपडयांचे माझे मनसुबे जागच्या जागीच जिरले.

महाविद्यालयात मी दाखल झालो तेव्हा वस्त्र स्वावलंबनाचे कांही अधिकार वडीलांनी माझ्या स्वाधीन केले. आपल्या पसंतीचे कापड आपण खरेदी करण्याचा आणि आपणांस वाटेल त्या शिंप्याकडे कपडे शिवून घेण्याचा हक्क मला प्राप्त झाला. हे प्राप्त झालेले हक्क जर हलके हलके वापरण्यास मी सुरवात केली असती तर महाविद्यालयातून बाहेर पडण्याच्या वेळेपर्यंत छानदार पोषाखाच्या सीमारेषेपर्यंत पोचायला; मला वास्तवीक काहीच हरकत नव्हती. त्यावेळी अगदी नव्या नमुन्याची अडचण उपस्थित झाली. मिसरूड अद्याप खोल होती, दाढी हनुवटीच्या कुशीत निद्रीस्त पडलेली होती. दलीतांची भरडलेल्या भारतीय जनतेच्या दारूण दुखांची आर्त हाक ऐकू येण्याइतकी कानांची वाढही झाली नव्हती आणि हेच तर मोठे नवल आहे की, अकस्मात हातांनी कातलेल्या सुताची, हातांनी विणलेली वस्त्रे वापरण्याची मी प्रतिज्ञा केली. देशभक्तिचे वारे माझ्या डोक्यात थैमान घालून राहीले होते. चांगला चहा घेत होतो तो सोडला. तरी साखर ही सोडणार होतो. पण एका चांगल्या माणसाने सांगितले की फुकट गावाला उपद्रव होईल. असे भलते सलते नेम धरू नको. वस्त्रांचे बाबतीत नुसतीच स्वदेशी वस्त्रे वापरण्याचा नेम मी धरतो तर त्यात फारसे काही बिघडले नसते. कारण गिरीणीचे कापड देखील दलीत पिडीत आणि भुकेकंगाल कामगारांनी आपल्या स्वेदगंगेचे मोल देऊन निर्माण केलेले स्वदेशी कापड होते. हात विणीच्या वस्त्रांचा हा ब्रह्मसंबंध माझ्या सात आठ वर्षेतरी मानगुटीला बसला होता अशी वस्त्रे वापरणाऱ्यांचा आणखी एक विशेष असा की वस्त्रे कशी वापरायची " खादीच्या धारकांना काहीही चालते " हा जणू नियमच असे. त्याचा थोडासा उपसर्ग मलाही पोचला होता. नुकता कॉलेजमध्ये जाऊ लागलेला कॉलेजीअर आणि मुद्दामच जाडी भरडी वस्त्रे वापरण्याचा माझा तो अट्टाहास पाहून माझे मित्र माझी चेष्टा करीत जो जो माझी टर उडवीत तो तो माझा हट्ट बळावत चालला. त्यांची चेष्टा सुरु झाली की क्रोध आणि उपहास युक्त मुद्रा धारण करून

मी सात्वीक संतापाने त्यांना म्हणे "ए टोणग्यांनो अक्कल तुमच्या वाट्याला अजिबात कशी रे नाही आली ?" लेकाच्यांनो तुम्हाला काहीतरी जाणीव आहे का ? अरे " मी घेतले उगीच ना व्रत अंधतेने !" मी शिष्टपणाचा आव आणून तावातावाने त्यांचेशी वादविवाद करू लागलो. हुज्जत घालू लागलो. तेव्हा त्यांनी माझे नांवच टाकले. ते म्हणाले आम्ही तुझे मित्र म्हणून आम्हाला सरळ दिसले ते तुला सांगितले. खादी वापरू लागायला तुला अद्याप वेळ आहे. या उप्पर तुझा अट्टाहास असेल तर हात विणीची खादीच काय पण तू जन्मभर ज्यूटची वस्त्रे वापरलीत तरी आमच्या बापाचे कांही जात नाही. पुढे एकेका गोष्टीचा ती सतत करण्यामुळे कंटाळा येतो तसा मला हात विणीच्या वस्त्रांचा कंटाळा आला. कोणी न सांगताच हात विणीची वस्त्रे मीच उतरून ठेवली. वस्त्रांचे खादी पर्व संपले

मला आता भीती वाटत होती ती ही माणसे एका टोकाहून सुटली की अगदी विरुद्ध टोकाला जावून भिडतात, तसे माझे देखील होईल. खादी सोडल्यावर इंग्लीश वस्त्र वापरणारांची उदाहरणे मला माहीती होती. वस्त्रांचे धोरण मी बदलले. चार चांगली माणसे जसा नेटका पोषाख करतात तसा पोषाख करायचा. उगीच कांही पण करायचे नाही असे ठरले. पोषाखांत देखील जाणत्याच्या चालीने चालावे ह्या शिरस्त्याप्रमाणे मी मामाला गुरु केले गुरु केले म्हणजे कांही मंत्र घेतला नाही मामाला वाट पुसत वस्त्रांचे तारू हाकारायचे असे मनाने ठरवले. ज्या मामाचे चेलेपद मी मनाने स्विकारले तो मामा ही खरोखरीच वस्तू होती. बांधेसूद आणि सूडौल शरिराची देणगी घेऊन तो जन्माला आला होता प्रभाकर पणशीकर प्रमाणे त्याने जे वस्त्र धारण करावे ते त्याला शोभून दिसायचे. लखनवी वेलबुट्ट्यांचा अंगरखा घातला की एखाद्या विलायतखांसारखा तो दिसे. नेहरू शर्टावर मुंडेदार जाकीट चढवले की छोट्या छोट्या सभांच्या सभामंचावर त्याला सहज जागा मिळे. इंग्लीश ड्रेस मामा फारसा करीत नसे. पण तो वापरण्याची वेळ कधीतरी येई तेव्हा मॅचिंगचे तंत्र सांभाळून तो उठावदार पोषाख करी. मला तर वाटे मामाने एखाद्यावेळी छाटी लावली तर लोक त्याला साधुपुरुष समजून त्यांच्या चरणावर लोळण घेते मामाला प्राप्त झालेली वस्त्रसिद्धी ही त्याच्या पावलावर पावूल टाकून जाणाराला लाभली पाहिजे. हा हिशोब करून मामांचा गंडा बांधण्याची उमेद मी धरली होती.

पण हिशोब कुठेतरी चुकत होता, तेच आकडे मांडले तरी उत्तर बरोबरच येत नव्हते. तेच कपडे वापरले तरी लोक माझ्याकडे काहीतरीच चेहरा करून पहात. मामाचे अनुकरण एकतर महागात पडत होते. पण छानदार कपडे वापरण्याबद्दल वाहवा झाली असती तर त्या हौसेखातर मी वस्त्रांचे मोलही आनंदाने दिले असते. पण वाहवा तर दूर राहीली उलट दोन वेळा चांगली फसगत झाली मामाच्या पेटंट दुकानातून कापड घेऊन त्याच्या स्टायलीस्ट दर्जीकडून विजारीचे स्टिचिंग मी करून घेतले म्हणजे विजार शिबली. विजार शिवून देतांना दर्जी दहा दहा वेळा सांगत होता की विजारीकडे पहात रहावे

असा माल तयार होईल त्याची बत्तीशी खरोखरीच वठली विजार तयार होताच आला मारी पुढे उभा राहून पुन्हा पुन्हा पोज घेऊन मी ती घातली. आणि कचेरीचा रस्ता धरला. विजारीकडे लोक पहातच राहीले.

एका चावट माणसाने तर कहर केला. " या आबा ! या असे समोर बसा ! विजार तर फर्स्टक्लास झाली आहे तुमची. आता काय विशाद आहे आगगाडयांची वेळेवर न येण्याची " तो चावट माणूस म्हणाला.

थट्टा चालली आहे हे समजलो. पाणी मुरते पण थट्टा समजली नव्हती. तेव्हा शेजारी बसलेल्या माणसाने चांगला चिमटा घेऊन मला सांगितले " ए शंको ! सिग्नलच्या रंगाची विजार शिवली आहेस ना, त्याच्यावर भाष्य चालले आहे. लवकर घरी पळ "

पुन्हा ती विजार म्हणून मी घातली नाही.

मामासारख्या कोट शिवला तर त्याची तऱ्हा तीच झाली सिमल्याच्या सहलीच्या शुभ प्रसंगी तो भरवशाचा कोट म्हणून बरोबर घेतला सिमल्याला शॉपींग साठी निघताना झकास कपडे करून बाहेर पडण्याची वहीवाट आहे. त्या शॉपींगचे वेळी मी तो कोट चढवला. केतकी वर्णाच्या सफरचंदांनी भरगच्च भरलेल्या एका दुकानापुढे आम्ही खरेदीसाठी उभे होतो. फळांचे भाव चालले होते. फळवाला सांगत असलेले भाव आम्हाला पटत नव्हते. या सौदेबाजीत आम्हाला खुष करण्याच्या भरात फळवाला मला उद्देशून म्हणाला " बटाट्याचे व्यापारी तुम्ही ! जरा जास्त भाव दिला तर काय झाले साहेब. फळवाल्याने मला बटाट्याचे व्यापारी म्हणावे हे मला रूचले नाही. छानदार कोट घालून मी जर बटाट्याच्या व्यापाऱ्यासारखा दिसत असेन तर व्यर्थ कशास्तव शीण करावा ? छानदार कपड्यांची ही कथा आणि व्यथा माझ्या अगदी परवा परवापर्यंत अनुभवाला येत आहे. कपडयांनी मला नेहमीच दगा दिला आहे.

तरी पण अद्याप छानदार कपड्यांचा मोह मला सोडवत नाही. गेल्या चार सहा महिन्यात छानदार कपडे घालण्याचा ' फिरूनी एकदा प्रयत्न ' मी करून पहात आहे. गेल्या चार महिन्यांत टेरेलिनचे चार शर्ट, चार टेरेलिनच्या विजारी मी शिवून घेऊन धुम धडाक्याने त्या घालतो आहे. लोक चकीत नयनानी माझ्याकडे पहात आहेत. खट्याळ बाळ्या धारप तर मला भर रस्त्यावर म्हणाला, आता ! काय टेरेलिन ? आता टेरेलिनची तुझी गाडी लेट झाली आहे. एकच प्याला नाटकात नाक्यानाक्यावर निरनिराळे गृहस्थ सुधाकरला समोर जावून उपदेश करीत तसे मला तिठ्या तिठ्यावर लोक पुसताहेत ' आता या वयात टेरेलीन ? टेरेलीन सोडा बुवा ? '

माझ्या पुढे मोठाच पेच प्रसंग निर्माण झाला. आहे. टेरेलिन वापरावे की फिरून पूर्वीचे पॉपलीन सुरु करावे ? हॅमलेट सारखे माझे डोके भणाणून गेले आहे.

● ● ●

# :: नको, मला प्रसिद्धी नको ! ::

आज माझी एवढी हयात गेली पण आमच्या गांवात नामांकित नामांकित म्हणून नावाजलेली, गुलछबु शिवण कला केंद्रे आहेत त्यांच्या वाऱ्यालासुद्धां मी कधी उभा राहिलेला नव्हतो. वस्त्रांप्रावरणाच्या बाबतीत अंगभर वस्त्र वापरावे ह्या जुन्या अनुभव सिद्ध तत्वाची कांस मी बळकट धरून होतो. त्यामुळे लोकांच्या दृष्टीने कपड्यांच्या बाबतीत मी गबाळ वर्गात मोडत असे हे कटु सत्य कबूल करणे प्राप्त आहे.

माझ्या गेल्या वाढदिवसाच्या दिवशी मी नको नको असे म्हणत असतां शेवटी माझ्या स्नेही मंडळीनी मला अहेर म्हणून गॅबरडीनचे कापड दिलेच. हे महावस्त्र मिळताच मात्र मी निश्चय केला की काय होईल ते जाईल पण कोट शिवायचा तो आमच्या नेहमीच्या शिंप्याकडून न शिवता 'कम्फर्ट' नांवाच्या शिवण कामाच्या दुकानांतून शिवून घ्यायचा.

'कम्फर्ट' मधून मी कपडे शिवून घेणार आहे हे माझ्या एका तरुण मित्राला समजतांच त्याला प्रथम मोठा अचंबा वाटला. आणि त्याने माझ्याकडून त्याबद्दल आडवळणाने विचारून खात्री करून घेतली. आणि ती होकारार्थी उत्तर देतांच त्यांने माझा उजवा हात गदगदा हलवून माझे अभिनंदन केले. तो म्हणाला आबा, तुम्ही आजवर केवळ थंडी वाऱ्यापासून संरक्षण होण्याकरीताच कपडे वापरीत होतात. आता आरामाकरिता कपडे वापरायचे असतात. कपड्याने माणसाची प्रतिष्ठा आणि रुबाबही वाढत असतो ही गोष्ट 'कंफर्ट' मधून शिवून घेतलेले कपडे वापरल्यावर तुमचे ध्यानांत येईल. हे कपडे वापरु लागल्यावर मी तुम्हांला पुन्हा भेटेन.

गॅबरडीनचे कापड काखोटीला मारून 'कम्फर्ट' मध्ये घाबरत घाबरत मी शिरलो. त्या दुकानाची ऐट विलक्षण होती. सर्वत्र कमालीची टापटीप दिसत होती. वरती पंखे धम धम फिरत होते. दिव्याचा चमचमाट चोहोकडे होताच दुकानात शिरताच एका रुबाबदार कपडे घातलेल्या माणसाने माझे मंदस्मित पूर्वक स्वागत केले. त्यामुळे माझा अर्धाअधिक घाबरेपणा कमी झाला. मी मनांत म्हटले हा काय शिंपी ! छे छे, लग्न मंडपाकडे निघालेला नवरदेव, पब्लिक सर्व्हिस कमिशनच्या इंटरव्ह्यू करीता चाललेला उमेदवार, अधिक चौकशी करता मला समजले की हे शिंपी महाशय मुंबई विश्व विद्यालयाचे पदवीधर आहेत.

मला गॅबरडीनचा कोट शिवायचा आहे असे मी सांगताच एका दालनाकडे बोट दाखवून त्यांत जाण्याविषयी मला सूचना करण्यात आली. डॉक्टर रोग्यांची परीक्षा तरी कमीच करीत असेल. पण कोटासाठी माझे मोजमाप घेण्याचे कार्य चांगली दहा

मिनिटे चालले होते. मोजमाप पुरे होताच डिपॉझीट म्हणून कांही रक्कम मजकडे मागण्यांत येईल असे वाटल्यावरून मी खिशांत हात घालून पाकींट बाहेर काढण्याच्या तयारीतच होतो. शिंपी महाशय कांही बोलेनात म्हणून मीच हलकेच विचारले ‘ डिपॉझिट ? यावर दुकानचे मालक उद्गारले ‘ रावसाहेब नाही, नाही. आम्ही आपणास ओळखतो. डिपॉझिटची गरज नाही. यशवंत मासिकांत येणारे आपले लेख आम्ही नेहमी वाचतो. ’

शिंपीदादाचे हे उद्गार ऐकताच मी थक्क झालो. शिंप्याच्या दुकानात, कापडाचे मोजमाप, मूल्यमापन व्हावे हे रीतसर झाले पण वाङमयाचे मूल्यमापन येथे व्हावे, यशवंतमध्ये आलेल्या लेखांच्या पतीवर डिपॉझिट न भरण्याची सवलत मला मिळावी हे अंमळ विचित्र होते. मी म्हटले धन्य आहे. माझी शिवण कला केंद्रापर्यंत माझ्या लेखांची मजल गेली ना ? शिंपी, तेली, तांबोळी ह्यानाही माझ्या लेखाची गोडी समजू लागली ना ? लोकमान्य तेल्या तांबोळ्यांचे पुढारी होते. मी शिंपी, तेली, तांबोळी यांच्याकरिता लिहीणारा लोक लेखक झालो तर ! बस बस ! यापुढे मी लेख लिहीणार ख्यातनाम लेखक होणार सहस्त्र लेख लिहून नाबाद राहणार ! मोठ्या लेखकांच्या नावाने करांगुळी घातल्या जातील तेव्हा हाताची बोटे संपली तरी निदान पायांच्या बोटावर माझे नांव मोजले जाणार. मोठ्या पुढाऱ्यांच्या दर्शनार्थ लोक धावतात, त्यांचे कोडकौतुक पुरवितात. तसे लौकरच माझेही कौतुक होईल. प्रसिद्धी माझ्या पायावर लोटांगण घेईल.

मी विख्यात लेखक होणार या कल्पनेच्या कुंजवनांत मोकाट वांसरासारखा मी कितीतरी वेळ उंडरत राहीलो होतो. त्या काकविच्या रसायनाचा गोड कैफ बराच वेळ माझ्या देहाच्या कबजा करून राहीला होता. प्रसिद्धीच्या सहस्त्र ज्योतींच्या प्रकाशांत मला घटकाभर परमावधीचे समाधान लाभले होते. पण पुन्हा जेव्हा भूतलावरील व्यवहारी जगाच्या पृष्ठभागावर मी अवतरलो तेव्हा प्रसिद्धी आणि ख्याती ही नाटकातल्या राजाच्या नकली वैभवासारखी मला फोल वाटू लागली. प्रसिद्धी आणि ख्याती हा नुसता भपका आहे, मायाबाजार आहे. वास्तविक अप्रसिद्ध, अपरिचित, मामुली माणूस म्हणून वावरण्यात खरी मौज आहे. प्रसिध्दी ही सोन्याची बेडी आहे. रत्नजडीत असेल पण सापळा आहे प्रसिध्दीचा पाश पायांत पडला तर तुमचे सारे स्वातंत्र्य नष्ट होईल. उदाहरणच घेऊ या घटकाभर आपल्या राणीचे. आपली एलिझाबेथ राणी आहे. तिच्या मनात लंडनच्या पुलावर आरामशीर बसावे असे आले. अगदी एकटे, दुसरे चिटपाखरू उपयोगी नाही. त्या पुलावर हे कल्पांती तरी होणे शक्य आहे कां ? नाही. त्रिवार नाही. राणी एलिझाबेथ ही इंग्लंडची आणि ब्रिश राज्य कुलातील मोठ्या देशांची सम्राज्ञी आहे. ती राजवाड्याबाहेर पडायची म्हणजे एक दिंडी बाहेर पडायची तिच्या भोवती तिच्या छपन्न दासी असायच्याच तिला तिच्या मनासारखे वागायला मिळणे नाही. तिची एकजण केशभूषा करील, दुसरी तिला पोषाख घालील. तर राहो तिला तिच्या केसांना

रिबन लावायचे तरी स्वातंत्र्य आहे का ? तिला राज वैभव भोगायला मिळेल पण आपणा सामान्य जनांस सहज प्राप्त असे भोग भोगावयास मिळणार नाहीत. मयूर सिंहासनावर सतत नजर कैदेत असलेली ती कैदी आहे. इंद्राला अमृत प्यायला मिळेल. पण एखादे वेळी अमृता ऐवजी ताक प्यावे असा आंबट शौक इंद्राचे मनांत आला तर अशावेळी इंद्राची ताकाची तहान कोणीतरी भागवू शकले काय ? इंद्र कितीही मोठा असला तरी लस्सीची लज्जत त्याला घेता येणार नाही. तक्रं शक्रस्य दुर्लभम्.

इंद्रादी देवांच्या आणि महाराण्यांच्या गोष्टी सोडून देऊन आपण जरा खालच्या थरांच्या लोकांचा विचार करु लागलो तरी प्रसिद्धीचे हे शुक्लकाष्ट चोवीस तास कोणाच्या मागे असणे हे त्यास परवडणारे नाही. प्रसिध्दीच्या मागे आणि पुढे कितीतरी चौक्या पहारे असतात. समाज सहस्त्र नेत्रांनी प्रसिद्ध पुरुषांच्या हालचालीकडे गुप्त पोलिसासारखा नजर ठेवून असतो. तुम्ही आम्ही काय खातो-पितो, कुठे जातो-येतो याची उचापत कोणी करणार नाही. पण बलराज सहानी, अशोककुमार, वैजयन्तीमाला यांच्या दिन चर्चा ही तर सार्वजनीक मालमत्ता होऊन राहीली आहे. साऱ्या पोरा सोरांना हे सुप्रसिद्ध नट केव्हा काय करतात, चहा केव्हा घेतात, ओव्हलटीन केव्हा घेतात, कोठला साबण लावतात हे माहीत आहे. सामान्य माणसाना आपल्यामागे हु दु दु लागलेला क्षणभर सोसणार नाही. आपण चहा पीत असावे आणि तेवढ्यांत कोणी माणूस आला तर आपणाला कसेसेच वाटते. घरात पंचा लावून सुटीच्या दिवशी खोलीतील कोळीष्टके झाडीत असतां कोणी पाहिले तरी वरमल्यासारखे होते आपले स्वातंत्र्य जे आहे त्याला जरा सुद्धा धकाधकी खपत नाही. मग आपल्याकडे कोणीतरी टक लावून पहात आहे असे लक्षात आले तर जेवणसुद्धा गोड लागणार नाही.

म्हणूनच आपण अप्रसिद्ध, अपरिचित लहान माणूस असणे ही मोठी सोय आहे. मुसलमान बायांच्या गोषाप्रमाणे लहानपणांत संरक्षण आहे गोषातल्या स्त्रीला सारेजण पहाता येते. पण गोषातल्या स्त्रीचे नखही दुसऱ्याच्या दृष्टीस पडणार नाही. तुकाराम महाराज म्हणतात त्याप्रमाणे लहानपण म्हणजे साखरेचा रवा आहे.

मी लेख लिहीतो आणि चार लोक माझे लेख वाचतात हा अपघात सोडला तर मी अगदी सामान्य माणूस आहे सामान्य माणसाच्या साध्यासिध्या आवडी निवडी मला आहेत अजून डोंबाऱ्याचा रस्त्यावर चाललेला खेळ, माकडवाल्याच्या खेळांत देवजी धसाड्या आणि भागाबाई यांच्या माकडचेष्टा पाहण्याचा मोह मला होतो. आमच्या गांवात एक बर्वे का कर्वे नांवाच्या माणसाचे छोटेखानी फराळाचे दुकान आहे. तेथल्या गरमागरम पदार्थांची गोडी अवीट आहे. संध्याकाळी जत्रे सारखी माणसे या फराळाच्या दुकानांत जमतात आणि मिटक्या मारीत फराळाचा आस्वाद घेतात. तान मान पाहून मीही वरच्याकडे जातो. कारण प्रसिध्दीच्या साथीच्या रोगाची लागण मला अद्याप

लागलेली नाही. रस्त्यावर जुन्या पुस्तकांचे दुकानदार दुकान मांडून बसतात. मी भर रस्त्यावर त्या दुकानासमोर उकीडवा बसून ती पुस्तके चिवडीत असतो. या सागर मंथनांतून कधी कालीदास, कधी गोस्वामी तुळसीदास, कधी रॉबर्ट लिंड, तर कधी लिटन स्ट्रॅची यांची ग्रंथ रत्ने माझ्या हाती लागतात. मोठा आनंद होतो. उद्या सुप्रसिद्ध लेखक झालो तर ह्या स्वर्ग सुखाला मी मुकेन. मला डोंबाऱ्याचा खेळ पाहता येणार नाही. जुन्या पुस्तकांच्या ढीगाऱ्यापाठी उकिडवे बसून पुस्तके शोधता येणार नाहीत, पिंजऱ्यांत ठेवलेल्या पोपटाच्या स्वतंत्र वनवृत्तीचा नाश होतो. माझ्या स्वतंत्र, स्वैर जीवनाचा, माझ्या मुक्तछंद जीवन काव्याचा प्रसिध्दीमुळे नाश होईल. जीवन वैराण होईल.

ही संशयास्पद प्रसिध्दी मी क्षणभरही अंगीकारू इच्छित नाही. आताच्या आता मी 'कंफर्ट' च्या शिंपी महाशयांना सांगतो की मी प्रसिद्ध लेखक नाही. माझे डिपॉझिट तुम्ही स्विकारले पाहिजे. हवेतर शिलाईचे सगळे पैसे देतो पण प्रसिद्ध पुरुषांच्या यादीत मला ढकलू नका. एवढी मेहेरबानी जरूर कराच.

(कल्पना : गार्डिनरच्या " ऑन बिईंग नोन " वरून)

● ● ●

# :: आबांच फोटो ::

केव्हाही पहा, फोटो म्हटले की आबांचे पाऊल पुढे. फोटोवर आबांचे अनिवार प्रेम आहे. आबांच्या कुटुंबाचा फोटो आहे. त्यात आबा आहेतच, विवाहानंतर नववधूसह नवरदेवाचा फोटो हा तर, मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे, त्याप्रमाणे अवश्यमेव काढून घेतलाच पाहिजे असा फोटो आहे. आयुष्यातला अत्यंत महत्वाचा असा क्षण म्हणजे विवाह. मग सौ. सुधा वहिनींसह आबांचा विवाहाच्या वेळचा फोटो नसेल ये क्या बात है ? पण याखेरीज आबांचे पन्नास निरनिराळे फोटो आहेत. मोठ्या पुढाऱ्यांप्रमाणे नेहरू शर्टावर मुंडेछाट जाकीट परिधान करून आबा साहित्यसंमेलनास निघाले आहेत. असा त्यांचा फोटो आहे. एका स्थानिक बँकेच्या कार्यकारी मंडळाचे आबा कार्याध्यक्ष आहेत. त्या बँकेची नवी इमारत बांधली गेली तिचे उद्‌घाटन ते करीत आहेत असा एक फोटो आहे. गेल्या पावसात आमच्या शहरात पुराने कहर उडवला त्या पुरात अनेक घरे वाहून गेली, लोक उघडे पडले, त्यांची अतान दशा उडाली, त्यावेळी त्यांच्या साहायार्थ जी मंडळी धावून गेली त्यात आबा प्रमुख होते. या निराधार, घरादारास मुकलेल्या लोकांना अन्नवस्त्रे वाटीत असतांना त्यांचा कोणीतरी काढलेला फोटो त्याने त्यास नजर केला आहे व तोही आबांनी आपल्या घरात लावला आहे. आबाना नाटकात कामे करण्याची हौस आहे. त्यांनी चाळीच्या गणेशोत्सवात आणि क्लबांच्या नाट्यप्रयोगात हुजऱ्यापासून राजापर्यंत अनेक भूमिका केल्या आहेत. आपले त्या त्या भूमिकांतील फोटो काढवून घेऊन ते सुबक चौकटीतून बसवून घेण्यास आबा विसरले नाहीत.

फोटोनी शृंगारलेल्या चुनेगच्ची वाड्यातल्या त्यांच्या दिवाणखान्यात तुम्ही नव्यानेच गेला की क्षणभर आपण आबांच्या दिवाणखान्यात आहोत का एखाद्या फोटो स्टुडिओत आहोत असा भ्रम उत्पन्न होतो फोटोंच्या हौशीपायी आबा पाण्यासारखा पैसा उधळतात. त्यांच्या संग्रही फोटोंचे एक अलबम आहे. आबांचे हे फोटोचे अलबम ही खरोखरीच एक अलीशान चीज आहे. मोरोक्को लेटरचे नक्षीदार वेष्टण असलेले हे फोटोंचे अलबम आबांना प्राणाहून प्रिय आहेत. त्याची जपणूक ते जिवाआगळी करीत असतात. त्या अलबममधल्या प्रत्येक फोटोवर पारदर्शक पातळ कागदाचे अवगुंठन आहे. फोटोवर अथवा वरच्या पातळ कागदावर एका तिळाएवढाही कुठे डाग तुम्हाला दिसणार नाही. कागद दुमडलेला सापडणार नाही. शीख लोक आपल्या पवित्र ग्रंथसाहेबाची जशी आबदशीरपणे जपणूक करीत असतात.

आबांचे हे फोटोंचे प्रेम आबांचा विनाकारण ( आणि विनामूल्य ) मत्सर करणारास एक मोठे नामी निमित्त सांपडले आहे. ही चांडाळचौकडी रस्त्यावर चौकाच्या कडेला एकदा का जमली की कोणीतरी आबांच्या फोटोचे विषयाचे पिल्लू हलकेच सोडून देतो. आणि मग तो विषय रंगवून हास्यरस उत्पन्न करण्याची त्यांच्यात जणू चुरस लागते. हा प्रकार आज कैक दिवस चालू आहे. हा चावटपणा एकदा चालू झाला की एकजण म्हणतो, ' आबाला म्हणावे आबा डोक्याच्या दोन्ही बाजूला दोन आंब्याचे टाळे बांधून एक झकास फोटो काढवून घे. दुसरा म्हणतो ' दुसरे सारे फोटो काढून झाले आता एक्सरेचे फोटो काढवून ते दिवाणखान्यात लाव ' आबांची ही टायकी ठीक झाली. पण आबांच्या तोंडावर हे बोलण्याची ह्यांच्यापैकी एकाचीही शाहमत नाही. ह्यावर तोडगा म्हणून त्यांच्यातल्या एका दीडशहाण्याने एकदा असे सुचवले की एक निनांवी नॉटपेड पत्र आबांना धाडून त्यांना हे सारे कळवावे. आणि मग आबा कसे चिडतात, चरफडतात ती मौज पहावी. आबांच्या निंदेचा नंदादीप सतत तेवत ठेवण्याचे ह्या दुष्टांनी कंकणच बांधलेले दिसते.

आणि मला सांगायला अत्यंत शरम वाटते की ह्या हलकट लोकांत मीही कधी सामील होत होतो आणि मामांची नवी नवी नालस्ती ऐकताच ही ही ही ही करून हसतो. आणि पुन्हा मामांकडे गेल्यावर हा विषय निघताच त्याच्या तोंडापुरते ह्या लोकांना उद्देशून " बदमाश डांबीस लेकाचे ! कामापुरते आबा आणि नंतर त्यांची निंदा. अरे पाप्यानो कुठे फेडाल हे पाप ? असे ठासून म्हणतो. हे लोक डांबीस असले तर मी सात डांबीस होतो हा लुच्चेपणा मी आबांच्या बाबतीत करायला नको होता पण आबांच्या या छुप्या हितशत्रुंच्या संगतीमुळे मलाही मामा पोकळ डामडौलासाठीच फोटो काढून घेतात असे वाटायला लागले होते. खोटे वृत्त जर दहावीस वेळा वर्तमानपत्रात आले तर ते अखेर खरे वाटू लागते तसे माझेही होत चालले आहे.

ञ ञ ञ

मात्र आबांच्या फोटोवरील भक्तिचा अन्वयार्थ बराचसा लागावा अशी एक हकीगत आमच्या शेजारी राहणाऱ्या गृहस्थाकडे घडली. या गृहस्थांच्या वडिलांची पुण्यतिथी साजरी करण्यासाठी सारी भावंडे एकत्र झाली होती. कोचीनकडे त्यांची एक बहीण एका श्रीमान् व्यापाऱ्याकडे दिली होती. तीही अनेक वर्षांनी मुंबईला आली होती त्या गृहस्थांचे बारमास फिरतीवर असणारे दोन भाऊही ह्या श्राद्ध दिनासाठी एकत्र जमले होते. त्यांच्या स्वर्गवासी वडिलांनी या सर्व भावंडासाठी अगदी पराकाष्ठेची झीज सोसली होती. जीवा पलीकडे मेहनत घेतली होती. मुलांचे ठाक ठीक व्हावे म्हणून त्यांनी उभ्या जन्मांत त्यांनी चैन केली नव्हती. विश्रांती तर त्यांनी शेवटी घेतली तेवढीच. सहाजिकच मुलांस आपले वडील आज बरे दिवस लाभलेले पाहण्यासाठी हयात असते

तर चांगले झाले असते असे वाटे. पुण्य तिथीचा विधी यथासांग चालला होता. खर्चाची कोणीच फिकीर करीत नव्हते. या स्मृतीदिनानिमित्त वडिलांची एक मोठी प्रतिमा तयार करण्यात आली होती. व प्रतिमेला सान्या भावंडानी पुष्पकला घातल्या होत्या. पित्याने त्यांच्यावर केलेल्या उपकारांचे कृतज्ञता पूर्वक ते स्मरण करीत होते

त्यावेळी तिथे हजर असलेल्या एका ढिल्या माणसांने सहज एक शंका उपस्थित केली. तो म्हणाला तुमच्या वडिलांच्या तोंडावळ्यांत आणि तुम्हा भावंडांच्या तोंडावळ्यात मुळीच सारखेपणा दिसत नाही. जमीन अस्मानाचा फरक की असल्या दिसतो' आता या माणसाला मी ढिला म्हणतो तो एवढ्यासाठी नसल्या शंका कुशंका भलत्याच वेळी कोणी काढण्याच्या भानगडीत पडत नाही हा माणूस घटकाभर तेथे गेलेला. चहा कॉफी घेतली आणि मुकाट्याने घरी परतले. असे खरोखर व्हायला पाहिजे होते. पण या माणसाच्या या फालतू प्रश्नामुळे तेथे जमलेल्या सगळ्यांचे चेहरे उतरले. सगळेजण टकमका एकमेकांकडे पाहूं लागले अंतस्थ हकीकत अशी होती. की खरोखरी त्यांच्या वडिलांचा फोटो नव्हताच. त्यांचे वडील मरणाच्या दारांत विकलांग पडले असता एक छाया चित्रकाराला तातडीने बोलावून त्यांनी त्यांच्या वडीलांच्या फोटो काढवून घेतला होता. त्या फोटोवरून दुसन्या एका कारागिराने आपल्या अकलेप्रमाणे आज असलेली प्रतिमा तयार केली होती ! त्या गृहस्थाला या कारागिराने कधीच पाहीले नव्हते. त्यामुळे त्यांच्या चेहरेपट्टीची त्यास कल्पना असणे शक्यच नव्हते. भावंडांचा मोठा विसर झाला. वडील चांगले हिंडते फिरते होते तेव्हा त्यांचा फोटो घेतो तर किती छान झाले असते. असे त्यांस वाटत होते पण आता ही गोष्ट अशक्य कोटीत जमा झाली होती.

मी म्हटले फोटोचे हे असे आहे. वेळेवर वेळ शिमग्याचा खेळ. ते काम चाल टकलीवर नेऊन चालत नाही. आज ती भावंडे चांगली सुखी आहेत. फोटोसाठी वाटेल तेवढा खर्च करायचे त्यांस सामर्थ्य आहे. पण ते असूनही आज व्यर्थ आहे. त्यांच्या वडिलांचा खरा फोटो त्यांच्या श्राद्धदिनी लाभला असता तर त्यांना आनंदाचे भरते आले असते ही हळहळ आता त्यांस कायमची टोचत असते. फोटो काढवून आणि ते पाहून पोट भरत नसते पण फोटो ही एक संजीवनी आहे. एक स्फूरण दायी वस्तू आहे आपले नांव आहे पण ते वर्तमान पत्रांत छापून आलेले पाहण्यात मौज असते ना ? आपण दर दिवशी खूप लिहीतो, पण आपले लिखाण वर्तमान पत्राच्या शिरोभागी फडकलेले दिसले म्हणजे माणसाच्या अंगावर मूठभर मांस येते. आपल्या रुपाचे कोड कौतुक आपणा सर्वानाच वाटते. पण फोटोमध्ये दिसणाऱ्या आपल्या रुपावर आपण बेहद्द खूष असतो. फोटो काढून घेण्याची संधी सहज चालून आली तर ती सोडायला सहसा कोणी तयार नसतो आजच्या युगांत फोटोला फार महत्व आलेले आहे. 'विद्येनेच मनुष्य आले श्रेष्ठत्व या जगा माजी'

या वचनाची आणि विद्येची सद्दी संपुष्टात आली असून फोटोनेच मनुष्य आले श्रेष्ठत्व या जगा माजी ' चा अंमल सुरु झाला आहे.

फोटोची कला साता समुद्रा पलीकडून आपल्या किनाऱ्यावर उतरली. त्यावेळी आपण कलेचे कौतुक तर केले नाहीच. उलट फोटो काढणे हे पोकळ डामडौलाचे लक्षण आहे असे मानून त्या कलेला जवळ जवळ वाळीत टाकले केशवसुता सारखा अलौकिक प्रतिमेचा कवी दिक्कालांच्या पलीकडे पाहण्याचे त्याच्या अंगी पाणी, त्यांना मराठीतील आधुनिक काव्याचा सार्वभौम राजा मानून त्यास लवून मुजरा करण्यांत धन्यता मानत आहेत. पण या कवी कुलशेखराचा फोटो कुठे आहे. ? आज कोणी त्यांचा फोटो आपणा पाशी आहे असे जाहीर केल्यास सहस्त्रवधी रुपये देऊन तो संपादन केल्यास मागे पुढे पाहणार नाहीत असे महाभाग या महाराष्ट्र भूमीत आहे. पण आज केशवसुतांच्या खऱ्या फोटोची तहान त्यांचे काल्पनीक चित्र डोळ्यापुढे आणून भागवावी लागते गोदुग्धाची तहान तांदुळाच्या पीठाच्या दुधावर आपण भागवीत आहोत हे आपले एक दुर्भाग्य आहे.

फोटोची कला आपणांकडे फार पूर्वीपासून असायला पाहीजे होती. शिवाजी महाराजांची आग्र्याहून सुटका कशी झाली ते आम्हाला पाहायचे होते. ज्ञानेश्वर महाराजांनी अमृताशी पैज मारणारा ज्ञानदेवी ग्रंथ कसा रचला, त्यांची अमृतवाणी कोणी टिपून घेतली ते पहाण्याची तहान आम्हाला लागली होती. तुकाराम महाराज गरुड वाहनातून सदेह वैकुंठाला कसे गेले. ते आम्हास पाहायचे होते. नामदेवाच्या हातचे भोजन पंढरीचा राणा कसे जेवत होता ते पाहता आले असते तर ऐलथडीच मोक्ष प्राप्ती झाल्याचे सुख आपल्याला लाभले असते. पण हे भाग्य आता आम्हा अभाग्याना कोठून लाभणार ? आमचे इतिहास आमची संत चरित्रे या बाबतीत अपुरी राहीली आहेत असे आम्हास वाटते. संत आम्हाला सोडून गेले, शिवाजी महाराच स्वर्गवासी झाले. पण रुख रुख आम्हाला सोडू शकत नाही.

आबांच्या आलबमचे महत्व म्हणून आता मला समजून आले. आबा कोणी महापुरुष नसतील, पण त्यांच्या आयुष्यातल्या सुखद घटनांचे फोटो त्याना नवी उमेद देत असले पाहीजेत. आबांचे आलबम ही शक्ती असली पाहीजे. आबांनी आणखी लाख फोटो काढले तरी मी त्यांस बोल लावणार नाही. त्यांच्या हितशत्रुत सामील होऊन त्यांची नालस्ती ऐकतांना दांत काढून ही ही ही ही करून हसणार नाही. आबांनी फोटोचे महत्व ओळखले आहे. आबांना नवयुगाचे दर्शन घडले आहे. आबा द्रष्टे पुरुष आहेत.

फोटोवाल्यानो या ! आबांचे नवे नवे फोटो काढा. आबांच्या फोटोत त्यांची हल्लीची जागा अपुरी पडल्यास त्यांना आपण दुसरी जागा घेऊन देऊ पण चालू द्या रेडी प्लीज ! सावधान ! आबा आता कॅमेऱ्याकडे समोर पहा.

● ● ●

# :: काळा चष्मा ::

गेल्या वर्षी आमच्या सहलीत एक मोठी मौज झाली. फलटणच्या रोखाने आमची मोटार चालली असता वाटेत साखरवाडी लागली. माझे जे सहलकरी सवंगडी होते त्या पैकी बहुतेकजण असे होते की साखरेशी अनेक वर्षे संबंध असूनही त्यांना साखरेची जन्मकथा माहीत नव्हती साखरेच्या ह्या खाणारांनी साखरेचे माहेरघर काळे की गोरे ते आज मितीपर्यंत पाहिले नव्हते साखरवाडीच्या साखर कारखान्यापाशी आपण येऊन पोचलो आहो हे समजताच मात्र ह्या साखरलालांचे कुतुहल जागृत झाले. त्यांनी निश्चय केला की आपण साखरवाडीला आलो आता चाव नाही, चूव नाही. कारखाना पाहिल्या-वाचून परत म्हणून फिरायचे नाही. पण कारखाना पाहायचा तर कारखान्याच्या व्यवस्थापकांशी वशिला पाहीजे. उभ्या साखरवाडीत आम्हाला ओळखणारा माणूस नव्हता. बरे, आमच्यामध्ये असा पणीदार, तेजःपुंज पुरुषश्रेष्ठ असा कोणीच नव्हता की ज्याने नुसती नजर कोणाकडे फिरवावी आणि त्या माणसावर छाप पडून त्याने " करिष्ये वचन तव " म्हणत आम्हापुढे नम्रपणे उभे रहावे.

साखर कारखान्याच्या व्यवस्थापकांशी वशिला लावण्यासाठी एक नामी शक्कल आम्ही सर्वांनी शोधून काढली. काळ्या भिंगाचा विल्सन गॉगल लावला की माणूस भलताच रुबाबदार दिसतो. त्यांचे कोणावरही विनासायास वजन पडते असे म्हणतात. तेव्हा सर्वानुमते मी काळ्या भिंगाचा गॉगल लावून व्यवस्थापकाला भेटायचे असे ठरले. मी नेहरू शर्ट, त्यावर मुंडेछाट जाकीट आणि गॉगल लावून साखर कारखान्याच्या कचेरीकडे शिष्टाईसाठी निघालो. कचेरीपाशी पोचताच तेथला चपरासी चटकन मला सामोरी आला. मी आल्याची वर्दी त्याने अपारदर्शक काचेच्या कमऱ्यांत बसलेल्या साहेबांना दिली. मी कशासाठी आलो हे सांगताच व्यवस्थापकांनी आम्ही कोण कुठचे याचा तपासही न करता आम्हाला कारखाना पाहायची परवानगी आणि वरती कारखाना दाखवण्यासाठी एक माणूसही दिला.

दुसऱ्या कोणाचे काहीही म्हणणे असो पण माझी शिष्टाई सफळ झाली. त्याचे बारा आणे श्रेय त्या काळ्या चष्म्याला होते. व्यवस्थापकांच्या ऑफिसातच " विल्सन गॉगलचा विजय असो काळे चष्मे चिरायू होवोत " अशा घोषणा कराव्या असे अनेक मिरवणूकीतून मिरवलेल्या माझ्या मनात आले. पण माझ्या दुसऱ्या सज्जन मनाने घोषणा न करण्याचा इशारा मला दिला. त्या घोषणांमुळे काळे चष्मे चिरायू झाले असते कदाचित पण साखर कारखाना पाहण्याच्या परवान्याचा जागच्या जागी जीव गेला असता.

काळ्या भिंगांच्या चष्म्यांचा जन्म कधी झाला, त्यांच्या जन्मदात्यांच्या मनांत काळ्या चष्म्यांनी कोणते कार्य करावे असे होते याविषयी संशोधक आणि संशोधन ग्रंथांनी अगदीच मुग्धता स्विकारली आहे. हे कांही बरे नव्हे. तथापी सामान्यपणे सूर्याच्या प्रकाशाने डोळे दिपू नयेत. प्रखर उन्हातान्हांत ज्यांना हिंडावे लागते त्यांच्या दृष्टीला थोडी फार शीतलता लाभावी हाच मुख्येत्वेकरून काळे चष्मे घडवण्याचा निर्मळ हेतु असावा असे अनुमान करण्यास जागा आहे. पण काळ्या भिंगांच्या चष्म्याच्या कुंडलीत भविष्य काळी भलतीच क्रांतीकारक उलथा पालथा होणार हे भविष्य त्यांच्या जन्माच्या वेळी प्रत्यक्षा भास्कराचार्यांनी वर्तवले असते तरी त्यावर विश्वास ठेवायला कोणीही तयार झाला नसता.

आज मात्र काळ्या चष्म्याचा उपयोग दिष्ति निवारण पेक्षा दिमाख दाखवण्यासाठी दृष्टीस शीतलस्पर्श लाभावा यापेक्षा शिष्टपणासाठी वापरले जातात, हे मुंबईच्या बाटलीवाला होमी या प्रख्यात चष्मे विक्रेत्यापासून तो दारोदार जावून काळे चष्मे विकणाऱ्या फेरीवाल्या-पर्यंत सारेजण तुम्हास सांगतील. काळ्या भिंगांच्या चष्म्यापाशी काय गारूडविद्या आहे न कळे; पण आज सामान्य माणसे काळ्या भिंगाचा चष्मा वापरणारा चारचौघांकडून अंमळ श्रेष्ठ आहे असे प्रामाणिकपणे मानतात. काळ्या भिंगांचा चष्मा ही प्रतिष्ठेची दर्शनी हुंडी वजनदार पणाची ग्वाही मानली जाते. अशी वस्तुस्थिती आहे. या काळ्या भिंगांच्या चष्म्यांचा जर लोक आढयता दाखवण्याकरिता उपयोग करत असतील तर मग काळे चष्मे ही चैनीची चीज मानून सरकारने त्यावर कर का बसवू नये ? आपल्या ओढग्रस्त सरकारने करपात्रवस्तूंत काळ्या चष्म्यांचा समावेश केल्यास चांगली प्राप्ती होईल. पंचवार्षिक योजनेचे तारू त्यामुळे पैलपार होण्यास सहाय्य होईल

काळ्या चष्म्यावरील कराचे विचार मनांत वावरत असता माझी निःपक्षपाती बुद्धी मला स्वस्थ बसू देईना. काळ्या चष्म्यानीच काय कुणाचे घोडे मारले म्हणून त्यावर कर बसवावा ? वकील लोक काळे कोट वापरतात. काळ्या चष्म्यामुळे माणूस शिष्ट दिसतो, निदान लोक तसे मानतात तर काळा कोट परिधान करणारा हाही कोर्टदरबारात मानमान्यता असलेला माणूस आहे असे समजले जाते. काळा कोट परिधान केलेल्या व्यक्तिबद्दल समाज अनेक गोष्टी गृहीत धरून चालतो. काळ्या कोटातील व्यक्तिभोवती एक पोलादी चिलखत, संरक्षक ढाल सतत अदृश्यपणे त्या व्यक्तीचा सांभाळ करीत फिरत असते. "आदरार्थे" बहुवचन काळ्या कोटातील व्यक्तीच्या सेवेसाठी हात जोडून उभे असते. नुसते अहोजाहो म्हणण्याचा लाभ किरकोळ म्हणून सोडून दिला तरी दुसरे कैक लाभ काळ्या कोटवाल्यांच्या खिशांत अलगद पडतात. भरल्या सभागृहात ही व्यक्ति उशिरा आली तर त्यांच्यासाठी आपले आसन रिकामे करुन देण्यास अनेक जण सिद्ध असतात. तिकिटासाठी रांगेत ताटकळत उभी राहाणारी माणसे काळ्या कोटवाल्या वकिलांचे तिकीट काढून देतात. काळ्या चष्म्यामुळे मिळणाऱ्या प्रतिष्ठेची काळ्या कोटामुळे मिळणाऱ्या प्रतिष्ठेबरोबर तुलनाही होऊ शकत

नाही. काळ्या चष्म्यांवर नगामागे एक रुपया कर बसवला तर काळ्या कोटावर पुष्कळच अधिक कर बसवावा लागेल.

पण काळ्या कोटांचा संरक्षक चिलखता सारखा उपयोग समाजात कोणी बुद्धी पुरःस्सर करीत असेल का हो ? चटकन तसे वाटत नाही. पण पक्का भरंवसा देता येणार नाही असल्या बाबतीत. असे सांगतात की विलायतेत एक पांढरी धोप पायघोळ कफनी धारण करणारा पाद्रीबाबा आगगाडीच्या पहिल्या वर्गाच्या कोचावर आरामशीर पहुडला असता हृदयक्रिया बंद पडल्यामुळे मेलेला आढळून आला. पाद्रीबाबाच्या पवित्र प्रेताचा पंचनामा झाला त्यावेळी पांढऱ्या कफनीच्या उजव्या बाजूच्या खिशांत एक काळ्या रंगाची जपमाळ आणि डाव्या बाजूच्या खिशांत एक तिसऱ्या वर्गाचे तिकीट सांपडले मृत्यूने अकाली घाला घातल्यामुळे पाद्रीबाबाचे बिंग बाहेर आले. पण पांढऱ्या पायघोळ कफनीच्या पुण्याईवर त्याने सारा जन्मभर पहिल्या वर्गाचा प्रवास केला असता तरी त्याला कोणी फट म्हटले नसते. आणि कधी तिकीट आहे का विचारले नसते.

ड ड ड

काळे चष्मे वापरणारे आणि काळे कोटवाले यावर सरसकट कर बसवला तर काही जणाना तो भूर्दंड व्यर्थच भरणे भाग पडेल असे मात्र वाटल्यावाचून राहात नाही काळे चष्मे वापरण्याची नेत्र वैद्याची शिफारसच असली तर ते न वापरून कसे चालेल ? अशा प्रामाणिक माणसांस काळ्या चष्म्यावर कर बसविल्यास मोठी उपाधी होईल. नेत्र वैद्याचे शिफारस पत्र काळ्या चष्म्याबरोबर गुरवाच्या शिवलींगाप्रमाणे त्यास गळ्यात घालून हिंडावे लागेल. केवळ शिस्त म्हणून काळे कोट वापरणाऱ्यांना काळ्या कोटावरचा कर हा जिझिया कराहून अधिक जाचक होऊन राहील. काडतुसांमुळे मागे शिपायांनी 'बंड' केले म्हणतात. तसे बंड करण्यास काळे कोटवाले वकील तयार होतील.

पण काळे चष्मे आणि काळे डगले यांवरील करांचे ओझे आक्षेपार्ह आहे असे मानले तरी अशा छपन्न दुसऱ्या गोष्टी आहेत की ज्यांच्यावर कर बसवल्यास तो कर अन्याय्य आहे असे म्हणण्याची हिम्मत कोणाला होणार नाही. मुकाट्याने त्याना तो भरणेच प्राप्त होईल. गोरखपूरला का कोठे एका पुरभय्याने पायाच्या टाचेपर्यंत सहज पोचणारी मिशी राखल्याचे वृत्त वर्तमान पत्रात मध्यंतरी आले होते. ह्या मिशीच्या अगदी इंचाइंचावर कर बसवल्यास त्यास कोण हरकत घेईल ? त्याने मिशीला पीळ देऊन मेणबत्तीच्या वातीसारखी मिशीची अग्रे ताठ उभी करून ठेवली असती तर जवांमर्दीचे ते चिन्ह मानता आले असते. पण पायाच्या टाचेपर्यंत. मिशा वाढवणारा हा माणूस पोकळ डौलासाठी श्मश्रुवर्धन करतो असेच मत द्यावे लागेल.

दुसरे काही लोक मी असे पाहीले आहेत की जिथे चार चौघे साधी सिन्नर विडी ओढत आहेत, चारमिनार सिगरेट मधून धूम्रवलय काढीत आहेत. नेमके तिथे अक्कड बाज पाईप ओढण्याची हुक्की त्यांना येते. नागण्णा प्रथम पाईप तळहातावर टोकून, त्यात डबीतला तंतूमय तंबाखू घालतात. नंतर पाईप तोंडात तिरकस धरून तो पेटवतात. त्यात धूम्रपानापासून मिळणाऱ्या आनंदापेक्षा आजूबाजूचे लोक कौतुकाने त्यांच्याकडे टकमका बघत राहतात यातच पाईपवाल्याला भूषण वाटत असते. तो पाईपचे थाटमाट करीत असतो. त्यावेळी गंमत म्हणून त्याला सिन्नर विडी देऊ करा तो तिरस्काराने ती झिडकारील अधिकच तिरसट असला तर विडी हातात घेऊन चुरगाळून तुकडे तुमच्या तोंडावर फेकील. आपण ही गावरान सिन्नर विडी ओढली तर एकदम जंगली आदमी ठरू हीच भिती त्याला वाटेल, एरवी तंबाखू ओढायची, ती चिलमीतून ओढली, कुड्याच्या पानातून वा टेंभूर्णीच्या पानांतून ओढली तरी आनंद तोच असणार. पण पाईप काढून घ्या. त्यांच्या ऐटीचा पाईपच मोडेल. पाईप त्याच्या प्रौढीचे प्रतीक आहे. बस बस ! आणि म्हणूनच ह्या पाईपवाल्यांवर कर बसवावा असे आम्ही सुचवतो. अहंकार हा निरनिराळ्या रुपाने वावरत असतो. चोर बाजारातून लाकूड सामान आणून बांधलेल्या घराला राजकमल हे नांव देणारा घरमालक, ज्या घरकुलांत धडपणे चार माणसे राहू शकत नाहीत अशा घराला शीश महल असे नांव देणारा घरधनी पाहीला की वाटते काही नाही यांच्यावर अहंकार कर बसवलाच पाहीजे

काळ्या चष्म्यांवरील, काळ्या कोटावरील पल्लेदार मिशांवरील व अहंकारावरील करांच्या योजनाबद्दल सरकार कोणाचीही पाठ थोपटील. पण कर योजना आणि कर वसूली यांत महदंतर आहे. हे कर वसूल करणार कोण ? मांजराच्या गळ्यांत घंटा कोण बांधणार ? समजा सरकारने मला ( वयाची अट शिथील करुन ) इन्स्पेक्टर नेमले आणि सारे शिपाई आणि पट्टेवाले घेऊन गोरखपूरच्या पूरभय्याच्या मिशीवरचा कर वसूल करायला मी गेलो. कर आकारायचा तर मिशी तर मोजली पाहीजे ? मग पुरभय्यांच्या मिशीला हात घालायची माझी छाती होईल काय ? माझा पट्टेवाला मिशीला टेप लावायला तयार होईल काय ? हां हां म्हणता पांच पन्नास टारगट कारटी तिथे जमा होतील. आमची हुर्यो करतील. धक्का बुक्की सुरु होईल. तेथून पळ काढता आम्हाला भुई थोडी होईल. कर नको पण ह्या वात्रट कारट्यांना आवरा असे म्हणण्याची पाळी येईल ! कर मरो पण आम्ही धडपणी घरी पोचलो की बस झाले असे वाटेल

म्हणून तूर्त सरकारने विनवले तरी मिशीवरचे कर वसूल करण्याचा धकाधकीचा रोजगार मला पत्करायचा नाही. सरकारने करवसूली अधिकाऱ्याची वस्त्रे दुसऱ्या कोणा कर्तबगार अधिकाऱ्याला द्यावीत मी मुळीच तक्रार करणार नाही त्याबाबत

● ● ●

# :: जपणुकीचा जपमंत्र ::

मी अगदी बिनचूक, अगदी कांही वर्षापासून कोणती गोष्ट करीत आलो असेन तर ती म्हणजे दरदिवशी निर्मळ श्मश्रू करणे ही होय. माझ्या दैनंदिन कार्यक्रमांत अगदी झालाच पाहीजे असा कार्यक्रम म्हणजे हाच. मी घरी, दारी प्रवासांत, कुठेही असो. मला खूप फुरसत असो की जीव घेणी घाई असो. झेनिथच्या अगर भारताच्या चकचकीत पात्याने दाढी ही उरकलीच पाहिजे.

हलके हलके दाढीच्या या नित्यविधीचे प्रस्थ फार वाढत आहे. दाढीची सारी उपकरणे पुन्हा पुन्हा पुसून लख्ख करणे हे काम असतेच. पण दाढीचे पाते विकत घेताच त्या पात्याच्या वेष्टणावर पाते वापरण्यास प्रारंभ केल्या दिवसाची नोंद करून ठेवणे ह्या कामाला मोठे महात्म्य प्राप्त झाले आहे. पंचांगांत चंद्र सूर्य ग्रहणांचे स्पर्शकाल आणि मोक्ष काल लिहीलेले असतात तसे दाढीची पाती वापरण्याचे प्रारंभ काल आणि निर्माण काल लिहीलेली जुनी पाती मी जिव्हाभावाने जपून ठेवली आहेत.

झेनिथचे एक आण्याचे पाते मी महिनाभर सहज वापरतो हे सांगण्यात मला मोठे भूषण वाटते. आण्याच्या पात्यांने आपणांस अधिकाधिक काम दिले पाहिजे हा हव्यास मला लागला आहे. या हव्यासापायी अलिकडे मी एक निसण्याचा दगड विकत घेतला आहे. देव पुजेकरीता चंदनाचे खोड उगाळले नसेल इतक्या भाविकपणे त्या निसण्यावर दाढीची पाती मी घाशीत असतो. दाढीच्या पात्यांची अशी जतन जपणूक चालू आहे.

स्वभावाने मी काटकसरी नाही पैसा उधळायला फारसा माझ्याजवळ कधी नसतोच म्हणा. पण तो असलाच की कसल्या तरी खुळ्या नादापायी मी तो उधळतो असा आमच्या घरधनीणीपासून पोरासोरांपर्यंत सर्वांचाच माझ्यावर आरोप आहे. असा मी उधळ्या माणूस पण झेनिथच्या एका आण्याच्या पात्यांना एवढा का जपतो ते समजत नाही. पण ती गोष्ट मात्र खरी आहे.

जपणुकीचे हे तंत्र फक्त दाढीच्या पात्यांच्या बाबतीतच नाही तर आणखीही दोन तीन वस्तूंच्या बाबतीत मी अवलंबीत आहे. असे मला आढळून आले. छत्री जास्तीत जास्त टिकली पाहिजे असा माझा अट्टाहास आहे. गेल्या वर्षापर्यंत वापरीत असलेली छत्री मी कांही तरी चार पांच वर्षे वापरली होती. आमच्या एका सोबत्यालाही हे छत्री टिकवण्याचे वेड लागले आहे. गेल्या वर्षी त्याच्या छत्रीने पहिले वर्ष संपवून दुसऱ्या वर्षात पदार्पण केले. कुणी न विचारताच तो छत्री दाखवून ज्याला त्याला सांगू लागला 'अहो सेकंड इयर आहे सेकंड इयर आमच्या छत्रिला' दुसऱ्या वर्षात पदार्पण केलेल्या

त्याच्या छत्रिचा विषय त्या बाबल्यांने आपण होऊन काढला मी घरात नव्हतो. हा विषय त्याने काढताच आमच्या मुलीने मुकाट्याने कोपऱ्यात कष्टमय स्थितीत जीवन कंठणारी माझी छत्री त्याच्या पुढ्यात ठेवली आणि त्याला ती म्हणाली 'काका तुमची छत्री सेकंड इयना, पण आमच्या बापूंची ही छत्री यंदा फायनल एम. बी. बी एस ला बसणार आहे!' आमच्या घरी झालेली ही हकीकत आमच्या मित्रानेच मला नुकतीच सांगितली पण परिणाम असा झाला की आमच्या छत्रीची मिजास पुन्हा कोणाला सांगायचे धारिष्ट्य त्याला झालेले नाही.

माझी मशार निल्हे छत्री पांचवर्षाची होती ही गोष्ट खरी, पण वास्तवीक पांच वर्षाच्या अवधीत तिची इतकी स्थित्यंतरे झाली होती की कापडापासून तो काड्यांपर्यंत एकही वस्तू आज मूळची राहीलेली नाही. छत्रिचा पहिला बांबूचा दांडा जावून त्याच्या जागी शेवटी प्लास्टिकचा दांडा बिन्हाड मांडून बसला होता. शनीच्या ताऱ्याच्या भोवती जसे चंद्र असतात तसे त्या छत्रच्या बुडाशी चांदणेही होते. ती छत्री पांच वर्षाची आहे हा एक भ्रम होता. पण मी मात्र तो भ्रम आहे हे मानण्यास तयार नव्हतो.

हो आणखीही एक वस्तू आहे तिच्यावरही माझे अनिवार प्रेम आहे. चष्म्याचे घर ती वस्तू मला चवेचाळीसावे वर्ष लागले तेव्हा मी चष्मा लावू लागलो. चष्मेवाल्याने चष्म्याबरोबर चष्माघर मला मोफत दिले. आज झाली त्याला तीन चार वर्षे. ते आणले तेव्हांची त्याची झळाळी कांही विलक्षण होती. आज तेच चष्म्याचे घर अगदी बिटके दिसू लागले आहे त्याची शिवण उसवली आहे. पूर्वी त्या चष्म्याघराला एकच प्रवेशद्वार होते आज ते मुक्तद्वार झाले आहे. कुठुनही चष्मा आत लोटता येऊ लागला आहे. प्रवेशबंदी कुठे शिल्लकच राहीलेली नाही. पण चष्म्याचे हे चंद्रमौली घर मी सोडून द्यायला तयार नाही

आमचा शेजारी रमाशंकर पैसेवाला खरा, पण अगदी कर्मदरिद्रि आहे लेकाचा. एक दिवस माझ्याकडे बसायला आला होता तेव्हा चष्म्याचे मेजावर पडलेले घर हातात घेऊन उलट सुलट फिरवून माझ्याकडे पाहून तो हसू लागला व म्हणाला 'रागावणार नसाल तर एक गोष्ट सांगतो' हे चष्म्याचे घर आता जीर्ण झाले आहे. हे टाकून देऊन नवीन घ्यायला आपण काय घ्याल ते सांगा' एवढ्यावरच तो थांबता तर मग मी तरी त्याला कर्म दरिद्री कशाला म्हटले असते? शेवटी बोलू नये ते तो बोललाच, 'बापू हे चष्म्याचे घर आता मला देऊन टाका' मी त्याला ते दिले नाही ही गोष्ट निराळी एक दिवस माझा चष्मा त्यातून खाली पडून फुटेल तेव्हा माझे डोळे पुरते उघडतील

केव्हा केव्हा दाढीचे पाते, छत्री, चष्म्याचे घर ह्या वस्तू जिवाआगळी जपण्याचे हे खूळ मी कुठून संपादन केले याचे माझे मलाच कोडे पडते पण आतांशा माझी ही

खुळे वज्रलेप झाली होती. दाढीच्या पात्यावर मी तारखा मांडून ठेवतो, त्यांची बरदास्त ठेवतो. हे माझ्या स्नेह्यांना माहीत झाले होते. ते मला हसत पण मीही तिकडे कानाडोळा करीत होतो.

परवा वामनरावांकडे गेलो असता एक चमत्कार घडून आला. मला सल्ला मसलतीसाठी वामनरावांकडे जाण्याचा प्रसंग क्वचितच येतो. पण हिन्दु कायद्याच्या एका प्रश्नासंबंधी मला एक अडचण आली म्हणून मी त्यांच्याकडे गेलो. आता कायद्याची पुस्तके वामनरावांकडे काय कमी आहेत. ! पण वामनरावांना तुम्ही स्वतःचे पुस्तक बरोबर आणलेत तर एकंदरीत बरे वाटते. तुम्हाला आस्था आहे हे ही दिसून येते. म्हणून हिंदु कायद्याचे माझे कोरे पुस्तक घेऊन मी त्यांच्याकडे गेलो हे पुस्तक मी दोन वर्षांपूर्वी घेतले होते पण त्या पुस्तकाच्या नवतीचा नूर अद्याप चमचम चमकत होता.

हिंदु कायद्याच्या प्रश्नावर वामनरावांशी मी चर्चा केली नाही, वामनरावांनी माझ्यांशी चर्चा केली मला अडलेला प्रश्न वामनरावांनी मला नीट समजावून सांगितला माझे समाधान झाले. मी जायला निघणार इतक्यात वामनरावांनी माझे मुळांचे हिन्दु कायद्याचे पुस्तक हातात घेतले आणि चांगले चाळले. माझ्या पुस्तकाकडे दृष्टी टाकीत ते मिस्कीलपणे मला म्हणाले ‘कां हो बापू ! तुमच्या ह्या पुस्तकावर तारखा दिसत नाहीत. कुठला परिच्छेद कधी वाचला, कुठले प्रकरण कधी परतले याचा मागमूसही दिसत नाही. !’

वामनरावांच्या त्या विचित्र प्रश्नाने मीही गोंधळलो. उगाच दांत काढून हसलो, पण माझ्या ध्यानी येऊन चुकले की आपले कोणी मित्र वामनरावांकडे जाऊन पाघळले आहेत. दाढीच्या पात्यावर मी तारखा घालतो हे आमचे हितगुज वामनरावांच्या कानापर्यंत कुणीतरी पोचवले आहे खास. झाला विश्वासघात झाला. कोणी तोंडात मारली असती तरी खजील झालो नसतो. इतका मी शरमिंदा झालो. प्रश्नाचे उत्तर सुचेना. वामनरावांच्या हातून ते पुस्तक काढून घेण्याची माझी काय हिंमत होती !

वामनराव पुन्हा म्हणाले “बापुराव बोलत का नाही ?” वामनराव गालातल्या गालात हसत होते. आणि मी पोटातल्या पोटात जिरत होतो. पुढे वामनराव काहीच बोलले नाहीत पण ते न बोलताही त्यांच्या मनात काय होते ते मी ताडले. गुरुंनी मौन धारण केले तरी शिष्याचा संशय फिटला होता. त्यांनी न सांगितलेला उपदेश

कर्ण संपुटात घुटमळत होता. वामनराव जणू सांगत होते, 'अरे शहाण्या माणसा, परमेश्वराने तुला अस्थिचर्मय असे हे माडीचे घर दिले आहे. ह्या घराच्या माडीवर एक दिवाणखाणा आहे. त्या दिवाणखान्यात एक अमोलिक वस्तू आहे. दाढीच्या लाख पात्याहून त्यांची किंमत अधिक आहे. चष्म्याचे घर, दाढीची पाती जतन करण्याचे काम चालू ठेव. त्यात काही बिघडत नाही. पण या देहरुपी घराला चैतन्य आणणारी चांदण्याप्रमाणे ऊजाळा देणारी जी अमोलिक वस्तू आहे तिचे जतन कर. ती वस्तू अधिक तल्लख. अधिक दैदिप्यमान होईल ह्याची खटपट कर लाभ त्यात आहे. जन्मा आल्याचे सार्थक त्यात आहे.

वामनराव माझ्याशी बोलत आहेत अशा तंद्रीत मी होतो. ही तंद्री संपताच मी पुन्हा सावध झालो. त्यावेळी चकचकीत कपातून आणलेला चहा माझ्या पुढे येऊन हजर होता. वामनरावांचा मुक्त गुरुपदेश आणि चहाचा प्रसाद घेऊन मी घरचा रस्ता धरला.

जपणुकींचा मंत्र मी उलटा जपत होतो. राम राम म्हणण्याऐवजी मरा मरा म्हणत होतो.

जपणुकीच्या खऱ्या मंत्रांची दीक्षा आज मला मिळाली होती. मी तृत झालो होतो. ज्ञानदेवांची ' मेळीलो जन्म फळा ' ही ओवी मुखावाटे बाहेर पडत होती.

● ● ●

# अरे, हे तर मुखवटे !

या बाँब वर्षावाने महिलांच्या रंगलेल्या बैठकीचे अक्षरशः हजारो तुकडे झाले. त्या साऱ्या बाया बारा वाटांनी माझ्या घरातून बाहेर पडल्या. क्षणार्धात माजघर अगदी मोकळे झाले. मी पुन्हा माझ्या खोलीत येऊन अंग टाकले इतक्यात आमच्या सौभाग्यवती बाहेर आल्या आणि म्हणाल्या, "का हो लवकर घरी"

कां ते आता नेमके आठवत नाही, पण त्या दिवशी मी नेहमीपेक्षा खूपच लवकर कामावरुन घरी परत आलो होतो. अर्थात यावेळी मी घरी परत येईन ही कल्पना कोणालाच असण्याचे काही कारण नव्हते मधल्या दारावरचा पडदा अंतःपुराची राखणदारी करण्याचे आपले काम इमानेइतबारे करीत होता. या सुरक्षित अंतःपुरात महिला मंडळाची छोटीशी बैठक भरली असल्याचा भास होत होता. आतून येणाऱ्या आवाजावरून अंदाज बांधायचा तर आमच्या कुटुंबिनी खेरीज दुसऱ्या चार पाच महिला तिथे गोळा झालेल्या असल्या पाहिजेत. त्या सर्व महिला मुक्त कंठाने आणि मन मोकळेपणाने कोटल्यातरी विषयावर चर्चा करीत होत्या. सर्वजणी एकाचवेळी बोलत असल्यामुळे घरातून नुसता दणदणाट उडालेला होता. महिलांच्या त्या महाघोषांत पुरुषाच्या पादत्राणाचा क्षीण आवाज पार जिरून गेला असल्यास त्यात नवल काय ? मी कपडे काढले. आराम खुर्चीवर जरा आडवा होणार होतो, पण म्हटले, चर्चा रंगली आहे. आपण घटकाभर बाहेर व्हरांड्यात चर्चेपासून चार पावले दूर बसावे.

अंतःपुर आणि अंतःपुरात चालणाऱ्या महिलांच्या गुजगोष्टी, खलबते, वादविवाद चर्चा याबाबत माझी मते अगदी निश्चित झालेली आहेत. अंतःपुर हा महिलाचा भुईकोट किल्ला आहे या भुईकोट किल्ल्याच्या चतुःसीमांत महिलांना संपूर्ण स्वातंत्र्य पाहिजे जेथली वाणी बाहेर कोणालाही कळता उपयोगी नाही. ती नकळत कोणी ऐकणे योग्य नाही. अंतःपुरातल्या शब्दाशब्दाभोवती खडा संगिनी पहारा असला पाहिजे. तेथे विश्रब्धपणे वावरणाऱ्या महिलांच्या वाणीला वा वचनाला वाऱ्याचासुद्धा स्पर्श होता कामा नये. प्रत्येक यजमानाने प्राणपणाने ह्या मंत्राची पाळणूक केली पाहिजे. उच्चरवाने म्हटले पाहिजे, प्राण जाहि अरू बचन न जाहि

आमच्या मित्रमंडळात हा निर्णय जेव्हा जेव्हा निघे तेव्हा तेव्हा महिलांच्या अंतःपुर स्वातंत्र्याचा मी पुरस्कार केला आहे. त्यांचा पक्ष घेऊन विरोधकांशी कडाडून भांडलो आहे. तत्त्व निष्ठेच्या पवित्र्यात उभा राहून सांगितले आहे की मानवी जीवनात काही गोष्टी अशा असतात की त्यांच्या बाबतीत तडजोड, पर्याय असूच शकत नाहीत. अंतःपुरातील स्वातंत्र्य ही अशी बाब आहे. माझे हे बौद्धीक जेव्हा माझे मित्र ऐकत तेव्हा थट्टेने म्हणत, ' छे छे, अरे हा भलताच पुरोगामी आहे. '

मी बाहेर व्हरांड्यात गेलो होतो त्याचे कारण माजघरात महिलांची जी खाजगी चर्चा चालू होती ती आडून ऐकण्याची माझी इच्छा नव्हती. पण ती आडगिन्हाईकी टाळण्याचा जो जो मी यत्न करीत होतो तो तो अंतःपुरातील ते आवाज माझा पाठपुरावा करू पहात होते. आता चक्क मी कानात बोटे घालणार होतो. पण तेवढ्या अवधीत एक वाक्य कानी पडले आणि त्यामुळे मी चकितच झालो. अरे ही चर्चा तर आम्हा पुरुषांविषयीच आहे पुरुषांचे दाखवायचे दात वेगळे आणि खायचे दात वेगळे असतात असे कोणी महिला प्रतिपादीत होती. पुरुषांचे सारे वागणे वरपांगी असते असे कोणी दुसरी ठासून सांगत होती एकएक वाक्यागणिक माझी उत्कंठा वाढत जात होती. ऐकण्याचा मोह आवरणे कठीण होत चालले होते. अविचारांचे पारडे जड होऊ पहात होते. इतक्यात एक नामी युक्ति मला सुचली. मी तपकिरीची चिमूट काढली आणि नाकांत ढोसली. तपकीर नाकात जाताच मला पाच सात शिंका धडाधड आल्या. त्या शिंका कसल्या बाँबचा वर्षावच तो ! त्या बाँब वर्षावाने महिलांच्या रंगलेल्या बैठकीचे अक्षरशः हजार तुकडे झाले. त्या बाया बारा वाटांनी माझ्या घरातून बाहेर पडल्या. क्षणार्धांत माजघर अगदी मोकळे झाले. मी पुन्हा माझ्या खोलीत येऊन आरामखुर्चीत अंग टाकले इतक्यात आमच्या सौभाग्यवती बाहेर आल्या आणि हसत हसत बोलायला त्यांनी सुरवात केली.

हे काय ! आज तुम्ही एवढ्या लवकर घरी कसे ! चहा घेणार की काही खायला करू ! ' मी म्हटले, काय मौज आहे पहा. एका मिनिटापूर्वी ही त्या बायकांच्या बंडात सामील होती. आणि आता मला विचारते आहे की ' चहा घेणार का ! ' जशी काही त्या गावचीच नाही. आता हिच्या बरोबर हसलो तर फसले. जरा चांगली फैलावर घेतो अगोदर. मग दुसरी बात. मी ठसक्यातच प्रारंभ केला.

' आज अगोदर माझे दाखवायचे दात कुठचे आणि खायचे कुठचे याचा खुलासा पाहिजे. माझ्या वरपांगी पणाचा पुरावा पाहिजे. चहा आणि फराळ मग सावकाश. '

विचारलेल्या प्रश्नांचे काहीच उत्तर न देता ती म्हणाली ' आज घरातला उष्मा जरा वाढलेला आहे. तेव्हा मी घटकाभर बाहेर जाऊन येते. जरा ऊन कमी झाले की करीन चहा. "

दरडावून माझ्या सवालांना जबाब मागण्याचा माझा विचार होता. पण ही दटावणी ऐकून घ्यायला तेथे होतेच कोण !

मनुष्य स्वभाव किती विचित्र आहे पहा. महिलांचे म्हणणे होते की पुरुषांचे वर्तन वरपांगी असते. मनांत एक असून ते बाहेर नाट्य दुसरेच दाखवतात. हे आव्हान वास्तविक पुरुषांना होते. मला होते. सवालाचा......... होता. शहानिशा माझ्या वर्तनाची व्हायची होती. ........ ...... आणायला हवे होते. आणि मी उलट

बायकोलाच दटावीत होतो. दमात घेऊन खुलासा मागत होतो. बँकेतून चेक परत आला होता आणि चेक दिला तेवढी रक्कम बँकेत होती की नाही याचा तपास न करता बँकेतल्या कारकुनावर माझा घुस्सा झाला होता. सही नमुन्याबर हुकूम न करता पोष्टातल्या कारकुनाची मला पैसे न दिल्याबद्दल मी हजेरी घेत होतो. हे कसे जमणार ? दुनिया येवढी भोळी राहिली नव्हती. बाटलीतून दूध पीत नव्हती. शेवटी विचारपूर्वक मी आमच्या मंडळीना काही सवाल विचारायचे नाहीत असा निर्णय केला. ही केस सूक्ष्म निरीक्षणाची होती. आपणाविरूद्ध केलेला अरोप खरा की खोटा हे अगदी बारकाईने पाहण्याचे मी ठरविले.

जेथे लपंडावच नाही तेथे लाख तपासणी केली तरी हाती काय लागणार ? कर नाही त्याला डर असावयाचे काय कारण ? अगदी निश्चितपणे मी स्वतःची सूक्ष्म निरीक्षक भिंगाखाली परीक्षा करून घेण्यास सिद्ध झाली. मी मोठा सद्‌गुणांचा पुतळा आहे. चांगले वळण काय चारित्र्य काय ते सर्वांनी माझ्या पासून शिकावे असे मला वाटत नव्हते. पण मी एक सुस्वभावी उदार अंतःकारणाचा, भला माणूस आहे याबद्दल मला मुळीच शंका नव्हती. सर्वांशी हसून खेळून वागण्याची माझी वृत्ती असल्यामुळे मी मोठा गोड माणूस आहे असे माझ्या प्रमाणे माझ्या मित्रांनाही वाटत असे. आमच्या आळीतले गणपतराव तर नेहमी म्हणत की गांवात कोणी माणूस कष्टी, उदासवाणा असेल तेथे आबाला चार घटका नेऊन सोडावा आबाचा बिनचावीचा मर्फी रेडिओ एकदां सुरु झाला की तेथे हास्यविनोदाचे गमतीचे वातावरण निर्माण झालेच म्हणून समजा.

आमची बहीण यमू ही आमच्या घरापासून थोड्या अंतरावर रहात असे तिच्या घरी मी वारंवार जात असे, माझ्याविषयी यमूचा अभिप्राय अगदी असाच होता. आम्ही उभयतां तिच्याकडे जात असू तेव्हा माझी वाखाणणी करून ती आमच्या बायकोला म्हणे ‘वहिनी, तू मोठी भाग्याची म्हणून माझ्या आबासारखा नवरा तुला मिळाला’ हे तिने म्हटले की आमची ही शहाणी मान मुरडून म्हणे ‘माहित आहेत, माहित आहेत’ यमूची मुले मी गेलो की मामा आले मामा आले म्हणून आनंदाने नाचू लागत. यमूची धाकटी मुलगी कुंदा आईला विचारी आज मामा आपल्याकडे राहणार ना, ग ?

हे सारे ठीक झाले पण मी घरी असाच असे का ही मुद्याची गोष्ट आहे माझ्या विषयी घरच्या माणसांना आदर होता ही गोष्ट खरी आहे पण त्याच्यात भीतीचा अंश असे की नाही ? जरूर असे. एकाद्या दिवशी माझे सकाळचे स्नानादि कार्यक्रम मी सावकाशपणे करु लागलो की आमची छोटी सुमन आईला विचारी ‘आई आबांना आज हपिसांत नाही जायचे ? ह्यावर मीही गंमतीने सुमनला सांगत असे ‘आज हपिसांत नाही जायचे !’ (आज हपिसाला सुटी आहे) पण मी बाहेर जाणार

आहे. तात्पर्य, घरांत मी बसलो :कीं घरांतले वातावरण जरा तंग रहात असे. मुलाना मोकळेपणी खेळायला हुंदडायला मिळत नसे आणि खरंच मी घरी फारच करडेपणे वागे घरांत मोठमोठ्याने बोललेले मला खपत नसे. कुणाच्या हातून भांडे जमिनीवर पडून दणकन आवाज झाला की माझ्या तळपायाची आग मस्तकाला जाई. मी ओरडून म्हणे ‘ हातपाय शाबूत आहेत. मग भांडी पडतात कशी ’ चहांत कधी कधी साखर घालायला आमची बायको विसरे. अशा वेळी पुन्हां कधीहि चहा पिणार नाही अशी प्रतिज्ञा मी करी एकदा आमच्या बायकोला बरे वाटत नव्हते तरी तीने तसेच चुलीवर आधण ठेवले. तांदुल ओयरले आणि मला म्हणाली, जरा भाताकडे लक्ष ठेवा. माझ्या वैवाहिक जीवनांत ही दुखणेकरी झाली आणि माझ्या हातात चूल आली असे कधी झाले. नव्हते, अशा वेळी तिला बरे वाटेना तेव्हां तिला थोडी मदत करायला मला वास्तविक कांही हरकत नव्हती. पण मी अगदी तिला चक्क सांगितले, आणि तेही गाणें गाऊन, ‘ मी अधणा न शिवे ’ ! शेवटी मी भाताकडे नाही तर नाहीच पाहिले.

पण यमूकडे मी असाच एकदा गेलो होतो. यमूला किंचित सर्दी झाली होती. तरी ती चुलीजवळ आपला स्वयंपाक करु लागली होती. मला काय कणव आला कुणास ठाऊव ! त्या दिवशी तिच्याकडे मी पोळ्या लाटायला यमूला मदत काय केली ! पाट काय मांडले !! आधणाला न शिवणारा मी कधी कधी आश्चर्य वाटे आज त्या गोष्टीचा छडा लागला. घरची माणसे ही घरचीच, गोठ्याच्या गाई त्यांना माझ्याबद्दल काय वाटते ह्याची परवा मला नव्हती. माझे बाहेरच्या लोकांच्या मताकडे लक्ष होते. त्यांनी मला मला म्हणायला पाहिजे होते. माझी सारीच धडपड त्यासाठी चालू असे. यमूला बरे वाटावे म्हणून मझ्याही घरी मी जे करण्यास नाकारी ते यमूकडे मी मोठ्या हौशीने करीत असे.

माझ्या औदार्याचेहि मला नेहमी कौतुक वाटत असते. माझ्या मध्यमवर्गीय आर्थिक परिस्थितीत मी कित्येक संस्थांना सहाय्य करतो वर्गणी द्यायला कचरत नाही. आता ही गोष्ट अगदी सत्य आहे. पण संस्थाला सहाय्य करण्यात केवळ सहाय्य हाच भाग असतो काय ? मी आमच्या गांवच्या शिशुसंगोपन मंदिराला देणगी दिली ती कां दिली ? खरे सांगायला कांहीच हरकत नाही ही वर्गणी जमा करायला गांवातली दोन बडी धेंडे फिरत होती त्यांच्याशी ओळख असणे हे प्रतिष्ठेचे लक्षण मानले जात होते. ते माझ्याकडे येण्यांत त्यांचे माझेकड जाणे येणे आहे, घरोबा आहे हे मला दाखवायचे होते शिशुसंगोपन हे गौणं होते ! परवा दुसऱ्या एका संस्थेच्या मदतीस्तव नाटकाचे प्रयोग झाले. माझी परिस्थिती पंधरा रुपयाचे तिकीट घेण्याची नव्हती पंधरा रुपयांत पाच तिकीटे घेतो तर घरातल्या साऱ्या माणसांना तो प्रयोग पहाता आला असता. घरात आनंदाचे वातावरण पसरले असते. पण मग मी मोठा असून माझा मोठ्या माणसांत वावर आहे माझी उठबस बड्या बड्या लोकांत आहे हे मला दाखवता आले

नसते. माझ्या औदार्यात औदर्य गुण आहेत पण ते अत्यंत अल्प प्रमाणांत आहेत. भय्याच्या दुधांत दुधापेक्षा पाणीच असते. तरी त्याला लोक दूधच नांव देतात. हा लोकांचा चांगुल पणा आहे.

औदार्य, संस्थांना मदत, नाटकांच्या प्रयोगाची न परवडणारी तिकिटे हे कांही माझे सत्य स्वरुप नव्हे. यमूकडे मी जाऊन तिला मदत करतो तिच्या मुलांशी लडिवाळपणे वागतो, त्यात माझा स्वार्थ आहे. घरांत करडेपणाणे वागणाऱ्या माणसाने आपण सुस्वभावी आहोत हे दाखविण्यासाठी पांघरलेले हे गोंडस प्रावरण आहे तो एक मुखवटा आहे, ओबडधोबड दिसणाऱ्या हनुमानाच्या मूर्तीला शनिवारी रुप्याचा लखलखीत मुखवटा घालून सजवतात त्यातलांच हा प्रकार आहे. मी मूळ प्रकृतीने एक अनघड माणूस आहे. त्या स्वरुपांत वावरणे मला परवडणार नाही. रामाशी विवाह व्हायला हवा तर शूर्पणखेलां लावण्यसुंदर रुप धारण करणे अवश्य आहे. माझे दाखवायचे दांत वेगळे आणि खायचे दांत वेगळे आहेत, माझे औदार्य, माझा हास्यविनोद, माझा लडिवाळपणा हे मुखवटे आहेत ! अगदी होळीच्या सणांत सोंगाडे तोंडाला लावतात तसले मुखवटे आहेत !!

• • •

३०५८
३३४

# प्रवास वर्णन

१) जगन्नाथ पुरी

२) कोणार्कचे सूर्यमंदीर

३) ज्ञान पीठ नालंदा

४) श्री काशी विश्वनाथ

५) यक्ष नगरी नैनिताल

६) हिम शिखरांचे रम्यदर्शन

७) चितोडगड ते आबू

८) आमची म्हैसूर यात्रा

९) गड सासवड

# :: जगन्नाथपुरी ::

गेल्या सहासात वर्षापासून एक उद्योग आम्ही अगदी छांदिष्टपणाने सतत चालविलेला आहे. दसऱ्याचा सिमोल्लंघनाचा मुहूर्त धरून घराबाहेर प्रस्थान ठेवायचे. योजनापूर्वक भारतात कुठेतरी दोन–अडीच हजार मैल आगगाडीने, पांच–सहाशे मैल बसने प्रवास करायचा. वीस–बावीस दिवस मनसोक्त भ्रमन्ती केल्यावर पुन्हा दिवाळीच्या दिवशी घरी परतायचे. आणि छापण्यालायक गोष्ट म्हणजे सुरू केल्यापासून हा कार्यक्रम कामाधामांची, अडचणींची मांजरे आडवी न येता सुरळीतपणे पार पडत आहे. अशीच एक बडी लंबी सफर मारून आम्ही नुकतेच परत आलो.

**ऐसपैस सफर—**

यावेळच्या सहलीचा पसारा कोल्हापुरी, शेमलेदार पटक्यासारखा ऐसपैस होता. एक टोंक होते भारताच्या पूर्वसागरावरचे जगन्नाथ पुरी आणि दुसरे हिमालयाच्या कुशीतल्या कुमाँव पहाडी विभागातले राणीखेत हैद्राबाद-वरून ओरिसा, बिहार व उत्तर प्रदेशातून जावून जवळ जवळ अर्ध्या भारताला प्रदक्षिणा झाली हैदराबादेत हिंडलो, भुवनेश्वरच्या नव्या राजधानीचा नवा संसार पाहिला, गोल घराच्या घुमटावरून



भुवनेश्वर लिंगराज मंदिर

भागिरथीच्या प्रवाहात पाय सोडून बसलेले "पाटलीपुत्रं नाम नगरम्" म्हणजे पाटणा बघितले. लखनौच्या बाजारी फेरफटका मारला, मथुरा, वाराणसी, प्रयाग, गया ही तीर्थे घडली. त्रिवेणी संगमावर स्नान झाले. नैनितालहून आणि पुन्हा आलमोरा आणि राणीखेत वरून हिमालयाच्या हिमशिखरांचे अतृप्ति दर्शन सुख भोगले. आमच्यातील एक तुकडी तर बॅरकी आणि पॅटन रणगाड्यांचे कबरस्तान खेमकरण येथपर्यंत मजल मारून पुन्हा आपल्या तळावर सुखरूप उतरली.

### हैदराबादेत फेरफटका—

आम्ही प्रथम जगन्नाथपुरीकडे मोर्चा वळविला. दसऱ्याच्या दिवशी सकाळी सिकंदराबाद एक्स्प्रेस हैदराबाद स्टेशनात येऊन उभी राहिली. गाडीवर कोणी न्यायला आले की, प्रवाशाला एक प्रकारची प्रतिष्ठा प्राप्त होते. आमच्या अरुण भय्याने केव्हा मुकाट्याने पत्र पाठवले होते. कुणास ठावूक पण त्याचे साडू स्टेशनवर उपस्थित होते. लग्नानंतर अरुण प्रथमच सासुरवाडीकडल्या माणसांकडे आला होता. जावईपणाचे गडद रंग अजून उतरले नव्हते. रिक्षातून वऱ्हाड्यांच्या रुबाबात सुलतान बाजारातल्या एका घरापाशी आम्ही उतरलो. यजमान पुढे येऊन त्यांनी आम्हाला त्यांच्या दिवाणखान्यात नेले. सोफासेटवर आणि शिंपल्याच्या आकाराच्या अमेरिकन खुर्च्यांवर आम्ही स्थानापन्न झालो. चहा तर आमची वाट पहातच उभा होता. मी आणि दुसरे काही मित्र काहीतरी खाल्ल्यावाचून अनशापोटी आंघोळ न करणाऱ्यांच्या पंथातले होतो. तेव्हा ब्रेकफास्ट झाला. नंतर सावकाश ऊन पाण्याने तब्येतीत स्नाने उरकली. आणि गांवात हिंडायला बाहेर पडलो चार लोक जातात म्हणून प्रथम आम्ही चारमिनार पहायला गेलो. पण मुद्दाम जावून पाहण्याजोगे चारमिनारमध्ये काही नाही. हैदराबादेच्या एका मोठ्या चौकात चारमिनार उभा राहिलेला आहे. मध्ये चांगली फरसबंदी केलेली आहे. त्यामुळे उनाड आणि रिकामटेकड्या लोकांचे बरे फावले फरशीवर होते. अंगावर उन्हे आली तरी लोक खुशाल लोळत पडले होते. इकडे पॉलीशवाले येणाऱ्या जाणाऱ्यांच्या चरणावर बिलगत होते. कुणी चारमिनारचे फोटो विकत घेता का असे विचारीत होते. असल्या ठिकाणी दिसणारी तीच नेहमीची दृश्ये चारमिनारपाशी दिसत होती. चारमिनार नाही पण हैदराबादेत एक प्रेक्षणीय चीज जरूर आहे. आणि ती म्हणजे सालारजंग म्युझियम.

### सालारजंग म्युझियम—

भारतातल्या पदार्थ संग्रहालयात सालारगंज पदार्थ संग्रहालय हे अग्रगण्य समजले जाते. या अनमोल पदार्थ संग्रहालयाला एक न्यून असेलच तर त्याच्या इतमामाला साजेशी टोलेजंग आणि देखणी वास्तू त्याला नाही हे आहे. पंच्याहत्तर लहान मोठ्या कमऱ्यांतून पदार्थ संग्रहालयात सालारजंगांनी तीन पिढ्या खपून दुनियाभरच्या अनर्घ्य

प्रेक्षणीय वस्तू जरा दाटिवाटीनेच ठेवल्या आहेत. त्यांची किंमत करणे हे काम सामान्य माणसाच्या आवाक्याच्या बाहेरचे आहे. पुण्याचे केळकर किंवा त्यांच्यासारख्या साक्षेची दुर्मिळ वस्तूंचा संग्रह करणाराला पदार्थ संग्रहालयाचे खरे मोल कळायचे. सामान्य माणसे पदार्थ संग्रहालयाच्या कमऱ्यातून यांत्रिकपणे पुढे पुढे सरकतात. अन्नकोट पहाणाराला जशी सुग्रास पदार्थांची उतरंड पाहून कंटाळा येतो तसेच थोडेसे येथेही आहे. खरी कलाकुसरीची कामे सामान्यांच्या डोक्यावरून जातात आणि भलत्याच एखाद्या फालतू गोष्टीला महत्व प्राप्त होते. त्याचा नमुना सांगतो.

## सगळेच कौतुक—

कमरा अनुक्रमांक ७३ मध्ये एक पुरुषभर उंचीचे घड्याळ मांडण्यात आलेले आहे. या घडयाळात अशी यांत्रिक योजना आहे की, प्रत्येक तास पुरा होतो त्यावेळी एक अंगठ्याएवढे बाहुले दरवाजा उघडून बाहेर येते आणि त्या त्या तासांचे टोले मारून परत जाते. टाईमपीसमध्ये चावी दिली की नेमक्या वेळी गजर होतो. त्यातलाच एक जरा सुधारून वाढवलेला हा प्रकार आहे हे चाणाक्ष माणसाच्या सहज लक्षात येते. थक्क होऊन तोंडात बोटे घालण्याजोगे यात काहीच नाही. पण मौज तर ही आहे की या ७३ व्या कमऱ्यांत मांडलेले हे घडयाळ म्हणजे हमखास हाऊसफुल्ल करणारे चित्र होऊन राहिलेले आहे. आम्ही १२ वाजण्याच्या ठोके पडायचा मोक्यावर तेथे कमऱ्यापुढे सुमारे दिडशे स्त्री-पुरुष प्रेक्षक ठाण मांडून बारा वाजण्याची पर्वकाळाच्या घडीसारखी वाट पहात उभे होते. ज्यांना हा बाराचा खेळ पाहण्याला मिळाला नाही ते पुन्हा एकच्या खेळासाठी ( तिकिटे काढून ) तिष्ठत होते. पदार्थ संग्रहालयातून उगाच जी बघ्यांची भाऊगर्दी होते. त्यावर गानसम्राट फैयाजखां यांनी सुचवलेला प्रयोग करून पहाण्याजोगा आहे. फैयाजखांच्या गाण्याला दर्दी लोकांच्याबरोबर फॅशन म्हणून खूपच इतर लोक येत. एका गाजलेल्या बैठकीच्यावेळी ख्यालाची गायकी सुरू होताच फालतु लोक कंटाळले. हे ध्यानी येताच मैफिलीच्या कारभाऱ्यांना ख्याल संपताच फैयाजखांनी सांगितले, "देखो, साईसाब अभी सबको एक एक कप कॉफी पिलावो. कॉफीवाले कॉफी पीके चले जायगे. फिर सच्चे सुननेवाले शौकसे गाना सुनेंगे ! झपतालवाले आणि कॉफीवाले यावर केलेला हा प्रयोग इतर ठिकाणीही गुणकारी ठरेल.

## जगन्नाथाचे दर्शन—

संध्याकाळी हैदराबादच्या यजमानांचा आम्ही निरोप घेतला आणि पुरी एक्स्प्रेसमध्ये बसलो. दुसऱ्या दिवशी पहाटे जगन्नाथपुरीत प्रवेश केला; तेव्हा पुरी जागी व्हायची होती. जगन्नाथपुरीच्या मंदिरापासून थोडया अंतरावर एका धर्मशाळेत आम्ही उतरलो. भराभरा स्नाने केली. कपडयांची आणि पाण्याची भेट झाली नव्हती. निघाल्यापासून त्यांची सोय लावून जगन्नाथजींच्या दर्शनासाठी निघालो. जगन्नाथ मंदिर हे

बलराम सुभद्रा आणि श्रीकृष्ण या त्रिमूर्तीचे अती पवित्र मंदीर मानले जाते. चार धामांपैकी एक धाम असून येथे शंकराचार्यांचे एक पीठ आहे. आद्य शंकराचार्यांनी या मंदिराला भेट दिल्याचे इतिहास सांगतो. ४५० फूट लांब आणि ३५० फूट रुंद आवारा भोवती एक उच भिंत आहे. आवारात एक भव्य मंदीर शंभर फुटाहून अधीक उंचीचे कोणा चोड गंग नामक राजाने बांधलेले आहे. ह्या गोष्टीला जवळ जवळ एक सहस्त्रवर्षे लोटली आहेत. प्रथम मुख्य देवूळ, पुढे जगमोहोन (सभा मंडप) नंतर नटमंदीर व शेवटी भोग मंदीर अशी मंदीराची रचना आहे. इतक्या प्राचीन आणि पवित्र देवालयातल्या बळराम सुभद्रा आणि श्रीकृष्ण या देवांच्या मुर्ती लाकडाच्या आहेत. असे पंड्याने सांगितले. तेव्हा ती मोठी विचित्र गोष्ट आहे असे आम्हास वाटले देवाची कवाडे सदा भक्तांसाठी खुली असली पाहिजेत इकडे कोणालाच वाटत नाही. प्रथम एका पंड्याने आम्हाला सांगितले की आश्विन महिन्याच्या एकादशी पासून महिनाभर देवदर्शन फक्त ठराविक वेळीच होईल. आम्ही थोडेसे दचकलोच. आम्हाला देवापाशी कांही खास मागायचे नव्हते तरी दर्शनाची आस बळकट होती. तितक्यात पुन्हा निरोप आला. दर्शनासाटी मंदीर खुले झाले. मूर्तीच्या अंगावर हिरे जडवलेले होते. ते पंडया आम्हाला दाखवीत होता. पण ते हिरेजडीत मुकुट आम्हाला दिसले नाहीत. हरिबंधू नामक पंडयाने आम्हाला सल्ला दिला की देवाला मेवा मिठाईचा नैवेद्य लागतो. मिठाईवाले हे पडयाचे बांधलेले होते. सवा रुपयाची मिठाई म्हणजे साखरेचे आणि गुळाचे सुमारे पंचवीस तीस बारीक गोळे होते ते समजून येऊ नये म्हणून ते एका द्रोणा सारख्या पुडीत बांधून आणले. हरी बंधूना थोडी दक्षिणा देऊन आम्ही नाद सोडला.

**कामरुप—**

मंदीराचे शिल्पकाम प्रेक्षणीय होते. पण शिल्पकामांत भलत्याच शिल्पकामाचा समावेश होता. शंभर ठिकाणी संभोगाची चित्रे उघडी वाघडी कोरलेली होती प्रत्येक गोष्टीची वकीली करणारे होते. या संभोग चित्रांचे समर्थक येथेही होते. त्यांचे समर्थन मात्र सामान्यजनांस न समजण्यासारखे व जरा गूढ होते. हा शिल्पाचा प्रकार पुढे कोणार्क भुवनेश्वर या मंदिराचे बाबतीतही दिसून आला. तेव्हा ज्या काळात ही मंदिरे बांधली गेली त्या काळी काहीतरी संकेत रूढ असावा असे अनुमान काढून आम्ही त्या विषयापासून परावृत्त झालो,

जगन्नाथपुरीला समुद्रस्नानाचे फार महत्व आहे. पंड्याचे "सागरे सर्व तिर्थानी" इत्यादी श्लोक तोंडपाठ होते. समुद्रावर आम्ही गेलो त्यावेळी पुळणीवर दहा दहा पंधरा पंधरा यात्रेकरूना दाटीने बसवून एकेक पंडा त्यांच्याकडून काहीतरी मंत्र म्हणवीत होता. हे सामुदायिक मंत्रानुष्टान भर उन्हात चालू होते. यात्रेकरू घामाघूम झालेले होते. इथला सुवासिनींचा वेणीदानाचा कार्यक्रम तर अंगावर शहारा आणणारा होतां. वीस पंचवीस वर्षांच्या विवाहीत स्त्रिया मुंडन करून हिंडत होत्या. त्यांचा पुण्यसंपादनाचा

हा हव्यास आणि पंड्याचा द्रव्य संपादनाचा हव्यास यांच्यामध्ये स्पर्धा चालू होती. यात्रेकरूना समुद्रात बुचकळून आणणारे कोळी डोकीस कवड्यांची टोपी घालून आपला प्राप्तीचा वाटा घेऊन राहिले होते.

**अत्र तत्र भिकारी—**

सर्व क्षेत्राच्या ठिकाणी भिकारी उदंड पीक असते तसे येथेही होते. कुष्ठरोगी, लंगडे, लुळे आंधळे रस्त्याच्या दोन्ही कडांना बसले होते. भिकाऱ्यांचे ते तांडेच्या तांडे पाहून वैताग येत होता. क्षेत्रांबद्दल उबग यावा असे एकंदरीत हे सारे वातावरण होते. आम्ही या क्षेत्रामध्ये धुमाकूळ घालणाऱ्या भिकाऱ्यांचा प्रश्न कसा सोडवावा याची चर्चा करीत रस्त्यातून चाललो होतो. बंडूने एक सोपा उपाय या समस्येवर सुचविला होता. बंडू म्हणाला " दुसरे तिसरे काही नाही च्छिवस च्छिवस च्छिवस " म्हणजे एकदाच गोळ्या घाला. हा प्रश्न कायमचा सुटेल. आमचा सर्वांचा ह्या " च्छिवस " ला टेकू होता. पण नंतर सावकाश विचार केला तेव्हा लक्षात आले की, भिकाऱ्यांच्या अठरा अक्षौहिणी संख्येपैकी एक तुकडी खलास केली तर दुसरी तेथे हजर होईल आणि समस्या पुन्हा जशीच्या तशीच राहील

आमच्या पुढे या समस्येपेक्षा मोठी समस्या निराळीच होती. कोणार्क सूर्य मन्दीराला जाणाऱ्या बसेस निघून गेल्या आता कोणार्कला कसे पोचायचे. एका स्टेशन वॅगनवाल्यावर जगन्नाथने खडा टाकून पाहिला. स्टेशन वॅगनवाला कोणार्क मन्दीरच काय भुवनेश्वर पर्यंत तुम्हाला सगळे नीट दाखवून आणतो असे म्हणून स्टेशन वॅगन घेऊन धर्मशाळेपाशी आला देखील आम्ही त्या गाडीत स्वार झालो. कोणार्क मन्दीराचा रस्ता मोटार कापू लागली.

# :: कोणार्कचे अद्वितीय सूर्यमंदीर ::

दिलीपच्या स्टेशन वॅगनमध्ये आम्ही आरुढ झालो. जगन्नाथ पुरीचा निरोप घेण्याची वेळ आली. तेव्हां पुरीच्या समुद्राचे हिरवेगार पाणी, लाटांचे मुक्त थैमान आम्हाला राहण्याचा मोह घालीत होते. त्या लाटांवर तरंगावे, पाण्यांत हुंदडावे, डुंबावे वागडावे असे वाटत होते. पण पुरीचा उकाडाही विलक्षण होता. आम्ही नुसते देवासारखे निमूट बसलो होतो तरीही घामाने निथळत होतो. समोर चहाचे दुकान होते, चहाची वेळ होती. तथापी त्या गरमीच्या दुष्मनाची आठवण देखील कुणाला झाली नाही. (माफ करा जगन्नाथाला झाली आणि त्याने चहा घेतला) जगूची चहावरील जी भक्ती आहे तिला या त्रिभुवनात केवळ एकच उपमा आहे. सुवासिनीला जसे हरीद्रा कुंकूम हे सौभाग्य वाण स्वीकार्य केव्हाही आणि कुठेही. शुभकाळ अवघ्या दिशा. जगूला चहा हा तसा सदा सेव्य आहे. वामनपंडीताची आणि जगूची ओळख असती तर त्यांनी खास जगू करिता

घरी दारी शय्येवरी
गरदीच्याही अवसरी
समस्तांची चिंता त्यजी
आणि चहा सेवन करी

असा एकादा श्लोक हातासरसा लिहिला असता. कोणार्कच्या वाटेवर एक मंदिर पहायला जायचे आहे अशी वर्दी दिलीपकडून आम्हास मिळाली. ह्या मंदिराचे खरे नांव सारी गोपाळ असले तरी लोकांच्या तोंडी सखी गोपाळ मंदिर हेच नांव रूढ होते. जगन्नाथपुरीच्या पंचक्रोशीतच हे मंदिर पडते. मंदिरापाशी उतरलो. हे मंदिर पुरातन असेलही पण शिल्पाची किंवा कला कुसरीची ओळखही त्याला दिसली नाही मंदिर बेता बाताचे होते. तरी पंड्यांची एक सेना मोठी होती. मंदीरांत प्रवेश करताच पंड्यांची एक तुकडी आमच्यावर तुटून पडली. जरा दटावूनच त्यांना आम्ही दूर सरा म्हणून सांगितले दर्शन झाले. पंडये अर्थात पिसाळले हमरी तुमरीवर आले. हमरी तुमरी व्यर्थ गेल्यावर त्यांनी निराळाच मुद्दा उपस्थित केला. जना मंदीराचे फोटो घेत होता. जनाने हनुवटी सरशी उगीच बदनामी पुरती दाढी ठेवली होती. त्यांच्याकडे बोट दाखवून तो कोण आहे असे त्यांनी विचारले. त्यांची जना विषयींची शंका वेळ येती तर फेडून टाकायची आमची सिद्धता होती. पण प्रकरण तेवढ्यावरच मिटले. पंडयाबद्दल तिरस्कार उत्पन्न झाला. पुन्हा त्याचे थोबाड पहायचे नाही असे ठरवून आम्ही निघालो.

**कोणार्कचे सूर्य मंदिर—**

आता कोणार्कचे सूर्य मंदिर पाहाण्यासाठी आम्ही उत्सुक झालो होतो. कोणार्क जगन्नाथपुरीच्या वायव्येस २० मैलावर आहे. इ. सन १२३८ च्या सुमारास नरसिंहदेव राजाने बांधलेले हे मंदिर आता काही ठिकाणी पडकळीस आले आहे. पण त्याच्या उत्कृष्टतेच्या निशाण्या अद्याप शाबूत आहेत. शिल्पकारांची कोणार्क मंदिर हीच काशी. जगाच्या सर्व देशातून लोक येऊन हे मंदीर पहात असतात. परदेशी लोकांना मंदीर आणि पॅगोडा यातला भेद समजत नाही त्यांनी कोणार्कला ब्लॅक पॅगोडा उर्फ काला मंदीर असे न.व ठेवले आहे. अकबर बादशहाचा दरबारी इतिहासकार अबुल फाजल ह्याच्या पाहाण्यात हे महान मंदीर आले होते आणि " आयने अकबरीत " हे मंदीर पाहून आपण थक्क झालो असे त्याने नमूद केले आहे. माधव



**कोणार्क-रथचक्र**

आचवलने मंदीर उत्कृष्ट आहे असे सांगून भागत नाही. गोऱ्या साहेबांचे प्रशस्तीपत्र लागते. असे लोक स्वतंत्र भारतात अद्याप आहेत. त्यांनी एक गौरकाय साहेब मंदीराविषयी काय म्हणतो ते ऐकण्यासारखे आहे.

पर्सि ब्राऊन ह्या कला तज्ज्ञाने असे स्पष्ट म्हणून ठेवले आहे की ( बादशहाच्या अमर प्रिर्त.चे यमुना काटचे विशाल मंदीर म्हणजे ) ताजमहाल पहाण्या अगोदर हे कोणार्कचे सूर्य मंदीर मी पाहतो तर ताजमहालला सर्वोत्कृष्ट शिल्पाकृती अशी पदवी

मी दिली नसती. ह्या कोणार्क मंदीराची उभारणी ८६५ फूट लांब आणि ५४० फूट रुंद अशा प्राकारवष्ठित जागेत केलेली आहे. मंदीराची कल्पना उदात्त आहे. या स्थावर जंगम जगताचा आत्मा श्री सूर्य नारायण चोवीस चाकांच्या महारथात आरूढ होऊन मंगल अशा प्रभात समयी निघाला आहे. हा रथराज सात अश्व आपले सारे बळ लावून ओढीत आहेत. अनंत कालच्या चिरयात्रेचे हे अमर चित्र आहे. सातशे वर्षाच्या कालावधीनंतर देखिल मंदिराच्या शिल्पकलेची प्रत्ययता, कलाविलास अजून अनुभवता येत आहे. दोन्ही हातानी धरून ठेवलेले शिल्पातले ते घोडे उधळत आहेत. त्यांच्या डोळ्यात जोष चमकत आहे. त्याच्या अंगातली रग दिसत आहे. शिल्पाचे वर्णन शिल्पकारानीच करावे. पण सामान्य माणसालाही आपण काहीतरी अद्‌भूत पहात आहोत असा साक्षात्कार हे सूर्यमंदीर पाहताना होत असतो. जना हा चित्रकार असल्यामुळे त्याच्या सौंदर्यासक्त मनाला हे शिल्प पाहून अत्यंत हर्ष झाला यात नवल नाही. त्याने दोन रोल खर्ची घालून निरनिराळ्या ठिकाणाहून मंदीराचे फोटो घेतले. अशा प्रेक्षणीय शिल्पाकृतीना नुसती धावती भेट देणे हे जनाला पसंत नव्हते. जनाचे स्तंभाचे व अश्वांचे फोटो घेऊन झाले तेव्हा आमचा एखादा फोटो काढण्यास जनाला आम्ही सांगितले जनाने कॅमेरा लावला. आम्ही जेवढे रुबाबदार चेहरे करता येतील तितके केले माझा समोरून घेतलेला फोटो साफ पडेल येतो म्हणून यावेळी मी तिरपा उभा राहिलो. कल्पना आहे की माझा तिरपा फोटो अधिक चांगला येईल कोणार्क मंदिराच्या पार्श्वभूमीवर तो उठून दिसेल. कोणार्कच्या अनुपम शिल्पमंदीराला कोटी कोटी प्रणाम करून आम्ही भुवनेश्वरकडे निघालो.

## ओरिसाची राजधानी

दिलीप हा नुसताच पब्लीक मोटारवाला नव्हता. त्याने मोटारगाडी हांकता हांकता गाईडचा कोर्सही पुरा केला होता भुवनेश्वराच्या रस्त्यात लागणारी सर्व प्रसिद्ध मंदिरे आम्ही पाहावी यासाठी तो गाडी उभी करीत होता. भुवनेश्वरात शिरताना केदारनाथ, सिध्देश्वर व मुक्तेश्वर अशी मंदिरे लागतात. ती त्याने आमच्या समवेत येऊन आम्हाला दाखवली. भुवनेश्वर ही ओरिसाची नवी राजधानी. नव्या थटामाटात आज तिची उभारणी चाललेली आहे. दिलीपला भुवनेश्वरची खडानखडा माहिती होती. भुवनेश्वराच्या हमरस्त्यावरून गाडी दौडत होती आणि दिलीपची ध्वनीमुद्रिकाही लागलेली होती. 'हा ओरिसा राज्याचे गव्हर्नर खोसला साहेब यांचा बंगला तो बिजु पटनायकांचा, पलिकडला बिरेन मित्राचा, कोपऱ्यात तिकडे भुवनेश्वरची कॉलेजे, म्युझियम आणि एरोड्रम' एका तासाभराच्या अवधीत अवघ्या भुवनेश्वर नगराभोवती त्याने आम्हाला फिरवून आणले. भुवनेश्वरला हॉटेलमध्ये उतरण्याच्या भानगडीत आम्ही पडलो नाही. चक्क एका धर्मशाळेत उतरलो. या धर्मशाळेच्या मध्यभागी भला थोरला चौक होता. त्या चौकात आम्ही आमच्या पथाऱ्या पसरल्या. सकाळी स्नानादी उरकून भुवनेश्वरचे लिंगराज हे शंकराचे मंदिर उघडण्यापूर्वी आम्ही भक्तगण देवाच्या दारी जावून उभे

राहीलो कोणार्क मंदीर एवढे नसले तरी या मंदिराचे शिल्पही प्रेक्षणीय आहे. गणपतीची मुर्ती विशेष सुंदर आहे. भुवनेश्वरचा उजाडल्या दिवसाला काया पालट होत आहे. आणखी दहा वर्षानी भुवनेश्वर अनेक परिनी वाढेल. अगदी ओळखू देखील येणार नाही असे अनेकजण बोलत होते.

ओरिसाच्या राज्याचा आमचा दौरा संपुष्टात आला होता. आम्ही बिहार राज्यात **प्रवेश करणार** होतो रांची हे बिहार राज्यातील एक महत्वाचे ठिकाण गोंड लोकांचे वसतीस्थान, फादर एडिसनची कार्यभूमी, खिरस्ती मिशनऱ्यांच्या संस्थांचे केंद्र, हेवी इंजिनियरींग वर्क्स, मिलिटरीचे महत्वाचे ठाणे, आणि वरती एक हवा खाण्याचे ठिकाण म्हणून रांचीकडे आम्ही मोर्चा वळवला होता. रांचीला जायला प्रथम पुरी हावडा सवारी गाडीने खरगपूरला जावून पुन्हा दुसऱ्या रांचीला जाणाऱ्या गाडीत बसावे लागते. आमची सवारी गाडी आस्ते आस्ते चालत होती. जवळ जवळ दहा तास ह्या प्रवासात गेले.

**आमचे ब्रिजबहाद्दर**

आमचे जे सवंगडी ब्रिज खेळणार होते त्यांनी उगीच वेळ वाया न दवडता डाव मांडला भुवनेश्वर पासून खरगपूरच्या आसपास गाडी येईपर्यंत जगन्नाथ मांडी न हलवता एक सारखा खेळत होता इतर भिडू आलटून पालटून खेळत होते. टाकलेल्या राणीवरून, न टाकलेल्या गुलामावरून त्यांचे वाग्युद्ध चालू होते; तह होत होते. खरगपूर येईपर्यंत या बहादुरांनी पत्त्यांचे रणमैदान अगदी धगधगत ठेवले होते आम्ही दुसरे ब्रिज खेळत नसलो तरी स्वस्थ बसलो नव्हतो. आमचे यज्ञ कर्म ( उदरभरण नव्हे ) चालू होते.

चहा, लिंबू सरबत, चणे, मुंगफली शिंगाडे आणि जे जे पदार्थ गाडीत विकायला आले त्यांचा त्यांचा समाचार घेतला. एकालाही विन्मुख परत पाठवला नाही. घुगनेवाला आला तेव्हा एकदा ह्या पदार्थाचा स्वाद घ्यावा किंवा नाही असा विचार मनात आला. मुंबईच्या आसपास आम्ही प्रवास करीत असतो तर घुगनीवाल्याला आश्रय दिला नसता. पण प्रवासात विशेषतः जिथे आपणाला कोणी ओळखत नाही अशा ठिकाणी ही मौज कोणतेच विधी निषेध आडवे येत नाहीत. जरा स्वातंत्र्य असते.

खरगपूरला ज्या गाडीत बसायचे होते ती गाडी तर स्टेशनात येऊन उभी होतीच. गाडी तुडुंब भरलेली, शिट्या वाजत होत्या, हिरवे कंदील, सिग्नल, गाडी सुटण्याची सारी तयारी होती. कसेबसे देह गाडीत लोटले. पण प्रवासात केव्हा भली माणसे भेटतात. दत्त नावाचे एक बंगाली गृहस्थ सहकुटुंब निघाले होते. त्यांनी स्वतः अडचण सोसून आम्हाला बसण्यापुरती जागा करून दिली. दोन बाकांच्या मधल्या वळचणीत चटया पसरून आम्ही हप्त्याहप्त्यांनी झोप घेतली. सकाळीं आठच्या सुमारास रांची आली एकदाची. आता आणखी हाल काढण्याची इच्छा नव्हती. रांचीच्या एका कोऱ्या करकरीत हॉटेलात तीन प्रशस्त खोल्या घेतल्या, भोजन केले आणि झोपेच्या शिल्लक बाक्या पूज्य केल्या.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ३०७९
शाखा

# :: ज्ञानपीठ नालंदा ::

सहलीत कार्यक्रम पत्रिका, समयसारिण्या, वक्तशीरपणा यांचा पुष्कळ उपयोग होतो. लेकुरवाळ्या सुनेला सासुबाईचा होतो तसा. पण काही वेळा त्यांचाच जाच होतो. रांचीला आम्ही एक दिवस एक रात्र काढली नाही तोच रांची सोडण्याचे सिग्नल पडून तयार. रांची हे टुमदार शहर आहे. समुद्रसपाटी पासून सुमारे २३०० फूट उंचीवर ते वसले असल्यामुळे. नाशिक पुण्यासारखी किंचित अधिक गुलजार थंडी तेथे असते. पुण्याच्या पर्वतीसारखी बांधेसूद आणि देखणी नसेल पण रांचिच्या शिवेपाशी एक टेकडीही आहे. टेकडीवर प्राजक्तिच्या बनात एक छोटे शिवमंदिर पण आहे. बिहार राज्याचे मंत्री आणि दुसरे सुखवस्तू लोक रांचीत येऊन डेरेदाखल झाले असल्याच्या वार्ता वृत्तपत्रांत झळकत आहेत. रांचीला ज्या सद्‌गृहस्थांकडे ओळखपत्र नेले होते ते आमच्यासाठी "जलपान भोजन बनाने का मौका" आशिर्वाद मागावा तसा आमचेपाशी मागून राहिले आहेत. बाळासाहेबांपाशी एक जास्त गरम रग आहे तो तात्पुरता मला द्यायच्या करारावर सह्या झाल्या आहेत. एवंच सर्व काही रांचीला चार दिवस चैनीत राहण्याला अनुकूल होते. कार्यक्रम पत्रिकेचा वक्तशीरपणा मात्र अक्रुरासारखा आम्हाला गयेला न्यायला बस आणून उभा होता. नको असलेल्या गोष्टी, ऐकायला येऊ नयेत अशा बातम्या, ह्या मृत्यूसारख्या अटळ असतात. शेवटी पित्याच्या आज्ञेसरसे राम आयोध्येहून निघाले तसे पण नाखुषीने आम्ही रांचीहून निघालो.



नालंदा विद्यापीठ

**विष्णुपदाला दुरूनच वंदन—**

रांची ते गया हा प्रवास १४० मैलाचा आहे. लांब पल्ल्याचा बसचा प्रवास हा फारच कंटाळवाणा असतो. नऊ साडे नऊला रांचीहून निघून दुपारी तीन वाजता बसची धिंडका गयेला पोचली गयेच्या बसअड्ड्याची जागा कोणी शोधून काढली नकळे. पण अस्वच्छतेचे पहिले पारितोषिक त्या बस अड्याला द्यावे लागले. कचऱ्याचे भले मोठे ढीग पावलोगावली होते. त्यांच्या आकारमानावरून आठ आठ दिवसांत त्यांच्या वाटेला कुणी गेला नसावा. असे दिसत होते. इतक्या ओंगळ जागेत उघडया तबकांतून मिठाई विकणारांच्या छातीठोक पणाची तारीफ करावी तेवढी थोडीच होती. एका सिनेमागृहाचा संसार नेमका येथेच थाटण्यांत आला होता. निवास स्थानाच्या शोधाअंती एक निवास स्थान मिळाले. त्याचे नांव होते 'वीज' एक रात्र या विजेत काढली. परमेश्वरकृपेने सुरक्षित व सुखरुप पणे बाहेर पडलो. मेरे मनकी गया फार निराळी होती फल्गु नदीच्या तिरावर चांगले घाट असतील, मोठी आणि प्रेक्षणीय मंदीरे असतील. गया क्षेत्राचे वातावरण प्रसन्न आणि पवित्र असेल असे वाटले होते पण मेरे मनकी गया आणि जी गया म्या प्रत्यक्ष पाहिली त्यांचा संगम झाला नाही असे खेदाने म्हणावे लागते गयेच्या विष्णू पदापाशी मोक्ष सदैव उभा असूनसुद्धा तिकडे पाय ओढ घेईनात दुरुन कोणीतरी विष्णूपदाची जागा दाखवली आणि आम्ही कर जोडून वंदन केले.

**आज बुद्ध देव हवे होते—**

गयेपासून ८–९ मैलावर बुद्ध गया हे बौद्धांचे पवित्र स्थान आहे. आधुनिक शांतीवादी मंडळीचेही पवित्र स्थान हेच आहे. आज भगवान बुद्ध नुसते हयात असायला हवे होते. जगाच्या प्रत्येक भागात शांतता नांदली असती ऱ्होडेशियांत काळे निग्रो आणि गौरवर्णी साहेबांचे लेक "काळे गोरे भाई भाई" असे ओरडत आनंदे डुलत राहिले असते. आणि भारत पाकिस्तानचे युद्ध तरी कशाला झाले असते? नाग लोक आयत्या बिळावर नागोबा होऊन न राहता भारतांतर्गत नागराज्याचे भारतीय प्रजानन म्हणवून घेण्यात अभिमान मानते. भगवान बुद्ध असते तर अंबरनाथची अवजड युद्धसामग्री निर्माण करणारी युद्धखोर फॅक्टरी बंद करून त्याच यंत्रावर थर्मास आणि मोसंब्याचा रस काढण्याची सुबक आणि घाटदार भांडी बनवता आली असती. सैन्यातील सैनिकांनी शेतात राबून रब्बी पिकांचे डोंगर उभे केले असते. भगवान बुद्ध आज नाहीत. त्यामुळे या जगात आकांत माजला आहे भगवान बुद्धाच्या अवताराची तहान आज बुद्धगयेच्या सुंदर मंदीरावरच भागवावी लागत आहे. आम्ही तरी तेच केले

**बुद्ध मंदीर—**

बुद्ध गयेचे बुद्ध मंदीर चौकोनी पिरॅमिडच्या आकाराचे आहे. शिखरापर्यंत उंची १८० फूट आहे. मंदीराच्या पायाच्या चार कोपऱ्यांवर मंदीराच्या छोट्या प्रतिकृती

बांधल्या आहेत. पराकाष्ठेची स्वच्छता व टापटीप हा बुद्ध गयेच्या मंदीराचा विशेष म्हणून सांगता येईल. मंदीराच्या पायऱ्या उतरून जाताच पायघड्या अंथराव्या तशी काथ्याची जाजमे अंथरली आहेत मंदीराच्या बगलेत भगवान बुद्धांना आत्मज्ञान प्राप्त झाले तो बोद्धीवृक्ष आहे. बोधीवृक्षाखाली मूर्ती आहेत त्यात शंकर, गणपती यांच्या मूर्ती आढळल्या. आणि त्यांचे थोडेसे आश्चर्यही वाटले. या बुद्धमंदीराच्या आसपास एक तिबेटी पद्धतीचे अनेक ढंगदार रंगानी सजवलेले मंदीर आहे. आत बुद्धाची मूर्ती आणि एक धर्मचक्र आहे. हे धर्मचक्र फार अवजड आहे. त्या चक्राशेजारी एक पाटी आहे. त्यात ' हे धर्मचक्र अनेक महा मंत्रांनी भारलेले आहे. हे चक्र फिरवल्यास फिरवणाऱ्यांच्या पापांचे शमन होते. ' आमच्या हातून प्रवासात शंभर अपराध घडले होते. पारोशाने भोजन केले होते दंतमंजन लावून मुखमार्जन न करता नुसती चूळ भरुन चहा प्यालो होतो ! कोणार्काच्या सूर्यमन्दीरावरची आणि पुरीच्या देवळावरची उघडी बाघडी चित्रे पाहिली होती. अचावचा बोल्लो होतो. आम्ही सर्वांनी धर्मचक्र मोठा नेट करून फिरवले. अमुचे दुरीतांचे तिमीर नाहीसे होऊन धुतल्या तांदळासारखे निर्मळ होऊन आम्ही मंदीराबाहेर पडलो.

**स्नानाचा सुखद स्पर्श—**

येथल्या वज्रेश्वरीसारखी उन पाण्याची कुंडे बिहार राज्यात राजगीर येथे आहेत राजगीर खरे नांव राजगृह हा राजा कोण आणि त्याने राजगृह येथे त्याची राजधानी केव्हा स्थापन केली, याचा उलगडा येथे कोणी केला नाही. ऊन पाण्याच्या कुंडांची व्यवस्था वज्रेश्वरीपेक्षा कितीतरी सरस होती. वज्रेश्वरीच्या कुंडांत स्नान करणारे उतरतात त्यामुळे त्यात उतरण्याला मन कचरते. राजगीरला कुंडे शोभिवंत गुळगुळीत फरशी बनवून बांधून काढली आहेत. ऊन पाणी पाटाने बांधून आणून गोमुखाद्वारे बाहेर सोडण्यात आले आहे. स्त्री पुरुषाना एकच क्यू येथे नाही. स्त्रियांची व्यवस्था अलग आहे. येथील ऊन पाणीही आधणासारखे कढत नाही. विसावण घातल्या सारखे सुख स्पर्श आहे. त्यामुळे एक फार भानगड झाली आहे. या सौम्य ऊन पाण्याखाली आसन मांडी घालून बसलेली माणसे उठण्याची गोष्टच बोलत नाहीत. रासन्हाण्याला बसलेल्या या गोपीचंदांची स्नाने उरकीपर्यंत थांबण्यात अर्थच नव्हता. जरा अंगलट करुन त्यांना दूर व्हा सांगून आम्ही स्नाने उरकली. ऊन पाण्याच्या कुंडावर पंड्यांचे काय काम ? पण ते बाया बापडयांकडून अर्घ्य देववीत होते. मंत्र सांगत होते. बाया मंत्रांचा पुनरुच्चार करीत होत्या.

**अद्वितीय नालंदा—**

राजगृहानंतर नालंदा विद्यापीठाला जाणाऱ्या वाहनांची वाट पहात आम्ही बसलो. नालंदा आणि तक्षशिला ही भारतातील प्राचीन विद्यापीठे हिंदुस्थान पाकिस्तानच्या घडेवाटपात तक्षशिला गेले पाकिस्तानकडे आणि नालंदा आपल्या वाटणीला आले.

तक्षशिलाची हल्ली काय परिस्थीती आहे ते आयुब खानाला माहीती. नालंदा हा पुरातत्व खात्याचा महान दिग्वीजयच मानला पाहिजे. असे सांगतात की १९१५ साली या परिसरात काहीतरी वस्तू गाढल्या गेल्या असाव्यात. असा शोध लागला. साहेब हा कितीही कठोर असला तरी तो रसीक जरुर होता. ब्रिटीश राजवटीतच नालंदा विद्यापिठाचे उत्खननास प्रारंभ झाला. हे उत्खननाचे काम धसमुसळेपणाने करण्याजोगे नव्हते. फार कल्पक अशा पुरातत्व खात्याच्या अधिकाऱ्यांनी राजस हातांनी हे पृथ्वीने गिळलेले माणिक जवळ जवळ मूळच्या अनाविद्ध अवस्थेत खणून काढले आहे आजच्या उत्खनीत अवस्थेत देखील विद्यार्थी विद्यार्जन करीत त्या ओवऱ्या, गुरुजन बसत ती पाठपीठे, कूप, पाणी जाण्यायेण्याचे मार्ग, सूर्य प्रकाशासाठी केलेल्या प्रकाश योजना अगदी शाबूत आहेत. हे विद्यापीठ बुद्ध धर्माच्या श्रेष्टींच्या ज्ञानपिपासेची साक्ष उत्कृष्टपणे पटवण्यास पुरेसे आहे.

ह्या विद्यार्पीठाची माहिती सांगणारा एक साठ वर्षाचा पोक्त माहीतगार आमच्या बरोबर आपसुकच आला. तीस चाळीस वर्षाचा त्याचा नालंदा विद्यापीठ, त्या वास्तुचे वस्तुपाठ सांगण्याचा परिपाठ. तो आपल्या घरातल्या वास्तुविषयींची माहिती सांगावी तशी नालंदा विद्यापीठाच्या बांधकामाची, कारागिरीची माहीती सांगत होता. त्याच्या सांगण्यात आत्मीयता होती. पहाणे संपले. आम्ही परतत होतो. माहीतगाराने तोंडातून अवाक्षर काढण्यापूर्वीच आम्ही त्याची रूप्यमेकं देऊन संभावना केली. नालंदा विद्यापीठासारखी अनेक विद्यामंदीरे या परिसरांत उत्खननाची वाट पहात अहिल्येसारखी शिळा होऊन पडलेली आहेत असे माहीतगार म्हणत होता. नालंदा पाहून काहीतरी अद्वितीय लेखात न सांगता येण्याजोगा निरागस आनंद झाला. आश्चर्य वाटले ते याचे की ज्या भारत देशात येशू खिरस्तापूर्वी सहस्त्र वर्ष विद्येची उपासना अखंड चालू होती ती एका एकी गेली कोठे ? ब्रिटिशानी हिंदी माणसाला निर्बुद्ध ही पदवी दिली कशी ? आणि सर्वात आश्चर्य म्हणजे आमच्या समाज धुरीणांनीही आम्ही निर्बुद्ध, बर्बर आहो, परमेश्वर दयाळू म्हणून ब्रिटिशांशी आपली गांठ घालून दिली हे अगदी निमुटपणे खरे तरी कसे मानले ? भारताचे घड्याळ मागे कोणी करून ठेवले.

# श्री काशी विश्वनाथ

नालंदा विद्यापीठाच्या प्रसन्न वातावरणातून नालंदेचा उंबरठा उतरून आम्ही बाहेर पडत होतो. तितक्यात तिथल्या एका सरकारी माहितीकडे आमचे लक्ष गेले. त्या माहिती फलकावर नालंदा विद्यापीठाची त्रोटक माहिती लिहिली होती. ह्या माहिती फलकांत शेवटी सन देऊन नालंदा विद्यापीठाची वास्तू उध्वस्त करणाऱ्या कोणा बखत्यार खिलजी नामक सुलतानाच्या नांवाचा उल्लेख करण्यात आला होता. हे मशारनिल्हे बखत्यार सुलतान कोणत्या साली नालंदेवर राज्य करीत होते आणि नालंदेची वास्तू उध्वस्त केली तसे आणखी काय काय पराक्रम त्या बहादुराने केले त्याची उठाठेव आम्ही केली नाही. पण मनात विचार आला की, नालंदेच्या विद्यापीठाने या सुलतानाचे काय घोडे की हत्ती मारले की त्यामुळे विद्येच्या या माहेर घरावर त्याने वरवंटा फिरवावा ? येथे नालंदा विद्यापीठाच्या विध्वांस करणाऱ्याचा चक्क नामोल्लेख आहे. पण ज्यांचा नामोल्लेख नाही अशा अनेक सुलतानानीही पवित्र मंदिरे, शिल्प मंदिरे उध्वस्त करण्याचा सपाटा ठेविला होता. काश्मीरातले भंगलेले अवन्तीपूरचे विष्णू मंदिर. कोणार्कचे सूर्य मंदिर, हंपीची मंदिरे कुणा ना कुणा पिसाट सुलतानच्या घणाखाली बळी पडली आहेत. आज अनेक भिंतीवर कोरलेल्या हत्तींची सोंड, घोड्याची तंगडी, स्त्रियांची नासिकाग्रे व डोळे फोडून तोडून छिन्न विच्छिन्न केलेली आपण पाहतो. किंबहुना सुलतानाच्या राज्य कारभारात मूर्ती भ्रष्ट करणे, मंदिरे उध्वस्त करणे हा प्रमुख व आवश्यक भाग होता असे म्हटले तर अतिशयोक्ती होणार नाही. मंदिराची ही व्यथा केव्हा केव्हा पहाणाराला व्यथित करते. पण एकदरीत आम्हा भारतीयांची सहिष्णुता आश्चर्यजनक आहे. नालंदेच्या विद्यापीठाचा विध्वंस करणाऱ्या या पैंगबरवासी बखत्यार शहाचे नांव शिवराई एवढे कुंकू लावून बखत्यार आजही मिरवीत आहे. नालंदाचे नाव जजियात लुप्त होऊन होऊन सुलतान बखत्यारशहाचे नांव जजरा जर व्हायचे त्यापेक्षा हे परवडले.

**पाटलीपुत्र नरगम्—**

नालंदेहून प्रथम बखत्यारपुराकडे जावून तेथून पुढे पाटण्याला जाणारी गाडी धरायची होती. सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास बिहारच्या राजधानीच्या शहरी प्रवेश केला. संस्कृतचे पहिले कवी हरी हे शब्द शिकल्यावर हितोपदेश नामक संस्कृत कथासंग्रहाशी आमचा समागम घडला. हितोपदेश जेथे विष्णू शर्म्याने सांगितला तेच

हे भागिरथी तिरावरचे पाटली पुत्रनामध्येयं नरगम्. भागिरथी तिरावर आर्यांची संस्कृती भरभराटली. त्या भारतीय संस्कृतीचा पहिला शहर म्हणजे पाटलीपुत्र नगर, पुढे केव्हातरी याच पाटलीपुत्राचे पाटणा असे नाव पडले. पाटलीपुत्र नगराजवळ भागिरथी गंगासागर म्हणून राहिली. चार मैलपर्यंत भागिरथीच्या तटाला लगटून पाटलीपुत्र उर्फ पाटणा नगर वसले आहे. आपल्या मातेच्या कडेवर मूल बसलेले असावे तसे गोल घरावरून पाटणा शहराकडे पाहणाराला हे सुंदर शहर गंगामातेच्या कटीवर बसले आहे असे वाटते

गंगेच्या या पात्रात वीसवीस टनी आगबोटी नांगरून पडलेल्या होत्या आम्ही भसाभस स्नानाची तयारी केली. साबण लावून कपडे धुतले आणि जरा जपून गंगामातेच्या प्रवाहात बुड्या मारल्या येथे नदी फार खोल आहे. प्रवाहाला ओढ आहे. सावधगिरी बाळगली नाही तर गंगामातेला गंगाष्टकात "स्वर्गारोहण वैजयंती का म्हटले आहे. ते ध्यानात यायचे पण तोवर आपण स्वर्गात जावून पोचलेले असायचे. गंगास्नान करून बाहेर पडत असता पंड्याने आमच्या कपाळी केशरी टिळा लावला. प्रथम पंड्याचा 'टोल' भरून मग नगरात हिंडलो येथले गांधी मैदान आझाद मैदानासारखे आहे. मैदानाच्या चारी कडांसरशी फुलबाग आहे. गोलघर आहे हे प्रचंड धान्य गोदाम वर्तुळाकार बांधलेले आहे. गोलघरावर बसण्यासाठी जागा आहेत. पाटण्याचे विहंगम दृश्य येथून पाहाण्याजोगे आहे

जुने पाटलीपुत्र प्रत्यक्ष कोठे वसले होते हे जनुला पाहायचे होते. ती एक ऐकण्यासाठी सुरस कथा आहे. जुने पाटलीपुत्र जेथे होते त्या भागाला कुम्हराद असे नांव आहे. कुम्हरादला जुन्या पाटलीपुत्र नगराचे अवशेष म्हणून ऐंशी खांब दाखवतात. पण काय झाले होते ते राम जाणे! एकूण ऐंशी खांबापैकी एका खांबाखेरीज बाकीचे खांब पाण्यात बुडलेले होते. खांबांची ही हकीकत झाली. पाटलीपुत्राच्या प्राचीन मूर्तीबद्दल विचारता त्या पदार्थसंग्रहालयात ठेवल्या असल्याचे सांगण्यात आले. जनुचे निश्चयाचे बळ उदंड होते. मूर्ती पदार्थसंग्रहालयात जाऊनही त्याने पाहिल्या असत्या; पण पदार्थ संग्रहालय सोमवारी बंद असते असे समजले.

(पुंडलीक वरदा हारि विठ्ठल, श्री ज्ञानदेव तुकाराम!)

**मोगल सराईच्या मार्गावर—**

जुने पाटलीपुत्र न पाहताच पाटणा सोडण्याची पाळी आली. पाटण्याहून मोगलसराईकडे जाणारी गाडी पाचला निघणार होती. गाडीच्या वेळेपूर्वीच स्टेशनवर हजर झाल्याचा फायदा झाला. प्रत्येकाला बसायला जागा, ब्रिज खेळणारांना स्वतंत्र जागा शिवाय वरच्या बर्थवर लेटायला जागा स्वच्छ वॉशबेसीन (आरसा शाबूत असलेले) अगदी चंगळ झाली. इतकी झकास जागा निघाल्यापासून आज पुन्हा भेटली होती.

रेल्वेला आम्ही शाबासकीही देऊन टाकली पण या गोऱ्यागोमट्या जागेला एक खोड होती. ती दिवेलागणीच्या वेळी उमगली. डब्यातले विजेचे कनेक्शन नादुरुस्त होते. भयंकर घोटाळा झाला. ब्रिजवाल्यांचे वायदे थांबले. खेळ बंद पडला एवढ्यावरच्या भागले नाही काळोखात पत्ते आवरत असताना किलवर गुलाम कुठे गुल झाला. अपरिमित हानी झाली. वसंत आणि अरुण विजेऱ्यांच्या प्रकाशात त्या गुलामाचा शोध घेत होते. बॅगांच्या मागे, होल्डालमध्ये बंडूच्या बास्केटमध्ये कानाकोपरा शोधून झाला. सर्व उपाय हरले. आता सर्वजण किलवर गुलाम आपणास दुःखात लोटून कायमचा सोडून गेला असे समजून जग राहटीकडे लक्ष देऊन निमूट बसले होते. अरुणने मोगलसराईजवळ आली तेव्हा गुलापाचा शोध काढण्याचा अखेरचा यत्न सुरू केला. आणि काय चमत्कार! हरवलेला किल्वरचा गुलाम गवसला. आनंदी आनंद झाला. हजरत बाल सापडला तेव्हा काश्मीरातील लोकांना हर्ष झाला नसेल इतका हर्ष अवघ्या खेळीयास झाला मोगलसराई आली. रात्रीचा मुक्काम एका सराईत केला. मोगलसराई हे भारतातले सर्वात मोठे जंक्शन अकरा निरनिराळ्या फाट्यांचे येथे मिलन झालेले आहे. गाड्या येण्याजाण्याचा व्यवहार सारखा येथे चालू असतो. रेल्वेनेच जवळ जवळ सारा गांव व्यापला आहे.

## शीतल वाहीनी गंगा

मोगल सराईहून काशी हे अंतर मुंबईहून माटुंग्याला जावे इतके आहे. दर पंधरा मिनिटांनी मोगलसराई स्टेशनवरून काशीला जाणाऱ्या बसेस सुटत असतात "काशीस जावे नित्य वदावे" हा मंत्र जपता जपता आज हयात गेली होती. शेवटी आमचे कुटुंब देखील आधीबिधी काशीक्षेत्र उरकून आले. आमचा काशीचा योग मात्र आज आला. पाटण्याला गंगा स्नान घडलेच होते. पण काशीच्या गंगेचे माहात्म्य अपार आहे. "का शीतल वाहीनी गंगा" या प्रश्नाचे उत्तर "काशीतल वाहीनी गंगा" असे देतात. काशीस उतरताच तडक दशाश्वमेघ घाटाचा रस्ता पुशीत आम्ही गंगेवर निघालो. दशाश्वमेध घाटावर स्नानाची परिस्थिती जरा बिकट वाटली. घाटावर गाई वासरे येत असल्यामुळे सर्वत्र गोययादी सांडलेले होते. नदीच्या पाण्यावर पाने फुले तरंगत होती आम्ही नावाड्याला आम्हाला पैलतिरावर नेण्यास सांगितले. पैलतिरावर एकतर भक्तांचा मेळा नव्हता आणि गंगेचा प्रवाह नितांत निर्मळ होता. जना दशाश्व मेधाच्या पार्श्वभूमीवर काशीक्षेत्राचे एक रंगीत चित्र चितारीत पुळणीत बसला होता. ते चित्र पहात नाववालाही जरा आडगावला गेला होता. गंगालहरीत डुबायला चांगली संधी सापडली. जनूचे चित्र संपले. नावाड्याने नावेत बसण्यास सांगितले दशाश्व मेध घाटावर आम्ही उतरलो. दशाश्वमेध मनकर्णिका आदीकरून जवळजवळ दोनशे बांधीव घाट काशीक्षेत्री आहेत. दशाश्वमेधाच्या थोडे पिछाडिला श्री काशीविश्वनाथाचे परम पावन मंदीर आहे मंदिरात दर्शनार्थिंची अष्टौप्रहर झुंबड लागलेली असते त्या गर्दीतच काशीविश्वनाथाचे दर्शन

घेतले. काशीच्या मंदिराच्या पाठीशी पाठ लावून औरंगझेबने का कोणी मशीद उठवलेली आहे येवढी लगद कशासाठी केली ते ध्यानात आले नाही. मशीदच बांधायची होती तर काशीला मोकाट जागा पुष्कळ होती.

## हिंदु विश्व विद्यापीठ—

काशीचे महात्म्य काशीच्या विद्येत आहे. काशी हे संस्कृत विद्येचे आदीपीठ आहे. भारताच्या कानाकोपऱ्यातील विद्वान माणसे काशी क्षेत्रीच्या विद्येचा टिळा लावून घेण्यात स्वतःला धन्य मानतात. नव्या आधुनिक निधर्मी संस्कृतीच्या पाणलोटालाही हे प्राचीन विद्यापीठ शरण गेलेले नाही. आजही काशीक्षेत्राच्या परिसरात बनारस हिंदु युनव्हर्सिटी आणि काशी विद्यापीठ ह्या महान संस्था भारताच्या संस्कृतीचा ध्वज हाती धरून मानाने उभ्या आहेत. महामना मदन मोहन मालवीयांची पुण्याई म्हणजे बनारस हिंदु युनव्हर्सिटी सुमारे १००० एकर क्षेत्रावर या विद्यापीठाची कॉलेजे पसरली आहेत. ह्या विद्यापीठाला नव्या महादेव मंदिराने अधिकच शोभा आणली आहे.

काशी विश्वनाथाचे मंदिर अति पवित्र आहे, पण बोळकांडीतून जाणाऱ्या रस्त्यामुळे, चिखलामुळे, गर्दीमुळे मंदिरात जाता येता जीव उबगतो. हे ध्यानी घेऊनच की काय बनारस युनव्हर्सिटीच्या जागेशेजारी काशी विश्वेश्वराचे मंदिर उभारले गेले आहे. हे मंदीर म्हणजे सुंदरतेचे चित्र आहे आदर्श मंदीर कसे असावे याचे ते उत्कृष्ट उदाहरण आहे. या मंदिराची मोहिनीच अशी जबरदस्त होती की तेथून हलावे असे वाटेना. भक्ती ही आधीच कठीण गोष्ट ‘ सुळावरची पोळी ” असे तिचे वर्णन तुकाराम महाराजांनी केले आहे. मंदिराला जाणारे बोळ निरुंद असतील, आजुबाजूस अस्वच्छता असेल तर भक्तीची अधिकच कुचंबना होते. ‘ देवाचिया द्वारी क्षणभर उभे राहायचे ’ तरी देवद्वार निर्मळ पाहिजे.

# पुरी ते नैनिताल

## प्रवास वर्णन--यक्ष नगरी नैनिताल

काशी तीर्थ घडले आणि एका कमळातून दुसरे कमळ उगवावे तसे प्रयागराज तीर्थही हाताबरोबर पदरी पाडून घ्यावे ही कल्पना उदय पावली. मूळच्या कार्यक्रमात फेरबदल करण्यासाठी आम्हाला कोणा वरिष्ठांची मंजुरी घ्यायची नव्हती. कारण आम्ही तसे सगळेच वरिष्ठ होतो. उठलो आणि मोगलसराईच्या फलाटावर प्रयागची गाडी उभी होती त्यात बसलो. प्रयागराज म्हणजेच अलाहाबाद. उत्तर प्रदेशाची लखनौ ही राजधानी असली तरी उत्तरप्रदेशाची अनभिषिक्त राजधानी अलाहाबाद. अलाहाबादचे नाव घेताच पंडीत जवाहरलाल नेहरूंची आठवण व्हावी असा पं. नेहरू आणि अलाहाबाद यांचा निकटचा संबंध आहे. प्रयागराज हे तीर्थाचे स्थान, त्रिवेणी संगमाची पवित्र स्थली, स्वतंत्र युनव्हर्सिटी आणि हायकोर्ट ज्याला लाभली आहेत असे मातबर नगर आणि तेज बहादुर सप्रु, जवाहरलाल नेहरू व लाल बहादूर शास्त्री ज्या नगरीने आपणास दिले ते अलाहाबाद नगर भारताचे अनमोल लेणे आहे. असे म्हटल्यास त्यात अतीशयोक्ती होण्याचा मुळीच संभव नाही.

अलाहाबादला गाडी पोचली तेव्हा रात्री दहाचा सुमार झाला होता. रेल्वेच्या भोजन गृहात आवराआवर आणि झाका पाक सुरु झाली होती तरी एका भल्या वेटरने आम्हाला जेवू खाऊ घातले. हॉटेले धुंडाळीत बसायची टेळच आली नाही. "कोको" हे गोड नांव असलेले हॉटेल मिळाले. खोली मात्र चवथ्या मजल्यावर होती जिने चढण्याउतरण्याची कसरत असली तरी त्याची कसर जागा हवेशीर असल्याने निघाली होती. गंगा यमुना संगमावरचा शीतल वारा खोलीत सरळ घुसत होता. त्याला दारे लोटून आवरावा लागत होता. कोको हॉटेलचा पोरगा हॉटेलपेक्षाही गोड होता. हा तरतरीत किंचित नकटा टेंगणा पण सुबक गुरखा वेटर आलिया गेलीयांचे हांसत मुखाने आगत-स्वागत करीत होता. त्याने लागलीच आमच्यासाठी पाणीउदकाचा दरबोस्त बंदोबस्त केला. सकाळी चहा केव्हा आणायचा, चहाबरोबर काय आणायचे याची चौकशी त्याने केली. पोराचे नांव किशनसिंग होते पण त्याने हौशीखातर किशनकुमार या नव्या नावाचा अंगिकार केला होता. पोराची खरी जागा रजतपटावर असायची, पण त्याचा नेम थोडासा हुकला होता. सकाळी ठरल्या घडीला 'नमस्ते' करीत पोरगा झकास चहा आणि टोस्ट घेऊन हजर झाला. लगबगीने चहा घेऊन आम्ही त्रिवेणी संगमाकडे जाण्यासाठी बाहेर पडलो.

**प्रीतिसंगमाचे मनोहर दृश्य—**

अलाहाबाद किल्ल्याच्या पायथ्याशी नौकांचा ताफा जाणाऱ्या यांत्रिकांची वाट पहात होता. येथे नौकावाल्यांचे भाव बरेच तेजीचे दिसले. थोडी घासाघिस करून सौदा पटला. हिरालाल होडीवाल्याने नाव बाहेर काढली. संथ पाण्यावर नांव बिगिबिगी चालत होती. हरद्वार हृषीकेशावरून वाहात येणारी गंगा मथुरा वृन्दावनावरून वाहात आलेल्या यमुनेला भेटते. त्या प्रीतिसंगमाचे ठिकाणी पाच मिनिटात आलो. येथेच सरस्वतीचा प्रवाह गुप्तपणे या दोन प्रवाहात सामील होतो असे मानतात. हा देखावा अपूर्व आणि नितांत रमणीय असा होता. नाव ऐन संगमाच्या जागी येऊन ठेपली तेव्हा हिरालालने मोठ्याने पुकार करून आम्हाला सांगितले, "बाबूजी!" संगमका जल पीजिये" आम्ही त्यासरसे मनात केशवाय नमः नारायणाय नमः माधवाय नमः असे म्हणत संगमाचे पावन तिर्थोदक चुळक्या चुळक्यांनी प्राशन केले. हिरालाल नाववाला बोल घेवडा होता. त्यांचेपाशी गिऱ्हाईकांचे समाधान करण्याची विद्या होती. नौकेत असता आम्हाला गेल्या कुंभ मेळ्याच्या यात्रेत शेकडो यात्रेकरू चेंगरून मृत्यूमुखी पडले त्या प्रसंगाची आठवण झाली. ते सूत्र पकडून त्याने त्या दारूण अपघाताचे चित्र आमच्यापुढे उभे केले. कुंभमेळ्याच्या चेंगराचेंगरीत हजारो माणसे मेली असे हिरालालने सांगितले. त्यांत हिरालालचे पाचसहा टक्के कमिशन असावे असे आम्हाला वाटले. तरी पण कुंभमेळयाच्या मृत्यूकांडाची हकीकत पानीपतच्या युद्धकथेखाली रम्य करून त्याने सांगितली.

**हिरालालची पक्कड गोष्ट**

हिरालाल म्हणाला 'कुंभमेळाचा' पर्वकाळ जेमतेम अर्धातास होता. याथेकरूनी भरगच्च भरलेल्या गाड्या चोहोबाजूनी वर्वकाळाच्या वेळीच अलाहाबाद स्टेशनांत येऊन ठेपल्या यात्रेकरु गाडयांतून उतरले आणि त्यांनी त्रिवेणी संगमाच्या पुळणीकडे तक्कड धूम धाव ठोकली. पुळणीवर अथांग जनसागर हेलावत होता योगा योग असा की नेमके या दिवशीच पंडीत जवाहरलालजी हे अलाहाबादेत आले होते. अर्थातच पोलीसदल तिकडे बंदोबस्ताला गुंतले. इकडे बंदोबस्त शून्य. त्यात नंग्या साधूनी कळस केला नंगे साधू हे कुंभ मेळ्याच्या सोहळयातळे मोठे मानकरी. ते सगळयांच्या अगोदरच संगमावर येऊन राहिले होते. या पर्वकाळाच्या मुहुर्तावर मिरवणूक काढण्याचा नंग्या साधूचा बेत ठरला. भोळ्या भाविकांच्या जीवघेण्या गर्दीतून हे दाडगेश्वर निघाले. त्यांच्या दांडगाईत चिलटे चिरडावीत तशी माणसे चेंगरून प्राणास मुकली. मृत्युमुखी पडलेल्यांची प्रेते वाहून नेण्यास लॉऱ्या आणाव्या लागल्या ही प्रेते निरनिराळ्या ठिकाणांहून गंगेच्या प्रवाहात सोडून देण्यात आली. कुंभमेळ्याच्या आपघाताची ही भयानक कथा संपवताना हिरालालने मोठी मौज केली. तो म्हणाला "या अपघातांत एक गोष्ट मोठी पक्कड झाली अनेक शेठजी सावकार मृत्युमुखी पडळे. श्रीमंताच्या आंगाखांद्यावरच्या सोन्या-

चांदीच्या वस्तूंची ही थोरली रास येथे पडली होती. धन, दौलत, सोने, नाणे सोडून हे श्रीमंत लोक तडक स्वर्गाला गेले" पैसेवाल्यांबद्दल वाटणारा हिरालालचा तिरस्कार उफाळून वर आला. हिरालाल एकीकडे हे सांगत होता आणि खो खो हसत होता. हिरालाल आणि त्याचा साथी गोपाळ समात दारिद्र्यामुळे संयुक्त सोशालिस्ट बनले होते. आम्ही हिरालालच्या पदरात त्याचे ठरलेले चौदा रुपये आणि कुंभमेळ्याच्या कथेचा बक्षीस म्हणून एक रुपया असे पंधरा रुपये टाकले. हिरालालचा आणि अलाहाबादचा एकदमच निरोप घेतला.

पुढचा कार्यक्रम प्रथम लखनौला जावून तेथून काठगोदाम एक्सप्रेसने नैनितालला जाणे हा होता दोन दिवस पाऊस मांडव घालून होता. तो आज दरदरून कोसळला. बस चालु झाली आणि वादळ वारेही बसच्या रस्त्यावर लहान मोठे वृक्ष उन्मळून पडले होते. एके ठिकाणी घोडे अडले. चिंचेचे मोठे थोरले झाड पुरा रस्ता अडवून आडवे पडले होते. आमच्या जवानांना हे आव्हानच होते. ते धडाधडा पडत्या पावसांत उतरले. मी ही परिकरबद्ध होत होतो. इतक्यात त्या सर्वांनी "महाराज ! अलं अतिसाहसेन" असे म्हणत मला आवरले आणि जागेवर बसवले (हम भी कुछ कम नही है मला एकदा सर्वांच्या नजरेला आणायचे होते. थोडक्यात काम भागले.) रस्त्याकडेच्या घरवाल्या कडून करवत मागिवली. दोघा जवानांनी झाडाच्या फांद्या कापल्या. इतरानी लाकडे दूर लोटून बसला जाण्यापुरती वाट मोकळी केली. दिवे लागणींच्या नंतर थोड्या वेळाने लखौनला पोचलो. लखनौशी नुसते हस्तांदोलनच झाले. बंडूने व अरुणने लखनौच्या बाजारी लखनवी साड्या आणि झब्बे घेतले. आम्ही गेल्या साली येवढे कापड लखनौला खरेदी केले होते की आमच्या कापलेल्या खिशांच्या जखमा अजून भरून आल्या नव्हत्या. स्टेशनवर निमूट पडून काठगोदामाला सकाळी साडे आठच्या सुमाराला आलो. काठगोदामाला नैनितालला जाणाऱ्या बस गाड्या तयार होत्या. नैनिताल यायला एक वाजला.

### नयनरम्य नैनिताल

नैनिताल हे हिमालयाच्या दुमाव ह्या पहाडी विभागांत ७००० फूट उंचीवर एखाद्या पुष्पवाटिके सारखे वसलेले आहे. नैनादेवीवरून आणि नयनरम्य सरोवरावरून ह्या सुंदर हवा खाण्याच्या टिकाणाला नैनिताल हे नांव पडले खरे पण नैनिताल लावण्यसुंदर करण्याची सारी करामात गोऱ्या साहेबांची आहे. त्यात दुसरा वाटेकरी नाही. प्रथम एका फिरत्या साहेबाचे दृष्टीस हे स्थळ पडले. एकेक करता करता पाच पंचवीस बंगले तेथे उठले. पुढे कुमाँव विभागाचे राजकीय कारभाराचे नैनिताल केंद्र बनले. गोऱ्या साहेबांचा थाटमाट भलताच असे. तलावाभोवती यक्षनगरी सिद्ध झाली. हॉटेले झाली, बेलवे डियर, वुडलँडस क्लेअर, स्नोव्ह्यू आणि पन्नास दुसरी चिनार, पाईन, देवदार ओक वृक्षांची समोवार लागवड झाल्यामुळे तलावाचे आणि शहराचे रुप पालटून गेले.

सरोवराच्या खोल पाण्यामुळे यॅचक्लब व बोटक्लबही सुरु करण्याची सोय झाली. एवंच येथे अणुमात्र न्यून राहू नये ही काळजी गोऱ्यां राजकर्त्यांनी घेतली. हिल स्टेशन आहे. आणि मॉल नाही असे होणेच शक्य नाही. नैनितालला मॉल तयार केला मॉल म्हणजे गुलछबू रंगेल लोकांनी सुन्दर वस्त्रे परिधान करून पायी वा घोडयावर बसून रमत गमत मिरवायचे ठिकाण सिमला, मसूरी दर्जीलिंग कुठेही जा मॉल रोड असलाच पाहिजे. मॉल हा हिल स्टेशनचा सौभाग्य अलंकार श्रीमंत लोकांच्या मॉलवर आम्हीही मनमुराद हिंडलो बोटीतून सरोवरात फेरी मारली.

## अदृश्य शिखरे

हल्ली उत्तरे कडल्या हिल स्टेशनावरून हिमालयाची हिम शिखरे पाहण्याची फॅशन पडत चालली आहे. नैनितालहून हिमशिखरे आल्मोरा आणि राणिखेत यांच्या पेक्षा दूर अंतरावर आहेत. पण हिमशिखरे नैनितालहून दिसत नाहीत असा कलंक लागू नये म्हणूनच की काय येथे स्नोपीक्स नावाचा एक पॉइंट तयार करण्यात आला आहे.

आम्ही स्नोपिक्स पॉईंटवर धापा टाकीत गेलो स्नोपीक्स दाखवणारे नकाशे मेजाच्या आकाराचे तक्त्यावर लावले होते पण नैनितालहून हिमालयाची शिखरे म्हणण्यासारखी दिसली नाहीत उगीच जनाने शिखरांकडे अंगुलीनिर्देश करायचा आणि इतरांनी "मम" म्हणायचे असा प्रकार चालला होता नैनितालला हिमालयाची शिखरे पाहण्याची ही भूक भागली नाही. आल्मोरा आणि राणिखेतहून ती शोभा अवर्णनीय दिसते असे समजले.

नैनिताल वरून मुक्काम हलविला. कंपनी अल्मोऱ्याला निघाली. एक एक दिवस आल्मोरा व राणिखेत येथे काढून आम्ही घराकडे माघारे जायला निघणार होतो.

● ● ●

# " हिम शिखरांचे रम्य दर्शन "

आल्मोऱ्याला जाणारी बस नैनितालहून सकाळी आठला सुटणार होती. बस अड्ड्यावर सामानसुमान आणून आम्ही बसची वाट पहात होतो. प्रवासांत जिवासारखे जपायला लागते सामानाला किंवा आपले गुर्जरबंधू ज्याला डागिणे म्हणतात त्याला. सात माणसांना सोळा डागिणे कांही जास्त ही नव्हते आणि कमीही नव्हते. पण आमचे आणखी एक गुपीत होते ते आता प्रवास धडपणे झाला आहे तेव्हा सांगायला हरकत नाही. आमची गंगाजळी आम्ही आमच्या बॅगांतून कपड्याखाली दडवून ठेवीत असू. त्यामुळे त्यातली एखादी बॅग गेली असती तरी आमचा 'आर्या' झाला असता सामान चढवताना उतरताना मामांची आठवण आम्हाला व्हायची. आसामच्या यात्रेत सामानाचे खाते मामांनी आपल्या अखत्यारीत ठेवले होते. सामान चढवते उतरवते वेळी मामा सामानापाशी अगदी 'डटके' उभे रहात आणि एकेका वस्तूची जातीने रुजवात घेत होल्डाल सह । हां होल्डाल सहा वळकरी एक हां वळकरी एक कातडी ब्यागा तीन; हा कातडी बॅगा तीन. साखळीच्या बॅगा चार, हां साखळीच्या बॅगा चार ही सडावात होऊन मामांनी 'आलबेल' म्हटल की आम्ही पुढे पाऊल टाकीत असू.

**आल्मोऱ्याला थडकलो**

आल्मोऱ्याचा रस्ता पहाडी, चढउत्तार आणि वळणा वाकणाचा होता. बसचा शेलाटा दिसणारा कुमाँनी ड्रायव्हर आपल्या कामात मोठा तरबेज होता. त्याचा स्टिअरिंगचा ताबा अगदी पक्का होता. नैनिताल ते आल्मोरा हे सहासष्ट मैलाचे मकाण त्याने केव्हांच तोडले. बारा वाजण्याच्या अगोदर अल्मोऱ्याला बसतळावर गाडी आणून त्यांने उभी केली. बस स्टँडपाशीच अम्बॅसडर नावाचे हॉटेल होते. त्यात तळ दिला. भूक सडकून लागली होती. भोजनगृहाकडे पाहून थोडीशी निराशा झाली. तिथे मोठा कोणी माणूसच दिसत नव्हता. गुडघ्या येवढ्या उंचीची चार पोरे होती. ती पोरे मात्र कामावर घसरली होती. एक कांदा चिरत होता. एक रोट्या भाजायला बिलगला होता. दुसरा एक ताटे आणि वाट्या चक्क करुन टेबलावर हारीने मांडत होता. थोड्याच वेळात भात, रोटी, डाळ आणि कोशिंबीर असे पद्धतशीर वाढलेले ताट आमच्या पुढे आले. सर्व पदार्थ रुचकर होते. पण कोशिंबीर तर बहारदार झाली होती. सातजण ताठ जेवणारांना एकटा रोट्या बनवणार तरी किती ? तो थकला बिचारा. शेवटी रोट्या पुरे झाल्या असे सांगून रोट्यांवरचा हक्क आम्ही सोडला. ह्या लहानग्या पोऱ्याचे आम्हाला फारच कौतुक वाटले. भोजन गृहाचा मालक त्यांना सारा दिवस राबवून अगदी मामूली वेतन देत होता हे समजले तेव्हा आम्हाला

अधिकच कीव आली पोरांची. पण तोंड पाटीलकी करण्यापलीकडे त्यांच्या कल्याणाचा दुसरा मार्ग उपलब्ध नव्हता.

**सर्वोत्कृष्ट शैलस्थान**

आल्मोरा शहर नैनितालच्या मानाने सर्वच बाबतीत डावे होते. मात्र अंदराजांनी बसवलेल्या पुरातन शहराचे आजही राजही राजकीय महत्व कमी झालेले नव्हते. आल्मोऱ्याला फार मोठी लष्करी छावणी असून येथे कुमाव पहाडी फलटणीचे हेडकॉर्टर आहे. या शहराला दुसरे एक असामान्य सौभाग्य लाभलेले आहे. ते म्हणजे पंडीत गोविंद वल्लभ पंत या भारताच्या सुपुत्राची हे आल्मोरा शहर जन्मभूमी आहे. हिंदी कविवर्य सुमित्रा नंदन पंत हे ही आल्मोऱ्याचेच. स्वामी विवेकानंद हे ही आल्मोरा येथे आले होते. व परमेश्वर चिंतनासाठी त्यांनी ही जागा फार पसंत केली होती. आल्मोऱ्याचे आम्हाला आकर्षण होते ते हिमालयाच्या हिमशिखरांचे दर्शन येथून घडते म्हणून. संध्याकाळी फिरायला निघालो, आणि हिमालयाची शिखरे दिसली, हिमाच्छादित शिखरांचे वेड एकदा लागले की तृप्ती होतच नाही. संध्याकाळी पाहीलेली शिखरे पुन्हा सकाळच्या सूर्याच्या कोवळ्या उन्हात कशी दिसतात हे पहायचे शिल्लक होतेच. सकाळी तोही कार्यक्रम झाला. वातावरण जरा ढगाळ होते. त्यामुळे जितकी ही शिखरे डिसेंबरात स्पष्ट दिसतात तितकी स्पष्ट व सुंदर यावेळी दिसली नाहीत. आल्मोऱ्याला राहाण्याचे उद्दिष्ट अंशतः सफल झाले. मध संपला कि भुंगा एका फुलाचा ठाव सोडून दुसऱ्या फुलाकडे धाव घेतो तसा आम्ही राणी खेतच्या बसची चौकशी करायच्या उद्योगाला लागलो.

**हिम शिखरांचे वेड**

नैनिताल, राणीखेत आणि आल्मोरा हे त्रिकूट आहे. नैनितालला आलेले बहुतेक प्रवासी, आल्मोरा व राणीखेतला जातात. राणीखेत पाहून आम्ही ही त्रिस्थळीची यात्रा



हिम शिखरांचे रम्य दर्शन

संपविणार होतो. राणीखेतचा अर्थ राणीचे शेत. पण राणीखेतला आज थंड हवेच्या क्षेत्रांची राणीव बहाल करण्यात आली आहे. राणीखेतची उंची ६००० फूट असून आल्माबराकी जेथे आहेत तो राणीखेतच्या भाग आणखी हजार दीडहजार फूट उंच आहे पण राणी खेतला शंभरगुण आहेत. ते या ६००० फूट उंचीमुळे नव्हते. राणीखेत हे हिमालयाच्या पायथ्यावर बसलेले आहे आणि त्यामुळे राणीखेतच्या कुठल्याही घरात बसून हिमालयाची जवळ जवळ २०० मैल लांबीची हिमपर्वतांची रांगच्यारांग तुमच्या पुढ्यात मांडल्यासारखी दिसते. सिमला मसूरी, दार्जिलिंग नैनिताल यापैकी कुठल्याच स्थानाला हे सौभाग्य प्राप्त झालेले नाही. नंदाघंटी, त्रिशूळ, नंदादेवी ही हिमशिखरे अरुणोदय होताच आम्हाला दिसली क्षणा क्षणाला नवे रुप धारण करणाऱ्या त्या दृश्यांची रमणीयता वर्णन करता येणार नाही. साखरेची गोडी जशी मुक्याला वर्णन करून सांगता येणार नाही तशीच परिस्थिती होती. जनूने व्हन्हांड्यात आर्ट गॅलरी उघडली. भसाभस एक, दोन, तीन रंगीत स्केचिस काढून तेथेच ती मांडली. अल्का हॉटेलात आणि राणी खेत मध्ये जनूच्या एवढा लोकप्रिय माणूस नव्हता अल्का हॉटेलच्या शेवटच्या कमऱ्यापर्यंतची सारी माणसे जनाचे चित्रांचे प्रदर्शन पाहून गेली. हॉटेलचे वेटर एकीकडे आपला कामधंदा करीत होते. मध्ये मिळालेला वेळ ते चित्र पहाण्यांत सार्थकी लावीत होते. जनूने नंतर आपले हपीस बदलले व भर रस्त्यावर नेले ती तर ऐन शाळेची वेळ होती चित्र लेखन सुरु झाले आणि पांच पन्नास पोरे जनूच्या भोवती गोळा झाली. एका शाळकरी मुलीचा आनंद तिच्या पोटात मावला नाही तिच्या मैत्रिणीला "चंफा, ए चंफा, यहांपर चित्र देखने आइये" अस ती बाह्या उभारून, हाक मारून सांगत होती मुलांनी 'शाळेत जाताना, वाटेत कांहीतरी पाहात राहू नये' हा नियम अगदी पोरांनी पार झुगारून दिला. चित्रे काढण्याचे कार्य आणखी चालते तर मास्तरही तेथे येऊन हजर झाले असते. असे वाटल्यामुळेच की काय जनूने आपले कुंचले आवरून धरले. राणीखेत ह्या अनन्य साधारण हिमशिखर दर्शनामुळे प्रवाशांना प्यार झालेले आहे. अमेरिकेच्या सुप्रीम कोर्टाचे जज्जांनी तर स्पष्टच लिहून ठेवले आहे की "राणीखेत हे जगांतील सर्वोत्कृष्ट शैलस्थान आहे."

जगन्नाथाला अजून पिंडारी ग्लेसिअर्स पाहाण्याची इच्छा होती. चौवाटीयाला सफरचंदाच्या बागा आहेत असे समजल्यावर त्यान त्या "सफरचंद" एक्सप्रेसची चौकशी करून गाडी सुटण्याच्या वेळा आणि 'किराया' याची इत्यंभूत माहीती जमा करून वैशंपायनाने जनमेजयाला कथन करावी तशी ती आम्हाला कथन केली. पण आता बंडूला आणि मला मुंबईला जायचे होते. आणि ते तिकिट काढून कोणीतरी आणून द्यावे अशी इच्छा होती. बंडूचा "चलो मुंबई हा ठराव बहुमताने पास झाला. परतीच्या प्रवासाची सिद्धता झाली. राणीखेतहून निघून फिरून एकदा काठ गोदामाचा रस्ता आम्ही धरला. काठगोदामाहून मथुरेला जाऊन जनता, फ्रॉंटियर, पठाणकोट जी मिळेल ती

गाडी धरून आम्ही घरी जाणार होतो. मथुरेला पहाटे उतरलो. मथुरेच्या द्वारकाधिशाची भेट जाता जाता घ्यावी असा विचार करुन कृष्णमंदिराचा रस्ता धरला.

**भक्ति प्रेमाचे दर्शन**

त्या पंच पंच उषःकालीही मथुरेच्या द्वारकाधीश मंदीराचा आसमंत जागा झालेला होता. भाविक आया बहीणी थंडी वाऱ्याची पर्वा न करता यमुना घाटावर स्नाने करून, कुंकुमादी चर्चूनी सहा वाजता देवद्वार केव्हा उघडते याची वाट पहात होत्या मथुरेच्या बाजात गडळणीचा आजही उत्कर भक्तिभाव वावरतांना दिसत होता. सहा वाजता एकच जयजयकार झाला. " बोलो द्वारकधीश की जय ! " द्वारकाधिशाने आपले कवाड उघडून भक्तांना दर्शन दिले. भक्तिभावाचा ओलावा आमच्याकडे जरा बेताचा, तथापी मथुरेच्या द्वारकाधीश मंदिरांत भक्तिप्रेमाचे दर्शन घडले त्याने हृदयात कुठेतरी समाधान झाल्याची किंचित प्रचीती आली.

मथुरेला शहाण्या माणसाने मुंबईची गाडी पकडू नये. सरळ दिल्लीला जावून गाडी धरावी गाडीत अतोनात गर्दी होती पण घरी जाण्याच्या धुंदीत आम्ही त्याची चिंता केली नाही. गाडी मुंबईला तीन तास उशीरा आली. आम्ही शिणलो होतो. पण मुंबई येताच पुन्हा उत्साहाला उधाण भरती आली.

★ ★ ★

# चितोडगड ते आबू

चितोडगडावरचा विजय स्तंभ ही रजपुतांच्या शौर्याची आणि विजयाची साक्षच होय. पण ह्या विजयस्तंभाचे शिल्पही बरेच प्रेक्षणीय आहे. आमचा वाटाड्या म्हणजे अगदी शहाण्णव कुळीचा पाक रजपुत होता. तेव्हा चितोडच्या विजय स्तंभाची वाहवा तो करणार नाही हे शक्यच नव्हते. चितोडचा विजय स्तंभ पहाताच दिल्लीचा कुतुबमिनार आणि चितोडचा विजय स्तंभ यांची तुलना करण्याची सुरसुरी आम्हाला येणे अगदी क्रमप्राप्त होते. मुद्दामच कुतुबमिनारचे कौतुक करुन आम्ही पूर्व पक्ष करताच आमच्या रजपूत वाटाड्याने कुतुबमिनारावर मोर्चे रोखले. 'कुतुबमिनार, कुतुबमिनार काय करता हो ? कुतुबमिनार म्हणजे एक उतरंड आहे, झालं. शिल्पाची निशाणी सुद्धा कुतुबमिनारावर शोधून सापडायची नाही.



चितोडगड

चितोडच्या विजय स्तंभांचा विशेष हा आहे की स्तंभाच्या पायापासून वरती कटीबंधापर्यंत बांधकाम चौरस तेरा फुटी आहे. तर त्यावरचे शिखरापर्यंतचे बांधकाम सतरा फुटी कामाचा कळस ! कां आहे की नाही कसब ! असे म्हणून प्रश्नार्थक मुद्रा करुन वाटाडया आमचेकडे पाहु लागताच 'आम्हीही तुझे म्हणणे खरे आहे' हे दर्शवण्यासाठी एक समयावच्छेदेकरून माना डोलवल्या. आमच्या रजपूत वाटाड्याने कुतुबमिनारची मिजास एका क्षणात उतरवून टाकली.

चितोड गडच्या या चतूर वाटाडयाची आठवण चितोड सोडले तरी मागे मनांत रेंगाळत राहीली. आज काल लोक प्रवासाचे शौकिन होऊ लागले आहेत; आणि इतिहास प्रसिद्ध स्थळांच्या ठिकाणी व लेणी गुंफांच्या प्रदेशांत वाटाडये तथा गाईड नामक नवी जीवयोनी निर्माण झाली आहे. ह्या वाटाडयांपैकी नव्वद टक्के वाटाडे अगदी पोटभरु आहेत. इतिहास कशाशी खातात याची त्यांना कल्पनाच नाही.

विश्वास ठेवा अगर ठेवू नका; खुद्द द्वारकेच्या एका मंदीरातील वृद्ध वाटाड्याने मंदीरातील रुक्मीणीच्या मूर्तीकडे अंगुलीनिर्देश करून 'ह्या प्राण्याला रुक्मीणीशी विवाह करावयाचा होता' ही अपूर्व माहिती आम्हास सांगितली. त्यावर आम्ही त्याला सांगितले की "बाबा रुक्मीणीशी विवाह करु पाहणारा प्राणी शिशूपाल असून बिचारा रुक्मी निरपराध आहे. आम्ही परोपरीने हे सांगत होतो. पण आमचे म्हणणे त्याच्या वरच्या मजल्याला पोचले की नाही ते मात्र भगवान श्रीकृष्णालाच माहीत !

### वाटाडे आणि थापाडे

वाटाड्याच्या थापेपणाबद्दल एक सुरस आणि अद्‌भूत कथा एका सुप्रसिद्ध अमेरिकन लेखकाने त्याच्या प्रवास वर्णनात दिली आहे हा लेखक इटलीमध्ये प्रवास करीत कोलंबसाचे जन्मग्राम जिनोआ येथे येऊन पोचला. त्या गावी कोलंबसाची अनेक स्मृती चिन्हे संग्रहीत केली आहेत. त्या स्मृतीचिन्हांपैकी अगदी बावनकशी खरी कोलंबसाची किती व बनवा बनवी किती हे कोण सांगणार. वाटाड्या प्रवाशाला सरसकट सगळीच दाखवतात. हा अमेरिकन प्रवासीही सापडला. कोलंबसाचा वाडा, कोलंबसाचा डगला त्याची तलवार, ह्या वस्तू तर वाटाडयांनी प्रवासी लेखकाला दाखविल्या असणारच; पण कोलंबसाच्या वस्तू दाखवत दाखवत वाटाडयांने प्रवाशाला एक कवटी ठेवलेली होती अशा दालनापाशी आणून उभे केले व कवटीकडे बोट दाखवून तो उद्‌गारला "ही पहा कोलंबसाची कवटी"! अमेरिकन प्रवाशाला त्या महापुरुषाची कवटी प्रत्यक्ष पाहाण्याचे पुण्य लाभले म्हणून धन्यता वाटली असावी.

कोलंबस वस्तू प्रदर्शनाचा प्रोग्राम पुढे चालूच राहिला. बऱ्याच वेळाने फिरून प्रवासी आणि वाटाडया आणखी एका कवटी ठेवलेल्या दालना पाशी आले. ही कवटी पहिल्या कवटी पेक्षा किंचीत मोठी होती. या कवटीच्या खोली पाशी येताच आता पुन्हा ही कवटी कोणाची हे कुतुहल उत्पन्न झाल्या कारणाने प्रवाशाने वाटाडयाला प्रश्न केला. आता ही कवटी कोणाची ? यावर क्षणाचाही विलंब न लावता अगदी निर्विकार मनाने वाटाड्याने उत्तर दिले 'कोलंबसाची'! प्रवासी मनांत म्हणाला कोलंबसाची कवटी मी पाहीली त्याला पुरा तासही लोटला नाही. मग पुन्हा कोलंबसाची दुसरी कवटी कुठून आली ? वाटाड्याने लगेच खुलासा करून टाकला की 'मघा तुम्ही पाहीली ती कोलंबसाची लहान पणाची कवटी ही तो पुढे मोठा झाल्यावरची कवटी' आहे की नाही जादू ! एक रात मे दो दो चांद खिले.

आमच्या रजपूत वाटाड्याचा रजपुतांचा जरा जादा अभिमान सोडला तर त्याला रजपुतांच्या इतिहासाची, त्यातील महापुरुषाची आणि महत्वाच्या घटनांची अगदी खडानखडा माहिती होती. अितिहास कथा त्याने आमच्या डोळ्यापुढे समूर्त उभ्या केल्या. आमच्या वाटाडयाला चांगली दक्षिणा देऊन आम्ही त्याचा निरोप घेतला. गांवगन्ना पसरू पाहणाऱ्या वाटाडयांना आमची सविनय प्रार्थना की त्यांनी बिदागी नि.संकोच मागावी लोक सढळ हाताने ती देतील. पण त्यांनी बिदागी घ्यावी तशी इतिहास भूगोल वाचण्याची तसदीही घ्यावी म्हणजे वर सांगितले तसे गोंधळ होणार नाहीत.

### पुष्कर तीर्थ

चितोड गडावरून आम्ही मुक्काम हलविला आणि अजमेरांत दाखल झालो. तेव्हा रात्रीचा समय झाल्यामुळे एकाद्या विसावा गृहाचा आश्रय पत्करणे अवश्य होते. अंबिका नांव धारण करणारा एक लॉज आम्ही पसंत करून खोली मुक्रर केली. हा लॉज पसंत करण्याचे एक कारण म्हणजे तो अजमेर स्टेशन लगत होता. आणि वरती लॉजचे धनीमालक आमच्या थोडेसे परिचयाचे निघाले. एरवी लॉजमधील आमच्या बारीकशा खोलीत शिरायची वाऱ्याचीही हिमत नव्हती. अजमेरांत उकाडा विलक्षण होता. खोली ती तशी प्याक बंद. पण सुदैवाने अंबिका लॉजच्या इमारतीला चांगली प्रशस्त गच्ची होती. शिवाय अंबिका लॉजच्या संभावित मालकांनी गच्चीवर झोपण्याचे, लोळण्याचे, घोरण्याचे आदीकरून हक्क आपल्या स्वाधीन ठेवलेले नव्हते. त्यामुळे निद्रेची समस्या सुटली. सकाळी आम्ही अजमेरपासून सुमारे सात मैलावर असलेल्या ' पुष्कर ' तीर्थाकडे निघालो. पुष्कर हे फार पुरातन तीर्थक्षेत्र आहे. अजमेरला आलेला प्रत्येक भाविक माणूस ह्या पुष्कर तीर्थावर गेल्याविना राहात नाही पुष्कर तीर्थ हा एक भला मोठा तलाव आहे. तलावाच्या चारी बाजूंना चांगले फरसबंदी घाट बांधलेले आहेत. काही राजेरजवाड्यांनी पुष्कर तलावांच्या अंगासरसे आपले महाल उठवले आहेत. पुष्कर महिमा अपार असल्याचे तेथले उपाध्ये आल्या गेल्याला सांगत असत ' कलौ चंडी विनायकः ' या धर्तीवर तेथल्या उपाध्यांनी.

**कलौ तु पुष्करं तीर्थ**
**नान्यदस्ति कदाचन**

हे सूत्र वाक्य तयार केले आहे. येथे दिलेले पिंडोदक पितरांना स्वर्ग लोकांत अगदी घरपोच पोचते अशी ब्रह्मदेवांनी देवांना दिलेली ग्वाही उपाध्ये बाबा येथे बायाबापडयांना देतात, आणि यात्रिक तीर्थावर श्राद्धादि उरकून घेतात.

अनेक तीर्थावर चालू असलेला पुण्यसंपादनाचा आणखी एक प्रकार येथेही प्रचलित होता. माशांना चणे चारणे हा तो प्रकार होय. तीर्थाच्या वाटेवर चणेवाल्यांची पेठच होती. प्रत्येक चणेवाला माशांसाठी चणे घेण्याबद्दल यात्रिकास विनवीत होता.

माशांना चणे चारण्यात पुण्य किती लागते हा जरी वादाचा मुद्दा असला तरी पुण्य संपादनाचा हा प्रकार चणेवाल्यांना व माशांना चांगला मानवलेला दिसला. चणेवाले ह्या धंद्यावर चांगले गरगरीत झालेले दिसले. मासेही चणे खावून मांडयाएवढे मोठे झाले होते. स्नानादि उरकून पुष्कर क्षेत्रिच्या प्रसिद्ध व्यंकटेश मंदीरात जावून देवदर्शनादी कार्यक्रम पार पाडले. पुन्हा अजमेरांत आलो. तो सुग्रास भोजनाचे दूत आमच्या खोलीपर्यंत येऊन पोचले होते. लॉजच्या मालकांची ओळख कधी वाया जायची नाही. आजची शिफारस इस्तंबोली गुलाबपाण्याचा शिडकाव टाकलेले फार प्रवाही नाही, फार घट्ट नाही. असे मधूर श्रीखंड ही होती.

आम्ही भुकावलो होतो. आज 'मा प्राणेषु दयां कुरु प्राणाः जन्मनि जन्मनि' हा विचार करून श्रीखंडाचे आकंठ सेवन केले. श्रीखंड सागोळ सिमिटा सारखे पोटात जावून पोटात स्लॅब घातल्यासारखे वाटू लागले. मग एक विजेचा पंखा पहाऱ्याला ठेवून वामकुक्षी केली. वामकुक्षी चांगली चार वाजेपर्यंत चालली.

### " अनासागरच्या काठी "

अजमेरच्या प्रेक्षणीय देखाव्यांत ' आनासागर ' चे नांव घालावे लागेल. आनासागर तलावाच्या एका काठांवर लोकांना बसण्यासाठी संगमबरी बिरादऱ्या बांधल्या आहेत. ह्या संगम खरी बिरादऱ्यांत बसून सज्जनांच्या मनांप्रमाणे विस्तीर्ण असलेला, शितल वायुलहरीच्या योगाने हेलावणारा अनासागर आम्ही :डोळे भरून पाहीला. मानवनिर्मीत तलावांत हा सर्वात मोठा तलाव आहे, असे सांगतात. जहांगिर बादशहाने तयार करवून घेतलेली दौलत बाग ही दर्शनीय आहे. दौलत बागेत लोक हवा खात होते. एकीकडे एक शिवाजीच्या नांवाने पुनीत झालेला पत्त्यांचा जुगार जोरदार चालला होता. ते निर्भयपणे जुगार खेळत होते त्यावरून आजमेरच्या सयाजीरावांच्या उदार आश्रया खाली हा उद्योग चालला असावा असे वाटले. अजमेरचे जैनांचे सुवर्णमंदीर जैनांच्या सर्व इमारती प्रमाणे गौर सजवितात तसे सजवलेले होते. अजमेर दर्शन पुरे होताच पुन्हा स्टेशनवर जावून आबूला जाणाऱ्या गाडीची वाट पहात बसलो. आज गाडीला तोबा गर्दी होती. जागेच्या शोधांत डब्यांची अदलाबदल करीत असता प्रवासांत पांच पांच मिनिटांनी लागणारी पाणथैली केशवरावांचे हातून हरवली. माझ्या मवाळ स्वभावाच्या मानाने जेवढी कडक भाषा वापरता आली तेवढी वापरून प्रवासात हरघडी लागणाऱ्या वस्तू हलगर्जीपणाने हरवणे बरे नाही. हलगर्जीपणाने आपले (व आपल्या भारत देशाचे) कसे नुकसान झाले आहे, यावर मी एक भाषण केशवला सुनविले. !

### ' आबुरोडला अपेक्षाभंग '

सकाळी आबुरोडचे स्थानकांत गाडी येऊन उभी राहीली आबुरोड हे हिलस्टेशन असल्यामुळे आणि उन्हाळ्यांत हिलस्टेशनला जावून आलो हे सांगण्यांत मोठे भूषण

असल्यामुळे आबूच्या बस स्टँडवर केवढा प्रचंड क्यू लागला होता. गॅबरडीनच्या पँट घातलेले पुरुष, मोटारच्या स्पेअर चाकाप्रमाणे मानेवर केसांचे चक्र धारण करणाऱ्या व इंग्रजीतून भाषण करणाऱ्या त्याच्या ललना सारेजण क्यूमध्ये खडे होते. बसची तिकिटे मिळायाला मनस्वी वेळ लागला. दरम्यानचा काळ आम्ही रामारोच्या मसालेदार चकल्या दोन तीन वेळा मागवू लोटला. आबूचे पहाडावर जायला बराच घाट चढावा लागतो. बसेस चांगल्या मजबूत व प्रशस्त होत्या. तासाच्या आंत बाहेर वेळ या प्रवासाला लागतो. घाटमाथ्यावर पोचताच थंडीच्या गुलाबी झुळका लागतील, रोमहर्ष अंगावर विलसू लागेल अशी मुलायम स्वप्ने आम्हाला बसमध्ये डुलकी लागली त्यावेळी पडत होती. आबू आले, पण शीतल झुळकांचा पत्ता नव्हता. आम्ही मनाची समजून घालून मनाला उपदेश केला "जगी सर्व वेळ थंड असते तसे हिल स्टेशन असते कां कुठे ?" मध्यम वर्गाचे आम्ही प्रतिनिधी, तेव्हा सहा रुपये रोज देऊनही आम्हाला मध्यम प्रतिची जागा मिळाली.

आमच्या खोलीचा दरवाजा बंद केला तरी ऑटोमॅटीक पद्धतीने उघडे. वहिवाट आहे म्हणून खोलीला लावण्यासाठी आम्ही कुलुप खरेदी केले. आता हे कुलुप चांगले कशाला हवे ? एक लहानसे कुलुप व दोन लहान किल्ल्यांचे जुळे आम्ही खरीदले. किल्ल्या फारच बारीक होत्या पण आम्हाला त्या हरवल्या तरी चिंता नव्हती. किल्ल्या हरवल्या तरी कुलुपापुढे मोठ्यांने जरी ओरडलो तरी ते उघडेल इतपतच कुलुप योजनापूर्वक आम्ही घेतले होते. आबुला जाताच येथल्या सर्वांत प्रेक्षणीय असा नखी तलाव आम्ही पहायला बाहेर पडलो हा तलाव पुराण कालांत देवाने नखांने खोदला अशी आख्यायिका आहे. हा तलाव महाबळेश्वराच्या वेण्यालेक प्रमाणे मोठा देखणा आहे. या तलावात ठिक ठिकाणी सुवर्णवर्णाच्या कमळांची पखरण तयार करण्यात आली आहे. जलविहारासाठी साध्या नांवा आहेत. नवविवाहीतांसाठी दुसऱ्या नखरेल नौकाही आहेत. सारा दिवस तेथे नौका विहार चालू असतो. नखी तलाव हे आबुचे नाक आहे असे म्हणण्यात हरकत नाही. दुपारी येथे दिलवाडा नामक जैन मंदीरास आम्ही भेट दिली. चौदा कोटी रुपये खर्च करुन दिलवाडा मंदीर बांधण्यात आले आहे. प्रत्येक पावला पावलाला संगमरवरी दगडावरचे कोरीव काम निराळ्या नमुन्याचे बनविण्यात आले आहे. शिल्प पाहून मन थक्क होते. आबु हे हिल स्टेशन आहे. तसेच जैनांचे दिलवाडा मंदीर आणि हिंदुचे अंबाजी मातेचे हे निवास स्थान असल्यामुळे आबुला तिहेरी महाम्य प्राप्त झाले आहे. दुपारी ही स्थळे पहात होतो. आबु हिलस्टेशन असल्यामुळे जिकडेतिकडे गारीगार असेल अशी कल्पना जागच्याजागी जिरली. घामाघूम झालो तरीपण सनसेट पॉइंट नामक एक विख्यात पॉइंट आहे म्हणून तिकडे गेलो. पॉइंट पाहिल्यावर वाटते की, पॉइंट न पाहाताच पुस्तकाचे आधारे सनसेट पॉईन्टचे वर्णन करतो तरी ते वर्णन जास्त भावले असते. एक उंच जागा, बसायला सिमेंटच्या बैठका, पुण्याच्या प्रवासात दिसते तसे खालच्या सखल प्रदेशाचे दर्शन बावटा खलास !

आबुचे हिल स्टेशन हे या बजूचे एकुलते एक असल्यामुळे त्याला भलताच भाव आला आहे असेच आमचे मत झाले. रात्री साडे दहापर्यंत नखी तलावाच्या काठी हिरवळीवर पहुडलो होतो. इच्छा ही होती की आबुची थंडी हवा आम्हाला क्षेमालिंगनपूर्वक भेटेल. आंगात हिव भरेल. सहा रुपये रोज देऊन घेतलेल्या खोलीचे दार बंद करून पांघरुणात लपेटून घ्यावे लागेल. पण हाय ! प्रथम दरवाजे बंद करुन निजलो. मध्यरात्र झाली तरी थंडी प्रगट होईना. पहाटे शिवराम पंतानी बंडूला जरा दरवाजा उघडून ठेव असे सांगितले हेतु हा की न जाणो आलेली थंडी खोलीचे दार बंद पाहून वापस जाईल. सकाळ झालीं आम्ही थंडीची वाट पहाण्याचे सोडून दिले. पुन्हा बस पकडून अबुरोडला निघालो. गाडीत अबुच्या थंडीसंबंधी चर्चा चालू असता एका सज्जनाने सांगितले आबुचा खरा हंगाम शियाला मध्ये असतो. उन्हाळ्यात नाही. आम्ही म्हणालो असे जर आहे तर हे पँटवाले पुरुष आणि त्या चक्रधारी ललना एवढी गर्दी येथे का उडवून देतात ? " बंडूने या प्रश्नाचे मार्मिक उत्तर दिले 'एक आबुला जातो म्हणून दुसरा अबूला जातो ' " आबु नाचे बाबू नाचे बाबूची शेंडी नाचे. "

मी स्टेशनवर उतरल्यावर थोडी चलाखी केली. नैनितालला परटाकडून धुवून आणलेले परीटघडी धोतर काढले आणि टेरेलिनचा टू वाय टू चा शर्ट परिधान केला. आता वरतून चांदीच्या भांड्याना लावतात तसा कागद लावायचा तेवढाच बाकी राहीला होता. घरी गेलो तो नैनितालच्या एकतीसशे मैलाच्या यात्रेहून मी आलो आहे असे कोणालाच वाटले नाही. इथेच नाना चौकांत जावून आल्या सारखा दिसत होतो.

● ● ●

# आमची म्हैसूर यात्रा

दिखनेमे ढब्बू गाडी !
        पाहीजे तर गाडीचा मोरावळा घाल.

पोपट आलाय पण झुंबरी कुठं ?
        सुरम्याने डोळे शांत होतात आणि पाणीही येते !

पानांत झावबाची वाडी !
        स्वर्ग लोकींचे वृन्दावन
ह्यानंतर अमृत तुल्य चहा कशाला ?

अजिंठा वेरूळची यात्रा गेल्या वर्षी जेंव्हा पुरी केली त्यावेळीच पुढच्या वर्षी म्हैसूरला जाण्याचा संकल्प करून त्या यात्रेचे उदक आम्ही सोडून ठेवले होते. कोणत्याही गोष्टीचा संकल्प करून त्याचे उदक सोडणे हे काम फार सोपे आहे. पण प्रत्यक्ष मे महिना लागला तरी कशाचाच जम बसेना. आमची म्हैसूरची यात्राही पार पाडण्यास आमचा श्रीपाद समर्थ आहे आणि अगदी आयत्यावेळी कांही तरी मार्ग काढून तो आमचे दारांत मोटार घेऊन उभा राहील हा आम्हाला भरवसा होता.

श्रीपादची आंस जी आम्हाला लागली होती त्याला अनेक कारणे होती. एक म्हणजे गाडीच्या चाकावर तो एकदा आरूढ झाला की निर्धारपणे प्रवासांत घोरत पडणे आम्हाला शक्य होत असे. मागे रत्नागिरीच्या यात्रेचे वेळी लांजे गावावरून मोटार जात असता रस्त्यावरचे वाटसरू मोटारीकडे टकमका पाहात असलेले आम्हाला दिसले. आम्हाला शंका येऊन आम्ही खाली उतरून श्रीपादला मोटार चालवण्यास सांगितले. पाहतो तो गाडीचा पुढचा टायर अगदी अत्यवस्थ असून त्याची प्रकृती चिंताजनक आहे असे आम्हाला दिसले. श्रीपादला हा वृत्तांत कथन करता तो शांतपणे आम्हाला म्हणाला " बापहो ! अगदी यत्किंचीत चिंता करू नका. त्या टायरला बेळगांवपर्यंत अगदी मरण नाही. " बेळगांव हे लांज्या पासून सुमारे अडीचशे मैल दूर होते. त्या बहादराने आम्हा सर्वास बेळगावी सुखरुप नेले.

श्रीपाद आम्हाला हवासा होता त्याला आणखी एक कारण होते. म्हैसूरचा प्रवास म्हणजे शुद्ध कानडी मुलखांतला प्रवास आमच्या पैकी एकाचेही कानडीचे ज्ञान ' नीरू बेक्कु इल्ला ' यापुढे गेलेले नव्हते. श्रीपादला मात्र सफाईदार मराठी बोलतां येत

असून तो कानडीही फरमास बोलू शकत असे. श्रीपादच्या सहाय्याने कानडी भाषेची अडचण दूर होणार होती.

पण यात्रेला जाण्याचा दिवस जवळ आला तरीहि आमच्या निर्वाणीच्या निरोपाना श्रीपाद कडून कांहीच उत्तर मिळाले नव्हते. त्यामुळे मोटारीकरीता नवी सोयरीक शोधणे प्राप्त झाले. नारायणाच्या ओळखीचा मुंबईच्या बारभाई मोहोल्यातील एक मोटारवाला शेटजी होता. त्या शेटजीची गाडी आम्ही ठरवली.

चौदा मेच्या रात्री मोटार ठाण्यास येऊन हजर झाली. मोटारी बरोबर ड्रायव्हर बाबुभाई जुनागढवाला हा असून त्याचा सहाय्यक महमंद होता. बोलाचालायला बाबूभाई चांगला अघळ पघळ होता. म्हैसूरची सहल म्हणजे तो झाडाचा पाला समजत होता नामराजेन्द्रांच्या म्हैसूरास जावयाचे म्हणूनच की काय त्याने एक झिरझिरीत बुशकोट व सॅटीनची पॅंट पेहेरली होती.

गाडीची व आमची तीच प्रथम भेट. गाडी शेवरोलेट होती. गाडीचा रंग गडद हिरवा होता. आत बसताच भुसकन खाली दबणाऱ्या गाद्या होत्या. या गोष्टीवरच आम्ही खूष होतो. लगेच आम्ही गेल्या वर्षीच्या गाडीची निन्दा आरंभिली. कुठे बाबुभाईची शेवरोलेट आणि कुठे गेल्या वर्षीचे धिंगाड अशी टिका सुरु होती बंड्र, दत्तू मोटारीतल्या गाद्या पुन्हा पुन्हा दाबून पाहून म्हणत होते "बस अशी पाहीजे गाडी"!

रात्री १ वाजता गाडीत पेट्रोल तेल हवा भरून गाडी निघाली. हवा फुकट असल्यामुळे बाबुभाईने ती भरून घेण्यात कसूर केली नाही. महमंद म्हणत होता तीस पौण्ड हवा पुरेशी आहे. बाबुभाईने सांगितले पन्नास पौण्डा शिवाय भागणार नाही. बाबुभाई होता गाडीचा ड्रायव्हर महंमद पडला नुसता क्लीनर. पनवेलहून गाडी पुढे सरकली. चौक गांवाचे हद्दीतून आम्ही चाललो होतो. आता थोडया वेळात खोपवली येणार असा विचार करीत आम्ही बसलो होतो. इतक्यांत गाडीचे दिवे गेले. बाबुभाईने सर्व ब्रेग लावून गाडी जागच्या जागी उभी केली. लगबगीने तो बाहेर उतरला. कपाळाला हात लावून तो म्हणाला. "अरे भाई परमात्माने सबको बचाया!" आम्ही ही खाली उतरून पाहतो तो चौकच्या अरुंद पुलाच्या कठड्यापासून फक्त एक वीतीवर गाडी होती. आणखी एक निमिषार्ध जाते तर आम्हा सर्वांचा पत्ताच बदलला असता. आम्ही बाबुभाईला हे काय नाटक झाले असे विचारले. तो मोठा धीराचा माणूस होता. जरा शॉर्टसर्कीट झाल्यामुळे भानगड झाली. असे म्हणून त्याने गाडी पुन्हा चालू केली.

गाडी चालू होताच शॉर्ट सरकीटमुळे होऊ घातलेला प्रसंग आम्ही विसरलो. बाबुभाईही म्हणू लागला की या वेगाने गाडी चालली तर उद्या सकाळी दहाला बेळगांव

गांठू बेळगांव आमच्या परिचयाचे होते तेथल्या एका उडूपी हॉटेलांत मागे आम्ही उपमा आणि डोशे यथेच्छ ढोसले होते. ते डोशे आमच्या डोळ्यापुढे तरंगू लागले.

इतक्यात 'छो' असा आवाज झाला. आणि शिवराम बसला होता ती बाजू चांगली अर्धा फूट खाली दबली परमात्मा आम्हाला बचावून जरा कुठे हुश म्हणत पंख्याने वारा घेत बसला असेल इतक्यात पुन्हा त्याचा धावा करण्याची वेळ आली. गाडीचे मागचे चाक पंक्चर झाले होते. तरी पण बाबुभाई म्हणाला, 'पांच मिनिटमें दुसरा टायर बिठाऊंगा.'

महंमदने जॅक बाहेर काढला. गाडीखाली उताणे पडून त्याने तो नीट लावला. पण आटे फिरत नव्हते. जॅक बहुधा दिवसपाळीवाला होता. अंधाऱ्या रात्री काम करण्याची त्याला सवय नव्हती. सुमारे अर्धा तास झाला तरी गाडी सूतभरही वर उठेना. शेवटी उसनवारी करून दुसऱ्या गाडीवाल्याकडून जॅक आणून दुसरा टायर बसवला. गाडी कशीबशी शिळ फाट्यावर आली.

शीळ फाट्यापाशी येईपर्यंतच उठवणीला आलेली ही गाडी पुढे खंडाळ्याच्या घाटातून कशी पार पडणार ह्या चिंतेत आम्ही होतो. घाटात गाडीला उर्ध्व लागला. घाट पुरा होण्यापूर्वीच ती अगदी निपचित पडली. तिचा जड देह आम्ही खंडाळ्यात फ्रॅन्सीसच्या वर्कशॉपपाशी नेण्याची व्यवस्था केली. फ्रॅन्सीसने गाडी तपासून पाहून काही भाग मुंबईहून आणल्याशिवाय हे आवजार येथून हालणे नाही. असे आपले मत दिले. गाडीचा आम्हाला पुरता वीट आला होता. पाण्यातल्या म्हशीचे सारे करावे तशा प्रकारे काहीही तपास न करता गाडी ठरवली आणि नुसत्या भपक्याला भुलले घारूअण्णा म्हणाला, मोटारीचे बाबतीतही कुळेविण कन्या वरी तो एक मूर्ख हीच परिस्थिती आहे.

एवढे होऊनही बाबुभाई तुम्हाला म्हैसूरला मी नेईन असे बडबडू लागला तेव्हा आम्ही त्याला सांगितले 'तुझी गाडी तू भले दुरुस्त कर नाही तर तिचा मोरावळा घाल. आम्हाला गाडीशी आता काही कर्तव्य नाही.'

गाडीचा बेंडबाजा वाजला तेव्हा म्हैसूरला जाणे आता घडत नाही असे वाटून आम्ही खट्टू झालो. केपा म्हणाला, आता आपण सर्वजण यात्रेचा ग्रंथ आटोपून ठाण्यास जावू या. म्हैसूरच्या यात्रेसाठी मोठ्या दिमाखाने निघालेले शेर्पा तेनसिंग आम्ही. आम्हाला दीनमुख घेऊन पुन्हा ठाण्यास जाणे कमीपणाचे वाटू लागले. एकदा पुढे टाकलेले हे पाऊल आता माघारी घेणार नाही असा आम्ही निश्चय केला.

पुण्यास जाऊन अखेरीस आम्ही गोल सफरीची तिकिटे खरेदी केली गोल सफरीचा मार्ग पुणे ते सिकंदराबाद, तेथून मद्रास, बंगलोर व म्हैसूर व पुन्हा पुणे

असा होता. हा प्रवास एकूण दोन हजार मैलाचा असून त्यासाठी आम्हाला दहा दिवसच देता येणार होते. घाई होणार हे उघडच होते. पण 'अकरणात क्षिप्रे करणं श्रेयः' या नात्याने तो मार्ग आम्ही स्विकारला.

पुण्याहून कुर्डुवाडीवरून सिकंदराबादेस जाणे अगदी सरळ पडले असते. पण चौकशीकरता गोल सफरीच्या तिकिटात हा सरळ मार्ग बसणार नाही असे आम्हाला माहितगार लोकांनी सांगितले म्हणून पुण्याहून दौंड, दौंडाहून मनमाड व पुढे सिकंदराबाद असा द्राविडी मार्ग आम्हास पत्करावा लागला.

गाडीत गर्दी पहाण्याची संवय पुणे–मुंबई प्रवास करणारांना आहे. पण पुणे मनमाड व पुढे मनमाड सिकंदराबाद या प्रवासात गाडीत बेसुमार गर्दी होती. डब्यातली बसण्याची जागा भरून दरवाज्यापर्यंत माणसे एकमेकास रेटीत उभी होती. पुढे पुढे गाडीच्या दरवाज्यातून उतरणे व चढणे मुष्कील होत चालले. चढण्या–उसरण्याचा व्यवहार खिडक्यावाटेच होऊ लागला.

या वेळी गर्दीत भर पडली होती लग्नाच्या वऱ्हाडांची. वऱ्हाडांत बाया, बापे, मुले व बोजे असत. लग्नात उडाली नसेल इतकी तारांबळ वऱ्हाडी मंडळींची गाडीत चढतांना उडत असे. दौंडला असेच एक भले मोठे वऱ्हाड गाडीत चढले वऱ्हाडांतील काही माणसे डब्याच्या काही भागात आणि बाकीची दुसऱ्यांत अशी ताटातूट झाली होती. डब्याच्या एका भागातून दुसऱ्या भागात जाणे अशक्य होते. गर्दीमुळे इकडचे तिकडे दिसत पण नव्हते. आमच्या इकडे जी मंडळी आली त्यांनी आपली सर्व माणसे आली की नाही हे पाहाण्याकरता पुकारे सुरू केले.

"पोपट आलाय का तकड पोपट ?" दुसऱ्या भागातून उत्तर आले "आलाया आलाया" पुन्हा त्यानी तिकडून हाकारी केली.

'झुंबरी कुनीकडं हाय, झुंबरी ?' पोपट व झुंबरीचां तपास लागला तेव्हा वऱ्हाडी मंडळीचा जीव शांत झाला.

एवढ्या विलक्षण गर्दीतही ह्या आगगाड्यांतून एक अजब प्राणी आम्हास वारंवार पाहण्यास मिळत होता. मोठ्या शितफिने गर्दीतून वाट काढीत हा प्राणी संथ पणे डब्याच्या मधोमध येऊन प्रथम मुकाट्याने उभा रहात असे. त्याला कोणी अडवू लागल्यास तो खुणेनेच आपणाला बसायचे नाही असे सांगे. गाडी चालू होताच हलकेच आपल्या खांद्यावर लटकलेल्या थैलीतून बाम, नाहीतर एखादे चूर्ण, सुरमा दंतमंजन बाहेर काढून वक्तृत्वपूर्ण भाषेत त्या वस्तूंची तो जाहीरात करीत असे. नुसते बोलूनच न थांबता बाम प्रत्येक ऊतारुच्या डोक्याला दरदरुन चोळीत असे. अथवा सुरमा डोळ्यात

भरी. त्याच्या वक्तृत्वाच्या प्रभावामुळे बाम डोक्याला चोळू नको असे सांगण्यास कोणी सहसा धजावत नसे. पुढे या वस्तू बाजारात घेतल्यास महाग पडतील, पण माझ्याकडून घेतल्यास फक्त निम्या किंमतीत मी त्या तुम्हास देईन. असा तो बहाणा करी. त्याबरोबर कैक लोक बाम, सुरमा, दंतमंजन विकत घेत. पसाभर आणल्या गोळा करून हा माणूस आपले प्रयोग दुसरीकडे करण्यास जाई.

आम्ही स्वतःस कितीही हुषार मानीत असलो तरी शेवटी उतारुच! आम्हांलाही या प्राण्याच्या वक्तृत्वाची भूरळ पडून आम्ही सुरमा दंतमंजनादी वस्तू विकत घेतल्या. सुरमेवाल्याकडून डोळ्यात सुरमा भरण्यांचे कसबही महादेव आणि नारायण यांनी उचलले. आमचा सुरमा म्हैसूर पर्यंत आम्हास पुरला. प्रत्येक दिवशी महादेव दोन दोन वेळा लोणच्यांच्या फोडीत मसाला भरतात तसा तो भरीत असे. सुरम्याने डोळे साफ होत की बिघडत ते नक्की सांगता येणार नाही. पण खूप पाणी डोळ्यावाटे निघे. व क्षणभर जरा थंड वाटे एवढे मात्र खरे.

आम्ही सिकंदराबादला उतरलो तेव्हा सकाळचे ८–३० वाजले होते. सिकंदराबादला जाण्यापूर्वी आम्ही तात्यांना तार पाठवून स्टेशनवर येण्याबद्दल कळविले होते. सर्वजण तात्या कुठे दिसतात की काय ते पहात होतो. तात्या आले नव्हते. तेव्हा आम्हास तात्यांच्या कारखान्याचा पत्ता माहीत होता. त्या ठिकाणी फोन करून तात्यांस बोलावले तात्या फोनवर येऊन आपल्या खड्या व करड्या सुरात शिवरामजवळ बोलू लागले. कोण कोण आले आहेत ही चौकशी करून त्यांनी आम्हाला घरचा पत्ता सांगितला. शेवटी थट्टेत तात्या म्हणाले 'शिवराम येतांना एखादा स्वयंपाकी आण. इथे जेवण बनवायला लागेल' आमचे स्वयंपाक कलेत निष्णात असलेले वासुकाका आणि नारायण हे होते. शिवाय तात्या भेटल्यावर आम्ही नुसत्या आमटी भातावर राजी होणार होतो.

सिकंदराबाद शहर हे सर्व सुखसोईनी आणि आधुनिक वाहनांनी युक्त असे दिसले. मुंबई थाटाच्या बसेस वक्तशीर शहरात येरझारा करीत होत्या. शहरातील रस्ते सिमेंटचे अथवा डांबरी होते. निजाम सरकारने या शहरात सर्व प्रकारे अधुनिकता आणण्याच्या प्रयत्नात कसूर केली नव्हती. आमच्या बसचा कंडक्टर शुभ्र कपडे परिधान केलेला असून इंग्लीश चांगले बोलत होता. तात्याचे हैदराबाद व सिकंदराबाद किती दूर आहे कुणास ठाऊक असे म्हणतो तो तात्याच दिसले. तात्या म्हणाले 'सिकंदराबादच्या व हैदराबादच्या सीमा एकमेकांत विलीन झाल्या आहेत.' तात्याचे घरी आल्यावर आम्ही स्नाने उरकून घेतली. कपड्यांना पाणी दाखवले. आम्ही स्नानादी कामे उरकून येतो तो तात्यांचा स्वयंपाक सिद्ध होता. जेवणाचेवेळी आम्ही तात्यांना सांगितले. तात्या 'अनंताचे लग्न आहे ३० तारखेला' तात्यांनी शामला एक उदबत्ती अनंताचे पानापुढे लावण्यास सांगितली. शामने श्लोक म्हणून रघुनायकाची प्रार्थना केली.

"उपेक्षु नको गुणवंता अनंता।
रघुनायका मागणे हेची आता।"

भोजनोत्तर हैदराबादेतील सुप्रसिद्ध सालारजंग पदार्थ संग्राहालय पाहण्यासाठी रिक्षे ठरवले. येथील वाहनात अन्य गोष्टींचा भरणा फार. रिक्षात दोन माणसे जेमतेम बसत. रिक्षांत शिवराम अगोदर बसल्यामुळे आतली सर्व जागा भरली. गवसणीत घातलेला तंबोरा खुंटीला अडकवून ठेवतात तसा रिक्षाच्या टपाला हात धरून जवळ जवळ अधांतरी बसलो होतो. सालारजंग पदार्थ संग्रहालयापर्यंत सायकल रिक्षावाल्यास घाम फुटला होता. शिवराम माणसाने माणसाला वाहून नेण्याच्या अमानुष पद्धतीचा रिक्षांतून निषेध करीत होता. ही माणसाने ओढण्याची वाहने कायद्याने बंद पाडली पाहिजेत असे त्याचे म्हणणे होते. जोपर्यंत ती वाहने आहेत तोपर्यंत मात्र आमच्या सारख्यांना नाईलाजाने त्यात बसावे लागते असा त्याच्या प्रतिपादनाचा सारांश होता.

सालारजंग पदार्थ संग्रहालय हा एक अजबखाना आहे. इमारत काही फारशी मोठी नाही. चार पांच इमारतीतील सुमारे पाऊणशे दालनांतून हे संग्रहालय मांडलेले आहे. सालरजंग हे निजामाचे माजी दिवाण. कोट्यावधी रुपये खर्चून हे पृथ्वीमोलाचे संग्रहालय त्यांनी संग्रहीत केले. यात असलेल्या सर्वच पदार्थांची यादी देणे शक्यच नाही. चीनी, जपानी, ब्रह्मी हस्तकौशल्याच्या वस्तूंचे उत्कृष्ट नमुने येथे आहेत जगप्रसिद्ध चित्रकारांच्या चित्रांचे हुबेहूब नमुने येथे पाहण्यास सांपडतात. संगमरवरी पुतळ्यांचे अद्वितीय नमुने येथे ठेवले आहेत. निजामाच्या रंगमहालातील श्रीमंती वस्तूंचा संग्रह येथे आहे. टिपू सुलतानांच्या चार हस्तिदती खुर्च्या विलायतेहून येथे आणविण्यास चव्वेचाळीस सहस्र रुपये खर्ची पडले असे सांगण्यात आले. ज्यात सोन्याचे तंतू गुंफलेले आहेत. असे अप्रतिम नक्षीकाम असलेले गालीचे येथे आहेत. या गालीच्यांची किंमत काय अशी घारूआण्णाने सहज चौकशी केली गालीच्यांच्या जोडीची किंमत एक लक्ष रुपये असे सांगताच आमच्या डोळ्यापुढे अंधेरी आली. येथील घड्याळेश्वराचे कौतुक पाहाण्यास माणसे सारखी लोटत असतात त्यात एक बाहुले दर सेकंदागणीक ठोके मारीत होते. दुसरे बाहुले एक तास संपताच दरवाजा उघडून बाहेर येई व तासाचे ठोके मारून पुन्हा आत जावून दरवाजा बंद करून घेई. गालीच्याच्या किंमतीची धडकी भरली असल्यामुळे या घड्याळाच्या किंमतीची चौकशी करण्याची पंचाईत आम्ही केली नाही.

नंतर चार मिनार, निजामांचे कार्यालय इत्यादी पाहून परत तात्यांचे बिऱ्हाडी गेलो. पुन्हा तात्यांनी चहा, कॉफी, चपात्या तयार ठेवल्या होत्या. कोणी एकदा तर कोणी दोनदा नको नको म्हणत सर्व पदार्थ संपवले. आठ वाजण्याच्या सुमारास मद्रासला जाण्यास निघण्यापुर्वी श्री. तात्या, सौ. वहीनी आणि बालगोपाळ मंडळींचा आम्ही निरोप घेतला.

सिकंदराबादेहून मद्रासला जायला दोन टप्पे घ्यावे लागतात पहिला द्रोणाचलम् व दुसरा गुंटकल. गुंटकल येथे आमच्या परिचयाची मद्रास एक्स्प्रेस आम्हाला मिळाली. ती मद्रास येथे ठीक आठ वाजता गेली. मद्रासला उतरताच मद्रास स्टेशन चांगले की आपले बोरीबंदर हा विचार मनात आल्यावाचून राहिला नाही. मद्रास स्टेशनची इमारत मुंबईच्या रेल्वेच्या इमारतीप्रमाणे भव्य असून या स्टेशनात जाणाऱ्या येणाऱ्या गाड्यांची व उतारूंची मुंबईप्रमाणेच धांदल होती.

वाहतुकीची साधने येथे होती. पण ती इतकी व्यवस्थित नव्हती. टॅक्सी विपुल नव्हत्या. मुंबईच्या व्हिक्टोरियासारखे सर्वांस पेलण्यासारखे व पुन्हा आरामशीर असे वाहन दिसले नाही. व्हिक्टोरियाऐवजी येथे बेढब आणि कुरुप अशी वाहने होती. त्या घोड्याच्या वाहनाचे नांव होते 'झटका' त्यात मोठ्या दाटीवाटीने चार माणसे बसत. झटक्यात बसायला बांबूची चौकट व त्यावर गोणपाट अंथरले होते. झटकेवाल्यांना गणवेषाचे काहीच बंधन नव्हते. आमच्या झटक्यावाल्याचे नांव होते व्याघ्रांबरम्. इतर झटकेवालेही दिगंबरम् आणि चिदंबरम् दिसले.

व्याघ्रांबरम्चा वर्ण काळ्या वाघाप्रमाणे काळारोम होता. त्याचे घोडे धास्तीमुळे बरेच खंगलेले दिसत होते. मोठ्या कष्टाने ते तिरपी पावले टाकीत चालत होते. तरी पण व्याघ्रांबर ते मोठे नामी घोडे आहेत असे खुणेने आम्हास सांगत होता. त्याने अंगात नेहरू शर्ट घातला होता. त्याच्या डोक्यावर केसांचे दण्डकारण्य माजले होते. एक मळकी गांधी टोपी त्या केसांना आपल्या काबूत ठेवण्याचा आटोकाट प्रयत्न करीत होती. आम्हाला दासप्रकाशम हॉटेलपाशी जायचे आहे व आम्ही बारा आणे भाडे देणार आहोत हे त्याला समजावून सांगायला आम्हाला फार मेहनत पडली. झटक्यात आम्ही अवघडून गेलो होतो. शेवटी दासप्रकाशम् हॉटेल आले आणि आमची झटक्याच्या बंदीवासातून सुटका झाली.

मद्रासला गेल्यावर पहावयाच्या ठिकाणात अड्यार येथील दिऑसॉफिकल सोसायटीचे आश्रमस्थानास पहिला क्रमांक दिला होता. हे नितांत रम्य व शांत आश्रमस्थान एका उपवनात वसविले आहे. उपवनाच्या ठिकाणचा घेर सुमारे १॥ ते २ मैल होईल. पूर्वसिंधूच्या तीरावर हे उपवन असल्यामुळे सागरी वारे या ठिकाणी सारखे चवरी धरून असतात. आत जाताक्षणीच मोठे मांडवन लागते. सर्व ठिकाणी स्वच्छता आणि प्रसन्न वातावरण आहे आश्रमस्थानात नेमक्या ५–६ इमारती आहेत. येथल्या ग्रंथालयात आम्ही सहज शिरलो. तेथील कर्मचाऱ्याने आम्हांस जे कृष्णमूर्तींच्या ग्रंथाविषयी माहिती सांगितली. हे ग्रंथालय भारतातील एक प्रमुख ग्रंथालय मानले जाते. अशी माहिती मला राजाभाऊकडून समजली. तपाचरणाला योग्य असे हे स्थान मला दिसले. या तपोवनाचे मध्यभागी या तपोवनाचा अनभिषिक्त राजा शोभेल असा पुराण

आणि जटील वटवृक्ष आहे. चाळीस सहस्र चौरस फुटाच्या सहज सिंहासनावर विराजमान होऊन आज अनेक शतके तो राज्य करीत आहे. या वृक्षराजाच्या शेजारी बसून आम्ही आमचे एक छायाचित्र काढविले; व वृक्षराजास अभिवादन करून हे आश्रमस्थान आम्ही सोडले.

आपा माधव हल्ली मद्रासला विमानाधिकारी असून तो येथेच जवळपास कुठेतरी राहतो हा शोध अनंताने लावला. सतत चार दिवसाच्या प्रवासाने आम्ही निपाणीच्या तंबाखूच्या व्यापाऱ्यासारखे कळकट दिसत होतो. आम्हाला वाटत होते की आमचा हा अवतार पाहूनच माधवचा बबरजी बाहेरच्या बाहेर हाकलून लावील काहीही झाले तरी माधवच्या बिऱ्हाडापर्यंत जायचेच असे आम्ही ठरवले. फाटकाचे आंत मोठा अल्सेशियन किंवा ब्लडहाऊण्ड कुत्रा नाही असे पाहून आम्हाला धीर आला. चौकशी करता माधव बाहेर कुठे गेला नसून घरीच आहे असे समजले. इतक्यात माधव स्वतःच पुढे आला. नमस्कार चमत्कार होऊन गप्पा गोष्टीस प्रारंभ झाला. गप्पा गोष्टीस प्रोत्साहन मिळण्याकरिता चहा शिरा व लिंबाचे सरबत असे पदार्थ सिद्ध होते. दोन तास झाले तरी गप्पा चालू होत्याच. शेवटी आम्ही मद्रास शहर पहाण्यासाठी जातो असे सांगून माधवकडून निघालो. त्यावेळी माधव व सौ. वहीनी यांनी भोजनाचे अगदी अगत्यपूर्वक निमंत्रण केले. त्या निमंत्रणाला नकार देण्याची सोयच नव्हती. संध्याकाळी भोजनास येतो असे सांगून आम्ही कपालेश्वर मंदिराकडे रोख फिरविला.

मद्रासला दोन मंदीरे विशेष प्रसिद्ध आहेत. एक कपालेश्वराचे आणि दुसरे पार्थसारथी मंदीर. कपालेश्वराचे आवार इकडील सर्व मंदिराप्रमाणे भव्य होते. मंदीराच्या गोपूरावर रामायण महाभारत व पुराणे यातील निरनिराळे प्रसंग कुशलतेने चितारले आहेत. शंकराच्या मंदिरात बिल्वदळांचा खच पडलेला असायचा. पण येथे असा प्रकार दिसला नाही. मंदीर आंतून बाहेरून निर्मळ व प्रसन्न होते. देवळाचे पुजारी पुरुषसूक्त म्हणत देवमूर्तीचे अभ्यंग आटोपीत होते. देवळाच्या थाटमाटावरून हा कपालेश्वर बराच धनाढ्य असावा असे दिसले. देवळाचे बाहेर भिकाऱ्यांचा सुळसुळाट होता. मंदिराचे समोर एक मोठा तलाव बांधून काढलेला आहे. पार्थसारथी मंदिर जवळ नव्हते म्हणून मद्रास बीच पाहण्यासाठी बसमध्ये बसले.

मद्रास बीच पाहण्याची खरी वेळ सकाळी अथवा संध्याकाळी. इतका मोठा म्हणजे सुमारे पांच मैल लांब व पाव मैल रुंद शुभ्र वालुकामय बीच दुसरीकडे नाही. चौपाटीवर मी शंभर वेळा गेलो असेन; ह्या बीचवर भेळपुरी पकोडीचे कागद न दिसल्यामुळे मला कसेसेच वाटले. पूर्व सागराच्या लाटा धुंदपणे किनाऱ्यावर आदळत होत्या. आम्ही डुंबण्याचा मोह वेळेच्या अभावी टाळला. या बीचच्या बाजूने मरीनड्राईव्हसारखा एक प्रशस्त हमरस्ता जातो. त्या रस्त्यावर प्रेसिडेन्सी कॉलेज,

हायकोर्ट इमारत इत्यादी मद्रासच्या प्रमुख इमारती आहेत. जवळच मरीन स्विमींग पूल ' नावाचे जलाशय आहे. या ऐटबाज जलाशयाचेही नुसते दर्शन घेणेच शक्य होते. नेमके त्याच दिवशी ते बंद होते.

मद्रासच्या झूलॉजिकल गार्डन्समधील आमची ' सोयरी वनचरे ' आम्ही पाहात असतांच माधवकडे जाण्याची वेळ झाली. तिकडे जातो तो माधवच्या मोठ्या हॉलमध्ये केळीची पाने मांडली होती केळीच्या पानाच्या मध्यभागी चांदीचे ताट व वाटी होती. अनंताच्या कुंडलित राजयोग असावा. मद्रासला जायचे आमच्या ध्यानीमनी सुद्धा नव्हते. अड्यारचे जवळपास तो रहात असेल हीही प्रथम आम्हाला कल्पना नव्हती. आणि आज एकदम केळवणचा बेत ! ह्याला राजयोगावांचून दुसरे काय म्हणणार ? केळवणाची ही पंगत स्वतः माधव आणि त्याची सुविद्य व पदवीधर पत्नी यांनी वाढली. केळीच्या पानावर दोन भाज्या, वरणभात, दुसरा मद्रासी पद्धतीचा भात, घडीच्या पोळ्या, अननसाचा मुरंबा, चटणी कोशिंबीर इत्यादी पदार्थांची झावबाच्या वाडीतील इमारती-प्रमाणे गचडी झाली होती. आम्हाला गर्दी होती तरी आम्ही कशाचाही अनमान केला नाही. भोजनोत्तर तांबुलादी पदार्थाचे सेवन करून आम्ही श्री. माधवराव आणि सौ. वहीनी यांस धन्यवाद देऊन मद्रास स्टेशन गाठले.

आमच्या धावत्या यात्रेचा चित्रपट दर दिवशी पालटत होता समुद्रसपाटीवरच्या मद्रासमधून निघून आम्ही आतां पूर्वघाट आणि निलगिरीच्या कुशीत बसलेल्या म्हैसूरकडे निघालो होतो बंगलोर स्टेशन आले. तेव्हा उजाडले होते. आम्ही येण्यापूर्वी चार दोन दिवस बंगलोरमध्ये पाऊस पडत असल्याने मुळचेच थंड बंगलोर, शहर अधिकच आल्हाददायक वाटत होते. बंगळूर हे शिवाजी महारांजांचे बंधू व्यंकोजीराजे भोसले यांच्या जहागिरीपैकी गांव. त्या गांवाची तंजावरहून उस्तवारी होईना म्हणून त्यांच्या वंशजांनी १८०७ साली वाडियार राजघराण्याला ते विकले हा इतिहास समजतांच आमचे बंगलोर विषयींचे प्रेम वृद्धिंगत झाले.

बंगलोरला गेल्यावर प्रथम नंदीकिशोराचे मंदीर आम्ही पाहिले. येथील अजस्र नंदी पाहून कौपिनेश्वराच्या नंदीबद्दल आम्हाला जो अभिमान होता तो गळून पडला. कौपिनेश्वराच्या नंदीचा आजोबा शोभेल एवढा हा नंदी मोठा होता. शंकरा-पासून नंदीं विभक्त होऊन त्याने बंगळूरात स्वतंत्र बिऱ्हाड केले असे दिसते. कारण शंकराची मूर्ती येथे नव्हती. चामुंडेला जाताना वाटेत या नंदीहूनही प्रचंड नंदी आहे. तेथेही शंकराची मूर्ती नाही. नंदीचे देवळानंतर आम्ही लालबाग पाहाण्यास गेलो.

लालबाग ही प्रथम हैदरने तयार केली. लालबागेचे आवार सुमारे १५० एकर आहे आज करमणूकीचे ठिकाण म्हणूनच या बागेचा प्रामुख्याने उपयोग होत आहे.

तरीही वनस्पती शास्त्राच्या विद्यार्थ्यांनाही ह्याचा उपयोग होतो. प्रि. माटे यांनी बंगलोरची लालबाग ही काश्मीर मधील बागांहूनही अधिक मनोहर असल्याची ग्वाही दिली आहे. या बागेत वड पिंपळ प्लक्ष चंपक कंदब शिरीष गुलमोहर व हिमालयांतील कॉनी फेरस जातीचे गगनचुंबी वृक्ष आहेत. जागोजाग पुष्करणी असून त्यातील पांढरी तांबडी कमळपुष्पे आपल्या स्वाभिमानी सौदर्याने प्रेक्षकांचे मन वेधीत होती. छाया वृक्षाचे खाली बसण्यासाठी शिलापट्ट तयार करण्यात आले आहेत. लाल बागेच्या शोभेत भर घालणारी एक चीज येथे आहे. ती म्हणजे बागेच्या मध्यभागी असलेले बिलोरी कांचेचे घर. या बिलोरी गृहात पांच हजार माणसे सहज मावू शकतील! भर दुपारीही उन्हाचा कवडसाही आत येणे शक्य नाही. या काच गृहांस पुन्हा पुन्हा प्रदक्षिणा घालत रहावेसे वाटते. मुंबईच्या लालबागेचे फसवे नांव बदलून त्या भागाला दुसरे काहीतरी नांव द्यावे अशी कल्पना माझ्या मनांत ही बाग पाहतांना दहा वेळा तरी आली.

बंगलोरचे कब्बन पार्क व पदार्थ संग्रहालय झरझर पाहून आमच्या यात्रेतले अखेरचे ठिकाण म्हणजे म्हैसूरकडे आमचा मोर्चा आम्ही वळविला. म्हैसूर नगरीत प्रवेश करताच जवळच्या एका टेकडीवर असलेले चामुंडा देवीचे मंदीर व तेथील राजेंद्रविलास राजवाडा ही प्रवाशांत जणू हाका मारू लागतात.

पर्वतीचे सुमारे तिप्पट उंच हे मंदिर आहे. वर जाण्यास ११०० पायऱ्या आहेत. आम्हापैकी कोणालाच चार दोन मजल्यापेक्षा अधिक उंचीवर चढण्याची संवय नसल्यामुळे वर पोचेपर्यंत आम्ही अनेकदा बैठक मारली छातीचा भाता लोहाराच्या भात्या प्रमाणे वाजत होता. राम, दत्तू वातुकाका हे बरेच मागे होते. पण ते ही आमच्या पाठोपाठ वर आले. चामुडा ही राज घराण्याची कुलस्वामीनी. तिच्या योग्य तो इतमाम राजाने ठेवला आहे. थोड्या अधिक उंचीवर राजेंद्रविलास राजवाडा आहे.

हा पाहण्यासाठी तेथल्या रखवालदारांपाशी आम्ही रदबदली केली. हा तुम्हाला म्हणून मी दाखवणार आहे पण याचा कुठे बभ्रा होता नये असे भासवण्याचे बेमालूम नाटक त्याने केले. राजवाडा दाखवत असताही तो अगदी तोंडावर हात धरून राहिला असून आम्हालाही सर्व कांही पहा पण तोंडातून शब्द बाहेर काढू नका असे खुणावीत होता. राज घराण्यातील निरनिराळे आरसे महाल, दिवाणखाने, मौल्यवान वस्तू यांचा थाट अवर्णनीय होता तेथे दोन मोठाल्या दुर्बीणी ठेवलेल्या दिसत होत्या. त्यातून सर्व म्हैसूर शहर अगदी स्पष्ट दिसते असे कोणी तरी म्हणत होते. परंतु दुर्बिणीतून म्हैसूर पाहण्याचा विचार रखवालदाराच्या नाटकामुळे आम्ही सोडून दिला. आम्ही मनात म्हटले की, आमच्याकरिता ह्या बिचाऱ्याची नोकरी जायला नको. हल्ली नोकऱ्या आहेत कोठे ? राजवाड्यातून परत फिरतांना आम्ही पाहातो तो दुसऱ्या लोकांचा

तांडा उभाच होता त्यांच्याशीही रखवालदार मुकाट्यानेच व्यवहार करीत होता. रखवालदाराचे हे मूकनायक नाटकाचे प्रयोग सारखेच चालू असल्याची आमची खात्री झाली

संध्याकाळी यात्रेच्या कळसाध्यायास प्रारंभ झाला. कृष्णराजसागर धरण आणि वृन्दावन बाग पाहण्याकरिता आगगाडीने नऊ मैलाचा प्रवास करावा लागतो. कृष्णराज सागर धरणाची योजना भारतविख्यात इंजिनियर श्री. विश्वेश्वर अय्या यांनी तयार केली. कावेरी, हेमावती आणि लक्ष्मणतीर्थ नदी या तीन नद्यांच्या संगमावर हे धरण बांधले गेले आहे. एखाद्या प्रेमळ मातेने आपल्या वत्साला स्तन्य द्यावे त्याप्रमाणे हे अवाढव्य धरण म्हैसूर राज्यास जीवन पुरवीत आहे. या धरणाची लांबी दीड मैल असून त्याची उंची सुमारे १२० फूट आहे. पायथ्याशी रुंदी ११४ फूट असून माथ्यावर पंधरा फूट आहे. ऐन उन्हाळ्यातही समुद्राप्रमाणे पसरलेल्या ह्या जलसमूहाला ' कृष्णराज सागर ' हे नांव अगदी यथार्थ वाटते.

कृष्णराज सागर धरणाच्या उतारावर जगांतील एक अलौकीक वास्तू आहे. ' वृन्दावन बाग ' हे तिचे नांव. या बागेचे वर्णन करण्याचा मी प्रयत्न करणार नाही. कारण तो प्रत्यक्ष पाहण्यातच खरी मौज आहे. बंधाऱ्यांनी अडवलेले पाणी निरनिराळ्या थरांतून खेळवून थुईथुई उडणारी कारंजी तेथे निर्माण करण्यात आली आहेत. या कारंज्यातून उडणाऱ्या फवाऱ्यांतून बहुरंगी रोषणाई पसरून देऊन बागेला अद्भूत शोभा आणली आहे. प्रत्यक्ष सदेह स्वर्गात न जाता स्वर्गातल्या काही सुखाची आणि भोगाची कल्पना देण्यास ही बाग समर्थ आहे. स्वर्गातील देवांविषयी तुकाराम महाराजांचे एक वचन आहे.

स्वर्गीचे अमर इच्छिताती देवा
मृत्यू लोकी जन्म व्हावा आम्हा ॥

अमरावतीतील देव परमेश्वरापाशी वृन्दावन बाग पाहण्यासाठी आम्हाला मृत्यूलोकी पाठव असे म्हणत असल्यास वावगे वाटण्यासारखे काही नाही.

वृन्दावन उद्याना सारखे देवदुर्लभ पाहील्या बरोबर समाधानाने आमच्या वृत्तीचा कबजा घेतला. त्यानंतर काही पाहीजे म्हणजे म्हणजे अमृत प्राशनानंतर मुंबादेवीच्या गुजराथी भटाचा अमृततुल्य चहा पिण्याची वांछा धरण्याच्या प्रकारा सारखे होणार होते.

म्हैसूरहून आही थेट घरचा रस्ता सुधारला.

● ● ●

# गड सासवडची सहल

'चला भूर जावूया ' असे म्हणताच पोरे हौसावून भराभर घराबाहेर पडतात. तसेच आम्ही आमच्या रथांत आरूढ झालो. पेट्रोल पिऊन संतुष्ट झालेला आमचा अग्निरथ भुरभुर धावू लागताच आमच्या वासंतिक सहलीच्या उपक्रमाला प्रारंभ होऊन आज सात वर्षे पूर्ण झाली हा आल्हाददायक विचार मतलबीच्या मंद झुळके बरोबर आमच्या मनांत येऊन दाखल झाला. १९५२ च्या मे महिन्यांत आम्ही रायगड प्रतापगडची पहिली सहल काढली तेव्हापासून सहलीचा हा क्रम सतत सात वर्षे चालू आहे. तसे पाहीले तर सात वर्षे हा फार मोठा अवधी नाही. पण सात वर्षांत रजेच्या भानगडी बदल्या, दुखणी, खुपणी अशी छपन्न विघ्ने उपस्थित होऊन वासंतिक सहलीची वास्तविक वासलात लागलेली असायची हे झाले नाही हे एक आश्चर्यच मानावे लागते. कधी मोठी तर कधी या वर्षीच्या सारखी छोटी पण सहलीवांचून वर्ष घालवले असे झालेले नाही.

किरकोळ अडचणीमुळे सहलीच्या कार्यक्रमात आम्ही फेरफार केलेला आहे. पण सहलीत खंड पाडलेला नाही. यंदाची सज्जन गड सासवडची सहल आयत्यावेळीच ठरली. पहिला सहलीचा बेत आम्ही पायघोळ आखला होता. सौराष्ट्राकडे जावून श्रीकृष्णाची द्वारका, सोमनाथचे ज्योतिर्लिंग, कांडला, ओखा, ही नवी बन्दरे, जामनगर, राजकोट ही शहरे आणि गिरनारचे डोंगरहि ( दुरून का होईना ) पाहावे असा विचार होता. सौराष्ट्रात प्रत्यक्ष जाण्यापूर्वीच साऱ्या गावांत आमच्या सहलीच्या गर्जना आम्ही उठवून राहिलो होतो. पण सहलीचे हे बेतबात बसवितांना आमच्या सहलीची तीथ आणि शिवरामपंतांच्या चंदरच्या लग्नाची तीथ अगदी धांदात एकाच दिवशी पडत आहे हा संशय देखील आम्हापैकी कोणाला आला नव्हता. ही गोष्ट आमच्या लक्षात येताच एक पेचप्रसंग आमच्या पुढे उभा राहीला की आधी सौराष्ट्राची सहल का आधी चंदरचे लगीन ! या कठीण समयी रघुराजाने आपला पोक्त सल्ला आम्हाला मोफत देऊन या पेचप्रसंगातून आमची सुटका केली.

रघुराजा म्हणाला, ' पुर्वी मराठ्यांच्या इतिहासांत तानाजी मालुसऱ्याने आधी लगीन कोंडाण्याचे, मागाहून रायबाचे असे ठरविले तरी आपणाला तशी चूक करण्याचे कांहीच कारण नाही. आधी चंदरच्या लग्नाचा बार उडवून देऊ आणि पुढे सावकाश जाऊ सौराष्ट्रात. "

सौराष्ट्राची सहल स्थगित होताच पुढे मागे दुसरी एकादी छोटीशी सहल काढता येईल काय हा विचार करीत होतो. गेल्या साली पुणे जिल्ह्यातले पुरंदर, भोर हे तालुके आम्हाला पाहता आले नव्हते. नकाशा काढून पाहता सासवडची सोपानदेवाची समाधी पुरंदरचा किल्ला, खंडोबाची सोन्याची जेजूरी, भाटघरचे निरेचे धरण अशी अनेक स्थळे आमच्या नजरेसमोर रांग करून उभी राहीली. त्यातच घारुआण्णाने सज्जन गडावर जाण्याचा ध्यासच धरला होता. सातारा जिल्ह्यांत एकदा शिरल्यावर कोयनेच्या धरणावर गेल्यावाचून कोण राहणार ? झाला नव्या सहलीचा आराखडा तयार आणि सुटली साऱ्या जणाना फर्माने.

आम्ही सासवडला जावून मुक्काम ठोकायचा असे ठरवले होते. सासवडला आम्ही पोचलो त्यावेळी रात्रीचे ११ वाजले असावेत. सासवडातील एखाद्या मंदीराच्या मोकळ्या सभामंडपात वसती करावी म्हणून आम्ही गाडी गांवांत घातली. ज्या रस्त्याने गाडी जाणार त्या रस्त्याच्या तोंडाशीच प्रवेश बंदीची पाटी लावली होती. पण त्या पाटीला न जुमनता आत शिरलो, पण गांवची कांहीच माहीती नसल्यामुळे मंदीराचा ठाव ठिकाणा मिळू शकला नाही. कुणाला विचारावे तर कुणी चिटपाखरूही जागे नव्हते. अपरात्री आणि परक्या गांवात फिरत राहण्यापेक्षा गांवाबाहेर मोकळ्या माळावर तळ ठोकणे बरे असे वाटले. गांवाबाहेर नांदुरकीचा एक छानदार वृक्ष होता. त्याच्या उदार आश्रयाखाली आम्ही तळ दिला. सासवडच्या हवेत चांगला गारठा होता. सासवडच्या थड हवेचा हेवा करीत असतांच आम्हाला झोप लागली.

सकाळी लवकर उठून आम्ही कऱ्हा नदीवर मुख प्रक्षाळणासाठी गेलो. कऱ्हेला बांध घालून तेथे पाणी अडवले होते. गांवचे गांवकरी आणि वाटेचे वाटसरु त्या ठिकाणी तोंड धुण्याकरितां आले होते. गुरळी सुद्धा वाया जाणार नाही अशी काळजी घेऊन त्यांचा तो कार्यक्रम चालू होता. त्या पाण्यांत व्यवहार करणे हे छातीचेच काम होते. देवाचे नांव घेऊन आम्ही शेवटी मुखमार्जनाला प्रारंभ केला.

सोपानदेवांची समाधी हे सासवडचे भूषण आहे. सासवडला तीर्थ क्षेत्राचे महात्म्य सोपान देवांच्या समाधीने प्राप्त करून दिले आहे. कऱ्हा आणि जांभळी या नद्या जिथे एकमेकीला भेटतात अशा संगमाच्या ठिकाणी ज्ञानियाच्या राजाच्या त्या लाडक्या सोपानाने, देह ठेवला. समाधीच्या पुढील अंगाला संगमेश्वराचे देवूळ आहे. समाधिच्या जागेची मांडणी आंळंदीच्या ज्ञानदेवांच्या समाधी सारखीच आहे. समाधी मंदीरासमोर मोठा प्रशस्त सभामंडप आहे. आम्ही समाधीच्या ठिकाणी गेलो. त्यावेळी काकड आरती नुकतीच आटपली होती. भाविक स्त्रिया पंढरीच्या रायाला आळवीत होत्या. सभामंडपात हातात वीणा घेऊन बाळु बुवा मुक्त कंठाने तुकाराम महाराजांचा अभंग म्हणत होते.

राहो आता हेचि ध्यान ।
डोळा मन लंपटो ॥
कोंडकोंडोनी धरीन जीवे ।
देहभावे पूजनी ॥

बुवांचा अभंग म्हणून होईपर्यंत आम्ही बसलो. शेवटी तिथल्या पद्धती प्रमाणे बाळु बुवांच्या पायांवर मस्तक ठेवून आम्ही सोपान देवांचा निरोप घेतला. सासवड हे इतिहास प्रसिद्ध ठिकाण ही आहे. पेशव्यांचे पुरंदर गडावर जाता येता, सासवडात मुक्काम होत असत. सासवडचा पुरंदऱ्यांचा वाडा आज बहुतेक मोडकळीला आलेला आहे. तरी तो एके काळी चांगला भव्य असला पाहिजे हे सहज दिसून येते. पूर्वी ह्या पुरंदऱ्यांच्या वाड्यांत राजकीय खलबते चालत असे म्हणतात. काळमहिमा असा आहे की आज याच पुरंदऱ्यांच्या वाड्यात तपकीरीचा कारखाना थाटलेला आहे. आम्ही वाड्यात गेलो त्यावेळी एक माणूस तंबाखू जमिनीवर खुशाल पायाने पसरीत होता. तपकिरिला आपल्या नासिकेत स्थान मिळण्यापूर्वी प्रथम अशी पाद्य पूजा करून घ्यावी लागते हा तपकिरी शोध आम्हाला सासवडला लागला.

सासवडला शंकरराव देवांचा आश्रम पाहण्यासारखा आहे असे आम्हाला समजले. गांवाच्या काठीशी बाहेर आश्रमाची स्वतंत्र अशी जागा आहे. आश्रमाच्या जागेच्या शेजारीच कस्तुरबा विद्यालयांत आम्ही प्रथम गेलो. या विद्यालयात आज कांहीतरी उत्सव होता कांही विद्यार्थिनी रंगावली घालण्यात चूर होत्या. कांही फुलांचे गजरे करण्यासाठी फुले वेचीत होत्या. विद्यालयाच्या बालक मंदीरात लहान लहान अर्भके खेळणी मांडून खेळत होती. त्यांच्या वर्गाच्या दाराशी आम्ही पोचतांच सारी बालसेन उभी राहून आम्हाला खडी ताजीम देती झाली. आमच्या घरी आम्ही आल्यावर कोणी उमे राहीले असली भलती पद्धत पडलेली नसल्यामुळे उभे राहून आमचा बालकांनी जो सत्कार केला त्यामुळे आम्ही फारच फुशारुन गेलो. आणि शिष्टपणे एकमेकांकडे पाहून घेतले. बालक मंदीरांतून आश्रमाकडे वळलो देवांच्या आश्रमांत देव नव्हते. कुठे बाहेर गांवी गेले होते. प्रेमाबाई होत्या. परंतु त्या सायंकाळी ४ ते ६ या वेळातच भेटू शकतील असे कळले. त्यामुळे आश्रम पाहणे राहिले. देवाच्या आश्रमाचे दर्शन एवढे देवदुर्लभ असेल अशी कल्पना आम्हास नव्हती बाकी राजकारणांत पडलेल्या ऋषीमुनींच्या आश्रमांला राजकारणाचा वाण नाही पण गुण लागायचाच.

सासवडहून पुरंदर किल्ला सुमारे ६ मैल नैऋत्य दिशेला आहे. पुरंदरला जायला निघालो तेव्हा दिवस बराच वर आला होता. सवाई माधवराव पेशव्यांचा जन्म ह्या किल्ल्यात झाला. पुरंदर हा गड डोंगरी असून किल्ल्याचा पसारा फार मोठा आहे.

किल्ल्याच्या पायथ्याशी गाडी उभी करून किल्ला जणू सर करण्यासाठी आम्ही सिद्ध झालो. आमच्या मामांची काहीच हालचाल दिसेना. बाबुरावही स्वस्थच होते मामांचे म्हणणे असे पडले की किल्ला कांही मोगलांच्या ताब्यात नाही तेव्हा अगदी वर चढून पुन्हा तो सर करावयाची मुळीच आवश्यकता नाही. खालून दिसतो तेवढा पुरे. मामांची ही नामी मसलत न मानता आम्ही किल्ला चढून गेलो. किल्ल्याच्या शिखरावर शंकराचे मंदीर आहे. शिखरावरून आजुबाजूच्या २५ मैलांचा टापू स्पष्ट दिसतो. टेहेळणीसाठी या गडाचा पुष्कळच उपयोग इतिहास काळी झाला असावा. गेल्या महायुद्धांत या पुरंदर गडाला लष्करी तळाचे महत्व प्राप्त झाले होते. त्यावेळी बांधलेल्या सुमारे पन्नास इमारती आज ओसाड पडून आहेत. पुराण वस्तू संरक्षण खात्याची मेहेरनजर या किल्ल्यापर्यंत पोचल्याचे कोठेच दृष्टोत्पत्तीस आले नाही. गडासंबंधी माहीती कोठेही वाचायला मिळाली नाही. सवाई माधवरावांचा जन्म हा सवाल सामान्य माणसापुढे नसेल. पण इतिहासज्ञांना अनेक गोष्टींचीं आवश्यकता भासत असते.

पुरंदरानंतर खंडोबाची सोन्याची जेजूरी पहायला आम्ही निघालो. जेजूरीला जाण्यासाठी पुरंदराहून आधी सासवडास यावे लागले. खंडेरायाची जेजूरी सासवडच्या आग्नेयेस ८–९ मैलावर आहे. जेजुरी हा गांव लहान आहे. शेदिडशे पन्याची घरे, लहानशी बाजार पेठ आणि त्याहून बारीक बोळ व गल्ल्या यांचा मिळून हा गांव बनला आहे. गावाच्या पृष्ठभागी खंडोबाचे प्रचंड देऊळ आहे. नऊ लाख चिऱ्यांचे हे देऊळ पर्वतीपेक्षा निम्या अधिक उंचीवर आहे. देवळाच्या काही भागाची पडझड झाली आहे. देवळाच्या वरच्या दिंडी दरवाज्यांत जेजुरी नगरपालिकेने एक यात्रा कर वसूल करण्याचे नाके ठेवले आहे. दरडोई सहा आणे अशी जबरपट्टी खंडोबाच्या भक्तावर बसवली आहे. नगरपालिकेचे प्रमुख उत्पन्नाचे हेच साधन दिसते. चाळीस सहस्र रुपयापर्यंत गल्ला अशा तऱ्हेने जमा होतो. अशी माहिती मिळाली. खंडोबाचे हळदीतच बसणे आणि हळदीतच उठणे असते. देवळात हळदीचा नुसता पेरा पडलेला होता देवापुढे कोणी भक्त "सदानंदाचा येळकोट" असे गर्जून तळी भरत होता,

खंडेरायाचे एक पुजारी आम्हाला खंडोबा देवाची माहिती सांगत होते. खंडोबा हे महाराष्ट्रातील अनेकांचे कुलदैवत आहे. ते जागृत आहे असे सांगतात की, पुराणकाळी दोन दैत्य फार प्रबळ होऊन त्यामुळे जनता गरीब गाय होऊन राहिली होती. त्या दैत्यांचा खंडेरायाने वध केला. भोळे पुजारी ह्या असूर मर्दनेच्या कथेबरोबर १९४२ की १९४५ साली चोरट्यांनी खंडोबाच्या अंगावरचे सारे सुवर्णालंकार उतरून नेल्याची हकिकत सांगतात. पुजारी मंडळींनी या दोन्ही गोष्टी एकदम सांगू नयेत पण पुजाऱ्यांना एवढे ज्ञान असते तर मग ते पुजारी कशाला राहिले असते ! खंडोबाचा अंगारा चर्चून आम्ही जेजूरीच्या खंडोबाची रजा घेतली.

भाटघरचे धरण हे आमचे पुढचे मुक्कामाचे ठिकाण होते पण सासवडच्या आजुबाजूस अंजिरांच्या बागा आहेत त्यापैकी एखादी अंजीर बाग पाहायला लाभेल तर सहलीची मौज वाढेल असे आम्हास वाटत होते. चोराची नजर जशी डबोल्यावर असते तसे आम्ही अगदी डोळ्यात तेल घालून वाटेने कुठे अंजीरबाग दिसते का हे पहात होतो. आमची गाडी शिवरी गांवावरून जात असता मला रस्त्यापासून थोड्या अंतरावर असलेला अंजीरबाग दिसला. पोलीसपार्टीला भूपत दरवडेखोर दिसता तर ते ओरडले नसते एवढ्या मोठ्याने मी ओरडलो " अंजीरबाग अंजीरबाग ! अंजिरबागेचे नांव ऐकताच बाबूरांवाने कचकन गाडी थांबवली. महादेवराव सर्वांच्या पुढे होऊन बागेकडे सरसावले. तिकडून डोकीस पांढरा फेटा व अंगात पांढरा अंगरखा घातलेले अंजीर बागेचे मालक रामभाऊ जगतापच येत होते. महादेवरावांना त्यांना नमस्कार करण्याचे सुचण्यापूर्वीच रामभाऊनीच महादेवरावांना नमस्कार केला.

रामभाऊना आम्ही साळसूदपणे सांगितले की, आम्हाला केवळ अंजीर बागा कशा असतात. ते पहायचे आहे. आम्ही अंजीर बागेत आलो ते अंजीराच्या झाडांची मुळे, खोडे, फुले फुलांतले पूंकेसर पहायला आलो नाहीत हे रामभाऊनी ओळखले. पण रामभाऊ कष्टी दिसत होते; कारण त्यांच्या बागेतील अंजीर चार दिवसांपूर्वी खुडून झाले होते. अंजीराच्या दुसऱ्या एका बागेतून अंजीराची करंडी मिळवून देण्याची व्यवस्था लावून दिल्यावर रामभाऊ अंजिराच्या सौद्यांच्या सुरस कथा सांगण्याला लागले.

रामभाऊंच्या चार गुंठ्यांच्या अंजीर बागेत अंजिरांची पर्णसंभाराने नटलेली सुमारे पाउणशे सुबक ठेंगणी झाडे होती. बाहेर कडक ऊन असूनही अंजिराच्या पाण जाळीने ती वरचेवर झेलून धरल्याने बागेत आराम होता. रामभाऊंना अंजिराच्या बागेतून किफायत असली तरी त्यांचे उखळ पांढरे झाले असल्याचे चिन्ह कुठेच दिसत नव्हते. त्यांचा संसार अंगासारखा चालण्या एवढी कमाई बागेतून त्यांना होत असावी. पण मुंबईच्या कुबेर नगरीत मोठमोठे धनाढ्य लोक आहेत.

वाटेल त्या किंमतीला अंजीर विकत घेण्याची त्यांची हिंमत आहे. असे श्रीमंत गिऱ्हाईक सारखे लाभत गेल्यास आपल्याला सोन्याचे दिवस निश्चीत पहायला मिळतील. ह्या आशेवर रामभाऊ जगले होते.

अंजिराच्या एका सौद्याची हकीगत त्यानी आम्हाला ऐकवली. ते म्हणाले एक दिवस मुंबईच्या मार्केटात अंजिराची खरेदी करायला दोन श्रीमंतांची पोरे आली. उभ्या बाजारात एकच करंडी उरली होती. अंजिराची करंडी घेतल्यावाचून परत येऊ नका अशी त्या श्रीमंतांच्या पोरांना सांगी होती. एका पोराने पहिल्या फटक्यांला पांच रुपयाच्या करंडीचे वीस रुपये केले. दुसरा पोरगाही कांही कमी नव्हता तो चाळीस रुपये भाव

करून बसला. जिद्दीत भाव शंभर रुपयावर जाऊन ठेपला. शंभर रुपयांवर भाव जातांच पहिल्या पोराची कंबर खचली. व तो करंडी न खरेदी करता हात हालवीत घरी गेला. त्याच्या बापाला पोरगा रित्या हाताने आलेला दिसताच अतिशय संताप आला. बापाने पायातले खेटर काढून पोराला (छाप्यात लिहिता येणार नाही अशी) शिवी हासडली. रामभाऊ गोष्ट सांगतांना इतके रंगले होते की त्यांनीही आपल्या पायातले काढून मुखाने त्या इरसाल शिविचाही उल्लेख केला. शेवटी मुलाचा बाप त्याला म्हणाला, पोरा करंडीचा भाव एकशे दहा केला असतास तर काय मेला असतास ? रामभाऊंची मनीषा हीच होती. असली शिरमंताची पोरटी आपणांस गिऱ्हाईक म्हणून लाभतील त्या दिवसाची ते आतुरतेने वाट पहात होते.

रामभाऊंच्या घटकाभराच्या सहवासात आम्ही चिरमित्र झालो. आमच्या बाजूला आलात तर आमच्या घरी येऊन जा अशी अक्षत आम्ही सर्वांनीच रामभाऊना दिली. रामभाऊनी अंजीराची करंडी देताना आम्हाला अगदी बजावून सांगितले होते की, करंडी उद्यापर्यंत उघडू नका. म्हणूनच आमची करंडी भाटघरचे धरण येईपर्यन्त शिल्लक राहिली. भोरहून भाटघर थोड्या अंतरावर आहे. भारतातल्या फार मोठ्या धरणांत त्याची गणना करतात. निरेचे पाणी अडवून सुमारे २७ मैलांचा प्रचंड तलाव येथे तयार करण्यात आला आहे. निरेला काढलेल्या दोन पाटांनी पुणे व सातारा जिल्ह्यातील पुष्कळच जमीन सुपीक झाली आहे. भाटघरचे धरण मुंबईचे गव्हर्नर जॉर्ज लॉईड यांच्या आमदानीत तयार झाले म्हणून त्यांचे स्मरणार्थ लॉईडसाहेबांचे नांव धरणाला देण्यात आले आहे. धरणावरून मोटारी लॉऱ्या इत्यादी वाहाने जातील एवढा मोठा रस्ता आहे. भाटघरमुळे भोरला महत्व प्राप्त झाले आहे. भोर शहरात धांवता फेरफटका करून आम्ही सज्जनगडाकडे जाणाऱ्या मार्गाचा तपास करू लागलो. सज्जनगड रस्त्यावर शिरवळात आम्ही चहाच्या दुकानात चहा घेत असता जवळपास एखादा साखर कारखाना असेल काय असा विचार आमच्या मनात आला. चहा हे पेयच असे बहारदार आहे की ते पिता पिता कल्पनेला नवे नवे पल्लव फुटतात. साखरवाडीला साखर कारखाना असून तो तीस मैलावर आहे असे कळताच सज्जनगडला जाणाऱ्या गाडीचा मोहरा आम्ही साखरवाडीला वळविला. साखरवाडीला आलो खरे, पण साखर कारखाना पहायला चिठ्ठीचपाटी वग वशीला आम्हापाशी नव्हता.

शेवटी मामा व मी सरळ मॅनेजरला गांठून कारखाना पाहण्याची परवानगी काढावी असे ठरले काळ्या भिंगाचा विल्सन गॉगल लावला की माणूस रुबाबदार दिसतो असे बंडूचे मत पडल्याने आम्ही दोघांनी काळे चष्मे लावले. बोलताना काळा चष्मा काढायचा असतो. पुन्हा डाव्या हातानेच तो काढला पाहिजे. काळा चष्मा दोन हाताने काढलांत तर रुबाबाचा कचरा आणि कामाचा बिघाडा होईल अशी बंडूने ताकिद दिल्यामुळे एका हाताने चष्मा काढण्याची मी तालीम केली.

आमची काळ्या चष्म्याचिही रंगीत तालीम अखेर वाया गेली. मॅनेजर एवढे सज्जन गृहस्थ होते कि त्यांनी आम्ही चष्मे काढून बोलायला सुरवात करण्यापूर्वींच कारखाना पाहण्याची परवानगी आणि दाखवणारा माणूस आम्हाला दिला. साखर कारखान्यांत आम्ही दाखल झालो. साखर कारखाना हे अजस्त्र काम आहे. चार दोनशे उसांच्या काड्याचे क्षणार्धात तुकडे होतात. चरकांत त्यातला थेंब न थेंब रस पिळून काढला जातो. चिपाडांचा भुगा सुकून जळण म्हणून भट्टीत जातो. प्रचंड बॉयलर, नळ्या, सिलिंडरे असलेले तीन मजल्याचे हे यंत्र पाहून पहाणारा थक्क होतो. आम्हाला कारखाना दाखवणारा माणूस फारच सालस होता. तो प्रत्येक यंत्राची तपशील वार माहिती आम्हास देत होता. जणू कांही येथून कारखाना पाहून गेल्यावर आम्ही साखरेचा कारखानाच काढणार आहोत. ! लिटमस पेपर तर त्याने पंचवीस वेळा रसात बुडवून आम्हाला दाखवून कांहीसे सांगितले. आमचे रसायन शास्त्राचे ज्ञान अगदीच 'पेनशनिला' आले असल्यामुळे त्या दाखवण्याचा कांहीच उपयोग झाला नाही. मॅनेजर साहेबांचे व कारखाना दाखवणाराचे आभार मानून आम्ही साखरवाडी सोडली.

साखरवाडीहून फलटणवरून आम्ही सातान्याकडे गलो. परळी साताराहून ४–५ मैलावर आहे परळीहून गड अगदी जवळ असून म्हातारी माणसेसुद्धा बोल बोलता गडावर जातात हे शिवरामने सांगितले नसते तर आम्ही काळोखांतून गड चढण्याच्या भानगडीत पडलो नसतो. गडावर गेलो तेव्हा आम्ही पार थकून गेलो होतो सकाळी उठून तळ्यावर गेलो. समर्थ रामदासस्वामींच्या समाधीचे दर्शन घेतले. महाराष्ट्राचे आनंदवन कसे होईल, औरंग्यापापी कोणत्या खटपटीने बुडेल, स्नानसंध्या करण्यासाठी उदंड पाणी कसे होईल ही ज्या महात्म्याला चिंता लागली होती, त्या महात्म्याचे एकांत वासाचे हे पवित्र ठिकाण होते. समर्थ भक्तांनी अलीकडे या स्थळाची मोठ्या मेहनतिने निगा ठेवण्याचे व सुखसोई वाढवण्याचे कार्य चालवले आहे. आज ज्याला निवांतपणे कांही वाचन, मनन, निदिध्यास करावयाचा असेल त्याने सज्जनगडाला जावे घारू आण्णाने म्हणे निश्चीत पणे ठरविले आहे की आळंदीला राहून ज्ञानेश्वरीचा देहूला तुकोबांच्या गाथेचे आणि सज्जनगडावर राहून दासबोधाचे पारायण करायचे. या पारायणांचा सोहाळा फार अनुपम होईल यात शंका नाही. पण आपणाला उंबरगडाहून सज्जनगडावर जाऊ द्यायला आपल्या घरातील आक्का आणि वेण्या तयार होतील तेव्हा ना !

कोयना धरणाची योजना ही महाराष्ट्राच्या भाग्यश्रीची योजना आहे. कोयनेच्या उगमाकडे जाऊ लागताच अपूर्व सृष्टीशोभा पदोपदी आपले स्वागत करते. कोयनानगर हे नवच नगर कोयनेच्या उगमाशी आज वसले आहे. डांबरी सडका नळाचे पाणी, वीज पुरवठा, गच्च भरलेली बाजार पेठ ही सर्व कोयना नगरांत पाहायला मिळतात.

ज्या धरणामुळे महाराष्ट्र सुखी होणार आहे. ते धरण बांधण्याचे काम आज चालू आहे. कोयनेच्या एका तिरावर सिमेंटचे रसायन तयार होऊन ते विजेच्या पाळण्यांनी दुसऱ्या तिरावर पोचवले जाते. यंत्रविशारद व स्थापत्य शास्त्रज्ञ यांची आज कोयना नगरात मोठी यात्रा भरलेली आहे १९६१ साली या योजनेतून पोफळी येथे तयार होणारी वीज सारा महाराष्ट्र उजाळून टाकील. ही योजना सिद्धिस गेल्यास रामदासानंतर आज पुन्हा एकदा महाराष्ट्राचे आनंद वन भुवन होईल.

ही आमची इच्छा आम्हाला परशुराम देवाला विवेदन करावयाची होती. म्हणून आम्ही अक्षय्य तृतीयेच्या दिवशी परशुराम क्षेत्री गेलो. छबीन्यांतून मिरवल्या जाणाऱ्या कोकणच्या राजाची, ह्या महाराष्ट्राला लवकरच सोन्याचे दिवस दाखव अशी मनोमन प्रार्थना केली. परशुराम हा साक्षात्कारी देव आहे. भक्तांची उपेक्षा तो कधीच करणार नाही.

● ● ●

# पक्षी वर्णन

१) पक्ष्यांतही सारे आपल्यासारखेच

२) सात भाई

३) देवपक्षी चक्रवाक

४) गरुड (हॉर्न बिल)

५) खंड्या पाणनदीकर

६) करढोक

७) गानसम्राट कोकीळ

# "पक्ष्यांतही सारे आपल्यासारखेच"

मला राहून राहून आश्चर्य वाटते एका गोष्टीचे ! पक्ष्यांचे 'शतकोटी प्रविस्तर' साम्राज्य आपल्या भोवती पसरले आहे. हे साम्राज्य नुसते सार्वभौम नव्हे तर सांतरिक्ष, संपूर्णपणे स्वावलंबी कोणाचे पै देखील देणे नसलेले. शिवाय मधुर गाऊन मानवाचे सदैव मनरंजन करणारे. सौन्दर्य, आनंद आणि विलास यानी नटलेले ! मानवाचा पोटापाण्याचा प्रमुख उद्योग कृषी त्या कृषीचे असंख्य शत्रू जे कृमीकिटक त्यांचा अहर्निश संहार करून पक्षी मानवाची सेवा करीत आले आहेत. एवढे असूनदेखील पक्षीसृष्टीची, पक्षीजीवनाची माणसाला पुरेशी ओळख नसावी ? कदर नसावी ? माणसाने पक्ष्यांबाबत कांही पुण्यकृत्य केले असेल तर ते एवढेच की 'स्वतंत्र वनवृत्तीच्या' या गोजीरवाण्या गोंडस जीवांना आपल्या दारी दरिद्री पिंजऱ्यात कोंडून आपल्या लब्ध प्रतिष्ठीत पणाचे आणि मानभावी पणाचे प्रदर्शन केले आहे. स्वच्छंदपणे जलकेली करणाऱ्या पक्ष्यांस पाशवी बळाचा वापर करून पकडले आहे. पक्ष्यांचे मांस रुचकर लागते म्हणून असंख्य निरागस पाखरांस जीवघेण्या छऱ्यांनी मारुन त्यांचे गुल्गुलीत मांस पोटांत रिचविले आहे. हे सर्व करतांना त्याच्या डोळ्यापुढे एकच विचार "ही पाखरे मजसि येतिल काय कामा?" पक्ष्यांबाबत पाश्चात्यांचे धोरण व दृष्टीकोन पुष्कळच वेगळा होत राहिला आहे. संपूर्ण ब्रिटीश बेटांत पक्ष्यांच्या जाती असतील तीनशे, साडेतीनशे. पण काय कौतुक आहे ! पक्ष्यांवर गाणी किती आणि कवने किती ! ऑर्निथॉलॉजीस्ट युनियन लंडन एव्हिकल्चरल सोसायटी, लंडन, अशा अनेक संस्थानी गेल्या कांही वर्षात पक्ष्यांचा शास्त्रीय अभ्यास, त्यांचे वर्गीकरण, त्यांचे स्वभावदर्शन सहस्त्रावधी कोस दूर असलेल्या भूभागात त्यांचे बिनचुक पर्यटन यावर खूपच संशोधन केले आहे. पण दुनियेची गोष्ट बाजूस ठेवून जरा भारताकडे किंवा इथे मराठिचिये नगरीकडे पाहिले तर पक्षिशास्त्राची पक्षी जीवनाची घोर उपेक्षाच दिसून येते. एक मात्र अपवाद मुंबईची नॅचरल हिस्टरी सोसायटी. "भारतातल्या सर्वसामान्य माणसाला तर कावळा, चिमणी, पारवा, मैना, पोपट, घार, गिधाड, मोर आणि कोंबडी या व्यतिरिक्त अन्य पक्ष्यांची ओळखही नाही असे दिसून येते. ( त्यातही जित्या कोंबडीपेक्षा मसाले घालून शिजवलेली मुरगीच लोकांच्या अधिक परिचयाची ! ) आपल्या देशात पक्ष्यांच्या सहस्त्रावर जाती आहेत. पक्ष्यांच्या बाबतीत आपला भारत ब्रिटिश बेटे, जर्मनी, फ्रान्स इत्यादी युरोपियन देशांपेक्षा कितीतरी पटीने समृद्ध आहे. ही समृद्धी नुसती संख्यात्मक नसून गुणात्मकही आहे. भारतीय पक्ष्यांच्या रंगिल्या रसील्या दुनियेत नाना नमुने आणि नाना नखरे आहेत. येथे गाणारा पक्षी आहेत. नाचणारे आहेत. दृष्ट लागावी इतके सुंदर पक्षी आहेत. जणू नंदनवनातून पृथ्वी तलावर अवतरलेले ! हाऊसिंग बोर्डाच्या घरापेक्षाही मजबूत आणि मुलायम घरे बांधणारे, सामुहिक जीवन जगणारे, शूरवीर, शरणागत, वत्सल, सहस्त्र कोसांवर असलेल्या भूभागात

होकायंत्राच्या साहाय्यावाचून बिनचूक उडून जाणारे, परभृत म्हणजेच आयत्या बिळावर नागोबा या वृत्तीचे, निशाचर खून करुन पोट भरणारे, बारशाला आणि बाराव्याला उपस्थित राहाणारे ... ... ... किती म्हणून वर्णन करावे ! कुटुंब संस्था ही मानवाची निर्मिती असे पुष्कळांना वाटते. पण पक्ष्यांतही कुटुंब-पद्धती आहे. पक्ष्यांचे 'द्वंद्वचर' हेही नाव आहे. पाखरे जोड्याने फिरतात, जोड्याने घरटी बांधतात, जोड्याने शत्रुशी मुकाबला करतात, जोड्याने पिलांचे संवर्धन करतात 'संगच्छध्वं, संवदध्वं' हे पाखरांच्या रक्तातच आहे. येवढे करून वर्षातून दोनदोनदा तीनतीनदा पाळणे हाल्वायची वेळ येत असूनही संख्येवर त्यांचे पक्के नियंत्रण असावे असे वाटते. नाहीतर माणसासारखे वाढत्या वंशाचे वळण असते आणि १९०१ साली चिमण्या होत्या त्याच्या दसपट चिमण्या १९७१ साली होत जात्या, तर पृथ्वीवर इंचभर जागा नाही राहायची. पण पक्ष्यांकडे काहीतरी अशिक्षीत कुटुंब नियोजनाचे तंत्र खास असावे. हा आहे आपला आमचा एक तर्क. लाखो पक्षी एखाद्या साथीत सापडले आणि जागोजागी कावळे–चिमण्या मरून पडल्या आहेत असे दृश्य पाहायला सापडत नाही.

### पक्ष्यांतील मास्टर कृष्णराव

बहुधा पक्ष्यांचे संगीत हेच माणसाला पक्ष्यांकडे आकर्षित करीत असते. म्हणून प्रथम संगीता बद्दल प्रसिद्ध असलेल्या पांखराविषयी लिहीतो. गाणाऱ्या पक्ष्यांत पहिल्या क्रमांकाविषयी रुचि परत्वे थोडा मतभेद होण्याचा संभव आहे. श्याम नावाचा पक्षी आहे तो सर्वात श्रेष्ठ गायक आहे. असे सांगतात. पण श्याम घनदाट वनस्थळीचा पक्षी आहे. सर्वसाधारण लोकांना त्यामुळे त्याचा परिचय नाही. प्रत्येकजण दुसऱ्याला हेच विचारीत हिंडतो आहे– "बतादो सखी, कौन गली है श्याम ?" पण श्यामचे प्रकरण जरा विवाद्य म्हणून बाजुला ठेवले, तर गाणाऱ्या पाखरांत दयाळ पक्षी हा श्रेष्ठ ठरेल. पक्ष्यांतले हे मास्तर कृष्णराव फुलंब्रीकरच म्हणायला हरकत नाही. इथे जरा एक भानगड आहे. तिचा खुलासा सुरवातीलाच केलेला बरा. खरे संगीत सगळ्यानाच समजते असे नाही. मरहूम फैय्याझखांची एक आठवण सांगतात. ती मोठी उद्बोधक आहे.

### दयाळ बुवांचा सोलो

फैयाजखांची एक बैठक ठरली होती. अर्थात ती फुकट असल्यामुळे खूपच धमाल श्रोत्यांनी उडवून दिली होती. श्रोत्यात जाणकार, बघ्ये, नुसतेच मलमलचा नक्षिदार अंगरखा घातलेले; त्याचबरोबर सडपातळ आणि विशाल महिला यांची गर्दी होती. फैयाजखांचा ख्यालच तासभर चालला त्या दर्दी गायकांने श्रोत्यांचे वजन ओळखले आणि 'तानसेन संगीत कलायतन'च्या कर्णधारांना बोलावून त्यानी चक्क मोठ्याने



दयाळ पक्षी (मॅगपाय रॉबिन)

सांगितले "भाईसाब, अभी सबको कप कप कॉफी पिलाव और इसके बाद फिर गाना शुरु होगा" झाले; गोळी लागली श्रोत्यांत काफीरागाचे शौकीन होते. कॉफी पिवून हलकेच ते निसटले. आणि नंतर मोठी मिष्टास आणि रंगभरेली बैठक मोजक्या लोकांपुढे झाली.

## दयाळ बुवांची पक्की बैठक

संगीत समजायला थोडी कांनांची 'तयारी' लागते. पक्ष्यांच्या संगीताला तर याची अधिकच गरज आहे. पण एकदा का दयाळ पक्ष्याची शीळ ध्यानी आली; त्यांचे सोलो, जुगलबंदीचे गाणे मन लावून ऐकले की माणूस हरखून गेलाच पाहिजे. ॲटकिन्स दयाळ पक्षाला "दि फायनेस्ट सिंगर ऑफ वेस्टर्न इंडिया" म्हणतो ते उगीच नाही. काळ्या आणि पांढऱ्या रंगाच्या या पाखरास इंग्रजीत मॅगपाय रॉबिन म्हणतात. झाडाच्या सर्वांत उंच फांदीवर बसून हा गातो. शेपटी उंचच उंच उचलून धरायची ही बुवांची लंबक आहे. बैठकीचा हा पक्का आहे. सहा वाजल्यापासून अगदी नऊ वाजेपर्यंत गाणे चालू असते गाण्याचे बोल नेमके सांगता आले असते तर बरे झाले असते. पण "सये सखी ये, प्रिये सखि ये" अशा सारखे बोल असतात. (चुकलभू द्यावी घ्यावी.) ज्यास्त नाही पण एक नक्की सांगू शकतो जे लोक "मेहबुबा मेहबुबा, मेहबुबा, ! ऊं ऊं ऊं ऊं ऊ ऊ ......" हे गाणे ऐकून अगदी बेहोष होतात त्यानी दयाळ पक्ष्याचे गाणे ऐकले तर ते खूष होतील येवढी गॅरंटी ! पुन्हा ते "खोया खोया चांद" "कौन करेगा इतना" असल्या गाण्याच्या वाऱ्याला उभे राहाणार नाही.

तसा मोठा गाणारा नाही, पण लहानसे आणि लाडीक, भावमधूर गीत कवडा गात असतो. खेड्या पाड्याच्या लोकांना कवड्याची ओळख करून देण्याची गरज नाही. तुम्ही प्रवास करीत असता तेव्हा एक काळसर करडा रंग असलेला पक्षी गाडी जवळ येताच झटकन उडून गेलेला दिसेल हाच कवडा, हा गातांना चांगला आवरून सांवरून बसेल. कवडा काय गाणे म्हणतो त्याचे शब्दांकन परिचित लोकांनी पूर्वीच करून ठेवले आहे. त्या गाण्याला थोडी पार्श्वभूमी आहे. कवडे बुवांची बायको सीता कवडे कवड्यांवर रुसून कुठे घराबाहेर की माहेरी गेली आहे. आणि सीता जवळ नसली म्हणजे कवड्याला ( आणि साऱ्या नवऱ्यानाही ) बायकोची खरी किंमत कळते. कवडा सीतेचे गुण आठवून आठवून म्हणतो—

चल गे सीते / कवडा मी पोर पोर पोर
तुझे पोहे गोड गोड गोड......

कवड्याचे हे करुण गीत ऐकून सीता परत घरी येते. कवडा गातो त्यावेळी हे गीत मनांत घोळवावे म्हणजे कवडा हेच गीत गातो असे वाटल्यावाचून राहणार नाही.

दयाळ पक्ष्याहून लहान पण तसाच काळा व पांढरा रंग असलेला गप्पीदास (बुशचॅट) नांवाचा पक्षी आहे. तोही मैल अर्धा मैल ऐकू येईल अशी शीळ घालतो. " ए शशी, ए शशी " अशी एखाद्या ओळखीच्या मुलीला हाक मारल्या प्रमाणे. हा पक्षी दिसणे महा कठीण. एक तर टिचभर देह, आणि जमीनीवर उतरला नाही नाही तोच पळतो कधी कधी हा पल्लेदार शीळ देखील घालतो. शिंपी, कोतवाल, बुलबुल हे पक्षी गाणाऱ्या पक्ष्यांच्या यादीत येतात.

## सारा मामला चोरटेपणाचा

गाणाऱ्या पक्षांची एवढी यादी देऊन कोकिळाचा ह्या यादीत साधा नामोल्लेखही नसावा याचे तुम्हाला आश्चर्य वाटेल. कोकिळाच्या पंचमालापाबद्दल, गान कुशलते बद्दल दुमत होण्याचे कारण नाही. पण हा विशाल कुलसंभव पक्षी मोठ्या घराण्याच्या पुण्याईवर जे एक अत्यंत गर्हणीय ओंगळ काम करतो. त्याबद्दल या पक्ष्याच निषेध करावा तेवढा थोडाच आहे.

## चल गे सिते

हा परभृत आहे. म्हणजे स्पष्टच सांगायचे तर कोकीळ आपली अंडी अलगत कावळ्याच्या घरट्यात सोडतो. इकडे अंतरिक्षात कोकीळाच्या जोरदार मैफली चालतात. दुसरीकडे कावळा कावळी दिवसपाळी रात्रपाळी करून कोकिळांच्या भावी अपत्यांचे संवर्धन करतात. एवढे करून कोकीळा भोवतीच पंचारती लोक ओवाळतात. त्यांच्या प्रतीमांचे घराघरातून पूजन चालते. हे आजच नाही, तर कैक काळ चालू आहे. कवी कुलगुरुकालीदासांना सुद्धा हे माहीती होते. त्यांनी लिहीले आहे की —



कवडा

प्रागंतरिक्ष गमनात स्वयपत्यजातं
अन्यै, द्विजैः परभृताः खलु पोषयन्ती ॥

छे, छे या चोरटेपणाच्या मामल्याचा एकदा केव्हातरी दंभस्फोट होणे जरूर आहे. कावळ्यांच्या बावळेपणाच्या भांडवलावर चाललेला हा काळा बाजार थांबलाच पाहिजे. कोकीळ घरंदाज असला, विशाल कुळात जन्मला म्हणून काय झाले ? चव्हाट्यावर चोरी होते आणि चोराला कोणी धरत नाही ? नियम म्हणजे नियम. शिस्त म्हणजे शिस्त. त्याला पर्याय नाही. पक्षी द्रोह करणारांची गय करून भागणार नाही. कोकीळ गाणारा पक्षी आहे का त्याचे उत्तर 'होय' पण ह्या विषयाची याहून अधीक चर्चा करणे पक्ष्यांच्या हिताचे नाही.

गाण्याइतकीच पक्ष्यांची सौन्दर्याबद्दल ख्याती आहे. परमेश्वराने जे माणसाला दिले नाही, पशूपासून जे चोरून ठेवले, ते रेखीव सौन्दर्याचे देणे इश्वराने पक्ष्यांस अनंत हस्ताने दिले. शुक कुलातल्या पक्ष्यांना तर विविध रंगांच्या कुंभांतून बुचकळून काढल्याचा भास होतो. पुण्याहून येताना वेळ झाला तर, खंडाळ्याला कोणा पुण्यवान माणसाने पक्षिशाळा तयार करून आलिया गेलियास पाहायला ठेवली आहे फुकट, ती पहावी. त्या पक्षिशाळेतले लहान मोठे पोपट, काकाकुवे पाहाल तर हरखून जाल. पण पुण्याई पाहिजे. एरवी होणे नाही.

तुका म्हणे दर्शन सुलभ गोमटे
परि उपतिष्ठे पूर्व पुण्ये ॥

सुंदर पक्षी पुष्कळ आहेत. पण त्यातही चार दोन पक्षी नितान्तसुंदर आहेत. पावशा हा त्यापैकी एक आहे. याचे नांव ठेवायच्यावेळी चांगल्या सुभग नावांना काय ताप आला होता की एकदम आणिबाणी येऊन चांगली नांवे, पुण्यश्लोक व्यक्तींची नावे ठेवण्यावर अचानक बंदी आली नकळे ! अहो बारशाच्या वेळी नुसते विष्णू सहस्त्रनाम कोणी म्हणता तरी किती तरी नांवे ध्यानात आली असती. एका पाठोपाठ " सुवर्णवर्णो, हेमांगो, वराङ्ग कनकांगदी ! " पण पांवशा हे अगदी बुद्रुक नांव ठेवले गेले.

हा पक्षी मैनेएवढा. त्यात पुन्हा दोन जाती. एकाचा सारा देह पिवळा. डोळे काळे, चोच लाल. दुसऱ्याचे डोके पिवळे आणि पंख काळे. हा पक्षी दिसण्या अगोदर त्याची शीळ ऐकू येते. " पीहो पी पीहो; पीहो पी पीहो "... ... नंतर दिसतो. पितांबर नेसलेला हा पक्षी. त्याला पाहताच मुखात ज्ञान देवांची अभंगवाणी आपोआप उमटते.

' देखिला देखिला गे माये पक्ष्यांचा देवो ! " चैत्रात, पण चैत्रापेक्षा वैशाख–जेष्ठांत शीळ घालून हा आंबराया घुमवीत असतो. म्हणूनच की काय याचे इंग्रजी नांव " मँगो बर्ड " असे पडले असावे. नंदनवनातून पृथ्वीतलावर हा पक्षी आला आणि पुन्हा घरची वाट विसरला असा काहीतरी प्रकार याचे बाबतीत झाला असावा. दुसरा एक पक्षी आहे. तो तर इससे भी ज्यादा खुबसुरत ! नावाच्या बाबतीत याच्याहि वाट्याला दुर्दैव आले आहे. इंग्लीश पक्षी शास्त्रज्ञ याला म्हणतात " फ्लाय कॅचर " म्हणजे माशा मारणारा. ( राम राम राम ) बुलबुलाच्या अंग घाटीचा हा पक्षी आहे. पण बुलबुलांशी साम्य येथेच संपते. सर्व अंग पांढरेशुभ्र.

मागे राजेशाही पांढरा रिबिनी सारखा शेमला अकरा इंच लांबिचा. डोळे काळे भोर, त्यावर तुरा हा हवेतून उडू लागला की रिबिनीचा ह्याचा शेमलाही झुलु लागतो. आणि मौजच मौज पहायलां सापडते. " आबू नाचे बाबू नाचे बाबूची शेपटी नाचे "

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे





श्वेतकेतु ( फ्लाय कॅच )

कृपा करून, खेड्या पाड्यावर हा पक्षी पाहिलात तरी कोणाला ह्याचे नाव विचारण्याच्या भानगडीत पडू नका असे काही भुक्कड नाव सांगतील की वाटेल झक मारली आणि यानां नाव विचारले ! " श्वेतकेतु " ! हे नाव याला अगदी शोभून दिसेल. कोणाचा सल्ला घेऊ नका, आणि कोणाला पुसू नका. खुशाल म्हणत चला या पक्ष्याला ' श्वेत केतु ' ! मग सगळे लोक म्हणू लागतील श्वेतकेतु श्वेतकेतु ! खंड्या, नीळकंठ, नवरंग, फुलचुखा हे पक्षीही सुदर पक्षातच मोडतात.

## शरणागत वत्सल कोतवाल

पक्ष्यांच्या साम्राज्यात सुन्दर पक्षी आहेत तसे काही सज्जन पक्षी आहेत शरणागत वत्सल ज्यांचे ब्रीद आहे " परित्राणाय त्रस्ताना, खल निग्रहणायच " कोतवाल हा तो पक्षी. हा पक्षी आकाराने लहान. पुन्हा कोळशासारखा काळा. कोतवालकी वशिला बिशिला लावून याने लाटली की काय असे सकृतदर्शनी वाटते. असे प्रकार नेहमीच चालत आले आहेत. पण कोतवालच्या बाबतीत असला प्रकार झालेला नाही. अगदी निव्वळ स्वतःच्या कर्तृत्वावर, असामान्य बहादुरीवर त्याने हे पद मिळवले आहे.

ॲटकिन्सला कुठून पत्ता लागला कुणास ठावूक ! तो म्हणतो की पितृवंशाकडून ह्या पक्षाचा श्राईक ह्या शिकारी पक्षाशी लागाबांधा आहे. शिकारी पक्षाचे रक्त ह्याच्या नसानसांतून वाहते आहे. टेलिग्राफच्या तारांच्या सहज सिंहासनावर विराजमान होणारा हा कोतवाल सहज लक्षात येण्यासारखा आहे. याची आणखी एक खूण म्हणजे कात्रिच्या पात्यांसारखी याची दुभंगलेली शेपटी. ह्या पिटुकल्या पक्षाचा पराक्रम व दरारा भलताच आहे. कावळा कोतवालाच्या तिप्पट चौपट मोठा आहे आकाराने. पण कावळा जेव्हा वाह्यातपणा करतो, लहान पाखरांची अंडी पळवण्याचे उपद्व्याप करतो, त्यावेळी कोळशा त्याची पाठ घेऊन चारी बाजूनी त्याला सळो की पळो करून सोडतो. ते दृश्य प्रत्यक्ष पाह्यल्यावाचून नीट समजायचे नाही. ह्या पक्षाचे घरटे उंच झाडावर, अगदी उघड्यावर असते. घरटे कसले कोतवालाची कचेरीच ती !

## कोतवालसाहेबांचा दरारा

त्या ठिकाणाहून कोतवाल आपले आर्तत्राणाचे आणि उदरभरणाचे कार्य चालू ठेवीत असतो. कोतवाल पक्ष्यांचे इंग्रजी नाव अधिक समर्पक आहे. त्याला " किंग क्रो " म्हणजे " राजे कोळशे " ह्या नावाने संबोधतात. या राजाचे घरटे ज्या शाल्मलीवृक्षावर वा पर्कटीवृक्षावर असते ते ठिकाण पावशे, होले, आपल्या घरट्यांसाठी मुक्रर करतात. आणि एक ' अभय को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी ' स्थापन होते. शरणागतवत्सल माणसांना झोप कुठची ? तीन साडेतीन वाजता सगळ्या पक्ष्यांच्या अगोदर कोंबडा आरवण्यापूर्वीच उठून हा शीळ घालू लागतो. शीळ जरा कर्कशच आहे. नाहीतरी कोतवालाची शीळ तशीच पाहिजे. धाक उत्पन्न झाला पाहीजे, दहशत बसली पाहीजे त्यांना म्हणायचे राजे याचे शास्त्रीय नावही मोठे भीषण रौद्र आहे– ' डायक्रूरस मॅक्टोसरस ' नांव ऐकताच काटा उभा राहीला पाहीजे अंगावर पक्ष्यांनी या नावाचा नुसता उच्चार केला मनोभावाने तरीही ' नच विघ्नभयं तेषाम् ' ! विघ्ने बारा वाटांनी पळत सुटतील त्यांची

## अभद्र घुबड

शरणागत वत्सल पक्षी आहेत तसे दुसरे अतिदुष्ट पक्षीही आहेत. माणसात जशा कांही गुन्हेगार जमाती असतात, तसे पक्ष्यांत देखील गुन्हेगार, दरवडेखोर, पक्षी आहेत. घुबड हा पक्षी चोऱ्या, दरवडे, खुन करण्यात पटाईत आहे. चोरांची पावलेच कांही विचित्र असतात. ह्या पक्ष्याकडे पाहीले म्हणजे तात्काळ लक्षात येते की हा पक्षी बेरड आहे. डबल भिंगाच्या चष्म्यातून दिसतात तसेच बटबटीत डोळे. आवाज अपशकुनी. दिवसा अक्षयनिद्रिस्त आणि अंधार पडल्यावर त्याच्या हालचालीना प्रारंभ " या निशा सर्व भूताना तस्या जागर्ती कौशिक. "

अशा पक्ष्याला मित्र तरी कोण असणार ! सारा दिवस आपल्या ढोलीत हा आपल्या दारिद्रि कारभारणीच्या आसपास बसून असतो एक पक्षीशास्त्रज्ञ तर लिहीतो की बायकोपासून हा केव्हांही दाहा पावले देखील दूर जात नाही. ( बराच सभ्य आहे असे खरे म्हणायला पाहीजे, कारण समजा, उद्या आणखी खेटून बसला तर कोण हटकणार ! मियाबिबी राजी तो क्या करे काजी ! ) घरट्यांत हाडांचा पेर पडलेला असतो. घुबडाचा बेडूक, उन्दीर, पाखरांची पिले, ह्याचा फराळ चालू असतो. कावळे निजलेले असताना हा अचानक येऊन कावळ्याची मानगुटी देखील पकडतो. ह्या घुबडाची पिसे इतकी तलम बनवली आहेत देवाने की घुबड जवळ येईपर्यंत पत्ता देखील लागत नाही, पाखराना आपल्याकडे या पक्ष्याचे दर्शन, त्याचे कर्णकटू शब्द हे अगदी वाळीत टाकलेले आहेत. ते बरोबर आहे असे म्हणावे लागते.

## असावे घरकुल आपुले छान

गायनकलेच्या इतकीच मोलाची घरटे बाधण्याची विद्या पाखरापाशी आहे. आजीच्या गोष्टीत सागितल्याप्रमाणे चिमणीचे मेणाचे असो नाहीतर कावळ्याचे शेणाचे असो पण ही सारी घरटी आतून मुलायम आणि उबदार असतात. पक्ष्यांची घरटी म्हणजे खरे म्हटले तर प्रसूतीगृहे. अंडी उबवीपर्यंत त्यांचा आश्रय पाखरे घेतात. एरवी जवळ जवळ सर्वच पक्षी वस्तीला झाडाझाडावर असतात. थंडी असो नाहीतर पाऊस. झाडे ह्याच त्यांच्या पडशाळा. दोन तीन पाखरांनी घरटी झाडून पक्ष्यांची बुद्धीमत्ता आणि विणकाम कुशलता याबद्दल आश्चर्याचा गोड धक्काच बसतो. सुगरण हा चिमणी सारखा आणि चिमणी एवढाच पक्षी आहे. एका घरट्यामध्ये भलताच फरक आहे. दोघांच्या चिमणीचे घरटे म्हणजे पिसे एकमेकांत गुंतवून केलेले. चिमणीचे घरटे म्हणजे वैताग तुमच्या आरशाच्या मागे, तक्तपोशीच्या वळचणीत घरटा बांधण्याचा चिमणीचा उद्योग चालू असतो. सुगरणाच्या घरट्याचा माणसाला बिलकूल ताप नाही. शिंदीच्या झाडांची राई असेल तर बेत जमलाच !

## सुगरणाचे घरकुल

शिंदीच्या पातीचे मजबूत दोर काढून शिंदीच्या लोंबत्या झावळीवर उलट्या दुध भोपळ्याच्या आकाराच्या घर बांधणीस जोड्याने सुरवात होते. घरटी बांधायच्या मोसमात सुगरण पक्ष्याचा पृष्ठभाग हळदिवा होतो. मग काय आधीच उल्हास त्यात आषाढमास. उपमा द्यायची झाली तर एकीकडे मिलरवर रेती सिमीट मळून तयार होते आहे. आणि दुसरीकडे घर बांधणारे कोंगाटी स्त्री–पुरुष कामगार स्लॅबच्या कामावर तुटुन पडताहेत मुकादम वरतून मधून मधून काम जलदीने होण्यासाठी ओरडताहेत. तसलाच प्रकार. पात्याचे दोर आणा, माती आणि दोराचे टोक यारीकडे सरकवा. पुन्हा दोर बाहेर ओढून घ्या. केवढा गोंगाट, केवढी बोंबाबोंब ! काम झपाझप उठत जाते. घरटा



सुगरण

तयार होतो. त्याची शान किती वर्णावी ! घरट्याच्या माजघरात दोन वर्ग एक सुगरणची उठाबसायची आणि आतले बाजूस बाळंतिणीची खोली. मध्ये एक दांडी. घरट्यात जाण्यासाठी लांबोळका वर्तुळाकार मार्ग. घरटे झुलते, पण वारावादळाला मुळी देखील

न जुमानणारे. कोणालाही अशा टुमदार घरट्याचा अभिमान वाटेल. त्या घरट्यांबद्दल सुगरणला स्वतःला ऐट वाटावी अशी ही घरटी असतात. सुन्दर घरटा बांधणारे दुसरे एक पक्षी आहेत. पण एक नंबरी नाहीत. किंचित कमी कलाकुसरीचे. शिंपी हे ह्या पक्ष्यांचे नाव. हिरवट रंगाचे. शेपटीचे दोन पदर लांब बाहेर आलेले. गळ्याभोवती कापल्या सारखी खुण. आकार बरोबर टिचकी येवढा. शब्द त्या मानाने भलताच तिखट. एकदा टुवि टुवि सुरु केले तर वीस वेळा थोपायचा नाही. यांचा घरटे बांधण्याचा प्रकार जरा न्यारा. दोन मृदू पण चिवट अशी पाने शिवून चुरमुऱ्यांची पुडी असते त्यासारखे खोलगट घरटे बांधायचे. कोणी म्हणेल त्यात काय मोठे ? पण कौशल्य खरे मृदू आणि चिवट पाने असणारे सखलसे झाड शोधून काढण्यात आहे. घरटे शिवताना टाके ढिले असता कामा नयेत. नाहीतर अंड्याचे सगळे भांडवलच खाली कोसळायचे. पक्ष्यांना आपली घरटी बांधताना ती जरा आडोशाला असतील, सुरक्षित ठिकाणी असतील हेही पहावे लागते ही सारी दक्षता ही अशिक्षित पट्टू पाखरे घेत असतात.

## आणि हे सॅनिटरी इन्स्पेक्टर

पक्ष्यांची वातावरणाचे प्रदूषण थोपवून धरण्यात फार मोठी मदत आहे. गुरे ढोरे रानात खेळ्यावर नैसर्गिक मृत्यू येऊन किंवा अपघाती मरत असतात. ही मढी उचलून नेण्याची सोय अस्तित्वात नाही. ही असंख्य प्रेते जागच्या जागी कुजू दिली तर दुनियेचे वातावरण दूषीत होईल. अष्टघाण सुटून नाकातले केस जळून जातील. साथीचे रोग पसरतील. हे प्रदुषण थांबवून धरण्यात दोन पक्षी सतत कार्यरत असतात विनामूल्य ! त्याना कोणी ' धन्यबाद ' असे देखील म्हणत नाही.

गिधाडाची सफाई मोहीम अति जलद अगदी वायुवेगाने होत असते. पुरुष माणसाला कधी मधी चहा करायची वेळ आली तर साखरेचा डबा सापडायला वेळ लागतो आणि केव्हा केव्हा तो मिळत देखील नाही. पण मुंग्या आणि डोंगळे यांना डबा अचूक सापडतो. त्यातला प्रकार आहे. ढोर मरायला टेकले, उठवणीला आले की गिधाडातल्या टेहेळ्याला कळते आणि विद्युत वेगाने पाच पन्नास गिधाडे येऊन हाडांचा सापळा शिल्लक राहीपर्यंत पोट भरून चरतात. घारी लहान प्रमाणात हे सफाईचे काम करीत असतातच घारींचे गिऱ्हाईक वेगळे. उंदीर, बेडूक, सरपटणारे प्राणी ह्यांची उचल बांगडी घार करीत असते. ह्या सफाई मोहीमेत कावळे दादांचा उल्लेख केला नाही तर त्यांच्यावर अन्याय होईल. सफाई हे कावळ्याचे एक ' मायनर कॉन्ट्रॅक्ट ' आहे. माणूस अनेक वस्तू टाकीत असतो. शिळेपाके अन्न खिडकीवाटे फेकतो. ह्याची पुढची व्यवस्था कावळे दादा करतात. हे काम करतांना कावळे कधी आगलावूपणा करून घरातली एखादी उपयोगी वस्तू, खोबऱ्याची वाटी निरांजनातल्या वातीचे राहीलेले थोटुक निरांजनसकट पळवितात. आता निरांजनाची कावळ्याला गरज नाही हे उघड आहे. त्याला हवी असते

तेलाची वात. ते त्याचे अन्न आहे. ते युक्ती प्रयुक्तिने संपादन करतात. माणसाला वाटते हे सारे जग परमेश्वराने आपल्यासाठी उत्पन्न केले आहे. खरा प्रकार रामदास स्वामिनी वर्णन केला आहे. ' माणूस म्हणतो माझे घर, पण माजरि म्हणती आमुचे घर ! श्वाने म्हणती आमुचे घर ! कावळादेखिल हे आमुचे घर म्हणाला तर बिघडले कोठे ?

आपल्याकडे कावळ्या वाचून पान हालत नाही. पूर्वी लोक आठवणीने कावळ्याला काकबळी देत. ज्ञानदेवांनी तर पलिकडच्या झाडावर कोकणाऱ्या कावळ्याला शकून सांगण्याबद्दल विनवणी केली आहे. तुला दुधाची वाटी, दहीभात देईन, सोन्याचा वाळा तुझ्या पायी बांधीन, आंब्याची मधूर फळे खायला देईन मात्र ' पाहुणे पंढरी रावो घरा कै येतील ' ते सांग असे विचारले आहे कावळा हा बारशापासून बाराव्या पर्यंत उपयोगी पडणारा पक्षी आहे. नुसत्या काळ्या रंगावर चिडून जावून त्याला हिडीस फिडीस करण्यात शहाणपण नाही. आफ्रिकेतल्या ऱ्होडेशियांत सध्या चाललेल्या प्रकाराला गाढवपणाशिवाय दुसरे नांव नाही. आपण सभ्य माणसासारखे मानवतेने कावळ्याशी वागणे जरूर आहे.

ஊ ஊ ஊ

पृथ्वीतलावरचा बंधूभाव हल्ली पातळ होत चालला आहे. या पार्श्वभूमीवर पक्ष्यांचा बंधूभाव उठून दिसतो. पक्ष्यांची घरे नसतात. घरटी असतात. घरट्यांत प्रसूतीविधी मात्र होत असतो. घरे नसलेले पक्षी अनिकेत स्थितीत एखाद्या प्रचंड वृक्षावर वस्ती करतात. उभा जन्म असा काढतात. चार दोनशे कावळे, शे दोनशे होले, पावशे आणि सटरपटर पक्षी चक्क झाडांतून झोपतात. पण त्यामानाने त्यांचे झगडे, खून, मारामाऱ्या होत नाहीत. पक्ष्यांच्या सहजीवनात पुन्हा मौज आहे. प्रत्येक जोडप्याचा दुसऱ्या जोडप्याशी संबंध नसतो. प्रत्येक जोडा आपले भक्ष्य वेगवेगळे संपादन करतो. सहजीवनाच्या प्रकाराचे श्रेष्ठ उदाहरण चक्रवाक पक्ष्यांचे. चक्रवाक आणि चक्रवाकी ही दिवसा बरोबर फिरतात. अंधार पडला म्हणजे फिरता फिरता उंच आणि उदंड वाढलेल्या गवताच्या आणि झुडपांच्या जाळीत एकमेकांपासून दूर जातात. मग रात्रभर गोंधळ चालतो दोघे एकमेकांना हाका मारीत सुटतात. वेडीपिशी होतात. आणि सूर्योदयाला पुन्हा ती एकत्र भेटतात. ज्ञानेश्वरांनी एका रुपकांत असे वर्णन केले आहे–

शद्बाचिया आसकर्डी । भेदनदीचा दोही थडी
आरडाते विरह वेडी । बुद्धो बोधू ।
तया चक्रवाकांचे मिथुन ।
सामरस्याचे समाधान
भोगनी जो चिद्गगन । भुवनदिना

सहजीवनाचा आणखी एक नमुना म्हणजे 'सातभाई पक्षी' सात पक्ष्यांचा मेळा चरायला एकदम बाहेर पडतो. हे पक्षी एकाच कुटुंबातले असतात असे नाही. ते टोळकेही असू शकते.

## पक्षी जीवनाचे प्रश्नोपनिषद्

पक्ष्यांविषयी थोडक्यात कांही माहीती येथवर दिली. पक्ष्यांचे सर्वावर कडी करणारे एक वैशिष्ट्य आहे ते सांगितल्या शिवाय ही पक्षी कथा संपणार नाही पक्ष्यांचे हजारोंचे थवे एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी उडून जातात. पक्ष्यांचे हे भूपर्यटन म्हणजे पक्ष्यांच्या अतींद्रिय शक्तिचे गमक आहे. पक्षी सहासहा मैल उड्डाण करताना थांबतात की नाही ? थांबत नसतील तर थकत कसे नाहीत ? ह्या आधांतरी प्रवासात खातात काय ? रस्ता नेमका कसा सांपडतो ? ठराविक ठिकाण खुणेवाचून वा होकायंत्रावाचून कसे सापडते ह्या साऱ्या प्रश्नांची उत्तरे अद्याप मिळायची आहेत. नव्या नव्या उपपत्या लावल्या जात आहेत. नवे युक्तीवाद निघत आहेत पण दाव्याचा फैसला मात्र लागण्याचे चिन्ह दिसत नाही. आदिमानवाला जो प्रश्न पडला होता तोच प्रश्न मंगळावर जायला निघालेल्या माणसाला पडलेला आहे.

पक्षी हे क्षुद्र प्राणी आहेत. त्यांचा जगाला म्हणण्यासारखा उपयोग आता राहिलेला नाही, कालबाह्य आणि निरुपयोगी प्राण्यांना प्रगत मानवाच्या जगात राहून त्यांचा अन्नपाण्याचा प्रश्न बिकट करू नये, असल्या विचारांना आता बुरशी आलेली आहे. उलट, पक्षी हे मानवाचे चिरमित्र आहेत. मानवाच्या अभ्युदयासाठी देखील पक्षी जीवनाचा साकल्याने आभ्यास आणि विचार झाला पाहिजे. पक्ष्यांच्या पोटापाण्याचा भार मानवाच्या शिरावर नाही.

'येन शुक्लीकृतः हंसाःशुकाश्च हरितीकृतः' त्यानेच पाखरांना बळकट पंख देऊन त्यांच्या उपजिवीकेची व्यवस्था केली आहे. ह्या पक्षीसृष्टीचे नीट अवलोकन करून पक्षीविज्ञानाची अधिक ओळख करून घेणे म्हणजेच 'स्थिरचर व्यापून दशांगुळे उरलेल्या परमेश्वराचे पूजन आहे. पक्षीसृष्टीतील कांही ठळक पक्ष्यांविषयी अल्पशी माहिती येथे दिली आहे. यामागे पक्षीसृष्टीचा प्रचंड 'ग्रंथसाहेब' म्हणजे निसर्ग तिकडे लक्ष वेधावे एवढाच हेतू आहे. दिवाळी अंकात भरगच्च साहित्य भरतात आणि तो चटकन वाचकांनी हाती घ्यावा म्हणून चांगलेसे चित्र मुखपृष्ठावर छापतात, तशातला हा प्रकार आहे.

● ● ●

# सातभाई

सात व्यक्तिना एकत्र आणण्यासाठी आणि त्यांच्यात मैत्री उत्पन्न करण्यासाठी कोण त्रास पडतो ! किती करार मदार, किती सभा आणि किती घटना घडवाव्या लागतात ! पण सभा, संमेलने नाहीत, वर्गणी घेणे देणे सुद्धा काही नाही तरीही ही सात पाखरे जन्मभर एके ठिकाणी राहतात, गोडी गुलाबीने खातात पितात हे आश्चर्य नाही कां ?

पाखरांच्या जातीत 'सातभाई' हे एक नवलाचे पाखरू आहे. दिसायला हे अगदी सामान्य पाखरू दिसते. ठिपकेदार मातट रंगाचे; साधारणपणे आकाराने मैनेएवढे, तोंडाने सदासर्वदा बडबड करीत राहणारे साहासाताच्या टोळक्याटोळक्याने पानापाचोळ्यात आपले भक्ष्य वेचीत फिरणारे किंचित ओंगळ असे हे पाखरू आहे.

भारतात वर हिमालयापासून तो थेट कन्याकुमारीपर्यंत सातभाईची कुठली न कुठली जात नाही असा प्रांत दाखविता येणार नाही.



सातभाई

बंगालपासून ते नेपाळपर्यंत सातभाईची जी एक जात आढळते त्या जातीला बंगाली सातभाई उर्फ छातारिया हे नांव आहे हे पक्षी तिकडे अगदी सुकाळाचे आहेत. जो जो उत्तरेकडे जावे तो तो सातभाईचा रंग फिका होत गेल्याचे शास्त्रज्ञाच्या नजरेस आले आहे. हिमालयात चार हजार फुटाहून अधिक उंचीवर मात्र हे पक्षी क्वचितच आढळतात. कारण ह्या पाखरांना मनापासून मोकळे माळ व बाताबेताची झाडी असलेल्या मनुष्य वस्तीजवळच्या जागा आवडतात.

बंगाली सातभाईप्रमाणे सातभाईच्या मलबारी आणि मऱ्हाठी अशा दोन आणखी ठळक जाती आहेत. मऱ्हाठी बोली, मऱ्हाटे लोक यांच्याविषयी स्वाभाविकच मला अभिमान आहे. पण या मऱ्हाठीच्या अभिमानामुळे मी मऱ्हाठी सातभाईचे कौतुक करतो असा आक्षेप येऊ नये म्हणून हे मऱ्हाठी सातभाई म्हणजे काय मौज आहे

याविषयी परमारे मेजर जरदीन ह्याच्या ग्रंथातला उतारा देतो. मलबार प्रांताच्या दक्षिणेकडे पांढर माथे (White Headed) सातभाई आहेत. त्याची शिकार कशी करतात त्याचे वर्णन करताना मेजर साहेब म्हणतात "शिकारी लोक पाजरमाथ्या सातभाईना पकडण्यासाठी त्याच्या घोळक्यात शिका नांवाच्या शिकारी पक्षाला सोडतात. शिका येताच या सातभाईची गाळण उडते. प्रथम ते मोठा गोंगाट उडवून देतात. मग एकाएकी चूप होतात. जो तो वेगळा होऊन पळ काढू लागतो. पण शूर मऱ्हाठा सातभाईप्रमाणे संकटात सापडलेल्य आपल्याा सोबत्याच्या रक्षणार्थ धावून जात नाहीत. मऱ्हाठा सातभाईच्या संचाराच्या सरहद्दी दोरी ताणून निश्चित केलेल्या नाहीत. पण हे वाटप झालेले नसले तरी नर्मदेपासून दक्षिणेकडे कर्नाटकापर्यंत सामान्यपणे मऱ्हाठी सातभाई आढळतात असे म्हणता येईल.

ह्या पाखरांना सातभाई हे नांव कोणी आणि केव्हा ठेवले ते भगवान जाणे. पण चमत्कार असा आहे की याला इंग्लंडातील लोकही सेव्हन सिस्टर्स म्हणजे सातबहीण ह्याच नांवाने ओळतात.

पक्षांचे सातभाई हे नाव ऐकले की आपल्याला थोडा हेवा वाटणे साहजिक आहे. कारण दादाभाई, जीजीभाई देवरभाई ही नावे म्हणजे आपणाला आपल्या बापशेटीच्या मालमत्तेप्रमाणे वाटतात. बंधु आणि बंधुभाव हे आम्हीच जाणू शकतो हा आमचा अहंकार आहे पण आपल्याहून अधिक, निदान आपल्याइतकीच बंधुभाव व सहकारिता या गुणांची या पाखरांना पारख आहे.

या पाखराला नवलाचे पाखरू असे मी प्रारंभी म्हटले आहे ते यासाठीच. आपणास सातजणास एके जागी आणण्यास, त्याचे मध्ये एक चिरकालीन मैत्री उत्पन्न करण्यास अनेक सभा करारमदार.

पण सभा नाही, संकलन नाही वर्गणी घेणे देणे काहीही नसता सात पाखरे जन्मभर एके ठिकाणी कशी राहतात, कशी खातात, कशी पितात ते समजत नाही. असे सांगतात की सातभाईचा हा एकोपा हंगामातही कायम राहतो.

असा एक संशय होता की सातभाई हे एका आईबापाची सहा–सात लेकरे असावीत आणि असे असेल तर ( निदान लग्न करणे होईतो ) एके ठिकाणी ते नांदत असल्यास त्यात एवढे नवल ते काय आहे. पण अधिक संशोधनानंतर आता असे आढळून आले आहे की या सात आठ जणात तीन अथवा चार निरनिराळी जोडपीही असतात. दिवसा एकेजागी बसणारी ही जोडपी रात्र होताच आपापल्या स्वतंत्र शेजघरात जातात. दुसरा दिवस उजाडताच "सह नौ भुनक्तु सहवीर्य करवावहै" या उपजत मिळालेल्या प्रेरणेने जवळ येतात. ही पांखरे घटकेत भांडतात, पुन्हा गोड होतात. भांडली तरी मनात अढी धरीत नाहीत.

सातभाईची एक मुळमुळीत जात आहे ती सोडली तर इतर सातभाई सुख दुःखाचे समान वाटेकरी असतात.

" कठिण समय येता कोण कामासी येतो " असे रडगाणे गाण्याची पाळी एकमेकांस ते येऊ देत नाहीत. एखद्यादुकट्या शिकाऱ्याचा सातभाईच्या चंतुरंग सेनेपुढे टिकाव लागत नाही. सातभाईपैकी कोणा एकावर हल्ला होणे म्हणजे सातजणांस ते युद्धाचे आव्हान समजले जाते. शत्रु अंगावर येताच वेळकाटे करुन सर्वजण त्याचेवर तुटून पडतात. सातभाईच्या सपाट्यात सापडलेला एकटा दुकटा शिक्रा बायकोच्या कुंकवाची घट्ट बळकटी असली तरच धडपणी घरी जातो. नाही तर युद्धांतच बहुधा तो राम म्हणतो.

सातभाईचे हे दीर्घपाद कस्तुर जातींत पडतात. यांना इंग्रजीमध्ये दोनतीन दुसऱ्या नांवाने ओळखतात. बॅबलर म्हणजे बडबड्या ह्या नांवाने हा ग्रंथान्तरी प्रसिद्ध आहे. हा उकिरड्यावर आणि अन्य ओंगळ ठिकाणी भक्ष्य शोधतो म्हणून यास चोखंदळ इंग्रज लोक डर्ट बर्ड असेहि म्हणतात ह्या पक्षाला गोड गळा नाही याची पट्टी जी एकदाच जन्मताच त्याना मिळाली आहे तीच शेवट पर्यंत कायम असते. हे भांडू लागले म्हणजे कसा आवाज येतो हे सुद्धां सलीम अल्लीने नमूद करून ठेवले आहे.

विच विच विची, री री री री री री हा गलका फारच कर्कश असतो. म्युनिसिपालिटीच्या अगर शेअर होल्डरांच्या सभेत कांही खडाजंगी चालू असली की सात आठ लोक एकदम मोठ्याने बोलल्यावर जसा गलका होतो तशाच प्रकारचा सातभाईच्या भांडणाचा गलका होत असतो.

सातभाईना सौन्दर्य आणि सुस्वर आवाजी दिलेली नाही हे बरेच झाले आहे. इडा पिडा टळली आहे मुंबईच्या क्राफर्ड मार्केटात पुष्कळ पक्षी पहायला मिळतात पण सातभाई तेथे मला आढळला आही कारण मुंबईकर मोठे गुलहौशी लोक, त्यांना पाखरे अशी पाहिजेत की पाहतां पहातां डोळ्याचे पारणे फिटले पाहिजे त्यांना मंजूळ शब्दाची पाखरे पाहिजे निदानीला ती रुचकर तरी असली पाहिजेत

ह्यापैकी कोणतेच गुण सातभाईच्यापाशी नसल्यामुळे त्याच्या कपाळाचा वनवास चुकला आहे. नाहीपेक्षा ह्या पक्षाला सोन्याच्या पिंजऱ्यात भरुन आपल्या दारांत खवाली करायला लोकांनी खास लावले असते.

हे पाखरु उडण्याच्या कामांत तेवढे तरबेज नाही. चाळीस पन्नास यार्ड उड्डाण करावे पुन्हा कोठेतरी बसावे. पुन्हा पंधरा मिनिटानी थारे पालट करावा असे सारा दिवस चालते. या पाखरांचे घरटे कपाच्या आकाराचे असते. त्यात सुबकपणा नसतो म्हटले तरी

चालेल. आंब्यांच्या झाडाच्या साधारण सखल अशा बेचक्यात घरटे बांधणे या पक्षाला परवडते. घरट्याचा पत्ता कोणाला लागू नये याकरिता नाना युक्त्या हा पक्षी योजतो. उगाच घरट्या पासून कांही अंतरावर उडून तेथे क्षणभर बसेल, आत शिरल्याप्रमाणे दखवील अशा बहाण्यामुळे याचे घरटे लाभणे कठीण होते.

याच्या विणीचा हंगाम जानेवारी ते जूनपर्यंत चालू असतो. मात्र पाळणा वर्षातून एक वेळा टांगावा लागतो की दोन वेळा याबाबत थोडा मतभेद आहे प्रत्येक वीणीला तीन निळी अंडी हे पक्षी घालतात.

मोठा चतुर पक्षी खरा पण कावळ्यासारखा काफर प्राण्याप्रमाणे यालाही बनवून आपली अंडी उबवून घेणारा एक पक्षी आहे. अंडी घालण्याचे हंगामात तुरेवाली कोकिळा आहे ती याच्या घरात आपली अंडी आणून ठेवते ह्या हुषार पक्षाची हुषारी या ठिकाणी अगदीच लटकी पडते. एक तर या पक्षाला मोजता येत नसले पाहिजे. किंवा अंडी दुसऱ्याची उमजण्यास याला अडचण पडत असावी. किंवा तुरेवाल्या कोकिळेचे कारस्थान समजत असूनहि तिच्या अपराधा करिता तिच्या निरापराध बालकाची कत्तल उडवावी असे ह्या पक्षाला वाटत नसावे किंवा काहीही खरे असो; पण हा प्रकार जगाच्या प्रारंभापासून आजवर अखंड चालत आला आहे.

असो माणसाच्या अंगी असलेले अनेक गुण याच्या अंगी वास करतात असा हा सातभाई पक्षी सर्वांच्या निरीक्षणास योग्य असा विषय आहे.

पक्षी जातीत हे पक्षी म्हणजे एक नवल आहे हे खरे आहे पण ह्या नवलाच्या पाखरांकडे लोकांचे फारसे लक्ष जाऊ नये हे त्याहून मोठे नवल आहे.

★ ★ ★

# देव पक्षी "चक्रवाक"

चक्रवाक पक्षाविषयी आपण सर्वांनी थोडेफार ऐकलेले असणे शक्य आहे. पण ह्या पक्षाचे दर्शन आपल्या दक्षिणेकडे तरी क्वचितच घडते. म्हणूनच गुन्हेगारांस दहावीस दुसऱ्या माणसांत उभे करून साक्षीदारास त्यांना ओळखून काढण्यास सांगतात तसे दुसऱ्या दहावीस पक्ष्यांमधून चक्रवाक पक्षी नेमका टिपून काढण्यास सांगितले तर बहुतेकांचे अंदाज चुकतील. काही थोड्या लोकांचे अंदाज शब्दकोडी सोडविणारांच्या अंदाजाप्रमाणे चुकून बरोबर येतील.

या चक्रवाकपक्षाचे दर्शन तुम्हाआम्हाला एवढे दुर्लभ आहेना पण कवी लोक मात्र हे चक्रवाक पक्षी आपल्या घरी कावडीने पाणी भरत असल्याची ऐट आणून त्यांच्याविषयी लिहितात. त्यांचे दाखले व दृष्टांत देतात. पण चक्रवाकांविषयी कवींनी ठिकठिकाणी उल्लेख केलेले असल्यामुळे का होईना, आज शाळकरी मुलांपासून तो थोरामोठ्यापर्यन्त सर्वांना चक्रवाकासंबंधी मोडकी तोडकी तरी माहिती झाली आहे. आज मनाचे श्लोक ज्याने म्हटले आहेत अशा मुलाला तुम्ही जर विचारले की "बाळ, तुला चक्रवाक माहिती आहे कारे" तर तो ताडकन.

सदा चक्रवाकासी मार्तन्ड जैसा।
उडी घालीतो संकटी स्वामी तैसा॥

असे उत्तर देऊन मोकळा होईल. मात्र हा चुणचुणीत जबाब देताक्षणीच त्याला हा मार्तन्ड कोण आणि कुठून उडी मारतो असले प्रश्न तुम्ही विचारता कामा नये. नाहीतर तुम्ही पस्तावाल आणि ते पोरगे बिचारे ओशाळेल कारण त्याला एवढेच माहीती आहे.

कवींचे चक्रवाकाबद्दल जेवढे म्हणून उल्लेख आहेत. त्याची दुसरी खुबी अशी अशी आहे की त्या उल्लेखांवरून तुम्हाला चक्रवाकाची पुरती माहीती मिळणार नाही. रामदासां प्रमाणे गोस्वामी तुलसीदासांनीही चक्रवाक पक्षाचा उल्लेख केला आहे. तुलसी दासांची 'जागिचे रघुनाथ कुंवर' ही अमर भूपाळी आपल्या परिचयाची आहे. त्या भूपाळीच्या दुसऱ्याच चरणात तुलसीदासांनी.

चंद्रकिरण शीतल भई ।
चकई पिय मिलन गयी ।

असा चकईचा नाम निर्देश केला आहे. ही चकई म्हणजे चक्रवाक पक्षाची मंडळी त्याची सौभाग्यवती. पण तुलसीदासजीही चंद्रकिरण शीतल झाले. चांगले फटफटीत उजाडले आणि आता ही ( भवानी ) आपल्या प्रियकराला भेटायला चालली येवढेच सांगून थांबतात. तिलां येवढा उशीर का झाला, रात्रभर ती कोठल्या कामात होती ते सांगत नाहीत.

ह्या दोघा कविंच्या मानाने ज्ञानेश्वरांनी चक्रवाक पक्षाबद्दल बरीच माहीती दिली आहे. हे मान्य करावे लागते. ज्ञानेश्वरीतील चक्रवाकासंबंधीचा उतारा असा आहे.

शब्दांचिया आसकडी ।
भेदनदीच्या दोही थडी ।
आरडत विरह वेडी । बुधी बोधु ॥
तयां चक्रवाकांचे मिथून
सामरस्याचे समाधान
भोगवी जो चिद्गगन ! भुवन दिवा ॥

तात्पर्य : चक्रवाकाचे हे मिथुन चरता चरता नदीच्या दोन वेगळ्या थडीला जावे. मग विरहामुळे वेडी होऊन ती दोघे आपापल्या थडीवरून एकमेकास साद घालतात. शेवटी सूर्य उगवला म्हणजे या चक्रवाक मिथुनाची पुन्हा भेट होते. चक्रवाक आणि चक्रवाकी यांची चुकामूक जगाच्या प्रारंभा पासून आज मितीपर्यन्त सारखी चालत आली आहे. निदान लोकाचा समज तरी तसा झालेला आहे. इतका मालमसाला असल्यावर ह्या चक्रवाकांवर एखादी लोक कथा किंवा दंतकथा नाही असे होणे संभवनीय तरी आहे काय ? दंतकथा आहेच, आणि ती अशी.

ঌ ঌ ঌ

चक्रवाक–चक्रवाकी हे एक प्रेमी जिवांचे शापीत जोडपे आहे. प्रेम हे आंधळे असल्या कारणाने या प्रेमी जोडप्याच्या हातून होऊ नये पण झाल्यावाचून मात्र रहात नाही असे काहीतरी अघटित, अविनयाचे कृत्य होते. आणि या घोर अपराधाबद्दल ब्रह्मदेवांने या प्रेमीजीवांना चक्रवाक व चक्रवाकीच्या जन्माला घालून वरती " तुम्हा दोघांची दररोज रात्री चुकामुक होईल व सकाळी सूर्य उगवल्यावर तुमची पुन्हा भेट होईल." असा शाप दिला. आणि तेव्हा पासून हे विरह मिलनाचे नाटक चालू आहे.

कवी सृष्टीतील चक्रवाक हा मोठा काव्यमय आहे. सत्यसृष्टीतला चक्रवाक कसा असतो ते आता पाहू. चक्रवाक पक्षाचा बांधा, स्वभाव विशेष या सर्वांवरून शास्त्रज्ञानी या पक्षाला राजहंस, कलहंस व बदके यांच्या वर्गात घातले आहे. चक्रवाक पक्षाचे रथांगनामा हे नाव संस्कृत वाङ्मयांत वाळते. पण चक्रवाक मधील चक्र हा शब्द चाक या अर्थी वापरला नसून चकर चकर असा ज्याचा शब्द ( वाक ) आहे असा पक्षी असा आहे. चक्रवाकाच्या अनेक शब्दात चकर असा एक शब्द आहे. असे शास्त्रज्ञांनी नमुद करून ठेवले आहे. या पक्षाला इंग्रजीत रडी शेलड्रेक असे नाव आहे. युरोपीयन लोकांनी याल ' ब्रॉम्हनी डक ' असेही दुसरे नांव दिले आहे.

भारतात येऊन राहिलेल्या युरोपियनांनाही येथल्या जाती भेदाचे वारे बांधल्यावाचून राहिलेले नाही. याचे ब्रॅम्हनी डक हे नाव हे एक प्रत्यंतर आहे. स्पृश्य, अपृश्य ब्राम्हण, शूद्र हे भेद पक्षांचे वर्गीकरण करताता त्यांनी पाडले आहेत. घारीचे उदाहरण दिल्याने हा मुद्दा अधिक स्पष्ट होईल. आपल्याकडे दोन प्रकारच्या घारी आहेत. एक आपल्या नित्य अवलोकनात असलेली काळी घार व दुसरी समुद्र, नद्या यांचे किनारी सर्व साधारणपणे आढळून येणारी दुसरी तांबुस पांढरी घार, पहिल्या काळ्यां घारीला युरोपीयन ( पॅरिया काईट ) ( शूद्र घार ) असे म्हणतात. व दुसऱ्या तांबुस घारीला ' ब्राम्हनी उर्फ ब्राह्मणी घार असे नाव दिले आहे. पक्षी वर्णाने चांगला उजळ व गोरटेला असला काळा मेळा नसला म्हणजे त्या पक्षाला युरोपीयनही ब्राह्मणी म्हणत आले आहेत. ही वस्तूस्थिती पक्षावरील वाङ्मय वाचणाऱ्याचे ध्यानी आल्यावांचून रहात नाही. यावरून जातीं पाती मोडून त्याच्या गंडेऱ्या केल्या तर आम्हाला दुःख होईल असे कोणी म्हणू नये.

चक्रवाक पक्षी हा आकाराने सुमारे २५ इंच लांब पक्षी आहे. चक्रवाक हा वजनदार असून त्याचे सुमारे ४.५ रत्तल (आताच्या २ किलो) वजन असते याचे डोके व मान यांचा वर्ण पांढरा शुभ्र, कपाळ पिवळसर चोच, पाय काळे शेपटीकडील पिसारा हिरवट व ओटिपोटी व पाठीचा भाग नारिंगी असतो. चक्रवाकी ही आकराने चक्रवाका पेक्षा अंमळ ल्हान असते. या दोघात आकाराशिवाय आणखी एक ठळक फरक असतो चक्रवाकाच्या गळ्या भोवती जो सुमारे दोन इंची काळा गोफ आहे. तसा गोफ चक्रवाकीच्या गळ्यांत नाही अगदी उघड्याबागड्या गळ्याने तिला या जगांत परमेश्वराने लोटून दिले आहे. जन्मा बरोबर लाभणाऱ्या अंग कांतीच्या बाबतीत पक्षी जातीतील स्त्रियांचा परमेश्वराने अगदी केसाने गळा कापला आहे. असे पक्षिणी म्हणत असल्यास ते निर्भेळ सत्य आहे.

चक्रवाक पक्षी भारतांत बाराही महिने असणारा पक्षी नाही. भारतात हिवाळ्यास प्रारंभ होताच उत्तरेतील देशांतून हा पक्षी विमानमार्गे येतो. कांही महिने येथे राहून हा पुन्हा देश पर्यटणाला निघतो. भारतात हा पक्षी विशेषेकरून हिमालयाच्या पायथ्यालगतच्या

भागांत लडाखमध्ये सरोवरे, तळी, नद्यानाले, ओढे यांच्या आजूबाजूस आढळतो. पाण्यांत उत्तम तऱ्हेने पोहतो. पुन्हा जमिनीवर तो डौलदारपणे चालतो. ह्या पक्षांचे खाणे म्हणजे ओल्या गवताचे बी व धान्यकण. चक्रवाक सरोवरे, तलाव, तळी यातून उगवल्या जाणाऱ्या वनस्पतीचे देठही खात असतो.

ह्या वरून हा पक्षी अगदी सात्विक आहाराचा साळसूद पक्षी आहे हे ध्यानी येईल. परंतु कांही दिवसांमागे ' इंडियन स्पोर्टींग रिव्हयू ' नावाच्या एका नियतकालीकांत हा (चक्रवाक) नदीकांठी गिधाडांच्या घोळक्यात पंगूंच्या मृतदेहांवर मेजवानी झोडतांना अनेक वेळा दिसतो असा त्याच्यावर मोठा घोर आरोप एका लेखकाने केला होता हा आरोप म्हणजे एखादा घनपाठी वैदिक ग्रीन किंवा लकीमध्ये कुक्कुट भक्षण करतांना दिल्याच्या आरोपाएवढा गंभीर आहे. जरदॉनने हा आरोप म्हणजे शुद्ध कुभांड आहे. असा आपला अभिप्राय व्यक्त केला आहे. तो म्हणतो " मी गंगाकांठी आणि दुसऱ्या नद्यांच्या काठी चक्रवाकावरील अभक्ष्य भक्षणाचा हा आरोप खरा आहे की काय हे पाहण्यासाठी हिंडलो परंतु अशा तऱ्हेच्या वर्तनाचा नुसता संशय येईल अशा स्थितीत चक्रवाक मला कधीही आढळला नाही. मी शिकारी लोकांस विचारूनही ह्या गोष्टीची सत्यता पाहिली आहे

ह्या पक्षांच्या स्वरांविषयी थोडेसे पूर्वी लिहिले आहेच. पण हा पक्षी ' आऊगा " असाही आवाज काढतो. हा आवाज सनईच्या सुराप्रमाणे चांगला खणखणीत असतो. चक्रवाक व चक्रवाकी ही एकमेकांपासून विलग झाली की हा आवाज दोघेही गळा काढून काढीत असतात. त्यामुळे पहिल्या दंतकथेसारखी दुसरी एक दंतकथा झाली आहे. चक्रवाक दुसऱ्या थडीवर असलेल्या चक्रवाकीला विचारतो, " आंऊ ? " चक्रवाकी त्याला तिकडूनच उत्तर देते, ' अरे मध्ये ही दुथडी भरून वाहाणारी नदी आहे. ना सख्या ! तू येऊ नकोस. ' प्रश्नोत्तरांचा हा गोंधळ रात्रभर चालू असतो अशीही पहिल्या दंतकथेची पुरवणी आहे.

चक्रवाक पक्षाला आपणच देवपक्षी म्हणतो असे नाही. मंगोलियन लोक, इजिप्शियन लोक हेही आपल्याप्रमाणे ह्या पक्षाला पवित्र मानतात. युरोपियनांनी देखिल ह्याचे नांव ब्राम्हणी बदक " असे ठेवले आहे.

साऱ्या वर्षभर आपल्या प्रिय सखीच्या समागमे भारतांतून उत्तर देशात व उत्तरदेशातून भारतात यात्रा करीत हिन्डणाऱ्या, विलायती देशांत राहूनही भलते सलते खाण्याच्या मोहांत न सांपडणाऱ्या या पक्षाला पवित्र म्हणायचे नाही तरी मग त्या पावित्र्याला याहून दुसरा चांगला धनी तरी कोण सांपडणार ?

● ● ●

# गरूड

गरुड या नांवाने सर्वास माहीती असलेल्या पक्षांची माहीती आज आपणांस करून घ्यायची आहे. पण हा गरूड म्हणजे भक्तकाम कल्पद्रुम महाविष्णू भक्तांची धांव ऐकतांच ज्यावर आरूढ होऊन वायुगतीने धांवत जातात तोच हा गरूड की दुसराच कोणी तोतया गरूड पक्षी आहे हे मला छातीवर हात ठेवून सांगता येणार नाही. यासंबंधी अगदी भंरवशाची माहीती वैकुंठावाचून इतरत्र मिळण्याजोगी नाही. त्यामुळे निरुपायाने हा विषय तूर्त येथेच सोडून देणे प्राप्त आहे.



गरूड ( हॉर्नबिल )

हा गरूडपक्षी साधारणपणे गिधाडाच्या आकाराचा; पण गिधाडापेक्षा कितीतरी देखणा पक्षी आहे. या पक्षाची चोंच खूप लांब व बांकदार असते. ही बांकदार चोंच हेच या पक्षाला गरूड हे नांव पडण्याचे प्रमुख कारण असावे. महाविष्णूचे ओझे या पक्षाला पेलेल की नाही; हे सांगता येणे कठीण आहे पण ५२ इंच लांबीचा हा धसमर पक्षी एखाद्या लहान पोराला पाठगुळीस मारून उडून जाण्याइतका ताठ निश्चीत आहे.

इंग्रजीत ह्या पक्षाला ग्रेट हॉर्नबील म्हणजे शिंगासारख्या चोंचीचा पक्षी अशी संज्ञा आहे. इंग्लंडमध्ये मात्र हा पक्षी आढळत नाही. शास्त्रीय परिभाषेत हे गरूड पक्षी बायसॅस्ट्रीस अथवा बायकॉर्निस म्हणजे दोन चोंचिचे पक्षी ह्या नांवाने ओळखले जातात. गरुडाच्या लांब व बांकदार चोंचीवर आणखी एक चोंचीसारखी हाडाची एक टोपी असते. ह्या टोपीचा व्यवहारांत या पक्षांना कांही उपयोग आहेसे दिसत नाही. कांही पक्षी शास्त्री ह्या टोपीचा उपयोग मोटारीच्या पाट्याप्रमाणे धक्के सौम्य करण्याकडे होत असतो असे समजतात.

ह्या पक्षांचा आकार, काळा व पांढरा रंग कर्कश, केकाटण्याचा आवाज या खाणा खुणावरून ह्या पक्षाची ओळख न पटणे असंभवनीय आहे. मैल अर्धा मैल अंतरावर असलेल्या या पक्षांची कर्णकटु ओरड कानांत घुसल्या वांचून रहात नाही. हा पक्षी उडतांना याच्या पंखानी हवा कापली जाते. त्यावेळी दोन्ही हातांनी सूप हवेत झटकल्यावर होणाऱ्या आवाजा प्रमाणे आवाज ऐकू येतो. हा पक्षी भरधाव उड्डाण करतो. उड्डाण करताना होडीवाला ज्याप्रमाणे चार वल्ही मारतो, थांबतो पुन्हा चार वल्ही मारतो तसा प्रकार चालतो. चार पंख मारून हवेत थोडे तरंगावे, पुन्हा चार पंख मारावे अशी याची उडण्याची पद्धत आहे. गरूड पक्षाचा विशेष आवडीचा आहार म्हणजे फळे, पिकलेले काजू, कुंभ्याची फळे आपल्या चोचीने भसाभस आदळून फोडून खातो. पण फळाशिवाय याला दुसरे काही चालत नाही असे नाही. मधून मधून सरडे, चोपई, पाली याच्या तडाक्यात सापडल्या तर त्यांचाही गरूड समाचार घेतो.

या पक्षाचे घरटे उंच झाडाच्या ढोलीत असते. जानेवारी ते एप्रिल महीन्यांत या ढोलींमधून मोठी धांदल सुरु असते. हा या पक्षांच्या विणीचा हंगाम होय. एका वेळी पाचापर्यंत अंडी गरूड पक्षीण घालीत असते. गरूड पक्षी हे सतत भारतात राहणारे पक्षी आहेत. युरोपांत गरूड पक्षांशी साम्य असणारे पक्षी नाहीत. भारतात गरूडाच्या मुख्य दोन जाती आहेत. हिमालयाकडे आढळणारी गरूडाची जात ही आकाराने सर्वात मोठी आहे. सह्याद्रीचे परिसरांत व त्रावणकोट पर्यंत पसरलेल्या मलबार किनाऱ्यावरील गरूडांची जात आकाराने लहान असते. ह्या दक्षिणेकडील गरूडांना चोचीवरील हाडांची टोपी असत नाही. करडा गरूड हा गरूडांचा आणखी एक प्रकार भारतात आढळतो. ही पूर्णपणे भारतीय अशी पक्षांची जात समजली जाते. हे करडे गरूड पक्षी घारीच्या आकाराचे पक्षी आहेत. या पक्षांच्या मलबार कडील जातीतही चोचींवर जी आणखी एक टोपी असते ती दिसून येत नाही. भारतात सरहद्द प्रांत सिंध व पंजाब खेरीज हा करडा गरूड सर्वत्र आढळतो.

करडा गरूड मोठ्या गरूडांपेक्षा आकाराने लहान असतो. तसाच त्याचा स्वरही या मोठ्या गरूडाहून भिन्न आहे. ह्याचा आवाज घारीच्या चित्कारा एवढा असतो. वडाची फळे ही करड्या गरूडाची फर्माईश ती पोटभर मिळाली की त्यापुढे दुनियेतल्या सर्व वस्तू त्याला तुच्छ वाटतात. हे पक्षी रानमाळी पक्षी आहेत. अगदी उघड्या मैदानाच्या देशात हे फारसे आढळणार नाहीत. या पक्षाचे घरटेही मोठ्या गरूडाप्रमाणेच उंच झाडाच्या ढोलीत असते. एकदा एखाद्या ढोलीत बिहाड मांडले की मग अनेक वर्षे गरूड तेथेच राहतो. थारे पालट करण्यच्या हा पक्षी विरूद्ध आहे.

करड्या गरूडांच्या म्हणजे ( गरूड पक्षीणींच्या ) बाळंतपणाचा बाळंदा भलताच असतो. गरूड पक्षीणीला आपल्या बाळंतपणाची तिथे जवळ आली असे वाटू लागले.

म्हणजे ती बाळंतीणीची खोली स्वतःच तयार करण्याच्या मार्गास लागते. ज्या झाडाच्या ढोलीत तिचे घरटे असते त्याचे थोड्याच दिवसात आपल्याकडे जुन्या काळी बाळंतीणीच्या अंधाऱ्या खोल्या असत तशा खोलीत रुपांतर होते. ही अंधारी खोली गरूड पक्षीण एकट्यानेच हलके हलके तयार करते. ही खोली तयार करण्यास लागणारा मालमसालाही परमेश्वराने तिजपाशी ठेवलेला असतो. घरट्याचें तोंड सिमींटासारख्या त्वरीत घट्ट होणाऱ्या मुख रसापासून ती सारवून घेते. एक चोच तेवढी बाहेर काढता येईल येवढेच छिद्र शेवटी घरट्याला ठेवून ती आत राहू लागते. ही बाळंतीणीची खोली तयार करण्यात तिचे यजमान तिला हातभार लावीत असल्याचे कोणी सांगत नाही. बाळंतपणाचे काम करणे हे पुरुषांचे काम नाही असा अहंभाव गरूडाला कदाचित वाटत असावा. गरूड पक्षीणीचा बंदीवास काही आठवडे चालतो. कारण पिले चांगली आठदहा दिवसांची होईपर्यंत ती तिच्या बाळंतीणीच्या खोलीतून बाहेर पडत नाही. अन्न उदकाचा व्यवहार घरट्याच्या छिद्रांतून चालतो. यजमान बाहेरूनच एक एक घास गरूड पक्षीणीस देतात

मुलांच्या बारशाच्या दिवशी ही गरूड पक्षीण बाहेर पडते. तेव्हा जागच्या जागी बसून साजूक तुपाचा सांजा खाणाऱ्या बाळंतणी प्रमाणे ती तुकतुकीत आणि पुष्ट दिसते. तिला बाळंतपण चांगलेच मानवते. काही दिवस तिला उडता येण्याचीही मुष्कील पडते. गरूड पक्षीणीच्या वार्षिक बाळंतपणाची कथा ही अशी आहे.

गरूड पक्षीण ज्यापेक्षा अद्याप येवढी मूर्ख राहीली आहे त्यावरून गरूड पक्षीणीत काडीचीही सुधारणा अजून झाल्याचे दिसून येत नाही. बाळंतपणाच्या या बारा भानगडी करण्यापेक्षा कुटुंबनियोजनाचे एक छोटे केंद्र उघडल्यात किती बरे होईल; असे आमचे एक मित्र गरूड पक्षीणीच्या बाळंतपणाची हकीकत वाचून आम्हा प्रत म्हणाले मीही आरोग्य मंत्र्याकडे शिष्टमंडळ पाठवण्याचा सल्ला त्यांस दिला आहे.

• •

# खंड्या पाणनदीकर

एखादे वेळी चुकलेला फकीर मशिदित सापडणार नाही पण खंड्या (पाणनदीकर) हा पक्षी मात्र नदी, नाले, ओढे, झरे यांच्या आसपास हटकून आढळलाच पाहिजे खंडया पक्षी हा गोड्या पाण्यातल्या मासळीचा फार लालची आहे. क्वचीत भरतीचे पाणी फिरल्यावर ठिकठिकाणी मचूळ पाण्याचे डोहरे तयार होतात. तेथेही खंड्या आढळणे शक्य आहे.

हेच उलट रितीने सांगायचे झाले तर असे सांगता येईल की जेथे जेथे खंड्या पक्षी आढळतो [ अर्थात मुंबईचे आल्बर्ट म्युझीयम सोडून ] तेथे तेथे नदी म्हणा झरा म्हणा अथवा एखादा तलाव तरी खास असलाच पाहिजे. म्हणजे खंड्या पक्षाला ''पाणीवाला महाराज'' म्हणण्यासही हरकत नाही. फरक ईतकाच की पाणीवाला महाराज हे भू-पृष्ठाखालचे पाणी दाखवितात. आणि खंड्या भू-पृष्ठावरचे पाणी दाखवतो.



खंड्या ( किंग फिशर )

समुद्रावर खंड्या पक्षाचा संचार असत नाही, खंड्याला शिकस्त म्हणजे समुद्र किनाऱ्यापर्यंत दिसणे शक्य आहे. हे सांगायचे कारण म्हणजे एका बारीक निरीक्षण सृष्टी निरिक्षण करणाऱ्या लेखकाने आम्ही 'चंपावती' बोटीने कोकणात जात असता आमच्या बोटीवर खंड्या पक्षी येऊन बसला असे एका मुंबईच्या वर्तमान पत्रात लिहीलेले माझ्या वाचनात आले आता छाप्यात आलेले सर्व खरे व बरोबर असते असे प्रामाणिकपणे मानणारा वाचकांचा फार मोठा वर्ग आहे. त्यांचेशी हुज्जत घालण्याची आपली हिम्मत नाही. पण दुसरे जे वाच आहेत त्यांना मी निश्चितपणे सांगू शकतो की चंपावती किंवा कोंकण किनाऱ्यावरून जाणाऱ्या दुसऱ्या बोटी या निदान किनाऱ्यापासून तीन चार मैलावरून जातात. इतक्या अंतरावरून जाणाऱ्या चंपावती बोटीच्या डोल काठीवर खण्ड्या पक्षी येऊन बसला असणे संभवनीय नाही. समुद्रावर संचार करणाऱ्या पक्षांचे अंगी दोन गुण तर खासच असावे. एक तर लांब अंतरापर्यंत कुठेही न थांबता उडणे व दुसरा पाण्यांवर तरंगता येणे. या दोन्ही गोष्टी खंड्या पक्षास अवगत नाही.

खंड्या पक्षी अगदी खरा मत्स्यगोत्री आहे. सांज असो वा सकाळ असो, उपास असो वा पारणे असो खंड्याचे माशांवाचून पान हलायचे नाही. म्हणूनच खंड्याला इंग्रजीत किंग–फिशर असे अन्वर्थक नाव मिळाले आहे. मराठीतले ह्याचे खंड्या हे नाव नागर मंडळीनी दिलेले दिसते. याचे मूळचे नांव खांड्या असावे. माशाला पकडून आणल्यानंतर त्याची खांडकी करून खातांना अनेकवेळा खेडेगावातल्या मंडळीनी याला पाहिल्यानंतर याचे नांव त्यानी खांड्या पक्षी ठेवले असण्याचा संभव आहे.

“ हिन्दुस्थानांतील पक्षी ” या पुस्तकांचे कर्ते श्री. कोल्हटकर यांनी आपल्या पुस्तकांत खंड्याचे गण्या असेही एक नांव असल्याचे नमूद केले आहे. खंड्या पक्षी छान गातो म्हणून त्यास गण्या म्हणतात. अशी एक झक्क थाप मी थापाड्या असतो तर तुम्हास मारून मोकळा झालो असतो. पण आपल्याला थापा मारायच्या नाहीत. म्हणून सांगतो की या खंडोबाचे गणोबा कसे व केव्हा पासून बनले ते आपल्याला मुळीच माहिती नाही.

शिवाय खंड्या गातो ही थाप मी मारली तरी ती फार दिवस पचणे शक्य नाही. कारण “ आवाजी ” म्हणून ज्याला नाव देता येईल ते खंड्या पक्षाजवळ मुदलांत नाही. खंड्याला मान असला तरी गळा मुळीच नाही असे म्हणायला अगदीच हरकत नाही. खंड्या पक्षाचा एक पिंगलवर्णी लाल चोचीचा एक भाईबंद आहे. तो तर उडताना कें कें कें कें अशा कर्कश किंकाळ्या मारीतच उडतो. फारच झाले तर रडगाणे असे म्हणता येईल. असे रडगाणे खंड्या म्हणत असलेला ही क्वचित आढळतो. एकुण गणोबा गाण्याचे बाबतीत गुळाचे गणपती आहेत.

खंड्या नदी नाल्याचे काठी एखादी सोईस्कर जागा शोधून काढतो. मच्छिमारीचे काम तेथून चालते. पाण्याच्या हालचालीवर त्याचे बारीक लक्ष असते. पाण्याखाली काही विशेष हालचाल झाली, काहीतरी वळवळल्याचा भास झाला की खण्ड्याने झपकन पाण्यात सूर मारलाच. मासेही काही कमी बिलंदर नसतात. केव्हाच खण्ड्याला झुकांडी देऊन दूर पसार होतात. अनेक वाऱ्या कराव्यात तेव्हा एखादा मासा सापडतो. माशांचे रेशनवर खण्ड्याचे भागत नाही म्हणून भरीला खण्ड्या कोवळे बेडूकही खातो. मासा असो वा बेडूक त्याला पकडल्यावर पुढचे काम खण्ड्या अगदी समरीत चालवतो. एखाद्या खुंटावर नेऊन दहा पाच वेळा माशांची आदळ आपट करण्यात येते या आदळ आपटीतच तो अर्धमेला होतो. आणि त्याचा पुरा जीव जाण्या पूर्वीच तो सदेह स्वर्गाला जातो. [ पुंडलीक वरदे हरि विठ्ठल ]

खंड्या जेथे मच्छिमारी करतो त्या जागे विषयी त्याला विलक्षण प्रेम उत्पन्न होते. त्या प्रेमापाटी पुढे स्वामीत्वाची कल्पना उद्‌भवते. एकदा एखाद्या नदीवर ही

मिया बिबी राहू लागली की तेथे दुसऱ्या कोणी येता कामा नये. अमेरिकेचा मनरो साहेब म्हणत असे की अमेरिकेच्या किनाऱ्यावर डोळा ठेवून जो कोणी एखादा परका माणूस येईल तो अमेरिकेचा वैरी समजला जाईल. खंड्याचेही म्हणणे असेच साधे सरळ आहे. एका म्यानात जशा दोन तलवारी राहू शकणार नाहीत ( किंवा काँग्रेसच्या राज्यात एका पुरुषाच्या घरात दोन लग्नाच्या बायका असू शकत नाहीत. ) तसे एका नदीवर अथवा पाणवठ्यावर दोन खंड्यांची लुडबुड जमायची नाही. घटकाभर दुसरा खंड्या आला आणि एकदा मासा पकडला तर ते क्षम्य आहे. पण तो बाडबिस्तरा सोडून तेथेच बिऱ्हाड मांडू पाहील तर त्याला चंचू युद्धाला सज्ज राहीले पाहीजे. त्या मरण मारण युद्धात जगेल वाचेल तो नदीचा स्वामी. मनरो साहेबाच्या " मनरो–डॉक्ट्रीन " प्रमाणे खंड्याचे हे ' खंडो–डॉक्ट्रीन " आहे.

ङ ङ ङ

खंड्याला गोड आवाजी दिली नाही त्याचा पुरा वचपा रंगाचे बाबतीत परमेश्वराने भरून काढला आहे. इंद्रधनुष्याचे जवळ जवळ सगळे रंग खंड्याच्या अंगावर परमेश्वराने गोंदले आहेत. डोक्यावर निळा काळा, पोटाला रसरशीत केशरी, पंखामध्ये हिरवा व निळा, चोचीत काळा कुळकुळीत, पायात पोवळ्यासारखे लाल. खुबसुरत पक्षांत खंड्याचा क्रम बराच वरचा लागतो.

खंड्या म्हणजे सुंदरतेचे चित्र. सुन्दर पक्षी काय आणि सुन्दर माणसे काय त्यांची घरे दारे ही झकपक असावीत असा नुसता भ्रम नव्हे पुष्कळांची खात्री आहे. खंड्याचे घरटेही मोठे झुलते, नाजुक साजुक असेल आणि त्यात खंड्या व सौ. खंड्या अवघा संसार सुखाचा करीत नांदत असतील अशी कल्पना येणे साहजिकच आहे. पण परिस्थिती अगदी विरूद्ध आहे. खंड्या झाडावर घर बांधीतच नाही. ज्या नदीवर तो मच्छिमारी करतो त्या नदीच्या काठी भुयारासारखे एक विवर खोदून त्यात खंड्या राहतो. घरात टापटीप तर राहीली बाजूला. घरभर माशाच्या हाडांचा नुसता पेर पडलेला असतो. घरातला चार चार दिवसांत केर भोवंडला नाही की घराचा जसा उकिरडा होतो तशी खंड्याच्या घरांची अवस्था असते.

खण्डया पक्षांतही पोटजाती असाव्यात ही गोष्ट लांच्छनास्पद आहे ! ( वास्तविक खण्डया पक्षांनी आता पोट जातीत विवाह करून खण्डया पक्षांतील पोट जातीचा उच्छेद केला पाहीजे ) तरीपण आज खण्डयाच्या एक नाही चार पोट जाती आहेत ही गोष्ट सत्य आहे खण्डया पक्षी हा अल्सेडाईन वर्गातला पक्षी आहे. खण्ड्याची मुख्य जात ॲल्सेडो ॲथिस अथवा ॲल्सेडो बेंगॉलेन्सिस असे शास्त्रीय नांव आहे. तिचे वर्णन येथवर आले आहे.

खण्डयाची दुसरी जात आहे. तिला खड्डू पट्टेकर असे नांव बरे दिसेल. या खण्डयाचे अंगावर काळे पांढरे पट्टे असतात. याची चोंच लांब व अणकुचीदार असून त्याचे

डोकीवर तुरेवजा काहि पिसारा असतो. देशावरील नद्यांच्या काठी हा पक्षी नेहमी दिसतो. खण्डयाची व याची राहणी, उपजिवीकेची पद्धत यात फारसा फरक नाही. मासळी मारण्यात हा जरा जास्त तरबेज आहे. हा आकाराने खण्डया पेक्षा बरांच मोठा आहे. याचे शास्त्रीय नांव 'सेसइल रुडीस' असे आहे. याचीच हिमालयात आढळणारी पोटजात आकाराने बरीच मोठी आहे. ह्याला सेराईल ल्युग्युविस अशी शास्त्रीय संज्ञा आहे. हिमालयाची हद्द सोडून हा खण्डू (पट्टेंकर) फारसा कोठे जात नाही.

खण्डयाच्या आणखी दुसऱ्या दोन जाती आहेत. त्यांत मुख्य फरक चोंचिच्या रंगात व आकारांत असतो. आपला खंडू साधारण चिमण्याच्या आकाराचा असतो. खंडयाच्या या दोन जातींच आकार मैनेच्या आकारा एवढा असतो. एका लाल चोचीच्या खण्ड्याला आपण खण्डू पिंगळे म्हणू व दुसऱ्याला खण्डू ढवळे. खण्डू पिंगळे व खण्डू ढवळे यांची शास्त्रीय नांवे ही मनोरंजक आहेत. खण्डू पिंगळ्याचे नांव रामफिलपिअन कॅपेन्सिस दुसरे खण्डू ढवळे यांना शास्त्री मंडळी हाल्सीयॉन स्मर्मेनपीस या नावाने ओळखतात ह्या खण्डू ढवळ्याची एक पोटजात सिलोन त्रावणकोर कडे आहे.

खण्डू ढवळे याचे रंगही खंडया पाणनदीकराप्रमाणे मोठे चित्तवेधक असतात. कोकणातल्या लोकांना याची ओळख करून देण्याची जरूर नाही. याची लाल चोच भली मोठी असून त्याने अंगात शुभ्र हाफशर्ट घातल्यासारखा भास होतो. स्नानाची याला फार आवड आहे. विहिरीजवळ ठेवलेल्या मोठ मोठ्या घंगाळातूनही हा आपले स्नान करतो.

खाण्यापिण्यात हा जरा साळढाळ आहे. मासे, बेडूक कुरल्या सर्व कांही याला चालते. ॲटकिन्सने याच्या खादाडपणाची एक गोष्ट नमूद केली आहे. ॲटकिन्सनच्या मित्राने एक पक्षिशाळा जमवली होती. त्यात लहान लहान छबडी पांखरेच पुष्कळ होती. त्याला एक खंडया पक्षीही लाभला. त्यालाही या शाळेत दाखल करून घेतले. हे नवे विद्यार्थी पक्षी शाळेत दाखल झाल्यानंतर थोडयाच दिवसांत शाळेच्या पटावरची पक्षीसंख्या पटापट घटू लागली. एके दिवशी वर्गाचे मॉनिटर खण्डू ढवळे हेच पोरांचा फराळ करीत असताना दिसले. लगेच त्याना शाळेतून काढून टाकण्यात आले

खण्डू पिंगळे व खण्डू ढवळे यांच्यात डोक्याच्या रंगांत व इतर किरकोळ फरक आहेत. पण खण्डू पिंगळे यांची विशेष उल्लेखनीय अशी अशी कामगिरी दिसून येत नाही.

माझ्या माहितीचे एका गृहस्थास रिकामा माणूस पहिला की त्याला कायरे किती कावळे मोजलेस असा प्रश्न विचारण्याची सवय होती. कावळे मोजीत बसणे हे अगदी रिकामटेकडेपणाचे लक्षण एखादेवेळेला होऊ शकेल. पण जंगलची दुसरी पाखरे कशी राहतात, काय खातात ह्यांचे स्वर कसे आहेत हे पहात बसणे रिकामटेकडेपणाचे असेल काय ? पांखरे मोजून पोटही भरणार नाही हे ही कबूल. पण अहो, पोटापाण्याचे आणि भाकरीचे प्रश्न आहेतच. रोजचे. पण राव ! माणसाला कांही डोकं, मन, आत्मा, अंतःकरण ही आहेतच की !

# " करढोक "

## साऱ्या मुलुखाचा बुजरा पक्षी

मिशी दाढी आणि मतें ह्यांची मक्तेदारी फक्त माणसाकडे आहे असे माणसांना वाटणे शक्य आहे. पण पक्षी जातीतही कांही पक्षांना दाढीमिशा असतात येवढेच नव्हे तर दाढीमिशावाल्या पक्षांचा एक स्वतंत्र वर्ग पक्षी शास्त्रज्ञानी पाडला आहे. या वर्गातील पक्षांना इंग्रजीत बारकेटस असे म्हणतात. बारकेटस म्हणजेच दाढीमिशीवाले पक्षी.

करढोक पक्षी हा दाढीमिशीवाला पक्षी आहे. या वर्गातील पक्षांत तांबट पक्षांचीही गणना होते. नाईटजार नांवाचा पक्षी या मिशाळ वर्गातला नसला तरी त्यालाही मिशा आहेत. या मिशावाल्या पक्ष्यांच्या मिशातही पुन्हा फरक आहे. तांबट आणि करढोक पक्षी यांच्या लांब आणि कांहींशा तात्यापंतोजी मिशांच्या वळणावर गेल्या आहेत. नाईटजारच्या मिशा जिथल्या तिथे कातरीने बारीक केलेल्या मिशाप्रमाणे असतात.



**करढोक** ( ग्रीन बार्बेट )

करढोक पक्षाचा परिचय खेड्यापाड्यातल्या ग्रामीण लोकांस करून देण्याची गरज नाही. कदाचित त्याच्या रंगरुपाचे वर्णन ते करुं शकणार नाहीत पण त्यांच्या दारच्या वडपिंपळाच्या झाडांतून जो कुरडुक कुरडुक असा आवाज दिवसभर ऐकू येतो तो कुणी विसरुं शकत नाही. कुरडुक कुरडुक या मंत्राचा अर्थ काय आणि हा पक्षी हा मंत्र जपून कोणत्या देवतेची आराधना करत असतो ह्या प्रश्नांचे उत्तर पक्षी शास्त्रज्ञानी नमूद करून ठेवलेले नाही. कुरडुक कुरडुक हा जप मात्र एकदा सुरु झाला की सारखा पांच पन्नास वेळा तरी ऐकू येतों. थोडा थोडा दम खाऊन पुन्हा पुन्हा हा पक्षी कुरडुक कुरडुक मंत्राचा जप करीत असतो.

हा करढोक पक्षी साऱ्या मुलखाचा बुजरा पक्षी आहे. उंच झाडाच्या शेंड्यावर दाट पानजाळीत तो नेहमी वावरतो. म्हणूनच ह्या पडदानशीन पक्षाचे दर्शन जरा दुर्लभ झाले आहे. दाखला द्यायचा झाल्यास असे म्हणेन की माधव बागेतील कृष्ण भगवानाचे दर्शनासाठी भक्तांना तिष्ठत बसावे लागत नसेल इतके ह्या पक्ष्याच्या दर्शनासाठी आपणाला खोळंबून रहावे लागते. कोणी तरी आपल्या पाळतीवर आसपास उभा आहे येवढा संशय आला पुरे. करढोक पक्षी लगेच आपला रेडिओ बंद करू अगदी गुपचुप बसेल. त्याचा संशय पुरत फिटेपर्यंत झाडावरून तुम्हाला ब्रही ऐकू येणार नाही. कपडे शिवायला आलेल्या गिऱ्हाईकाचे शिंपी जसे टेप लावून माप घेतात तितक्या काटेकोर पणे पक्षी शास्त्रज्ञानी ह्या पक्षाचे मोजमाप लिहून ठेवले आहे. ते सगळे मोजमाप येथे देण्याची आवश्यकता नाही. या पक्ष्याच्या ढोबळ खूणा दिल्यास आपला कार्यभाग होईल.

करढोक हा मैनेच्या आकाराचा हिरव्या रंगाचा पक्षी आहे. ह्याच्या हिरव्या अंगावर पांढरे पट्टे असतात. हा बहुधा जमीनीवर चरतांना आढळत नाही. ह्याचा फलाहारावरच विशेष भर आढळतो. इंग्रजीत ह्या पक्षाला ग्रीन बारबेट असे म्हणतात. या हिरव्या करढोकाच्या तीन लहान मोठ्या पोटजाती आढळतात. महाराष्ट्रांत आढळणारी जात ही आकाराने सर्वात लहान असते. त्रावणकोर, सिलोनकडे व वरती संयुक्त प्रांतांत म्हणजे आताच्या उत्तरप्रदेशात याच्या दोन पोटजाती आंहेत.

या करढोकचा हिमालय करढोक म्हणून एक जाणता भाऊ आहे. हिमालयाचे पायथ्यापासून तो सुमारे ८०० फूट उंची पर्यंतच्या भूभागांत याची पैस असते. बुजरेपणा व पडदपोस पणा हे गुण याच्याही अंगी आहेत. करढोकचा दुसरा दायजी आसामकडे दिसतो. रुप व वर्ण या बाबतीत जरा उजवा येईल. याचा कंठ निळा असतो. सर्व अंग हिरवे असते. रसीक लोकांनी याचे नांव बसंत बासरी असे ठेवले आहे. पक्षांची नांवे कशी पडतात हा एक मनोरंजक विषय आहे. पक्षाच्या आवाजावरून त्यांची नांवे ठेवण्याची रीत हीच सर्वसामान्य रीत दिसते. चिव चिव करणारी चिमणी. काव काव करणारा कावळा, पावशागो म्हणणारा पावशा, चकर असा आवाज काढणारा तो चक्रवाक, करढोक पक्षाचे नांवही तो कुरडुक असा तो करीत असलेल्या आवाजावरूनच पडले असावे.

हा करढोक पक्षी जो आवाज करतो त्याचे निरनिराळ्या लोकांनी निरनिराळे स्वर लेखन केले आहे कोणी तो आवाज कुटुर असा लिहीतात. एका लेखकाने या पक्षाचा आवाज "पकराव पकराव" असा उच्चार झपझप केल्यास जसा आवाज येईल तसा असतो असे म्हटले आहे. मी लहानपणी माझ्या आजोळी या पक्षांचा आवाज ऐकला त्यावेळी मला तो आणखीच निराळा वाटला. आमच्या आजोळी हरी टुकरूल आणि गोपाळ टुकरूल असे दोन कुणबी होते. हा पक्षी टुकरूलटुकरूल करून त्यादोघा टुकरुलाना हांका मारीत असावा असे माझ्या पोरबुद्धीला कैक दिवस वाटत असे. आगगाडीच्या

आवाजात कोणाला ती कशासाठी पोटासाठी खंडाळ्याच्या घाटासाठी असे म्हणत आहे असे वाटते तर दुसऱ्या कोणाला ती दुसरे कांही तरी म्हणत असल्याचा भास होतो. त्यातला हा प्रकार आहे.

हिमालयांतल्या करढोकचा आवाज आपल्या करढोकपेक्षां वेगळा आहे. त्याच्या दोन तीन आवाजांत अन्याय, अन्याय असा एक आवाज आहे. तेथील लोकांनी या करढोकच्या आवाजावर मल्लीनाथी करून एक दंतकथा रचिली आहे. ते म्हणतात कि पूर्वी कधीतरी ह्या हिमालय करढोकाचा एक कज्जा कोर्टास चालला. पण कोर्टाने त्या कज्ज्याचा निकाल त्या करढोकाच्या विरुद्ध दिला तेव्हा कोर्टाने आपल्यावर अन्याय केला आहे असे करढोकाला वाटले. तेव्हा पासून आजमितीपर्यंत तो अन्याय अन्याय असे घोकीत राहीला आहे.

या करढोकचा आणखी एक विशेष म्हणजे यांचे घर. हा पक्षी इतर पक्षांप्रमाणे घरटे बांधीत नाही पोकळसे झाड पाहून त्यात तो एक गोल आकाराची जागा तयार करतो. गोल पोकळ जागेतच ह्या पक्षाची अंडी असतात.

हा पक्षी हिरवागार खरा पण त्यांचा बांधा असावा तितका सुबक नाही म्हणून त्याला लोक पिंजऱ्यात पाळीत नसावेत. शिवाय ह्या पक्षांना मिशा असतात हेही फॅशनेबल लोक याला का पाळत नसावे याचे एक कारण असू शकेल. ह्या बाबतीत लोकांचे फारसे चुकते असे म्हणायला जागा नाही दयाळू परमेश्वराने उदार होऊन करढोक नरालाच काय पण करढोक मादीलाही मिशा दिल्या आहेत परमेश्वराचा उदारपण मान्य पण म्हणून असले हे सोंग पिंजऱ्यात कोण पाळणार ?

● ● ●

# गान सम्राट कोकीळ

पक्षी शास्त्रज्ञांनी पक्ष्यांचे त्यांच्या शरीर रचनेवरून आणि त्यांच्या गुणधर्मावरून निरनिराळे वर्ग पाडले आहेत वांकड्या चोचिचे कावळे ते कॉरवाईड, फुलातला मध चोखणारे फुलचुखे ते नेक्टनारिइड; सुवर्ण वर्णाचे पावशे ते ओरिओलाईड; शिकार करणारे बहिरी ससाणे ते फॉकनाईड. याच पद्धतीने कोकीळ पक्षी हा कब्युलाईड या वर्गात गणला जातो. कोकीळ पक्षाच्या वंशवेलाचा विस्तार फार नसला तरी दुसरे सात आठ पक्षी या वंशांत आहेत. ज्यांचे दर्शन घडणे म्हणजे फार मोठा शुभ शकून झाला असे समजतात. ज्याचे दर्शन म्हणजे तोंड गोड होण्याची हमखास खात्री मानतात तो भारद्वाज अथवा कुकुडकुंभा नांवाचा पक्षी या कोकीळ वर्गातलाच पक्षी आहे. व्हिसलर या पक्षी शास्त्रज्ञाने भारद्वाजा खेरीज, जिला इंग्रजीत ‘ ककु ’ असे नांव दिले आहे, तो कविजनांचा प्यारा पक्षी, मलकोहा, पट्टेरी तुरेवाली ककु हे पक्षी या वर्गात समाविष्ट केले आहेत.



कोळशा ( किंग क्रो )

कोकिळ हा पक्षी सुमारे सतरा इंच लांबीचा कावळ्यासारखा कृष्ण वर्णी :पक्षी आहे. त्यापेक्षा तो नीटस आणि देखणा आहे. कोकीळाच्या काळेपणांत एक प्रकारची हिरवी-निळी झांक असते. त्याची चोंच हिरवट रंगाची, भृकुटी गुंजवर्णी शेपटी लांब असते. हे जे वर्णन आहे ते अर्थात सौभाग्यवती कोकिळाबाईचे नाही, श्रीयुत कोकीळरावांचे आहे पण दुर्दैव असे आहे की या कोकीळरावानांच, सर्व सामान्यपणे कोकीळा ही संज्ञा लावतात. कोकीळाताई कोकीळरावांप्रमाणे देखणी तर नाहीच. पण कांहीशी कुरुपच आहे. हिचा वर्ण आहे धुरकट पिंगळा. वर्ण एक पिन्गट तर पिंगट, पण परमेश्वराने हा पिंगट वर्ण तरी तिच्या अंगावर सारखा चोपडला असता तर बरे झाले असते. पण आधीच धुरकट पिंगळा वर्ण आणि वरती रोमारोमागणीक पांढरे चट्टे, राम राम !

## उपवनातील कोकीळा

रुपाचे एक राहो, पण गायन हिरा सौभाग्यवती हिराबाई बडोदेकरांच्या मुखांतून लाख वेळा तरी आपण , 'उपवनी गात कोकीळा' हे गीत ऐकले असेल. पण उपवनांत कोकीळा गाते हे हि अर्धसत्य आहे. कोकीळेला अगदी गळा नाही असे नाही. पण वसंत ऋतूंत जे सुरेल, पल्लेदार, पंचमालापांतले संगीत आपणास वारंवार ऐकू येत त्या स्वरसंपदेवर एकट्या कोकीळाचे स्वामीत्व आहे असे बहुतेक शास्त्रज्ञांचे मत आहे.

धड रूप नाही आणि गोड आवाजीही नाही. अशा परिस्थितीतही कोकीळरावांचे आपल्या प्रेयसीवर अनिवार प्रेम असते असे सांगतात. त्यावरून प्रेम हे आंधळे नसून ते बहिरेही असावे अशी प्राध्यापक काणेकरांची जी शंका आहे ती बरोबर वाटते.

आपल्या भारतात कोकीळेचे भारीच महात्म्य आहे. धार्मिक वृत्तीच्या श्रद्धावान भगिनी कोकीळ पक्षाला परमेश्वररूप मानून कोकीळाव्रत नावाचे एक अत्यंत कठीण व्रत करीत असतात. ज्या वर्षी अधिक आषाढमास येतो त्या वर्षी संपूर्ण अधिक आषाढ मासापर्यंत हे व्रत पाळायचे असते. व्रतकाली भगीनी सारा दिवस उपोषण करतात. रात्री कोकीळरव ऐकल्यानंतर उपोषण सोडायचे असते आषाढ महिन्यात पाऊस अगदी मुसळधार कोसळू लागतो. आणि कोकीळ व दुसरे गाणारे पक्षी जवळ जवळ मुके होऊ लागतात. अशा परिस्थितीत ह्या व्रतधारी भगिनीना केव्हा केव्हा दोन दोन दिवसही ढळढळीत उपोषण घडते. या खडतर व्रताची सांगता भगिनी उपाध्येबोवांना कोकीळेची सोन्याची व आम्रतरूची चांदीची प्रतिमा व त्यांच्या गृहिणीला काळी चंद्रकला दान देऊन करतात. कावळी जिवापाड मेहनत करून कोकीळेची कच्ची बच्ची वाढविते आणि कोकीळेच्या पदरांत पुत्र प्राप्तीचे फळ आयते पडते. आमच्या व्रतधारी भगीनी हे उग्र व्रत मोठ्या कष्टपूर्वक करतात आणि उपाध्येबोवांना सोन्याचांदीच्या प्रतिमा आणि उपध्यीबायींना काळी चंद्रकळी यांचा लाभ घडतो. कोकिळेला जशी अनायासे पुत्र प्राप्ती होते तसाच काहीसा प्रकार या व्रतांत होतो म्हणून ह्याला 'कोकिळा व्रत' हे नाव दिले असावे असा जावई शोध आमच्या एका थट्टेखोर मित्राने लावला आहे. त्याचा हा जावई शोध अगदी बिनबुडाचा असे म्हणवत नाही.

कोकीळ पक्षी हा फलाहारावर समाधान मानणारा पक्षी आहे. ही फार नामी गोष्ट आहे. पण कोकीळ पक्षी हा परभृत पक्षी आहे ही गोष्ट कोकीळेच्या लौकिकाला साजेशी नाही. कोकीळेच्या परपुष्टतेचे बिंग हे आजच्या शास्त्रज्ञांनी शोधून काढले नसून ते फार प्राचीन काळापासून भारतीयांना कळून चुकले आहे. अमर कोशांत कोकीळाची जी निरनिराळी नांवे दिली आहेत. त्यांत परभृत हेहि एक नांव आले आहे.

कोकीळा आपली अंडी कावळीकडून कशी उबवून घेते, कावळी अजाणतेपणी पोरदशेत त्यास कशी पोसते ही कहाणी मोठी मनोरंजक आहे. कावळे हे मे महिन्याच्या

सुमारास आपली घरटी बांधू लागतात. कावळ्याचे घरटे बाहेरून वेंगरूळ दिसत असले तरी त्या घरट्यातले शेजवर चांगले उबदार व मऊ असते. कोकिळा आणि कावळी यांचा गर्भधारणेचा हंगाम हाही मे महिन्याच्या आसपास सुरू होतो. कावळीचे घर शेणाचे असते असे मुलांच्या गोष्टीत आपण ऐकतो, पण हे शेणाचे घर सदा मुक्तद्वार असल्यामुळे, कोकिळेची मोठीच सोय झाली आहे. अंडी घालण्याचा हंगाम आला की कोकीळ कावळा आणि कावळीच्या घराच्या आसपास उगीचच घिरट्या घालू लागतो. कावळा–कावळीला त्याचा संशय येऊन ती त्याच्या मागे लागून त्याला तेथून हुसकावतात. कोकीळ त्या जोडप्याला हुलकावण्या देत देत दूरवर घेऊन जातो. त्याच वेळी संधी साधून कोकिळा आपली अंडी अलगद कावळीच्या घरात घालते. कावळा हा साऱ्या मुलखाचा डामरट पक्षी खरा, पण त्याचे गणित कच्चे. त्याला तिरकी तीनच्या पुढे अंक मोजता येत नाहीत. असे ॲटकिन्स साहेब म्हणतो. त्यात बरेच तथ्य असावे. आपण अंडी किती घातली याचा अंदाज कावळीला नसतो. कावळी गलथानपणे घरट्यातली सारीच अंडी आपली समजून उबवते.

कोकिळेचे हे चौर्यकर्म अठ्ठावीस युगे अव्याहतपणे चालू आहे. यावरून निसर्गाचीही या चौर्यकर्मात कोकिळेला फूस आहे हे उघड आहे. निसर्गाने कावळी आणि कोकिळा यांच्या अंड्यांत फारसा फरक चटकन ध्यानी येईल असा ठेवलेला नाही. बरे अंड्याचे एक असो. पण अंडी फुटल्यावर तरी ही चोरी उघडकीस आली पाहिजे. कोकिळेच्या पोरांची कावळीच्या घरट्यातून हकालपट्टी झाली पाहिजे. पण यातही निसर्गाने एक गोम ठेवली आहे. कोकीळेच्या नर संततीचा रंग काळाकुट्ट असतो. हे सरळ झाले पण पुढे उत्तर आयुष्यात पिंगळी होत जाणारी कोकीळाची: मादी अपत्यदशेत नर संततीपेक्षा अधिकच काळीकुट्ट दिसते असे पक्षीशास्त्रांना आढळून :आले आहे. या निसर्गाच्या लबाडीमुळे कावळीला अंडी फुटल्यानंतरही कोकीळाच्या पिलाचा संशयही येत नाही. ॲटकिन्स तर म्हणतो की कोकीळेच्या पिलांची शेपटी लांबसडक वाढू लागते तेव्हा तर कावळी आपली पोरे आता गोजिरवाणी होणार म्हणून हौसावून जाते. मग एक दिवस कोकीळा आपली जाणती झालेली पिले कावळीच्या घरट्यातून घेऊन जाते. तेव्हा कावळीला सारा प्रकार समजत असावा. या सर्व प्रकारावरून निसर्गालाच कावळा कावळीची पुन्हा पुन्हा फटफजिती झालेली पाहण्यास मौज वाटत असावी असे वाटते.

## गायन सम्राट कोकीळा

कोकीळे प्रमाणे तिची चुलत भावंडेही चौर्यकर्मात अगदी तरबेज आहेत असे दिसते. ककू ही पक्षीण आकाराने कोकीळेपेक्षा लहान आहे ती पक्षीण आपली अंडी शिंपी, रेन विपीट यांच्या घरट्यांत घालते. कोकीळेच्या परपुष्टतेच्या दोषापासून सर्वस्वी अलिप्त असा एकच पक्षी या कोकीळ जातीत आहे. तो पक्षी म्हणजे भारद्वाज. भारद्वाज हा मोठा संभवित पक्षी असून आपली संतती आपल्या घरट्यात वाढवितो.

कोकीळेचे परभारे पोटे पोसवून घेण्याचे हे काम अगदी निर्विघ्नपणे पार पडत असते असे नाही. हा चोरीचा मामला पचवितांना अनेकदा कडो विकडी युध्दे करावी लागतात. पिले कावळीच्या घरट्याबाहेर काढताना प्राणहानी होते भृणहत्या चालू ठेवण्यापेक्षा आपली पिले वाढवावी, कोकीळ कुळावरील कलंक धुवून काढावा असे कोकीळेला कसे वाटत नाही हे एक कोडे आहे. आजवर ते सुटलेले नाही. पुढेही ते सुटेल असे वाटत नाही.

कोकिळपक्षाचा ध्वनी आपणास बारमास ऐकू येत नाही. ही गोष्ट सर्वांना माहिती आहे. याची उपपत्ती दोन तऱ्हेने लावण्यात येते. कोकिळा आणि इतर गाणारे पक्षी यांना मुसळधार पाऊस आणि हुडहुडी आणणारी थंडी आवडत नाही. हा कठीण काळ लोटेपर्यंत एका कवीने म्हटल्याप्रमाणे ते पक्षी तरु कोटरांत अथवा अन्य ठिकाणी थारेपालट करून टाकतात. त्यांचा प्रिय वसंत ऋतू आला की, त्यांचे गाणे पुन्हा जागे होते मग उपवने आणि वनस्थळांतून गायनाचे जलसे सुरू होतात. कोकिळपक्षी हा भारताच्या हद्दीतच स्थलांतर करीत असतो असे आढळून आले आहे. परंतु त्याच्या स्थलांतराच्या सीमारेषा अद्याप निश्चित झालेल्या नाहीत.

कोकीळ पक्षाची हकीकत अशी आहे. त्यावरून त्याच्या भलेपणाविषयी कोणीही आक्षेप घेऊ शकेल, पण कोकिळाच्या एका गुणाने त्याच्या साऱ्या दोषावर पांघरूण घातले आहे लोकांचे चित्त या पक्षाने आपल्या पंचमालापाने चोरून ठेवले आहे. लोकांनी कोकिळेचा परभृततेचा अपराध पोटात घातला आहे.

संस्कृत वाङमयात व सर्व देशी भाषांतील वाङमयात कोकिळाचा जयजयकार केला आहे. कोकिळाहून मंजूळ गाणारे पक्षी आहेत. ढंगदार गाण्यात श्यामा आणि दयाळ हे कोकिळाला हार जाणार नाहीत. पण लोकांना त्यांचा कोकिळेइतका परिचय नाही. गाण्याच्या बाबतीत कोकिळेचा आवाज हा मानदंड बनून राहिला आहे. गाणाऱ्या पक्षात कोकिळेला प्राप्त झालेले राज्यपद दुसऱ्या पक्षांना त्यांच्यापासून हिरावून घेता येईलसे वाटत नाही

● ● ●

# व्यक्ती दर्शन

१) कै. आबा घाणेकर

२) कुशं भटजी ललीत लेख

३) कै. रियासतकार सरदेसाई

४) कै. विनायक कोंडदेव ओक

५) सव्यसाची पत्रकार तात्यासाहेब करंदीकर

# एक समर्पित जीवन

**कै. आबा घाणेकर**

दिनांक १७ मे १९६४ या दिवशी ठाण्याचे श्री. विष्णू लक्ष्मण तथा आबा घाणेकर प्रदीर्घ आजारानंतर कालवश झाले. गेले काही महिने त्यांचा आजार विकोपाला गेला होता. आणि या दुखण्यातून आबा वाचत नाहीत हे जवळ जवळ सर्वांना कळून चुकले होते. "मरणं प्रकृतिः शरीराणाम्" हे सत्य सामान्यजनांना ऐकून माहिती असले तरी त्यामुळे दिवंगत व्यक्तीच्या निधनाचे दुःख थोडेच नाहीसे होते. त्यातही आबांसारख्या निरलस कार्यकर्त्यांच्या बाबतीत तर ही गोष्ट विशेषत्वाने प्रत्ययास येते.

**मूर्ती लहान कीर्ती मोठी**

नागपूर शहरी १९२५ साली परम पूजनीय डॉक्टर हेडगेवारांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे वृक्षारोपण केले. याच संघ वृक्षाचे एक रोपटे नागपूरहून आणवून आबा घाणेकरांनी ठाण्याच्या भूमीत लावले. ठाण्याची ही मुरमाची जमीन ह्या वऱ्हाडी रोप्याला मानवेल किंवा नाही, हा रोपा इथे फोफावेल किंवा नाही असला कचखाऊ विचार आबांच्या मनाला शिवला देखील नाही. तर आबा घाणेकरांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पुण्याहवाचन ठाणे नगरात केले तेव्हा त्यांचे वय लहान होते. तिशीच्या आसपास एकाद्या सामान्य कवायत शिक्षकाच्या हातून ही असामान्य गोष्ट घडली असे प्रांजळपणे सांगावेसे वाटते. प्रथम आबा एका व्यायाम शाळेत शिक्षक होते. पुढे त्यांनी स्वतःच श्रीराम व्यायाम शाळा नांवाची संस्था चालू केली. श्रीराम व्यायाम शाळेसाठी जागा संपादन करण्यात आली. व्यायाम शाळेची इमारत यथातथाच होती. पण व्यायामशाळेचा शिक्षक मात्र असा तसा नव्हता. आबांची मूर्ती तशी लहान होती. पण अत्यंत मेहनतपूर्वक आबांनी चांगली पिळदार व मजबूत शरीरसंपदा कमाविली होती. आबा त्यांच्यापेक्षा भारी माणसाला होणार नाहीत अशी ताकतीची कामे लीलया करीत तेव्हा तर सर्वांना मोठा अचंबा वाटे खो खो आट्या पाट्या आदी देशी खेळात त्यांनी प्राविण्य संपादन केले होते.

## पूजनीय डॉक्टरांची भेट

आबांच्या अंगी व्यायाम पटुत्वा खेरीज आणखी एक कला होती. ती म्हणजे लोकसंग्रहाची हलके हलके आबांच्या भोवती गोपाळांचा मेळा जमू लागला. श्रीराम व्यायाम शाळेच्या जागेत मुले येत होती. खेळत होती, बागडत होती, व्यायाम करीत होती. तथापी आबांना नुसत्या व्यायामाच्या शिक्षणाने, शारीरिक सुधारणेने समाधान वाटत नव्हते. त्यांच्या डोळ्यापुढे व्यायाम शिक्षणाहून अधीक शाश्वत असे कांहीतरी अमूर्त ध्येय होते. आबांची व्यायाम शाळा जरा बाळसे धरत होती. त्या सुमारास सुदैवाने परमपूजनीय डॉक्टर हेडगेवारांशी त्यांची गांठ पडली आणि खूणगांठही पटली. नंतर एके दिवशी श्रीराम व्यायाम शाळेच्या पटांगणातून एक धून ऐकू येऊ लागली 'हे प्रभू, श्रीरामदूता शील हमको दीजिये !' ती राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची प्रार्थना होती. त्या प्रार्थनेच्या शेवटी 'आम्हा सर्वांना हे प्रभो तू वीर व्रतधारी बनवं अशी आळवणी होती. मोठ्या उत्साहाने काढलेली, मोठ्या कष्टाने उभी केलेली श्रीराम व्यायाम शाळा रा. स्व. संघात विलीन झाली. ओढा गंगेला मिळाला ठाण्याच्या संघ शाखेवर त्यावेळी परमपूजनीय डॉक्टर हेडगेवार येत आबांच्यापाशी संघ कार्याविषयी बोलत ह्याचे जेव्हा आज स्मरण होते तेव्हा आबांच्या कर्तृत्वाचे कौतुक वाटते.

आबा घाणेकरांनी एक एक माणूस सतत प्रयत्नाने जोडून एक चांगली संघ शाखा निर्माण केली. आबांच्यापाशी दुसऱ्यावर शब्दमात्रे छाप पाडील असे वक्तृत्व नव्हते. पण त्यांच्याशी बोलणाऱ्या माणसाला हा माणूस निर्लोभ वृत्तीचा, सरळ मनाचा आहे असे लवकरच पटे. ठाणे संघ शाखेच्या प्रारंभापासून हिवाळी शिबिरे, घोष इत्यादी सर्व अंगानी शाखा सुसज्ज, सुविहित असली पाहिजे. इकडे आबांचे लक्ष असे. आळसाला आबांच्या घरात थारा नव्हता. आबा संघ शाखेवर सर्वांच्या आगोदर, संघवेषात आलेले असायचे. ते शिस्तीचे भोक्ते होते. वेळेनुसार रागवत देखील. पण त्यांच्या रागाचा डंख कुणी धरला नाही. रागाचा क्षण निघून गेला की पुन्हा खेळीमेळीचे वातावरण पसरत असे.

## अकिंचनाचा संघ संसार

दम्याने आबांच्या पिळदार आणि मजबूत शरिरात केव्हा शिरकाव केला होता न कळे. पण त्याचा पिच्छा त्याने अखेरपर्यंत पुरवला. आबांची सांपत्तीक स्थिती ! कवायत शिक्षकाची अल्पवेतनी नोकरी करणाराची सांपत्तीक स्थिती कशी होती हे सांगायला हवे का ? पण आबांनी आर्थिक टंचाईची वाच्यता कधी केली नाही. नोकरीचा जो पैका मिळे तो ते खर्चीत. " ठेविले अनंते तैसेची रहावे " ह्या वृत्तीने पण अदीनत्वाने त्यांनी आपल्या आयुष्याचे दिवस काढले.

ठाण्याच्या संघ शाखेचा व्याप सांभाळून आबांनी पनवेल येथे संघ शाखा स्थापन करण्याचा प्रयत्न केला. पनवेलला ते काही दिवस दर रविवारी जात असत. भिवंडी येथे शाखा स्थापन करण्यासाठी ते ठाण्याहून सायकलवरून जात. मुलुंड येथेही त्यांनी संघ शाखा चालू केली होती.

आबांचे जीवन हे समर्पीताचे जीवन; "विषय तो त्याचा झाला नारायण" ह्या संतवचनाप्रमाणे एका ध्येयाला वाहिलेल्या जीवनाचे उत्कृष्ट उदाहरण आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा सहस्रावधी शाखांनी नटलेला शाल्मली वृक्ष आज आपल्याला दिसतो. या पल्लवीत वृक्षाला ज्यांनी प्राणांच्या जलसेवनाने संवर्धीले त्या थोर पुरुषांत आबांचे स्थान आहे. त्यांचे उतराई होणे कसे शक्य आहे? त्यांच्या चरणी मस्तक नमविणे एवढेच आपणाला शक्य आहे. त्या संघ कार्यकर्त्यास शतशः प्रणाम!

• •

# कुशं भटजी

खारला ब्लॉक नी बिक मध्ये आम्ही राहू लागलो त्याला पुरती पाच वर्षे तरी झाली की नाही कुणास ठाऊक. कदाचित झाली असतील. पण त्यापूर्वी आम्ही सारा जन्म कोळ्याच्या वाडीतल्या एका चाळीत काढला. आमच्यावर जे काही संस्कार झाले मनाची बरीवाईट मशागत झाली ती त्या चाळींच्या वातावरणात. त्यावेळी आमचा ज्यांचे ज्यांचे पाशी स्नेह जमला, घरोब्याच संबंध आला त्या व्यक्ती आज अकस्मात एखादे दिवशी राजापूरच्या गंगेप्रमाणे हृदयात प्रगट होतात. मग तेव्हाच्या काही घटना आणि मौजा यांच्या आठवणींनी मनाची चौदाही कुंडे भरभरून वाहू लागतात

या साऱ्या व्यक्तित कुशंभटजी मालशे यांची आठवण मला अगदी ठसठशीतपणे आल्यावाचून राहत नाही. कुशंभटजी कोकणांतल्या माखजन गावचे. माखजनास त्यांचे घर व थोडी शेती होती. कोकणांतल्या शेतीवर कुटुंबनिर्वाह होईना म्हणून कुशंभटजींनी मुम्बईचा रस्ता सुधारला. आणि तेथे भिक्षुकी सुरु केली. कुशंभटजी अंगकाठीने उंचही नाही आणि ठेंगूही नाही असे मध्यमसर होते. त्यांचा वर्ण काळा होता. डोळे किंचित किलकिले होते. त्यांची प्रकृती मुळात दणकट आणि भिक्षुकीच्या धंद्यात दही, दूध, तूप यांचा रतीब बारमास चाले. त्यामुळे त्यांच्या देहावर भिवली ललीत उदर शोभा झळकत असे.

माझी मुंज कुशंभटजींनीच लावली. मुंजीनंतर काही दिवस मी संध्या म्हणायला त्यांचेकडे जाई आणि मानेला मारे हिसके देऊन मंत्र म्हणे

आपो हिष्टा मयो भुवस्तान उर्जे दधातना ।

पुढे पुढे ही संथा घेण्याचा मला कंटाळा आला आणि कुशंभटजींच्या घरी संध्या म्हणणेस जायचा मी बंद झालो. माझे दोहोचे चार हात कुशंभटजींचे हस्तेच झाले. आमच्या लहानपणी चाळीतील उपाध्येगिरीची मक्तेदारी कुशंभटजींकडे होती. चाळीतील बडीबडी धेंडे म्हणजे मोतीवाले खरे, प्रोफेसर गाडगीळ आणि डॉक्टर बखले हे सारे कुशंभटजींचे यजमान होते. त्यांची यजमान कृत्ये आपणांकडे आहेत हे कुशंभटजी मोठ्या दिमाखाने सर्वांस सांगत असत. आणि ते सांगत त्यात बरेच तथ्यही होते. मिळकतीच्या दृष्टीने ही कुळे म्हणजे घबाड होते. या घरातील यजमानीण बाया मोठ्या धर्मपरायण असल्यामुळे त्यांचेकडे सारे वर्षभर काही ना काही व्रत, वैकल्य, ब्राह्मण, सवाशीण चालू असे. कुशंभटजींपाशी यजमानीन बायांना धर्म कृत्यांचे महत्व पटवून देण्याचे कसब होते.

एखादे व्रत त्यानी यजमानीण बाईस करायला सांगितले तर कुशंभटजीकडे त्यासंबंधी चाल चलाऊ शास्त्राधार तयार असे. श्रीशंकरांनी त्रिपुरासुराचा वध केला तत्पूर्वी हे व्रत त्यांनी केले होते असा पोथी पुराणांतून आलेला उल्लेख कुशंभटजी बाईस म्हणून दाखवीत. त्यांचे हे शास्त्राधार बहुधा बरोबर असत. अर्थात यजमानीण बायांना शास्त्राधार आहे आणि तो संस्कृत भाषेत आहे. एवढी गोष्ट पुरेशी असे. त्या जास्त खोलात शिरत नसत. घरात होणाऱ्या व्रतवैकल्याबाबत यजमान मंडळीचा संबंध फक्त दक्षिणेच्या विड्यावर पाणी सोडण्यापुरता येई. ते यजमानीण बाईस म्हणत "तुमचे ते कुशंभटजी आणि तुम्ही हवा तो गोंधळ घाला. दोन पैसे सरळ मागा हवे तर. पण आमच्या मागे उपास तापास जपजाप्य याचे लंबगट लावून देऊ नका."

कुशंभटजी शास्त्राधार सांगत त्यात एखादे वेळी टोकून देतो ऐसाजेचा प्रकार घडे. त्यांची एक यजमानीणा बाई गुरुवार बरेच दिवस करी. सारा दिवस कडक उपास. आतांशा म्हणे महिला हरतालकेच्या दिवशीसुद्धा चक्क चहा पितात पण या बाईना गुरुवारी चहाही चालत नाही. रात्री दत्तात्रेयांची आरती, प्रसाद असा कार्यक्रम चालत असे. एके दिवशी बाईना काय वाटले कोणास माहीती ! बाई कुशंभटजीना म्हणाल्या "गुरुजी, आज मी लग्न झाल्यादिवसापासून गुरुवार करते आहे. वास्तविक मला काही कमी नाही. देवापाशी काही मागायचे नाही; पण गुरुवारी उपास का करतात याविषयी काही शास्त्राधर असल्यास तो जाणण्याची इच्छा आहे. अशावेळी शास्त्राधारांची आणि वचनांची वखार का आहे की पैसे टाकले आणि शास्त्राधार घेऊन आले ? पण कुशंभटजींना गांगरून जाणे हे मुळीच माहीती नव्हते. त्यांनी "वर्णानाम् ब्राह्मणे गुरू" हे वचन बाईना सांगितले आणि हे सांगोवांगी नाही मी प्रत्यक्षच तेथे हजर होतो. मला त्यावेळी फार नाही तरी "वर्णानाम ब्राम्हणो गुरुः" याचा अर्थ समजण्याइतके संस्कृत समजत होते मी कुशंभटजींचा हा शास्त्राधार ऐकून गार झालो. पण मनात म्हटले शास्त्राधार सांगणार कुशंभटजी आणि यजमानीण बाई राजी. मग त्या बाईना त्या वचनाची फोड करून सांगून त्यांची ऐती बसलेली श्रद्धा नाहीशी करण्याच्या पापाचे धनी आपण व्हा कशाला ? आणि कोणास ठाऊक, कुशंभटजीनी या सद्भावनेनेच या बाईला सांगितले असेल.

आम्ही चाळीतील लहान थोर मंडळी कुशंभटजीस "गुरूजी" या बहुमानार्थी नावाने हाक मारीत असू पत्र व्यवहारात कुशंभटजींना वेदमूर्ती हा मायना वापरला जात असे. कुशंभटजी हुशार होते; वेदांचे पठण करूनच ते आपला चरितार्थ चालवीत हे खरे पण वेदमूर्ती म्हणण्याइतका वेदांशी त्यांचा घनिष्ठ संबंध नव्हता. कुशंभटजींच्या वेदमूर्तीपणाचे बिंग बाहेर पडे गणपती उत्सवाच्या मंत्रजागराच्या कार्यक्रमाचे वेळी आमच्या चाळीच्या उत्सवात मंत्रजागराचा कार्यक्रम हा अगदी हमखास होणारा कार्यक्रम मंत्रजागरावाचून चाळीचा उत्सव झाला ही गोष्ट कदापी शक्य नव्हती. ह्या कार्यक्रमासाटी

दशग्रंथी ब्राम्हणांस आमंत्रण असे. ते गणपतीच्या मंडपात दाटीने एकमेकांसमोर पाटांवर बसून मंत्र म्हणत. मंत्र म्हणतांना त्यांची अगदी हात घाई हमरी तुमरी चाले. ते मंत्रयुद्ध पाहण्यात मोठी मौज वाटे. या मंत्रजागराच्या ब्राह्मणांच्या पंक्तीत बसून कुशंभटजींनी कधी खणखणीत वेदमंत्र म्हटले असे होत नसे. वात्रट पोरे कुशंभटजी मंत्र जागराला बसले की त्यांचे अगदी पाळतीवर असत आणि एकमेकांस खुणावून सांगत ' ए कुशंभटजी पहा कुशंभटजी '

कुशंभटजींच्या वेदपठणाची जी आबाळ चालली होती त्याबद्दल त्यांना फारसा दोष देण्यासारखी परिस्थिती नव्हती. दर दिवशी त्यांच्या मागे एकादषण्या, पूजा आणि कसले तरी पाठ यांचीच गर्दी एवढी असे की माशी अंगावर बसली तरी अंगावरून ती झटकायला त्यांना फुरसत नसे. पुष्कळ केसेस असल्यावर एखाद्या चांगल्या वकीलाची जशी तारांबळ उडते तसे ही आन्हीक कामे उरकतांना कुशंभटजींचे होई. अशा धांदलीतून ते मोकळे झाले आणि खुषीत असले तर मी त्यांना एखादे दिवशी विचारीत असे, " गुरुजी, आज किती केसेस होत्या ? " आन्हिकानंतर कुशंभटजी कुठल्यातरी यजमान घरी चांगले मजबुत जेवून घेत. रात्री ते जेवत नसत. पण दुपारच्या जेवणामुळे त्यांच्या डोळ्यांवर झापड येत असे. आणि दुपारी एकदा ताणून दिली की वेद कुशंभटजींच्या स्वप्नांत त्यांना भेटतील तेवढेच.

ड ड ड

कुशंभटजी हौशी होते. आपणाकडे कांहीतरी निमित्ताने माणसे येत जात असावीत असे त्यांस वाटे आणि त्यासाठी थोडीफार पदरमोड करावी लागली तरी त्याला त्यांची तयारी असे श्रावणमासी श्रावणीसाठी एक मोठा मेळावा त्यांचेकडे जमे कित्येक वर्षांचा श्रावणीचा हा परिपाठ होता. श्रावणी करायची म्हणजे खटपट थोडी का असते ? दुर्वा सातूचे पीठ, तीळ, पवित्रके, दर्भांच्या जुड्या, पंचगव्य तांबडमाती, इंधन, वाहात्तर भानगडी लागत. पण श्रावणीच्या कार्यक्रमासाठी वाटेल तेवढी तसदी ते घेत. कधी आळस करीत नसत. वरती श्रावणीच्या वेळी सर्वांस कॉफी देत. श्रावणीला येणारी मंडळी त्यांस यथाशक्ती दक्षिणा देत ही गोष्ट वेगळी. पण श्रावणी परभारे एखाद्या यजमानाकरवी त्याच्याच घरी ते करते तरी त्यांची दक्षिणा थोडीच बुडणार होती ?

श्रावणीचा सोहळा सुद्धा अगदी दणक्यात होत असे. कुशंभटजींची वाणी गोड आणि मंत्रांचे उच्चार स्पष्ट असत. त्यामुळे श्रावणीला आलेल्या सर्व चाळीस पन्नास माणसांना ते स्वच्छ ऐकू जात. श्रावणी करणारांनाही वाटे की काही तरी संस्कार आपणांवर होत आहेत. श्रावणी म्हटली की पंचगव्य प्राशन करणे हे विशेषतः नव्या मुंज्या मुलांना त्रासदायक वाटे. पण पंचगव्य प्राशनांत ते कुणाचीही लटपट चालू देत नसत. पंचगव्य पळी पळी वाटून झाले की खड्या आवाजात ते मंत्र म्हणत.

यत्वगस्थिगतं पापं देहे तिष्ठती मामके ।
प्राशनांत पंचगव्यस्य दहत्यग्नि रिवेंधनम् ॥

त्यांनी "इती प्राश्य" असे म्हणताच सर्वजण पंचगव्य मुकाट्याने गटकन गिळून टाकीत व आचमने घेत

श्रावणीच्या मध्यावर गंगास्नानाचा एक विधी सांगितलेला आहे. हा विधी ठीक झाला पण गंगा काशीस राहीली. तेव्हा कुशंभटजी मोठ्याने सर्वांस सांगत "हा आता सर्वांनी गंगा नदीत स्नान करून पुन्हा दहा मिनिटांत पाटांवर येऊन बसायचे आहे" मागाहून जरा हलक्या स्वरांत ते सांगत, "पलिकडच्या खोलीत कॉफी तयार आहे. ती पिऊन घ्या." हे गंगास्नान कोण टाळणार ? श्रावणीच्या शेवटी पितृतर्पणाचा एक कार्यक्रम असतो. त्यावेळी फार गंमत उडे. कुशंभटजींनी तर्पण सुरू करताच सारेजण आंगठ्यावरून पाणी सोडू लागत लहान मुंजे मुलगे देखील! हे ध्यानांत येताच कुशंभटजी बजावून सांगत "अरे, ज्यांचे आईबाप जिवंत आहेत त्यांनी पितृतर्पण करावयाचे नाही." पण हा इशारा येण्यापूर्वी कांही मुंजे मुलगे जित्या पित्याला आंगठ्यावरून पाणी पाजून मोकळे होत आणि मग एकच हंशा पिके.

कुशंभटजींना भिक्षुकीच्या धंद्यात नाना तंत्रे सांभाळावी लागत. सर्व यजमानांस आणि यजमानीण बायांस खूष ठेवावे लागे. वेळेचे अनुसंधान ठेवावे लागे. दहा मिनिटे इकडे तिकडे, पण ठरल्या कार्याला जावे लागे. पुष्कळांकडचे भोजनाचे निमंत्रण आल्यास आन्हिक कामांचा बेतबात पाळून सोईस्कर आमंत्रण स्विकारावे लागे. इतर ठिकाणी "वहिनी मला जरा घाई आहे, उद्या रामला तुमच्याकडे जेवायला पाठवीन" असा पर्याय काढून वेळ साजरी करावी लागे. कुशंभटजींनी ही सर्व तंत्रे चांगली आत्मसात केली होती. भिक्षुकीच्या धंद्यात भिडबीड चालत नसे. भीड बाळगून भिक्षुकी करणारा उपाशी मरेल असे ते नेहमी म्हणत. पुजेला होमहवनाला कुशंभटजी एकटे अथवा सहकाऱ्यांबरोबर जात त्या त्या घरच्या स्त्रिया अगदी धांदलीत असत अशा वेळी कुशंभटजी स्वतः अगदी स्वयंपाकघरापर्यंत जाऊन सांगत "आता असे करा वहीनी, तुम्ही सोवळे नेसा, घरच्या देवांची पूजा उरकून घ्या; आणि आम्हाला चहा, कॉफी, दूध जे काय तयार असेल ते चटकन द्या. म्हणजे आम्ही एक मार्गी आमच्या कामाला लागू" हे सांगताच दुसरी दहा कामे टाकून यजमानीणबाई भटजीबोवांस चहा कॉफी देत असे. होमहवनांच्या दिवशी घरांतील लहान मुलांची तान्ह्या बालकांची सुद्धा बाया आठवण विसरत परंतु कुशंभटजी आपले हाल करून घेत नसत.

यजमानापेक्षा यजमान पत्नींना खुलवण्याचे काम कुशंभटजींस करावे लागे. त्यांच्या खुपीवर तर भिक्षुकीची भिस्त यजमानपत्नींना खुलवण्याच्या कुशंभटजींच्या काही पेटंट

खुणा होत्या. पुजेला यजमान आणि यजमानपत्नीचा जोडा बसला की यजमान देवापुढे हात जोडून भटजी सांगत तसे तोंडाने मंत्र म्हणू लागत.

'श्रीगणेशायनमः कुलदेवताभ्योनमः इष्टदेवताभ्योनमः अद्य श्रीमदनंतपूजनमह करिष्ये अशा वेळी यजमानीण बाईहि हात जोडून बसलेल्या दिसल्या की कुशंभटजी हसत हसत त्यांना सांगत, " वहिनी तुम्ही त्यांच्या हाताला हात लावून ठेवा " चार चार मुले झालेल्या वहीनींनी नव्या नवरीप्रमाणे यजमानांच्या हाताला हात लावताच पोराबाळांची अवती भोवती जमलेल्यांची मोठी करमणूक होई. वहिनींना तसे बरे वाटे. पूजा आटोपल्यावर भटजींना नुसताच नमस्कार करून यजमान प नी चालायला लागण्याच्या तयारीत दिसल्या तर कुशंभटजी सांगत " नांव घेऊन नमस्कार करायचा असतो. " मग नांव घेण्याचा साग्रसंगीत कार्यक्रमही नाइलाजाने करावा लागत असे. काही गोष्टी भटजींस करण्याची मुभा असते. यजमानीण बाईंनी नवा चपला हार घातला असला तर कुशंभटजी विचारीत " चपलाहार नवा दिसतोय आबासाहेबांना वरची जागा मिळालेली दिसते ! " आपल्या दागिन्यांचे कौतुक कोठल्या स्त्रीला नको असते ? खूष झालेली यजमान पत्नी चपलाहार गळ्यातून उतरून भटजीस दाखवी. खुबीदारपणे तयार केलेल्या खुषीच्या दुनीयेत कुशंभटजींस मग काही उणे पडत नसे.

आपल्या धंद्याव्यतीरिक्त समाजाच्या अथवा सार्वजनिक कार्याच्या इतर उचापती कुशंभटजी करत नसत नाही म्हणायला पंचांगांचा वाद जेव्हा मागे जोरावर आला होता तेव्हा कुशंभटजी टिळक पंचांग खरे की निर्णयसागर खरे या वादात कधी कधी भाग घेतांना दिसत. पंचांगाच्या बाबतीत कुशंभटजींचा भर जुन्या पंचांगाकडे अधिक होता. ते म्हणत " बळवंतराव ( म्हणजे लोकमान्य बाळ गंगाधर टिळक ) फार थोर पुरुष होते, पुढारी होते. पण पंचांगाच्या फंदात पडून त्यांनी चाललेली परंपरा उगाच बिघडविली जे ज्योतिर्गणित मोठमोठ्या ज्योतीषांसही कळण्याची मारामार होती ते आपणांस कळते सायन पंचांग अमक्या कारणांमुळे बरोबर, निरयन पंचांग चूक असे सांगण्याचा प्रयत्न मात्र कुशंभटजी करीत नसत. पण हक प्रत्यय आणि काही ठोकताळे आहेत ते जुन्या पंचांगाप्रमाणेच येतात. नव्या पंचांगाशी जुळत नाहीत एवढे ते अट्टाहासपूर्वक सांगत. पंचागाच्या वादात मुंबईच्या माधव बागेत ब्रम्हवृन्दानी म्हणजे भिक्षुक मंडळीनी एक सभा घेतली होती. त्या सभेला कुशंभटजी गेल्याचे मला माहीती आहे. मुंबईच्या ब्राह्मण सभेच्या कारभाऱ्यांनी एक उत्सव टिळक पंचांगाप्रमाणे अगोदर एक महिना साजरा केला होता. त्या उत्सवात भिक्षुक मंडळीनी भाग घेऊ नये. मंत्रजागरात जावू नये असा ठराव करण्यातही कुशंभटजीचा हात होता.

पंचांगाच्या बाबतीत गणितापेक्षा डुक्कर मुसंडीवर कुशंभटजींचा भरवसा जास्त होता. ते प्रमाण त्यांनी स्वतः डोळ्यानी पाहिले होते असे ते सांगत. निर्णयसागर पंचांगाच्या गणेशचतुर्थीच्या दिवशी त्यांच्या गावची जी डुकरे मुंडी खाली घालीत, चंद्राकडे ढुंकुनही पहात नसत, तीच डुकरे आधीच्या टिळक पंचांगी गणेश चतुर्थीला उजळ माथ्याने वर माना करून चंद्राकडे पाहताना त्यानी पाहिली होती ! डुकरांच्या दृकप्रत्ययापुढे बळवंतरावांचे सारे ज्योतिर्गणीत रद्द होते. 'पंचागांच्या बाबतीत आमचा व बळवंतरावांचा सतत झगडा चालेल एरवी बळवंतरावांचे आमचे काहीच वाकडे नाही. उलट ते आमच्या तिकडचे असल्याने आम्हाला त्यांच्याविषयी मोठा अभिमान वाटतो.

कुशंभटजींच्या संबंधी एका गोष्टीचा उल्लेख केला नाही तर रामायण सांगून रामाची सीता कोण हेच सांगण्याचे राहिले असे होईल. भिक्षुक मंडळी लग्न, मुंज, बारसे, षष्ठी, समारंभ सगळ्याच वेळी यजमानाकडे व दुसऱ्या ठिकाणी जाऊन सुग्रास भोजनाच्या पंक्ती झोडत. पण लोकांच्या उत्सव प्रसंगी उल्हासाने भाग घेणारी ही मंडळी कोणावर येऊ नये पण आल्यावाचून राहात नाही असा मरणाचा बाका प्रसंग आला कीं स्मशानात जाण्याच नाकारीत; त्यांना यावेळी नेमके बरे वाटत नाहीसे होई. त्यांची बायको गरोदर रहात असे. आईबाप जीवंत असल्याची एरवी मरणोन्मुख राहीलेली आठवण एकदम सजीव होई. अशा भटाभिक्षुकावर कुशंभटजी कोरडे ओढीत; ते म्हणत भिक्षुकीची सोन्यासारखी वृत्ती या भिक्षुकांनीच पार बिघडवून टाकली आहे. मरणाऱ्यांस द्यावयाचा अग्नीसंस्कार हा ही एक संस्कार आहे. त्याला दुसऱ्या संस्कारांएवढेच महत्व आहे जगांतील निरनिराळ्या धर्माचे लोक मृताची समारंभपूर्वक बोळवण करतात. लाडू खायला ज्यांचा पाय पुढे त्यांनी तरी मृताला अग्नीसंस्कार देण्याच्या वेळी बारा बयादी आणि सबबी सांगू नयेत बोलावणे येताच बाहेर न पडता भिक्षुक मंडळी स्मशानात जाण्यास का कूं करतात; त्यामुळे धर्मावरचा लोकाचा विश्वास साहजिक कमी होतो. हे भिक्षुक सुखासीन आहेत अशी समजूत होते. भिक्षुकीच्या धंद्याला गौणत्व प्राप्त होण्याला हे कुऱ्हाडीचे दांडेच गोतास काळ झाले आहेत असे ते म्हणत स्वतः कुशंभटजींनी कधीही कोणत्याही सबबीवर स्मशानात जाण्यास नाही म्हटले नाही काही काही वेळा एका दिवसातून तीन तिनदांही कुशंभटजी स्मशानात गेलेले आहेत. कॉलऱ्याच्या आणि प्लेगाच्या साथीत शंकराप्रमाणे त्यांचे वास्तव्य स्मशानात असे ! त्यांच्या ह्या सेवेबद्दल साऱ्या ब्रह्मवृन्दाने त्याचा त्यावेळी सत्कार करणे आवश्य का होते. फार मोलाची अशी ती सेवा होती. पण सत्कार कोणाचे करावेत हे समजण्याची पात्रता ब्रह्मवृन्दास व लोकांस नसल्याने ती गोष्ट घडली नाही. सत्कार राहोच, पण कुशंभटजी स्मशानात अग्नी संस्काराचे बोलावणे येता क्षणीच जातात याचा अनेक भटाभिक्षुकानी गैर फायदा घेतला. त्यांच्याकडे आलेल्या माणसास ते कुशंभटजीकडे पाठवू लागले. त्याचे नांव त्यांनी 'मुडदे फरास' ठेवले होते. कुशंभटजीचा त्यांच्या सेवेबद्दल असा सत्कार व्हावा हे अत्यंत लाजीरवाणे होते !

भिक्षुकीचा धंदा हा नुसता पोटा पाण्याचा धंदा नाही. लोकांच्या वृत्तीना चांगले वळण लावण्याचे ते एक उत्कृष्ट साधन आहे. असे त्यांचे म्हणणे आहे. भिक्षुक सत्प्रवृत्त आणि निष्कलंक चारित्र्याचा असला पाहिजे असा त्यांचा आग्रह असे. तोच जर वाईट निघाला तर तो समाजाला धर्मप्रवृत्त कसे करू शकणार ? भिक्षुकीच्या धंद्याला वाईट दिवस आले तरी चांगल्या भिक्षुकांस समाज मानाने वागवतो हे कुशंभटजीना माहीत होते. बेकार कारकून होण्यापेक्षा चांगला भिक्षुक होणे वाईट नाही असे त्यांचे म्हणणे होते.

भिक्षुकांच्या मुलांनी आपला परंपरागत पेशा सोडू नये, वेदांची कास धरावी, ते त्याचा संसार सुखाचा करतील अशी कुशंभटजींची श्रद्धा होती. आपला राम म्हणायला बसत नाही. मी वाटेल ते झाले तरी भटजी होणार नाही असे म्हणतो ह्याचे त्यांस मनस्वी वाईट वाटे. त्यांनी रामास तसे न करण्यास सांगितले. पण वडिलांचा हा फुकटचा सल्ला त्याच्या मनात आला नाही. त्याचे जे दुसरे सल्लागार होते त्यांच्याच बाजूला राहीला. शेवटी वेद म्हणणे झाले नाहीच. शाळेतल्या अभ्यासांतही त्याची गती चालेना. भिक्षुकीच्या धंद्याला रामराम ठोकणारा कुशंभटजींचा राम मुंबईच्या एका मिलमध्ये आज नोकरी करतो आहे. कोंबिंग खात्यात कधी दिवसपाळी कधी रात्र पाळी अशी कष्टाची भाजी भाकरी आज तो खात आहे. आणि डीसेंबर महिन्यात तर आपली गिरणीच बंद होणार आहे हे ऐकल्यापासून त्याच्या पोटांत धडकी भरली आहे.

त्याला कधी कधी कुशंभटजींचे आपण ऐकले नाही ह्याचा मनस्वी पश्चाताप होतो पण आता पश्चातापाचाही काही उपयोग नाही.

• • •

# कै. रियासतकार सरदेसाई

**कुर्वन्नेवह कर्माणी ।**
**जिजीविषेत् शतंसमा ॥**

ज्यांच्या पदरांत परमेश्वराने पुरुषायुष्याचे पुरेपूर माप घातले होते आणि त्या उदंड आयुर्दायाच्या प्रयाणाच्या घडीपर्यंत कर्मयोग्याच्या तत्वनिष्ठेने कर्मरत राहून ज्यांनी सदुपयोग केला ते महाराष्ट्राचे ज्येष्ठ इतिहासकार रियासतकार श्री. गोविंद सखाराम सरदेसाई दि. २३ नोव्हेंबर रोजी परलोकवासी झाले. इंद्रायणीच्या तीरावर वसलेली इतिहासाची उतार पेठ उठली. महाराष्ट्रातला आणि भारत इतिहास संशोधन मंदिराचा एक ज्ञानदिवा मालवला. दिवसेंदिवस शून्य होत चाललेले ते मंदिर अधिकच शून्यवत भासू लागले. महाराष्ट्राची व महाराष्ट्राच्या इतिहास संशोधनाची अपरिमित हानी झाली.

रियासतकार सरदेसाई हे आपल्या भारतांतील समर्पित जीवनाचे अत्यंत उत्कृष्ट उदाहरण म्हणून दाखवता येईल. इतिहास संशोधन आणि इतिहास लेखन हे आपले जिवित कार्य असा नेम एकदा नाना साहेबांनी तरुणपणी घेतला. त्या क्षणापासून नेमलेल्या विषयापरते व्यवधान त्यास माहिती नव्हते. त्यांच्या इंद्रियांनी इतिहास विषयाहून अन्य वळण घेतलेच नाही. त्यांच्या आवडीच्या विषयाच्या उपासनेत त्यांचे अन्नदाते श्रीमंत संभाजीराव महाराज गायकवाड आड येताहेत असे दिसताच मोठ्या मान मरातबीची नोकरी सोडून दिली. वरती सयाजीरावांची कायमची इतराजीही पत्करली संसार यात्रेत तर त्यांच्यावर कठीण घाले आले. कर्तबगार मुलाचा मृत्यू त्यांनी पाहीला. त्यांची सहधर्मचारिणी, वयाच्या एकोणिसाव्या वर्षापासून एकोणऐंशी वर्षापर्यंत जिने त्यांना सोबत केली, तीही त्यास सोडून स्वर्गाचा रस्ता सुधारती झाली. तरीही घोर संसार दुःखाने दुखवून त्यांनी आपले जीवित कार्य सोडले नाही. " सुख वा यदि वा दुखं " या योग्याच्या भूमिकेवर ते ठामपणे उभे होते.

या थोर इतिहासकाराच्या महात्म्याचे मूळ शोधण्यासाठी कोणी त्यांच्या गोविल गावाकडे धांव घेईल, या मुलाचे पाय पाळण्यात कसे दिसत याचा शोध घेऊ पाहील; तर त्याच्या पदरी समाधान येईल असे वाटत नाही. गोविलीस गुरे राखणारा गोरामोरा मुलगा पुढे रियासतकार सरदेसाई होईल असे भविष्य कोणीच वर्तवू शकला नसता. काही

मुले आपल्या भावी कर्तृत्वाची चुणुक लहानपणी दाखवतात हे खरे आहे. गीतारहस्यकार लोकमान्य टिळकांनी संत शब्द संत, सन्त आणि सन्त असा लिहून शिक्षकास भविष्यकाळाचे प्रसादचिन्ह दाखवले पण मनुष्याच्या बालपणी पुढील आयुष्याचे ठसे दिसलेच पाहीजेत असा काही अबाधित सिद्धांत नाही. पाळण्यात ज्यांचे पाय मुळीसुद्धा बाळसेदार नव्हते अशा मुलांनी युवावस्थेत अलौकिक चमत्कार करून दाखवले व लोकांना थक्क करून टाकल्याची उदाहरणे आहेत. गोविल गांवी किती गवशीळ घातली तरी रियासतकार गोविंद सखाराम सरदेसाई सापणार नाहीत याचे दुसरे एक कारण आहे ते असे की **रियासतकार** सरदेसाई यांचा जन्म गोविलास झाला नसून तो बडोद्यास सयाजीराव महाराजांकडे झालेला आहे. श्री. बापूसाहेब आठल्यांस श्रीमंत सयाजीरावांनी " तुमच्या खात्रिचा कोणी माणूस असेल तर बोलवा. " असा निरोप दिला. आणि बापुसाहेबांनी " तू बडोद्यास जा " असे गोविंदरावांस कळविले. त्याप्रमाणे सरदेसाई बडोद्यास रुजू झाले. बडोद्यास राजपुत्रांस शिकवण्याची सुवर्ण संधी त्यांस लाभली. बडोद्याचे सयाजीराव महाराज हे मोठे विद्याव्यासंगी होते. त्यांचे खाजगी वाचनालय फारच मोठे होते. इतिहास आणि राजकारण ह्या विषयांचे महाराजांस प्रेम होते. त्यांच्या सहवासांत अनेक ग्रंथांचे अवलोकन व परिशिलन करण्याचा योग सरदेसायांस लाभला.

इतिहास ग्रंथ वाचावेत, टिपणे करावीत, नाना प्रकाराची ऐतिहासीक माहीती जमा करावी हाच त्यांचा उद्योग होऊन बसला. त्यांच्या ऐतिहासीक टिपणांचा, इतिहासाच्या ज्ञानाचा राजपुत्रांस शिकवण्याचे उपयोग करीत असत. पण एक दिवस एक अकल्पीत योग आला. आणि इतिहास लेखक म्हणून ते जगापुढे आले. ती हकीकत फारच मनोरंजक असल्यामुळे येथे सांगणे क्रमप्राप्त आहे. " वाईकर भटजी " या गाजलेल्या कादंबरीचे लेखक श्री. रामभाऊ टिकेकर उर्फ धनुर्धारी हे एके काळी फार जाडे प्रकरण होते. त्यांचा आणि गोविंदरावांचा चांगला परिचय होता. ते एकदा कामानिमित्त बडोद्यात गेले असता त्यांनी गोविंदरावांची इतिहास विषयक टिपणे वाचली श्री. रामभाऊ टिकेकरांसारखा लेखक बडोद्यात आला हे कळताच बडोद्याच्या " सयाजी विजय " पत्राचे संपादक त्याच्याकडे आपल्या वर्तमान पत्रासाठी लेख मागण्यास गेले तेव्हा तुमच्या बडोद्यात लेखक आहेत त्यांच्या कृती का छापत नाही ? असे रामभाऊनी संपादकांना विचारले. या लेखकाचे नांव संपादकास सांगून रामभाऊ स्वस्थ बसले नाहीत. त्यांनी सरदेसायांकडून वाचावयास आणलेले एक हस्तलिखीत टिपण त्या संपादकाच्या स्वाधीन केले. " सयाजी विजय " च्या संपादकांनी ते टिपण मुद्रीत करून सरदेसायांकडे नेले. सरदेसाई आश्चर्यचकीत झाले. धनुर्धारी रामभाऊ टिकेकर पुढे त्यांना भेटल्यावर त्यांनी माझे हस्तलिखीत " सयाजी विजय " च्या संपादकास परस्पर देण्याचा उपद्व्याप तुम्हास कुणी सांगितला असे त्यांस म्हणालेही. रामभाऊ टिकेकरांचा हा उपद्व्याप महाराष्ट्र इतिहास लेखनास अत्यंत उपकारक ठरला. या

उपद्व्यापाबद्दल त्या थोर " वाईकर भटजी " चे सर्व इतिहास प्रेमी सज्जन सर्वदा आभारी राहतील यात शंका नाही.

ᘐ ᘐ ᘐ

मुसलमानी रियासत हा गोविंदराव सरदेसायांचा पहिला इतिहास ग्रंथ. ह्या ग्रंथाने इतिहास लेखनाचे पुण्याहवाचन झाले. गोविंदरावांनी इतिहास लेखनाचे हे कार्य अगदी देहांतापर्यंत अखंडीतपणे केले. नव्वदाव्या वर्षी जणू काही पुन्हा एकदा त्यात नवी उमेद आली आणि " राजा शिवाजी " हे पुस्तक त्यानी लिहून काढले व आणखी पुस्तक लिहिण्याचा संकल्प सोडला. मुसलमान रियासती पाठोपाठ मराठी रियासती आणि ब्रिटीश रियासतीचे ग्रंथ बाहेर पडले. वरील रियासती बाळाजी बाजीराव, पेशवे दप्तर खंड १ ते ४५, काही इंग्रजी इतिहास ग्रंथ मिळून रियासतकारांच्या लेखांची काही सहस्र पाने सहज भरतील. ही अपार दौलत रियासतकारांनी महाराष्ट्राकरिता ठेवली आहे. त्यांच्या लिखाणात प्रतिभेची गरूडभरारी दिसत नाही.

इतिहासाचार्य राजवाड्यांची विद्वत्ता, चिंतामणराव वैद्यांचा सर्वस्पर्शी व्यासंग, वासुदेव शास्त्र्यांची तर्ककर्कश बुद्धीपत्ता यांचे दर्शन या गोष्टी रियासतकाराच्या लिखाणात आढळून येत नाहीत. असे काही टीकाकारांचे प्रामाणिक मत झाल्याचे दिसते. आपणापाशी फार अलौकिक बुद्धीसामर्थ्य आहे असा दावा रियासतकारांनी कधी केला नाही. धुळ्यास त्यांचा सत्कार झाला त्याप्रसंगी सत्कारास उत्तर देताना जे भाषण रियासतकारांनी केले त्यात अत्यंत विनम्रपणे " I have been a common plodder in life " असे सांगून टाकले. आपल्याकडे इतिहास संशोधनाच्या क्षेत्रांत मोठमोठे वैनतेय आहेत असे प्रतिपादले जाते. पण हे सारे वैनतेय " अगच्छन् वैनतेयोऽपी पदमेकं न गच्छती " या प्रकारचे आहेत. अशा स्थिती शील वैनतेयापेक्षा पिपीलीकेप्रमाणे आयुष्यभर कष्ट करून शिखर गाठणारे फार चांगले असे म्हणणे भाग पडते.

ᘐ ᘐ ᘐ

रियातकार सरदेसाई यांचे महाराष्ट्रीय इतिहास संशोधक मंडळींशी तितकेसे सख्य नव्हते. इतिहासचार्य राजवाडे, चितामणराव वैद्य यांच्यापेक्षा बंगालचे इतिहासचार्य सर जदुनाथ सरकार यांच्याकडे त्यांचा विशेष ओढा होता असे सांगतात. हा आक्षेप अगदीच निराधार होता असे म्हणण्यात अर्थ नाही. पण त्याचबरोबर महाराष्ट्रीय इतिहास संशोधनातले अग्रगण्य हे कांहीसे मत्सरग्रस्त, परमतांबद्दल असहिष्णूभाव बाळगणारे आहेत अशी रास्त तक्रार फारा दिवसापासून लोकांच्या मनात घर करून आहे. इतिहास संशोधनाचा सूर्य हा एका ठराविक ठिकाणी प्रकाशत असतो. त्याबाहेर प्रकाश असला तरी तो उसना व परावर्तीत प्रकाश आहे ही कल्पना सुप्तरुपाने महाराष्ट्राच्या इतिहास संशोधन मंदिरातून वावरत असते. या भावनेची बरीच झळ महाराष्ट्र सारस्वतकार

विनायकराव भावे यांस लागली होती. विनायकराव भाव्यांसारख्या निर्भिड माणसाने या वृत्तीचा समाचार महाराष्ट्र सारस्वत ग्रंथात घेतला आहे. रियासतकारांच्या मृदु स्वभावाला हे जमण्यासारखे नसल्यामुळे आपल्या महाराष्ट्रीय मंडळींशी पटत नाही तेव्हा मत्रीसाठी त्यांनी परप्रांताकडे दृष्टी वळविली असावी. जदुनाथ सरकारांशी केलेली मैत्री ही रियासतकारांच्या पथ्यावरच पडली असे म्हणण्यास हरकत नाही. ह्या मैत्रीमुळे 'पयसा कमलं कमलेन पयः" असा उभयपक्षी लाभ झाला. जदुनाथ सरकारांचा मराठ्यांच्या इतिहासाविषयी पूर्वग्रह झालेला होता. तो रियासतकारांच्या समागमात अस्सल साधने त्यांस पहावयास मिळाल्यामुळे, पार पालटून गेला. रियासतकारांस कसलेल्या इतिहास लेखकांस काय काय पथ्ये पाळावी लागतात, संशोधन शास्त्रशुद्ध करावयाचे तर काय करावे लागते याचे समग्ज्ञान त्या प्रणितप्रज्ञ बंगाली इतिहासाचार्या कडून लाभले.

ॐ ॐ ॐ

भारत देशाने आणि महाराष्ट्राने रियासतकारांचा त्यांच्या हयातीत यथोचित सत्कार करून त्यांचे ऋण अल्पांशाने फेडले भारत सरकारने नुकतीच 'पद्मविभूषण' ही पदवी त्यांस सन्मानपूर्वक अर्पण केली. धुळे हे राजवाड्यांचे वसतिस्थान. धुळे संशोधन मंदिराने रियासतकारांस 'इतिहास मार्तंड' ही पदवी बहाल केली. पुणे विद्यापीठाने त्यांस 'डॉक्टरेट' अर्पण केली. अशा तऱ्हेने सन्मानपूर्वक जीवन व्यतीत केल्यानंतर ते प्रयाणासाठी सिद्ध होऊन राहिले होते. आणि अगदी शांत चित्ताने दिनांक २३ नोव्हेंबरला ते स्वर्गवासी झाले.

आज संयुक्त महाराष्ट्राचे आंदोलन महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यापर्यंत पोचले आहे. महाराष्ट्राची शिवशक्ती जागृत झाली आहे. तरी समाजातील सर्व थरांच्या उपासकांमध्ये महाराष्ट्राच्या उज्वल इतिहासाचे लोण अगदी खोलवर पसरणे आवश्यक आहे. पण तसे ते पसरले नाही. संयुक्त महाराष्ट्राच्या प्रत्येक अभिमान्यास आपला इतिहास चांगल्याप्रकारे माहीती असायला पाहीजे. रियासतकारांनी महाराष्ट्रेतिहासाची दौलत आपणास देऊन ही सोय केली आहे. संयुक्त महाराष्ट्र मिळवण्याचे सतीचे वाण आम्ही आंधळेपणाने घेतलेले नाही. आम्हाला कोणी तरी बोलवितो तसे आम्ही बोलतो आहो, संयुक्त महाराष्ट्राचा गदारोळ उगीचच आम्ही करून राहिलो आहोत असा आक्षेप ह्या चळवळीवर घेता उपयोगी नाही. महाराष्ट्राच्या शिवशक्तिच्या प्रत्येक उपासकास असे ठासून सांगता आले पाहीजे की

की घेतले व्रत न हे आम्ही अंधतेने ।
लब्ध प्रकाश इतिहास निसर्गमाने ॥

आमच्या मागे उज्ज्वल ऐतिहासीक परंपरा आहे. इतिहासाचा हा प्रकाश रियासतकारांच्या इतिहास ग्रंथातून आपणास मिळेल असा आम्हांस पक्का भरवसा वाटतो.

● ●

# बालबोध मराठीचे प्रवर्तक
# कै. विनायक कोंडदेव ओक



कै. विनायक कोंडदेव ओक

सातारच्या एका खाणावळीत जेवून, त्याच खाणावळीतल्या एका खोलीत पोर वयात सुरु केलेली लेखन कामाठी ज्यांनी पाऊणशे वयमान होईपर्यंत जरासुद्धा थांबू दिली नाही, १८८० त 'बालबोध' मासिक (टपाल हंशीलासह आकरा आणे वार्षिक वर्गणी असलेले) काढून ते सतत चौतीस वर्षे ज्यांनी एकहाती एक टाकी चालविले ते रावसाहेब विनायक कोंडदेव ओक दि. ९ ऑक्टोबर १९१४ या दिवशी परलोकवासी झाले. रावसाहेब ओकांच्या निधनाचे वृत्त कानी पडतांच महाराष्ट्र ग्रंथकारातले भिष्माचार्य गेले असे उदगार 'आनंद' मासिकाचे संपादक वासुदेवराव आपटे यांनी काढले. त्यांच्या निधनाने मराठी वाङमयाची मोठी हानी झाली. मातृभाषेवरील अमर्याद प्रीति, दांडगा व्यासंग उद्योगपरता या गुणांनी तरुणांना लाजविणारा थोर लेखक नाहीसा झाला, स्फूर्तीचा झरा आटला अशी हळहळ त्यांनी व्यक्त केली

'बालबोध' मासिकाच्या चौतीस वर्षाच्या कारकिर्दीत रावसाहेब ओकांच्या हातून चरित्रे, कविता, निबंध, शास्त्रीय माहीती मिळून जवळ जवळ ९००० पृष्ठे भरतील इतका मजकूर लिहीला गेला. याखेरीज ग्लॅडस्टन, अॅब्राहम लिंकन, सर, टॉमस मनरो, पिटर दी ग्रेट, ऑल्फ्रेड, दी ग्रेट, सॅम्युअल जॉन्सन, वॉरन हेस्टींग्ज शिकंदर बादशहा या पाश्चात्य पुरुष श्रेष्ठांची चरित्रे त्यांनी लिहीली ह्या चरीत्र ग्रंथांची पृष्ठे १५०० हून अधीक भरतील. जावजी दादाजी चौधरी, रावराजे दिनकरराव राजवाडे, हरिश्चंद्र कृष्ण जोशी यांचीही त्यांनी चरित्रे लिहिली आहेत. फ्रांसच्या राज्यक्रांतीचा इतिहास, रोमचा इतिहास, इतिहास तरंगिणी, हिंदुस्थान कथारस, हिंदुस्थानचा संक्षीप्त इतिहास ह्या ग्रंथाच्या निमित्ताने इतिहासाच्या प्रांतातही फेरफटका मारला आहे आनंदाव आणि शिरस्तेदार या कादंबऱ्या रावसाहेबांना ललीत लेखकांच्या मालीकेत बसविण्यात पुरेशा आहेत. त्यांनी मुलांकरिता क्रमिक पुस्तके लिहिली. त्यांच्या लघुनिबंधमाला व 'मधुमक्षिका' या पुस्तकाना दक्षिणा प्राईज कमिटीने पारितोषिके दिली आहेत. भगीरथ प्रयत्नाच्या या लेखणीबहाद्दराचा त्यावेळी

महाराष्ट्र भाषेचा भिष्माचार्य म्हणून गौरव व्हावा यात कांहीच नवल नाही. परंतु आजचे एक अग्रगण्य टिकाकार प्राध्यापक श्रीनिवास बनहट्टी यांनीही "रावसाहेब ओकांचे हे अवाढव्य ग्रंथकर्तृत्व पाहून आपले मन थक्क झाले. ओकांच्या या ग्रंथोत्पादनास आमच्या देशात काय पण पाश्चात्य देशातदेखील तोड मिळणार नाही" असा अभिप्राय अगदी प्राजळपणे दिला आहे.

इतक्या जबरदस्त हव्यासाचे लेखक विष्णूशास्त्री चिपळूणकर, लोकमान्य टिळक यांचे समकालीन असता त्यांच्या नावाच्या गजराने मराठीची नगरी दुमदुमली असे काही झाले नाही. जो पहावा तो शास्त्रीबुवांच्या चरणावर माथा ठेवतो, लोकमान्यांपुढे लोटांगण घालतो, त्यांच्याच लेखांची पारायणे करण्यात धन्यता मानतो असे दिसते. रावसाहेब ओकांच्या चरित्र अभ्यासकास हे कोडे उलगडत नाही.

पण त्यात अवघड काय आहे. ज्या काळखंडांत रावसाहेब वावरत होते त्या कालखंडावर शास्त्रीबोवा व लोकमान्यांचे शिक्का मोर्तब होऊन गेले होते. त्या काळांत जहाल राष्ट्रीयत्वाच्या तप्तमुद्रांच्या निशाणी अंगावर असल्यावाचून टांकीच्या घावांवाचून जनताजनार्दनाच्या देव्हाऱ्यांत कोणालाही स्थान मिळण्याजोगे नव्हते नुसत्या पांडित्यावर मोठ्या नोकरीच्या नोकझोकावर लोकांना झुलविता येण्यासारखी परिस्थिती नव्हती. रावसाहेब ओक खंदे लेखक खरे. पण टिळकांचा देशभक्तीचा खडतर मार्ग सोडून खाविंदचरणी मिलींदायमान होण्याचा सोपा मार्ग त्यांनी पत्करला होता. रावसाहेब जनता आपणास बरे कसे म्हणेल याचा विचार नकरत त्यांच्या कँडीसाहेबाहि वरिष्ठांचे बरे म्हणवून घेऊन शिक्षणखात्यांत हुद्द्यांच्या जागेवर चढले. राजनिष्ठा ही जन्माची सार्थकता त्यांनी मानली आणि इतरजनांसही त्याच राज मार्गाने जाण्याचा सतत उपदेश केला. त्यांच्या उपदेशामृताचे कांही कण नमुन्या दाखल येथे देतो.

नाविष्णुः पृथिवीपती<br>
ऐसे शास्त्रे सांगताती ।<br>
त्याचे ठायी पूज्य मति<br>
अखंडित असो द्यावी ॥<br>
हे राज्य निष्ठेचे मुख्य लक्षण<br>
ग्रंथी बोलले विचक्षण ॥<br>
त्यावरी आपुला विश्वास<br>
पूर्ण, सुज्ञजनी धरावा ॥<br>
आपला राजा प्रत्यक्ष देवो<br>
त्यावरी असावा दृढ भावो ॥<br>
त्याच्या कल्याणचा ठावो

आपण नित्य शोधावा ॥
त्याचे गुणानुवाद गावे
त्याचे संदेश शिरी वंदावे
त्याचे कल्याण नित्य
मागावे देवापाशी ॥
आपण हिंदी जनांनी नित्य
अंतर्बाह्य स्मरोनिया सत्य
इंग्लीश प्रभूचे अगत्य अगत्य
सर्व अभिष्ट चिंतावे ॥
त्यांच्या कृपामय राज्यात
आपण आहो सुखे नांदत
हा लाभ अपूर्व म्हणतात
सध्याचे सर्व शहाणे ॥

रावसाहेबांसारख्या उदंड उद्योगाच्या साक्षेपी लेखकाने या राजनिष्ठेच्या मार्गाने जाण्याचे निश्चित करावे हे खरोखर देशाचे दुर्दैव होते. रावसाहेबांसारखा दांडगा लेखक त्यावेळच्या राष्ट्रीय पक्षात सामील होता तर लोकमान्य टिळकसुद्धा साऱ्या लोकांनी त्यांची शिबिकेत बसवून मिरवणूक काढली असती. जनतेने आपल्या हृदयसिंहासनावर त्यांची प्राणप्रतिष्ठा केली असती. स्वातंत्र्याच्या अमरकथेत त्यांचे नांव नोंदले गेले असते. आणि पुढच्या पिढीतील साऱ्याजणांनी त्यांच्या नावाचा जयजयकार लोकमान्य टिळकांप्रमाणे केला असता. परंतु या बाबतीत रावसाहेबच काय पण त्यावेळचे सारे भले भले चुकले. जिथे भले भले म्हणवणाऱ्यांना भुरळ पडली तिथे रावसाहेब ओकांना तरी बोल लावण्यात काय हाशील आहे ?

रावसाहेब ओकांनी राज निष्ठेचा धोपटमार्ग पत्करला त्याला त्यांची गरीबिची गृहस्थिती हेच प्रमुख कारण असावे असे अनुमान काढण्यास बराच वाव आहे.

सरकार मायबापाविषयी त्यांच्या मनांत निष्ठा उत्पन्न होण्यास आणखी एक निमित्त कारण घडले. साताऱ्यास असतांना फुरसतीच्या वेळांत ग्रंथसंग्रहालयांत जावून ग्रंथ वाचीत आणि साताऱ्याच्या ‘ शुभसूचक ’ पत्रांत लिहीत त्यांचे लेख लोकास आवडत ग्रंथकारां-विषयी त्यांचे ठिकाणी फार ओढा होता. आपणही ग्रंथकार व्हावे, आपले नांव ग्रंथावर छापलेले पहावे, तो अनुपम आनंद भोगावा अशी आंस त्याना लागली. त्यांने वेळी दक्षिणा प्राईज कमिटी नांवाची संस्था चांगल्या मराठी पुस्तकाना पारितोषिके देत असे. या कमिटीचे मेजर टॉमस कँडी हे अध्यक्ष होते. विनायकरावानी एक पुस्तक रचून त्यावर नाव गाव न लिहीता ते दक्षिणा प्राईज कमिटीकडे रवाना केले. त्याचे हे निबंधाचे पुस्तक

कमिटीच्या पसंतीस उतरले आणि त्यास दक्षिणा प्राईज मिळाले. त्यानी या पुस्तका पाठोपाठ " मधुमाक्षिका " नावाचे दुसरे पुस्तक लिहून काढले. ह्या पुस्तकाचे कोड कौतक पहिल्या पुस्तकाहून अधिकच झाले मेजर कँडीस ते फार आवडले. आणि ही आपली पसंती आपल्या चिरंजीवाकरवी विनायकराव ओक नेवाशास मास्तर होते तेथे धाडून कळवली कँडी साहेबाच्या गुणग्राहकतेमुळे साहेब प्रत्यक्ष परमेश्वर आहे असे वाटू लागले वास्तवीक रावसाहेबानी ह्या कँडीसाहेबास डोळ्यानी प्रत्यक्ष पाहिलेही नव्हते. पण न पाहिल्या न देखल्या कँडीवर त्यांची अपरंपार भक्ती जडली ते म्हणू लागले की ' आपणास मराठी लिहिण्यास मेजर कँडीसाहेबांनी शिकवले. साहेबांच्या शिष्योत्तमाने कँडी ज्या सरकारचे आश्रीत होते त्या सरकारचे भजनी लागावे हे क्रमप्राप्त होते

इंग्रजांविषयींच्या या निष्ठेपायी रावसाहेबांनी सत्तावनचे स्वातंत्र्ययुद्ध, मूर्तीपूजा आदी गोष्टीवरही प्रहार केले. बरे, इंग्रज सरकारविषयी त्यांना वाटणारा प्रेमा जर खरा असता, इतिहासाच्या डोळस अवलोकनाने उत्पन्न झाला असता, तर ते एक वेळ क्षम्य मानले असते. पण पुष्कळ वेळा तर रावसाहेबांनी स्वतःच्या प्रामाणिक मतांशी बेईमानी पत्करून केवळ इंग्रज वरिष्ठांस खूष ठेवण्याकरिता काही विधाने केली आहेत अशावेळी तर रावसाहेबांच्या लाचारीची कीव कराविशी वाटते. एके जागी तर स्वतःच्या लाचारीची त्यांनी स्पष्ट कबुली दिली आहे.

मात्र येथवर रावसाहेबांच्या राजनिष्ठेची जी चर्चा झाली तेवढ्यावरून त्यांच्या चरित्राचे मूल्यमापन करणे ठीक नाही होणार. कारण कालमानेकरून त्यांच्या चरित्र ग्रंथाला लागलेला राजनिष्ठेचा कलंक जर सोडला तर त्यांच्या चरित्राचा शेषग्रंथ अगदी सरळ आणि सुबोध आहे. निरलसपणे केलेल्या महाराष्ट्र सारस्वताच्या सेवेचे ते सुरस आख्यान आहे. इग्रजी भाषा तरंगिणींत यथेच्छ डुंबावे. त्यांच्या देशातील पुरुष श्रेष्टांची चरित्रे अवलोकावी नि तेथल्या लोकांनी आपल्या देशाकरिता काय केले, त्यांनी केवढाली कामे केली हे आपण पाहून आपल्याकडील तरुणाना सांगावे. आणि त्यांच्या अंगी त्या पाश्चात्य पुरुषश्रेष्ठांचे काही गुण उतरतील तर पहावे म्हणून अशा प्रकाची खटपट हेच त्यांनी आपल्या जीवनाचे ध्येयवाक्य बनविले होते.

त्यांचा मुलांवर अतोनात जीव असे. त्यांच्या बालबोध मासिकाच्या पहिल्या अंकावरून लहान अर्भकाविषयी त्यांस किती कळवळा होता ते दिसून येते. ते मुलांस उद्देशून लिहितात; " शाळेत कळत नाहीत पण तुम्हाला तर कळल्या पाहिजेत अशा लक्षावधी गोष्टी आहेत. त्यातल्या थोड्या आम्ही दर खेपेस अगदी तुमच्या साध्या भाषेने सांगू. तुमच्या मनाला करमणूक व्हावी, तुमच्या आंगचे सद्गुण वाढावे आणि दिवसेंदिवस तुम्ही शहाणे आणि सुखी व्हावे हा आमचा प्रयत्न आहे. हा परमेश्वर सफळ करो " परमेश्वराने त्यांची ही विनंती बऱ्याच प्रमाणात ऐकली आणि ३४ वर्षे त्यास " बालबोध "

मासिकाकडून जनतेची सेवा करण्याची संधी दिली. हिंदी लोक चारित्र्यसंपन्न व्हावेत हा त्यांचा आग्रह होता. त्यांनी "शिरस्तेदार" नांवाची लहानच कादंबरी लिहिली आहे. त्या कादंबरीचा विषय हाच आहे. त्यात लांच खाताना पकडला गेलेला अधिकारी तुरुंगवास भोगत असतो व तो आपल्यावर ओढवलेल्या प्रसंगाची करुण कहाणी सांगत असतो. कादंबरीची सुरवात इतक्या वेधक पद्धतीची आहे की कादंबरी एकदा हातात धरली की पुरी होईतो वाचक ती खाली ठेवणार नाही

'शिरस्तेदार' कादंबरीच्या नायकाने आपण खाल्लेल्या लांचेचे वर्णन तर बहारदार केले आहे. रावसाहेबांच्या सूक्ष्म निरीक्षण शक्तिचे ते उत्कृष्ट उदाहरण आहे असे मानण्यास हरकत नाही. 'शिरस्तेदार' म्हणतो मी शिरस्तेदारीचे काम करू लागल्यावर सुमारे तीन महिन्याने पोळ्याचे बैलावरून मारामारी झाल्याचा एक खटला कचेरीत आला. वादी, प्रतिवादी दोघेही चांगले गबर होते. वादी प्रथम माझ्या बिऱ्हाडी आला आणि त्याने त्याने आपली सर्व हकीकत मला सांगितली. तिजवरून त्याच्याकडे कांही दोष नाही असे माझ्या ध्यानात आले. पण मी त्याला कायद्याची भलतीच थाप देऊन असे सुचविले की, हे प्रकरण तुम्हाला फार भयंकर आहे. संभाळा! हे ऐकताच तो घाबरून उठून गेला आणि सुमारे अर्ध्या तासाने मला एकांती गाठून त्याने मजपुढे सुमारे चाळीस रुपयांचे एक पैठणी पागोटे ठेवले आणि हात जोडून म्हणाला, ही उगाच फुलाची पाकळी आहे, माझा बचाव करून हेतू सिद्धीस न्यावा म्हणजे आणखी यथाशक्ती सेवा करीन मी त्याला आश्वासन देऊन ते पागोटे ठेवले आणि कचेरीस गेलो. तेथे खटला चालू झाला तेव्हा माझे पाय वादीकडे ओढू लागले असे पाहून प्रतिवादी घाबरला आणि त्याला तेव्हाच समजून आले की शिरस्तेदारास आपलेसे केल्या शिवाय आपणांस यश यावयाचे नाही. तेव्हा काल हरणार्थ त्याने आणखी पुरावा आणण्याचे निमित्त करून मुदत मागितली. ती आमच्या साहेबांनी दिली. दुसरे दिवशी तो प्रतिवादी मला भेटला आणि त्यानेही आपली हकीगत मला सांगितली आणि मी नको नको म्हणत असता, एक मोठी म्हैस दरवेळेस चार चार शेर दूध देणारी अशी त्याने माझ्या गोठ्यात बांधली आणि मी पांच चार मंडळीत बसलो होतो. तेथे म्हशीबद्दल साठ रुपये रोख घेऊन भरुन पावल्याची पावती दोन साक्षी घालून तिकीट लावून स्वदस्तूर सही करून आणून दिली. ती वाचल्याबरोबर तिचा आशय माझ्या लक्षांत आला ती पावती इतर मंडळींना वाचली म्हैस पाहीली ती पुष्कळ वाखाणली. नंतर आम्ही सारे उठून आपापल्या कामास गेलो. पुढे नेमल्या तारखेस खटला निघाला. उभय पक्षांचे साक्षिदार झाले वादी मनत समाजे की मी दिलेले पागोटे रावसाहेबांच्या डोक्यास आहे. तेव्हा आपला विसर त्यास पडायचा नाही. प्रतिवादी मनात म्हणे की पागोटे पोचल्यावर मी म्हैस दिली आहे तेव्हा अर्थात तिचे सार्थक होईल. असा उभयतांचा विचार चालला असता किमतीच्या महत्वानुरुप आमचे मन प्रतिवादीकडे वळले. ते पाहून वादीने मला ऐकू येण्यासारखे म्हटले, "रावसाहेब पागोट्याकडे कांही नजर असू द्या" मी ते ऐकले

न ऐकले अशावारी नेले पण प्रतिवादी जवळच उभा होता त्याने वादीचे शब्द ऐकताच म्हटले " पागोटे अडकले म्हशीच्या शिंगात " हे सर्व ऐकुण मी उगाच वाकड्या नजरेने वादीकडे पाहीले. तो काळा ठिक्कर झालेला माझ्या दृष्टीस पडला. पुढे खटला चालून साहेबांने प्रतिवादी तर्फे फैसला केला ह्या कथेला कथा वाङ्मयांत शाश्वतस्थान मिळाले पाहिजे शिरस्तेदार कादंबरीत ललीत लेखनाची सर्व बीजे दिसून येतात रावसाहेबास थोडी फुरसत मिळती तर ' शिरस्तेदार ' कादंबरी सारख्या आणखी कादंबऱ्या लिहून त्यांनी समाज सुधारणेच्या मार्गाचा अवलंब केला असता.

सोप्या सुबोध धाटणीच्या मराठी शैलीचे तर त्यांस जनकच म्हणावे लागेल मराठी भाषेवर त्यांचे अमर्याद प्रेम होते. मराठी बोलीचे जे पूर्वाचार्य आहेत त्या दादोबा पांडुरंग तर्खडकर, सदाशिव काशिनाथ छत्रे यांच्या मालीकेत रावसाहेब विनायक कोंडदेव ओक गुंफणे अवश्य आहे.

ब्रह्मविद्या जतन करून ठेवणाऱ्या ब्रह्मवेत्त्या पुरुषांचे स्मरण करून त्यांच्या संतर्पणार्थ कृतज्ञतेचे पाणी सोडण्याचा प्रघात आपल्याकडे अनेक युगांपासून आहे. त्या सर्व आचार्यांना पाणी देताना म्हणतो.

" ये सर्वे आचार्या ते सर्वे प्रीयन्ताम '

आपणा सर्वांस आपली मायबोली आपल्या प्राणाहून प्रिय आहे अशा माय बोलीला ज्यानी समृद्ध केले सुबोध शैलीचा साजशृंगार तिजवर चढवला त्यांचेही स्मरण ब्रह्मविद्या जतन करणाराप्रमाणेच आपण नित्य केले पाहीजे

हा हेतू मनांत धरून मराठी भाषेच्या भीष्माचार्यांच्या पुण्यतिथीचा योग साधून त्यांचे विषयी हे लिहीले आहे.

● ● ●

# सव्यसाची पत्रकार
# कै. तात्यासाहेब करंदीकर



कै. ज. स. करंदीकर

मृगश्रेष्ठ केसरीला मृगेंद्रता प्राप्त होत असते ती त्याच्या महाविक्रमशाली बाहुंमुळे त्यांचा कपील वर्ण, त्याची कटी आणि त्याची भव्य आयाळ ही त्याची रुपसंपदा होय. महाराष्ट्राच्या वनस्थलीत ज्याचा सिंहनाद भरून राहीला आहे त्या लोकमान्य टिळकांच्या केसरीचे सामर्थ्यही त्यांचे उजवे डावे हात समजले जाणारे संपादकीय सेनेतले दोन महापराक्रमी वीर होय. एक साहित्यसम्राट तात्यासाहेब केळकर आणि दुसरे तात्यासाहेब करंदीकर देशातील तरुणांच्या हृदयांत राष्ट्रप्रेमाची ज्वाला प्रदीप्त व्हावी ह्या उद्देशाने लोकमान्यांनी केसरी चालू केला. लोकमान्य टिळकांच्या हयातीत नांवारुपाला आलेला केसरी तात्या साहेब केळकरांच्या कारकीर्दीत 'ज्ञानाचे सदावर्त' होऊन राहीला. महाराष्ट्रातील बहुसंख्य जनतेच्या मार्गदर्शनाचे महत्वाचे कार्य कित्येक वर्षे तात्यासाहेब केळकर केसरीद्वारे करीत होते. त्यांच्याप्रमाणेच तात्यासाहेब करंदीकर हे साक्षेपी संपादक केसरीस फार दिवस लाभले लोक पक्षाची बाजू सरकारपुढे निर्भयपणे मांडण्याचे बाणेदार धोरण या संपादकानी अनेक वर्षे चालविले. केसरीच्या संपादकत्वाची वस्त्रे दुसऱ्या तरुण संपादकांच्या स्वाधीन केल्यानंतरही तात्यासाहेबांच्या लेखणीला विश्रांती मिळाली नाही. वयाला चौऱ्याऐंशी वर्षे पुरी झाली त्याच्या काही दिवस अगोदर तात्यासाहेबांचे महाभारत कथाभाग व शिकवण हे गाजलेले पुस्तक त्यानी प्रसिद्ध केले. 'द्रौपदी वस्त्रहरण' हे अनेक कवींना काव्यवस्तू होऊन राहिलेले प्रकरण प्रक्षिप्त असून कौरवांच्या दुष्टपणाला भडक रंग देण्याकरिता नंतरच्या कवीनी हा कथाभाग रंगविला आहे. असे खळबळजनक मत त्यांनी ह्या पुस्तकातच प्रतिपादले आहे. हे 'वस्त्रहरण' प्रकरण आता वर्तमानपत्राच्या स्तंभातून गाजेल, त्यावर पूर्वपक्ष, उत्तरपक्ष होतील टिकाकार व तात्यासाहेब करंदीकर यांजमधील सवालजबाब खूप रंगतील अशी लढत पहाण्याच्या सुखस्वप्नात रसिक वाचक असता तात्यासाहेबांच्या दुःखद निधनाचे वृत्त प्रसिद्ध झाले.

## हिंदुत्वाचे पुरस्कर्ते

तात्यासाहेब केळकर व तात्यासाहेब करंदीकर हे वर्तमानपत्राच्या क्षेत्रात साधारणपणे एकाच वेळी प्रवेश करते झाले. पण लोकमान्य टिळकांच्या निधनानंतर त्यांच्या राजकारणाचे केळकर हे वारसदार मानले जावू लागले. लोकप्रियता त्यांना त्यांच्या अष्टपैलू व्यक्तित्वामुळे वश होती. तात्यासाहेबांसारखा प्रतिभाशाली लेखक लोकप्रियतेच्या उधाण भरतीची अनुकुलता लाभताच, साहित्य सम्राट पदाला जावून पोचला तात्यासाहेब करंदीकर हे धोपटमार्गी असल्यामुळे केळकरांबरोबर वाटचाल करु शकले नाहीत. पण केळकरांबरोबर तुलना केल्यामुळे काकणभर कमी वाटणारे करंदीकर हे सामान्य कोटीतील लेखक आहेत असा कोणी समज करून घेऊ नये.

"जगातील क्रांतीकारक लढाया" हा त्यांचा पहिला ग्रंथ स्वतंत्र नसून भाषांतरीत होता परंतु अनुवाद करता करता त्यांच्या अंगी स्वतंत्रपणे ग्रंथ लिहीण्याची धमक आली. केसरी पत्रांत ते सुमारे १९११ पासून लिहू लागले. १९३१ मध्ये ते केसरीचे मुख्य संपादक झाले. १९४६ पर्यंत केसरी त्यांच्याच संपादकत्वाखाली निघत होता. १९४६ तील केसरी पत्राचा मोठा खप हे त्यांच्या यशस्वीतेचे गमक मानावे लागेल. त्यांच्या स्वतंत्र ग्रथात वाद विवेचन मालेत लिहीलेला 'हिंदुत्ववाद' हा ग्रंथ श्रेष्ठ दर्जाचा ठरेल. वादविवेचन मालेच्या चालकांच्या आग्रहास्तव लिहीलेल्या ह्या ग्रंथात हिन्दुत्वाचा हिरीरिने पुरस्कार केलेला आहे समाजवाद, साम्यवाद, गांधीवाद इत्यादी वादांचे डिंडीम जिकडे तिकडे वाजत असता हिन्दुत्ववादावर ग्रंथ लिहिणे हे फार अवघड कार्य होते. पण तर्कशुद्ध पद्धतीने आणि अनेक प्रमाणे देऊन त्यांनी 'हिन्दुत्ववादापुढे इतर सर्वही वाद फिके आहेत. इतर धर्मीयांनी हिन्दुधर्मातील विचारप्रणाली आत्मसात करून घ्यावी आणि दुःखमुक्त व्हावे असे हिन्दुधर्माचे तत्वज्ञान मूलग्राही व खंबीर आहे असे जोरदार प्रतिपादन केले आहे. हिन्दुधर्माविषयी त्यांच्या मनात वागत असलेली असीम भक्ती 'हिन्दुत्ववादाच्या" पानोपानी प्रतीत होते. आजच्या निधर्मी राज्याच्या जमान्यात हे पुस्तक कोणी वाचील असे वाटत नाही. परंतु त्यामुळे 'हिन्दुत्ववाद' ग्रंथाचे महत्व कमी होऊ शकत नाही.

## अभ्यासपूर्ण लिखाण

लढाऊ राजकारण किंवा जागतिक महायुद्धासंबंधी लिखाण करायचे तर ते कृष्णाजीपंत खाडीलकरांनी करावे; येरा गबाळांचे ते काम नाही असा समज फार लोकांच्या पोटात घर करून होता. कृष्णाजीपंत खाडीलकरांचा जागतिक राजकारणाचा अभ्यास दांडगा होता हे मान्य पण तात्यासाहेब करंदीकरांनी दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी युध्द् समालोचनात्मक असे जे लेख लिहीले ते खाडीलकरांच्या लढाऊ राजकारणाच्या लेखांच्या तोडीचे आहेत. हे कोणाही निःपक्षपाती वाचकास कबूल करावे लागेल. त्यांच्या

महायुद्धाविषयक लेखांचे मथळेही मोठे आकर्षक असत "जर्मन गरुडाची भरारी" ब्रह्मदेश गेला आता आसाम तरी सांभाळा "काळ्या समुद्रांतले कालकूट" "रत्नांच्या वाटणीची वाट काय" ? या मथळ्यांवरून ते लेख किती चमकदार असतील याची थोडी बहुत कल्पना येणे कठीण नाही.

भगवद्‌गीता हा तात्यासाहेब करंदीकरांचा मोठा आवडीचा विषय. लोकमान्य टिळकांचे 'गीतारहस्य" हा ग्रंथ तात्यासाहेबांस वेदाएवढा प्रमाण होता. भगवद्‌गीतेत कर्मयोग हाच प्रमुख विषय असून इतर विषय हे गौण आहेत. या गीतारहस्यकारांच्या मताचा तात्यासाहेब करंदीकरांनी "गीता तत्वमंजिरी" अथवा निर्लेप कर्मशास्त्र नांवाचा ग्रंथ लिहून पुरस्कार केला आहे. ह्या ग्रंथाची प्रथमावृत्ती १९५३ मध्ये प्रसिद्ध झाली गीतारहस्यासारखा ग्रंथ उपलब्ध असूनही गीता तत्वमंजीरी" ग्रंथाने लोकांमध्ये कुतुहल निर्माण केले व त्या ग्रंथाची दुसरी आवृत्ती प्रसिद्ध व्हावी यावरून तात्यासाहेबांच्या गीता तत्व मंजीरी ग्रंथाची योग्यता ध्यानी येईल. गीता ग्रंथ जनतेत लोकप्रिय व्हावा यासाठी पुष्कळच परिश्रम करंदीकरांनी घेतले आहेत. गीताजयंती कधी असते, तिथी खरी मानण्यास प्रमाण काय या विषयावर करंदीकरांनी लेख लिहिला असून गीता जयंतीची तिथी आता निश्चित मानण्यात येत आहे.

**सर्वगामी विद्वत्ता**

फलज्योतिष व पंचांग संशोधन हे तात्यांचे विशेष भक्तीचे विषय होते. पंचांगाचे बाबतीतही त्यांनी लो. टिळकांच्या शुद्धनिरयन पंचांगाचाच पुरस्कार केला आहे. संपादकीय लिखाण व स्वतंत्र ग्रंथ लेखन यांचा व्याप त्यांच्यामागे असूनही वार्षिक पर्जन्यमानाचे भविष्य ते प्रतिवर्षी वर्तवीत असत. अनेक वर्षे निरलसपणे हे भविष्य वर्तविल्यावर तात्यासाहेबांच्या असे लक्षात आले की त्यांनी ज्या दिवशी पाऊस पडेल असे भविष्य वर्तविले असेल तो दिवस निखालस कोरडा जावा. त्यांच्यावर झालेली ग्रहांची ही इतराजी त्यास असह्य झाली आणि त्यांनी हे भविष्य वर्तवणे बंद केले. पण ज्योतिषाचा एकदा लागलेला छंद अगदी मरण घटकेपर्यंत सुटला नाही. नुकतेच त्यांनी त्यांच्या एका मित्रास लिहिलेल्या पत्रात आपण फाल्गुनी पौर्णिमेनंतर जगत नाही असे ग्रह पाहून भविष्य वर्तविले होते व ते भविष्य खरेही झाले,

तात्यासाहेब वर्तमानपत्राच्या धकाधकीच्या मामल्यात न पडते तर कोण झाले असते असा प्रश्न विचारल्यास ते शिक्षक झाले असते. तात्यासाहेब गुरुवर्य विजापूरकरांच्या समर्थ विद्यालयात शिक्षक होते. त्यानंतर ते टिळक महाविद्यालयात इतिहास व अर्थशास्त्र या विषयांचे अध्यापक होते. मुधोळ शाळेच्या हेडमास्तरांचे काम त्यांनी केले होतेच. ते अखेरपर्यंत शिक्षकच राहते तर त्यांच्या अंगचे कांही मौलिक गुण प्रकर्षाने लोकांपुढे आलेच नसते तेव्हा शिक्षकाच्या पेशास त्यांनी रामराम ठोकला हे वर्तमानपत्राच्या

धंद्याच्या दृष्टीने चांगले झाले असेच म्हटले पाहिजे. वर्तमानपत्राचे लिखाण कसे असावे या विषयी त्यांची मते नवीन पत्रकारास पटतीलच असे नाही. वर्तमानपत्रातून सनसनाटी वृत्ते, राशिभविष्ये छापून लोकांच्या हीन अभिरुचीस शरण जावे ही कल्पनाच तात्यासाहेबांना रुचण्यासारखी नव्हती. त्यांनी स्वतः लोकांस बळेच रिझवण्यासाठी खटपट केली नाही चटकदार लिखाणाला ते शोभेच्या दारूची उपमा देत असत. ते म्हणत, 'वीस पंचवीस वर्षानंतर आपल्या वृत्तपत्राच्या व नियतकालिकांच्या जुन्या फायली चाळल्यावर त्यावेळी पुनश्च वाचण्यासारखे व संग्रही ठेवण्यासारखे जे लिखाण असेल तीच आपली वाचकांना व समाजाला खरी देणगी होईल. बाकीचे लिखाण ही शोभेची दारू. तो पेटत राहील तोपर्यंत पहाण्यांत मौज. पण एकदा ती विझून गेली की मागे काय? कोळसे व खापऱ्या! समारंभांच्या शोभेकरीता अशा दारूची गरज असतेच व त्यांत ती तयार करणाऱ्याच्या कौशल्याची तारीफ होत नाही असे नाही पण वृत्तपत्रकारानी आपण केवळ शोभेची दारू तयार करणाऱ्या कारखानदारा सारखे घटकाभर शोभेचे लिखाण करणारे न बनता पिढ्यानपिढ्या अक्षय्य टिकणाऱ्या कलाकुसरीचे काम करणारे कारागिर व्हावे! असो. सात्विक वर्तमान पत्रकारांच्या मालिकेतील श्रेष्ठ पुरुष, निर्मळ वर्तनाचा, थोर व्यासंगी साहित्यिक तात्यासाहेब करंदीकरांच्या निधनाने नाहीसा झाला आहे. त्यांच्या निधनाने रिकामे पडलेले आसन पुनश्च मंडीत होणे कठीण आहे. असे या घडीला तरी वाटते.

समाप्त

प्र. ठा. ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ३०७८९
ग्रंथ शाखा (स्थळ प्र.)
REFBK-0024521